राष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ
विदर्भ संशोधन मंडळ ग्रंथमाला, क्रमांक

संशोधनमुक्तावलि

[सर चौथा]

" डॉ. रामकृष्णपंत भांडारकर यांनी दक्षिणचा प्राचीन इतिहास हा ग्रंथ लिहून महाराष्ट्र, कर्णाटक इत्यादि प्रदेशाचा प्राचीन इतिहास उपलब्ध करून देण्याचें कार्य केलें, तसेंच कार्य म. म. मिराशी यांनी वाकाटक व कलचुरि या राजवंशाविषयीच्या आपल्या संशोधनात्मक ग्रंथांनी विदर्भ व मध्यप्रदेश या प्रदेशांच्या इतिहासाच्या बाबतींत केलें आहे. . . . .

प्रस्तुत ग्रंथांतील पहिल्या सहा लेखांत त्यांनी मेघदूतांतील रामगिरि हा नागपूरजवळील रामटेक होय हें उत्तम रीतीने सिद्ध केलें आहे. . . . त्यांचे या वादांतील प्रमुख प्रतिपक्षी श्री. वा. कृ. परांजपे यांचें विवेचन किती निराधार व भ्रामक आहे हें त्यांनी या सहा लेखांतून फार उत्तम रीतीने दाखवून दिलें आहे. "

लोकनायक डॉ. **मा. श्री. अणे**

लेखक

वा. . मिराशी

किंमत चार रुपये

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळाद्वारा पुरस्कृत

विदर्भ संशोधन मंडळ ग्रंथमाला, क्रमांक १९

संशोधनमुक्तावलि

[सर चौथा]

लेखक

महामहोपाध्याय **डॉ. वासुदेव विष्णु मिराशी,**
एम्. ए., डी. लिट्.

माजी प्राचार्य, मॉरिस कॉलेज, नागपूर, आणि
विदर्भ महाविद्यालय, अमरावती;
फेलो, न्यूमिस्मॅटिक सोसायटी ऑफ इंडिया;
प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृति या
विभागाचे अध्यक्ष, नागपूर विश्वविद्यालय.

विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर

प्रथमावृत्ति] **किमत चार रुपये** [१९६१

प्रकाशक :
श्री. दे. गो. लांडगे, बी. ए., एल्एल्. बी.
कार्यवाह, विदर्भ संशोधन मंडळ,
नागपूर १.

मुद्रक :
पां. ना. बनहट्टी, बी. एस्सी.
नारायण मुद्रणालय, धनतोली,
नागपूर १.

डॉ. यशवंत खुशाल देशपांडे,

एम्. ए., एल्एल्. बी., डी. लिट्.

यांस

सादर समर्पण

पुरस्कार

म. म. डॉ. मिराशी हे भरतखंडांतील ख्यातनाम संस्कृत पंडित आणि संशोधक आहेत. ते यावज्जन्म अध्ययन–अध्यापनाचें कार्य करीत आहेत. त्याबरोबरच संशोधन व ग्रंथलेखन करून हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाच्या निर्मितीस अत्यंत उपयोगी असें बहुमोलाचें साहित्य विद्याव्यासंगी वर्गास उपलब्ध करून देत आहेत. नागपूर महाविद्यालयांत प्राध्यापक व प्राचार्य या नात्याने त्यांनी केलेली सेवाहि फार मोलाची आहे. पण सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी आपणांस सर्वस्वी संशोधन-कार्यास वाहून घेतलें आहे. त्यांनी जें लेखन आणि जी ग्रन्थरचना केली तिची किंमत करतां येणें शक्य नाही. डॉ. रामकृष्णपंत भांडारकर यांनी अर्ली हिस्टरी ऑफ् दि डेक्कन (दक्षिणचा प्राचीन इतिहास) हा इंग्रजी ग्रंथ लिहून महाराष्ट्र, कर्णाटक इत्यादि प्रदेशाचा प्राचीन इतिहास उपलब्ध करून देण्याचें कार्य केलें, तसेंच कार्य म. म. मिराशी यांनी वाकाटक व कलचुरि या राजवंशांविषयीच्या आपल्या संशोधनात्मक ग्रंथांनी विदर्भ व मध्यप्रदेश या प्रदेशांच्या इतिहासाच्या बाबतींत केलें आहे. त्यांच्या हा महान् कार्याबद्दल सर्व भारतांतील इतिहासप्रेमी विद्वान् त्यांचे सदैव ऋणी राहतील.

प्रस्तुत ग्रंथ हा संशोधनमुक्तावलीचा चौथा ‘ सर ’ आहे. यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या तीन ‘ सरां ’त पन्नासावर लेखांचा समावेश झाला आहे आणि पृष्ठसंख्या ६५० वर गेली आहे. प्रस्तुत सरांत वीस लेख समाविष्ट केले असून त्याची पृष्ठसंख्या दोनशेंवर आहे. याशिवाय त्यांचे

इंग्रजी संशोधनपर लेखांचे दोन संग्रह प्रसिद्ध झाले असून तिसरा नागपूर विश्वविद्यालयाने प्रकाशनार्थ घेतला आहे.

प्रस्तुत ग्रंथांतील संशोधनलेखांचे विषयानुसार संस्कृत वाङ्मय, प्राचीन भारतीय कोरीव लेख आणि प्राचीन भारतीय नाणीं असे तीन वर्ग पडतात. ग्रंथकर्त्याने लिहिलेल्या हृद्गतांत वरील तीन्ही वर्गांतील लेखांची संक्षिप्त माहिती दिली आहे. तिजवरून देखील वरील लेख लिहिण्याचा हेतु व ग्रंथकर्त्याची सत्यान्वेषणाची तळमळ वाचकांस स्पष्ट दिसून येईल. 'संस्कृत वाङ्मय' या वर्गाखाली येणाऱ्या पहिल्या सहा लेखांत त्यांनी मेघदूतांतील रामगिरि हा नागपूरजवळील रामटेक होय हें उत्तम रीतीने सिद्ध केलें आहे. त्यांच्या या सिद्धांतावर आक्षेप घेणाऱ्यांच्या मतांचें त्यांनी केलेलें खंडण कोणत्याहि निराग्रही वाचकास पटण्यासारखें आहे. त्यांचे या वादांतील प्रमुख प्रतिपक्षी श्री. वा. कृ. परांजपे यांचें विवेचन किती निराधार व भ्रामक आहे हें त्यांनी या सहा लेखांतून फार उत्तम तऱ्हेने दाखवून दिलें आहे.

प्रा. मिराशींचे हे लेख वाचीत असतां माझ्या डोळ्यांसमोर पैठणच्या श्री. एकनाथ महाराजांचें चित्र उभें राहिलें. असें सांगतात की एकदा एकनाथ महाराज भर उन्हाळ्यांत गोदावरींत स्नान करून आपले मठाकडे सोवळें नेसून व हातांत पाणी भरलेला गडवा घेऊन जात असतां एका मुसलमानाच्या तरुण मुलाने त्यांना स्पर्श केला. तेव्हा ते परत नदीवर गेले आणि पुनः स्नान करून पूर्वीप्रमाणेच परत येऊं लागले. त्या खोडकर मुलाने त्यांना पुनः स्पर्श केला. ते पुनः परत नदीवर गेले व परत आले. याप्रमाणे सहादा त्याने स्पर्श केला व सहादा ते कांहीहि अपशब्द न बोलतां व आपल्या मनाची शांति न ढळूं देतां गोदावरीस स्नान करून परत आले. सातवे वेळीं मात्र त्या मुलाने त्यांना

त्रास न देतां जाऊं दिलें. असें सांगतात की हा मुलगा पुढे त्यांचा शिष्य झाला आणि त्यांच्या मठांत एखाद्या सेवकाप्रमाणें काम करून कांही काळ झाल्यावर तो त्यांच्या अनुग्रहास पात्र झाला.

मला अशी उमेद वाटते की म. म. मिराशींचे हे सहा लेख वाचल्यानंतर परांजपे किंवा टिकेकर यांचे मतांत इष्ट परिवर्तन होऊन ते त्यांचे शिष्य जरी न झाले तरी प्रशंसक बनतील आणि वाङ्मयीन संशोधन कार्यास लागणारी निरभिमानता, सत्यान्वेषणतत्परता आणि शांति यांचे धडे शिकून ते स्वत:च्या संशोधनांत अपरिमित यश संपादितील. वाङ्मयक्षेत्रांत मिराशी यांनी या वादांत सौजन्य व क्षमाशीलत्व दाखविलें आहे तें पाहिलें म्हणजे ‘ शान्तिजलधि ’ ही पैठण-क्षेत्रींच्या एकनाथमहाराजांची पदवी एखाद्या साहित्यसम्राटाने त्यांनाहि अर्पण करणें उचित होईल.

त्यांचे सर्वच लेख माहितीपूर्ण आहेत आणि वाचकांस संशोधनाची दिशा दाखविणारे आणि मार्गदर्शन करणारे आहेत. त्यांच्या हातून मानवी ज्ञानाचे निधींत भर घालण्याचें महाबुद्धिमत्तेचें व वाङ्मयतपस्येचें कार्य दीर्घकाल अव्याहतपणें चालो आणि त्याकरिता परमेश्वर त्यांस उदण्ड आयुष्य व सुदृढ प्रकृति देवो अशी प्रार्थना करून आणि प्रस्तुत-कालीन ‘ शान्तिजलधि ’ ग्रंथकर्ते म. म. मिराशी यांस अभिवादन करून मी हा पुरस्कार पुरा करतों.

नागपूर,
ता. ३–१२–१९६१

माधव श्रीहरि अणे

लेखकाचें हृद्गत

तीन वर्षांपूर्वी माझ्या संशोधनपर लेखांचा आणखी एक संग्रह 'संशोधनमुक्तावलि : सर तिसरा' या नांवाने प्रसिद्ध झाला. अनेक विद्वान् परीक्षकांनी त्याची प्रशंसा केली व आणखी तसे लेख प्रकाशित व्हावे, अशी इच्छा व्यक्त केली. तदनुसार विदर्भ संशोधन मंडळ हा चौथा 'सर' प्रकाशित करीत आहे.

प्रस्तुत 'सरां'त वीस लेख असून ते 'संस्कृत वाङ्मय', 'प्राचीन भारतीय कोरीव लेख' आणि 'प्राचीन भारतीय नाणीं' या तीन विभागांत संगृहीत केले आहेत. दुसऱ्या 'सरा'च्या प्रकाशनानंतर कविकुलगुरु कालिदासाच्या मेघदूत काव्यांतील रामगिरीच्या भौगोलिक स्थानाबद्दल वाद उत्पन्न झाला. म्हणून 'मेघदूतांतील रामगिरि अर्थात् रामटेक' हें पुस्तक प्रकाशित करून मी त्या वादाची सविस्तर चर्चा केली आणि उपलब्ध असलेल्या भक्कम वाङ्मयीन व कोरीव लेखांच्या पुराव्यावरून रामगिरि हा विदर्भांतील रामटेकच होय हें सिद्ध केलें. त्यानंतर श्री. वा. कृ. परांजपे यांनी रामगिरि म्हणजे पूर्वीच्या सरगुजा संस्थानांतील रामगड हें आपलें मत पुनः प्रतिपादन केलें आणि प्रा. शेंबवणेकर यांनी तो पर्वत म्हणजे नाशिकच्या उत्तरेचा रामशेज, असें आपलें मत पुढे मांडलें. प्रस्तुत संग्रहांतील पहिल्या पांच लेखांत या दोन्ही मतांचें चिकित्सक रीतीने परीक्षण करून खंडण केलें आहे.

सहाव्या लेखांत जैन वाङ्मयांत रामगिरीविषयीं काय माहिती मिळते व ती रामटेकपक्षाला कशी उपोद्बलक आहे तें दाखविलें आहे. त्यानंतरच्या लेखांत मेघदूतांत वर्णिलेल्या देवगिरीचें स्थान निश्चित केलें आहे. श्री. वा. कृ. परांजपे यांनी अलीकडे प्रकाशित केलेल्या 'Fresh Light on Kālidāsa's Meghadūta' या पुस्तकांत कालिदासाचें जन्मस्थान छत्तीसगडाच्या बिलासपूर जिल्ह्यांतील मालडा या गावीं होतें असें विलक्षण मत प्रतिपादिलें होतें. त्याचें सविस्तर परीक्षण आठव्या लेखांत करून तें कसें बिनबुडाचें आहे, हें दाखविलें आहे. त्यानंतरच्या लेखांत भीष्म पितामहांच्या विवाहितत्वाच्या प्रश्नाची चर्चा केली आहे. या विभागांतील शेवटच्या लेखांत वैदर्भ संस्कृत कवि त्रिविक्रमभट्ट याच्याविषयीं नवीन माहिती दिली आहे.

दुसऱ्या विभागांत प्रथम पंढरपूरचा शिलालेख आणि जवखेड्याचा ताम्रपट यांतील कांही प्रश्नांची चर्चा करून नंतर कोंकणांतील शिलाहारनृपति मुम्मुणि याचा ताम्रपट, विदर्भांतील कृष्णदेव याचा शिलालेख आणि मराठवाड्यांतील रामचंद्र ऊर्फ रामदेवराव यादव याचा पुरुषोत्तमपुरी ताम्रपट असे महाराष्ट्राच्या प्रमुख विभागांतील तीन कोरीव लेख पूर्णपणें देऊन त्याचें सविस्तर विवेचन केलें आहे. या लेखांत त्या त्या विभागांतील अनेक भौगोलिक नांवें व इतर माहिती आली असल्यामुळे तेथील वाचकांस हे लेख महत्त्वाचे वाटतील अशी आशा आहे. त्यानंतरच्या एका लेखांत मध्यप्रदेशांतील प्राचीन काळची शूर राणी दुर्गावती हिचा पति गोंड राजा दलपतशहा याचा उपलब्ध झालेला एकच एक शिलालेख संपादिला आहे. महाराष्ट्रांत झाशीच्या राणीविषयीं जसा अभिमान व आदर आहे तसाच हिंदीभाषी लोकांस राणी दुर्गावतीविषयीं वाटतो. त्यामुळे हा लेखहि वाचकांस महत्त्वाचा वाटेल अशी आशा आहे.

मराठींत प्राचीन भारतीय नाण्यांविषयीं फारच थोडें लिखाण झालें आहे. म्हणून प्रस्तुत पुस्तकाच्या शेवटच्या विभागांत महाराष्ट्र व मध्यप्रदेश यांत सापडलेल्या प्राचीन नाण्यांविषयी तीन लेख घातले आहेत. त्यांत सातवाहन, क्षत्रप आणि चालुक्य या प्राचीन राजवंशांच्या नाण्यांविषयी महत्त्वाची माहिती आढळेल. महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं प्राचीन नाणीं मधून मधून सापडतात, पण त्यांच्या ऐतिहासिक महत्त्वाविषयी लोकांस कांहीच कल्पना नसल्यामुळे तीं वितळविलीं जाऊन प्राचीन भारतीय इतिहासाचें अपरिमित नुकसान होतें. प्रस्तुत पुस्तकांतील या सचित्र लेखांमुळे याविषयी जनतेंत कुतूहल उत्पन्न होऊन अशा नाण्यांचा संग्रह करून तीं प्रकाशित करण्याची प्रवृत्ति वाढेल अशी आशा आहे.

विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी दीपलक्ष्मी मासिकाच्या फेब्रुवारी १९६१ च्या अंकांत प्रकाशित केलेला 'काली मेघदूत लिही' हा लेख अलीकडे माझ्या अवलोकनांत आला. मेघदूतांत उल्लेखिलेला रामगिरि हा रामटेकच होय ही समजूत विदर्भांतील अगदी खालच्या थराच्या जनतेंतहि अद्यापि कशी दृढमूल आहे हें त्यायोगें सुस्पष्ट होतें. म्हणून त्यांच्या अनुज्ञेने तो लेख एका परिशिष्टांत दिला आहे. त्यावरून या प्रश्नाविषयीं आता मुळीच संशय राहणार नाही, असें वाटतें. तो लेख प्रस्तुत पुस्तकांत घालण्याकरिता श्री. शेंडे यांनी संमति दिली, याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

संशोधनमुक्तावलीच्या पहिल्या तीन सरांस न्यायमूर्ति डॉ. भवानीशंकर नियोगी यांनी आपल्या विद्वत्तापूर्ण पुरस्कारांनी भूषविलें होतें. या खेपेस ते नेत्रव्याधीने पीडित असल्यामुळे प्रस्तुत 'सरा'स त्यांच्या पुरस्काराचा लाभ झाला नाही. परमेश्वरकृपेने ते लौकरच या व्याधींतून पूर्णपणें बरे होवोत, असें इच्छितों.

डॉ. नियोगी यांच्या प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे प्रस्तुत ग्रंथास पुरस्कार लिहिण्याविषयीं कोणास विनंती करावी या विवंचनेंत होतों तों लोकनायक बापूजी अणे कांही कामानिमित्त नागपुरीं आल्याचें समजलें. तेव्हा त्यांना याविषयीं विनंती केली. त्यांनीहि ती आनंदाने मान्य करून अल्पावधींत पुरस्कार लिहून दिला याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. पूज्य बापूजींनी माझ्या संशोधनकार्याबद्दल सदैव आपुलकी दाखविली आहे. प्रस्तुत ग्रंथास आपल्या पुरस्काराने भूषवून त्यांनी मला अधिकच उपकृत केलें आहे. याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

प्रस्तुत 'सर' विदर्भाचे मान्यवर संशोधक डॉ. यशवंत खुशाल देशपांडे यांस सादर अर्पण केला आहे. विदर्भांत ज्यांनी संशोधन-कार्याला आरंभ केला त्यांत डॉ. आप्पासाहेबांचें स्थान प्रमुख आहे. अद्यापि—वयाला ऐशीं वर्षें होत आलीं असतांहि—ते संशोधन कार्यांत सदैव व्यापृत असतात. त्यांचा माझा परिचय सुमारें तीस वर्षां-पूर्वी प्रथम झाला व पुढे त्याची स्नेहांत परिणति झाली. त्यांची विद्वत्ता सौजन्य, निरंहकारी वृत्ति इत्यादि गुणांबद्दल मला वाटत असलेला नितान्त आदर मी हें पुस्तक त्यांस अर्पण करून व्यक्त करीत आहे.

प्रस्तुत पुस्तकांत घातलेल्या रामगडच्या मूर्तींचे फोटो नागपूर संग्रहालयाच्या व ब्लॉक 'नवभारत' मासिकाच्या अधिकाऱ्यांच्या कृपेने, तसेंच नाण्यांचे ब्लॉक न्यूमिस्मॅटिक सोसायटीच्या जर्नलचे संपादक डॉ. नारायण यांच्या कृपेने मिळाले. याबद्दल मी त्या सर्वांचा आभारी आहे.

प्रस्तुत पुस्तकांतील कांही लेख यापूर्वी मासिकांत प्रसिद्ध झाले होते. त्यांच्या संपादकांनी त्या लेखांच्या पुनर्मुद्रणास अनुमति दिली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

हें पुस्तक विदर्भ संशोधन मंडळाने प्रकाशनार्थ स्वीकारलें, याबद्दल मी त्याचा अत्यंत ऋणी आहे. हें प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळाच्या उदार देणगीने शक्य झालें, याबद्दल त्याचेहि मनःपूर्वक आभार मानतों.

शेवटीं नारायण मुद्रणालयाचे संचालक श्री. पां. ना. बनहट्टी यांनी आपल्या छापखान्याच्या कीर्तीस अनुरूप अशा रीतीने हें पुस्तक अल्पावधींत छापून दिलें याबद्दल त्यांचेहि आभार मानले पाहिजेत.

नागपूर
१ डिसेंबर १९६१ } वा. वि. मिराशी

शुद्धिपत्र

पृष्ठ १४७ वर लेखाच्या शीर्षकांत 'शके १२१२' याबद्दल 'शके १२३२' असें वाचावें.

अनुक्रमणिका

सूचना—दुसऱ्या विभागांतील पृष्ठें १२३ ते १४१ आणि १५८ ते १७२ यांवर दिलेल्या कोरीव लेखांचें वाचन करतांना खालील संकेत ध्यानांत ठेवावे—

(१) चौकोनी [ ] कंसांतील अक्षरें अस्पष्ट आहेत असें समजावें.

(२) चौकोनी कंसांतील अक्षरें तारकांकित [*] केलीं असल्यास तीं मूळांत नाहीत किंवा नष्ट झालीं आहेत व म्हणून संपादकाने सुचविलीं आहेत असें समजावें.

(३) वाटोळ्या ( ) कंसांतील अक्षरें मूळच्या अशुद्ध अक्षरांच्या जागीं शुद्ध म्हणून सुचविलीं आहेत, असें समजावें.

संशोधनमुक्तावलि

सर चौथा

संशोधनमुक्तावलि

सर चौथा

संस्कृत वाङ्मय

१. रामगडच्या मूर्ति*

श्री. वा. कृ. परांजपे यांनी अलीकडे प्रकाशित केलेल्या ' मेघदूतावर नवा प्रकाश ' या पुस्तकांत पूर्वीच्या सरगुजा संस्थानांतील रामगड हाच कविकुलगुरु कालिदासाच्या मेघदूतांत वर्णिलेला रामगिरि हें सिद्ध करण्याकरिता त्या पर्वतावरील गुहेंतील मूर्तींचा प्रमाण म्हणून उपयोग केला आहे. या मूर्ति राम, लक्ष्मण व सीता यांच्या आहेत असें त्यांचें म्हणणें आहे. मध्ये राम, त्याच्या डाव्या बाजूस लक्ष्मण आणि उजव्या बाजूस सीता अशा रीतीनें या मूर्ति बसविल्या आहेत. सामान्यतः रामाच्या डाव्या बाजूस सीतेची मूर्ति असते, पण येथें ती त्याच्या उजव्या बाजूस आहे हें त्या मूर्तींच्या अत्यंत प्राचीनत्वाचें गमक आहे असें ते मानतात आणि त्यावरून रामगड हें स्थल फार प्राचीन आहे असें अनुमान करतात. पूर्वीच्या मध्यप्रांताच्या छत्तीसगडांतील संस्थानांच्या गॅझेटियरमध्ये या मूर्तींचे फोटो दिले होते तेहि त्यांनी आपल्या पुस्तकाच्या पृ. १६२ वर दिले आहेत.

---

* नवभारत, मार्च १९५९.

रामगडावरील मूर्तींविषयीं पूर्वीचीं मतें

श्री. परांजपे यांनी स्वतः या मूर्ति पाहिल्या नाहीत. इतरांच्या वर्णनावर त्यांची भिस्त आहे. या मूर्तींना वस्त्रें नेसवून मग फोटो घेतले आहेत. त्या फोटोंवरूनहि ते जिला सीता समजतात त्या मूर्तीच्या हातांत कमंडलु कां अशी शंका 'सकाळ' (ता. २८-९-५८) मध्ये त्यांच्या पुस्तकाचें परीक्षण करणाऱ्या गृहस्थांनी व्यक्त केली आहे. यापूर्वी दोघा गृहस्थांनी या मूर्ति पाहून त्यांचें वर्णन लिहून ठेवलें आहे. सन १८७४-७५ मध्ये कनिंग्घामचा मदतनीस बेग्लर हा रामगडास गेला होता. त्यानें रामगडचें सविस्तर वर्णन कनिंग्घामच्या आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ् इंडिया रिपोर्ट्स्, व्हॉ. १३, पृ. ३१-५५ मध्ये केलें आहे. त्यांत या मूर्तीविषयीं तो म्हणतो, सीतेची म्हणून जी मूर्ति दाखविली जाते ती गंगेची किंवा दुसऱ्या एखाद्या नदीची असावी. तिच्या उजव्या हातांत कमंडलु आहे. मधली मूर्ति इंद्राची किंवा बहुधा शिवाची असावी. तिच्या एका हातांत त्रिशूल आणि मस्तकावर सर्पांच्या फणा आहेत. वज्रामुळे या मूर्तीला इंद्र म्हणावें तर तिच्या डोकीवर सर्पांच्या फणा कशा, असा प्रश्न बेग्लरला पडला. तेव्हा ती शंकराची असावी असा तर्क त्यानें केला. तथापि इंद्राच्या मूर्ति क्वचितच आढळत असल्यामुळे ही कदाचित् इंद्राची असावी असेंहि त्यास वाटलें. शेवटची मूर्ति—जी लक्ष्मणाची आहे असें श्री. परांजपे म्हणतात ती—रामाची होय असें बेग्लरने ओळखलें, कारण तिच्या डाव्या बाजूस हनुमानाची मूर्ति दिसते. त्यावरून त्या मूर्तीविषयीं संशय राहात नाही. यानंतर सन १९०५ मध्ये श्री. इ. बी. कॉब्डन रॅम्से, आय्. सी. एस्., या गृहस्थांनी रामगडला भेट दिली. त्यांनी त्या स्थलाचें बऱ्याच विस्तारानें वर्णन केलें आहे, तें पूर्वोक्त छत्तीसगडमधील संस्थानांच्या गॅझेटियर मध्ये दिलें आहे (पृ. २३०-२३२). या गृहस्थांना भारतीय शिल्पशास्त्राचें मुळीच ज्ञान नव्हतें. तेथल्या लोकांनी त्या मूर्ति अनुक्रमें सीता, राम व लक्ष्मण यांच्या आहेत म्हणून सांगितलें व तें खरें मानून त्यानें तसें लिहून ठेवलें. श्री. परांजपे यांनी बेग्लरचा वृत्तांत पाहिला होता असें त्यांच्या पुस्तकावरून दिसतें; तथापि त्यांना कॉब्डेन-रॅम्सेचें मत स्वीकारतांना कांही शंका आलेली दिसत नाही. उलट तेथील स्त्रीची मूर्ति सीतेची मानून ती

रामाच्या उजव्या बाजूस असल्यामुळे या तिन्ही मूर्ति अत्यंत प्राचीन आहेत असें अनुमान करून 'रामगड हा मेघदूतांतील रामगिरि' हें आपलें मत बळकट करण्याकरिता त्यांनी त्याचा उपयोग करून घेतला आहे.

श्री. परांजपे यांच्या 'रामगड हाच रामगिरि' या मताचें चिकित्सक रीतीने परीक्षण करतांना या मूर्तींच्या पुराव्याकडे माझें लक्ष गेलें. त्यांच्या पुस्तकांत दिलेल्या फोटोंत मूर्ति वस्त्रावृत दिसत असल्याने त्या ओळखणें कठीण होतें. तथापि सीतेच्या हातांत कमंडलु कसा आणि रामाच्या डोक्यावर सापाच्या फणा कां, या शंका मनांत आल्याच. त्यांचें निराकरण करण्याकरता मूळ शिल्पांचे फोटो अभ्यासिणें जरूर होतें. सुदैवाने नागपूर संग्रहालयाचे क्युरेटर डॉ. शं. श्री. पटवर्धन आणि असिस्टन्ट क्युरेटर श्री. वि. प्र. रोडे हे कांही महिन्यांपूर्वी रामगडला गेले होते व त्यांनी तेथील मूर्तींचे फोटोहि घेतले होते. ते त्यांनी मला दिले. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. ते फोटो या लेखाच्या सोबत छापले आहेत.

मधली मूर्ति बळरामाची

या फोटोंच्या साहाय्याने आपण या मूर्तींचा अभ्यास करूं. मधली मूर्ति इंद्राची, शंकराची किंवा रामाची नसून बळरामाची आहे. बळरामाची मूर्ति कशी असावी याविषयी वैखानसागमांत पुढील वर्णन दिलें आहे—

अथ बलभद्ररामं मध्यमदशतालमिति द्विभुजं त्रिनतं दक्षिणहस्तेन मुसलधरं वामेन हलधरं श्वेताभं रक्तवस्त्रधरमुद्बद्धकुन्तलं दक्षिणे रेवतीं देवीं पद्मकिञ्जल्कवर्णां पुष्पाम्बरधरां दक्षिणेन हस्तेन पद्मधरां प्रसारितवामहस्तामेवं कारयेत् ।* यांत म्हटलें आहे की बळरामाची मूर्ति मध्यम दशताल उंचीची द्विभुज, त्रिभंगी असावी. तिच्या उजव्या हातांत मुसळ व डाव्या हातांत नांगर असावा. बळरामाचा वर्ण गोरा व वस्त्र लाल असावें. त्याचे केस वर बांधलेले असावे. त्याच्या उजव्या बाजूस त्याची पत्नी रेवती कमलतंतूप्रमाणे

---

* Gopinath Rao, Elements of Hindu Iconography, Vol. I, Part II, Appendix, p. 44.

वर्ण असलेली, फुलांच्या आकृति ज्यावर आहेत असें वस्त्र नेसलेली अशी असावी. तिच्या उजव्या हातांत कमल असावें आणि डावा हात पसरलेला असावा.

वराहमिहिराच्या बृहत्संहितेंत बलरामाच्या मूर्तीचें पुढील वर्णन आलें आहे.


बलदेवो हलपाणिर्मदविभ्रमलोचनश्च कर्तव्यः ।
बिभ्रत्कुण्डलमेकं शङ्खेन्दुमृणालगौरवपुः ॥

यामध्ये बलरामाच्या एकाच कानांत कुंडल असावें असें एक अधिक लक्षण सांगितलें आहे.

सोबतच्या प्लेट मधील मधल्या मूर्तीचें निरीक्षण केलें असतां तिच्या बाबतींत बलरामाच्या मूर्तीचीं बरीचशीं लक्षणें जुळतात हें दिसून येईल. मुख्य लक्षण हें की त्याच्या उजव्या हातांत नांगर (बेग्लर म्हणतो त्याप्रमाणे वज्र नव्हे) व डाव्या हातांत मुसळ (त्रिशूळ नव्हे) आहे.† दोन्ही कानांत कुंडलें व डोक्यावर रत्नजडित किरीट मुकुट आहे. गळ्यांत अनेक अलंकार व पुष्पमाला आहेत. बाहूंवर अंगद, हातांत कडें, पायांत वाळा व चाळ आहेत. त्याचें अधोवस्त्र गुडघ्यापर्यंतच आलें असून तें कमरेंत रशनेने बांधलें आहे आणि त्याचा सोगा पुढे सोडला आहे. बळराम हा शेषाचा अवतार होता म्हणून तन्निदर्शक शेषाची फणा त्याच्या डोक्यावर दाखविली आहे. या सर्व लक्षणांवरून ही मूर्ति श्री. परांजपे म्हणतात त्याप्रमाणे रामाची नसून बलभद्ररामाची (बळरामाची) आहे यांत मुळीच संशय नाही.

---

† वैखानसागमांतील हातांतील या आयुधांचें वर्णन उलटें आहे. पूर्वीच्या ग्वाल्हेर संस्थानांतील तुमैन (प्राचीन तुंबवन) येथे सापडलेली ब रामाची मूर्ति वैखानसागमांतील वर्णनास अनुसरून आहे. श्री. ग. ह. खरे यांच्या 'मूर्तिविज्ञान' ग्रंथांतील पृ. ४६ च्या समोरचें बळरामाचें चित्र पाहा.



रेवती



बलराम

प्लेट १ – रामगडच्या मूर्ति

[नागपूर संग्रहालयाच्या कृपेने]



राम

बळरामाच्या उजव्या बाजूची मूर्ति रेवतीची

बळरामाच्या उजव्या बाजूची मूर्ति सीतेची होय असें श्री. परांजपे म्हणतात व ती रामाच्या उजव्या बाजूस असल्याने या मूर्ति अत्यंत प्राचीन (कालिदासाच्या ?) काळीं बसविल्या असाव्या असें अनुमान करतात. त्यांचीं या बाबतींतलीं विधानें व अनुमानें, मधली मूर्ति बलरामाची ठरल्या- मुळे, फोल झालीं आहेत. या स्त्रीच्या हातांत कमंडलु असल्यामुळे ती गंगे- सारख्या एखाद्या नदीची असावी असा बेग्लरचा तर्क होता. पण तसें असतें तर त्या नदीचें लांछन मूर्तीच्या पीठावर कोरलें असतें. गंगेच्या पीठावर मकर व यमुनेच्या पीठावर कांसव अशीं त्या त्या नद्यांचीं लांछनें कोरलीं असतात. तसें कोणतेंहि लांछन या मूर्तीच्या पीठावर नाही. तेव्हा ती कोणा नदीची दिसत नाही. बळरामाच्या उजव्या बाजूचें तिचें स्थान आरंभापासूनचें असल्यास ती मूर्ति बळरामाची स्त्री रेवती असावी. मागे वैखानसागमांतील उतारा दिला आहे त्यांत ‘ दक्षिणे रेवतीं ’ बळरामाच्या उजव्या बाजूस रेवतीची मूर्ति असावी, असें म्हटलें आहे. तिच्या उजव्या हातांत कमळ असावें व डावा हात पसरलेला असावा असेंहि वैखानसागमांत म्हटलें आहे. हीं लक्षणें मात्र प्रस्तुत मूर्तीच्या बाबतींत जुळत नाहीत. शिल्पकाराने बळरामाची मूर्ति करितांना जसे कांही फरक केले आहेत तसेच याहि मूर्तीच्या बाबतींत केले असावे.

या मूर्तीच्या डोक्यावर किरीट व मागे तेजोवलय दाखविलें आहे. दोन्ही कानांत प्राचीन पद्धतीचीं कुंडलें आहेत. गळ्यांत रत्नजडित कंठ्या व हार आहेत. बाहूंवर व हातांत अलंकार दाखविले आहेत. डाव्या हातांत कमंडलु आहे, उजव्या हातांतली वस्तु रुद्राक्षमाला असावी, असा बेग्लरचा तर्क होता, पण तिची घडण दोरीसारखी दिसते. तेव्हा तो पाश असावा. प्राचीन काळच्या देवींच्या मूर्तींच्या हातांत कमंडलु व पाश दाखविण्याची पद्धति होती. तसें येथे केलेलें दिसतें. या मूर्तीचें अधोवस्त्र जवळ जवळ घोट्यापर्यंत आलें आहे. पायांत वाळे व चाळ आहेत.

तिसरी मूर्ति रामाची

तिसरी—बळरामाच्या डाव्या बाजूस असलेली—मूर्ति, श्री. परांजपे म्हणतात त्याप्रमाणे, लक्ष्मणाची नसून रामाची आहे. रामाच्या शिरावर किरीट मुकुट व मागे तेजोवलय आहे. उजव्या हातांत शंख आणि डाव्या हातांत धनुष्य आहे. उजव्या बाजूस खाली टोक केलेले तीन बाण दाखविले आहेत. गळा, बाहू, हात, पाय यांचे अलंकार, तसेंच नेसलेलें वस्त्र बळरामाच्या मूर्तीच्या प्रमाणें आहेत. रामाच्या डाव्या बाजूस सीतेची लहान मूर्ति किरीटधारी व विविधालंकारयुक्त दाखविली आहे. तिच्या उजव्या हातांत चक्र व डाव्या हातांत नालयुक्त कमल दिसतें. हात, पाय, गळा वगैरेंचे अलंकार रेवतीच्या मूर्तीप्रमाणे आहेत. रामाच्या उजव्या बाजूस हनुमान हात जोडून बसलेला दाखविला आहे. मूर्तींच्या महत्त्वाप्रमाणे त्यांचे आकार दाखविण्याची पद्धत होती. म्हणून रामाची मूर्ति सर्वांत मोठी, सीतेची त्याच्या अर्ध्या आकाराची व हनुमानाची सर्वांत लहान अशी दाखविली आहे.

या मूर्तीवरून रामगड हा रामगिरि होय–हें सिद्ध होत नाही

या मूर्ति त्यांची घडण, अलंकार वगैरेवरून मध्ययुगीन दिसतात. त्यांमध्ये शिल्पकाराने रामगडच्या समंतात् भागांत दिसणाऱ्या आदिवासी लोकांच्या चेहऱ्यांचें अनुकरण केलेलें दिसतें. अर्थातच त्यांवरून रामगडच्या प्राचीनत्वाविषयीं किंवा कालिदासाच्या मेघदूतांतील रामगिरीशीं त्याच्या ऐक्याविषयीं कोणतेंहि अनुमान काढणें शक्य होणार नाही. तेथे रामसीतांची मूर्ति असल्यामुळे रामगडला रामगिरि म्हणावयाचें तर तेथेच बलराम–रेवती यांच्याहि मूर्ति असल्यामुळे त्याला गोकुळांतील गोवर्धनगिरिहि कां म्हणूं नये ? अनुमानच काढावयाचें असल्यास रामसीतांच्या किरीटधारी मूर्तीवरून ते मेघदूतांत वर्णिल्याप्रमाणे वनवासांत असतांना रामगडवर राहिले नसून राज्यारोहणानंतर तेथे गेले होते असें म्हणावें लागेल.

तेव्हा या मूर्तीवरून पूर्वीच्या सरगुजा संस्थानांतील रामगड हा मेघदूतांतील रामगिरि होय या श्री. परांजपे यांच्या मताला यत्किंचित्‌हि दुजोरा मिळत नाही, हें येथील विवेचनावरून स्पष्ट होईल अशी आशा आहे.

२. मेघदूतांतील रामगिरीचा शोध*

' वसंत ' मासिकाच्या जानेवारी १९५९ च्या अंकांत श्री. श्री. रा. टिकेकर यांनी ' रामगिरीचा वाद ' या शीर्षकाचा लेख प्रसिद्ध केला आहे. त्यांत श्री. वा. कृ. परांजपे यांच्या अलीकडे प्रसिद्ध झालेल्या ' मेघदूतावर नवा प्रकाश ' या ग्रंथाचा परिचय करून देतांना मेघदूतांत वर्णिलेला रामगिरि हा मध्यप्रदेशाच्या पूर्वीच्या सरगुजा संस्थानांतील रामगड होय या त्यांच्या मताचा उल्लेख करून श्री. टिकेकर म्हणतात, ' आमचें मत असें झालें आहे की रामगड हा रामगिरि नसेल कदाचित्, पण रामटेक मात्र रामगिरि खास नव्हे. श्री. परांजपे यांचा प्रकाश रामटेकला अधिक विदारक झाला आहे. ' आपल्या विधानाच्या समर्थनार्थ त्यांनी घेतलेले आक्षेप पुढीलप्रमाणे आहेत :

(१) ' रामगिरिस्वामिनः पादमूलात् ' या ताम्रपटीय आधारावर महामहोपाध्याय मिराशींनी रामटेकला रामगिरि ठरविलें आहे. पण ' रामगिरिस्वामी ' हे कोणी ' गिर ' गोस्वामी (गोसावी) याचें नांव असेल. दाशरथी रामाला रामगिरिस्वामी असें आणखी कोठे म्हटलें आहे काय ? स्वामी हा बहुमानार्थी शब्द विशेषनामानंतर उपयोजतात (जसें रामदासस्वामी, अक्कलकोटकरस्वामी); तेव्हा रामगिरिस्वामी याचा अर्थ राघव–रामाकडे, रघुपतिकडे, कसा घ्यावयाचा ?

(२) भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकांत (वर्ष ३, पृ. ९३) हा ताम्रपट प्रसिद्ध झाला आहे. तेथे या उल्लेखाचा अनुवाद ' रामगिरि येथील स्वामींच्या (प्रभु रामचंद्राच्या नव्हे) पादमूलाहून ' असाच केला आहे.

(३) समग्र ताम्रपटहि ' वेवन्दस्वामीलिखित ' असल्याचा निर्देश त्याच ताम्रपटांत उपान्त्य ओळींत आहे. रामगिरिस्वामीचा हा कोणी शिष्य असावा.

---

* वसंत, फेब्रुवारी १९५९.

(४) रामटेक येथे लक्ष्मणाचें मंदिर आहे. पण रामाचें मंदिर मागाहून कोणीतरी बांधलेलें दिसतें; त्यांतील मूर्ति मात्र जुन्या असाव्या असा म. म. मिराशींचा तर्क आहे. पण काळेकृत नागपूर प्रांताचा इतिहास, पृ. ७३ वर म्हटलें आहे की 'पहिल्या रघुजीने आपणांस यश आल्यास रामटेकच्या गडावर श्रीरामाच्या मूर्ति बसवूं व देवालय बांधूं असा नवस केला होता.' त्यावरून रामटेकला श्रीराममंदिर नव्हतें, असेंच दिसतें. मग लक्ष्मणाचें कसें असेल ?

(५) रामटेकवर सीतेची न्हाणी आहे; पण रामाची मूर्ति नाही; देऊळहि नाही. नुसत्या पादुकांची पूजा प्राचीन काळापासून चालू राहण्याचें कारण सबळ असलें पाहिजे. त्या रामचंद्राच्या—दाशरथि रामाच्या आहेत काय इत्यादि छाननी करून झाली पाहिजे.

(६) रामटेकचें वाकाटककालीन महत्त्व, कालिदासाचें नंदिवर्धनास आगमन आणि नंदिवर्धनाहून रामटेकला भेट इत्यादि सर्व महत्त्वपूर्ण घटना "असेल," "असावे" अशा तर्कप्रतिष्ठित असल्याने त्यांचा आधार घेतां येत नाही.

या सर्व प्रमाणांवरून 'श्री. परांजपे यांच्या नव्या प्रकाशाने रामटेक–पक्ष लुळा झाला' असें आपलें मत श्री. टिकेकर यांनी नमूद करून ठेवलें आहे.

रामटेक–पक्षाची पूर्वपीठिका

सुमारें दीडशें वर्षांपूर्वी होरेस हेमन विल्सन याने मेघदूताच्या आपल्या आवृत्तीला जोडलेल्या टिप्पणींत 'रामगिरि म्हणजे नागपूरच्या उत्तरेस कांही अंतरावर असलेलें रामटेक असावें, कारण तेथे रामचंद्राचीं अनेक देवालयें आहेत व यात्रेकरिता मधून मधून अनेक लोक येतात' असें म्हटलें होतें. पण या विधानाला त्याला कांही आधार देतां आला नव्हता. तसेंच मेघदूतांत वर्णिलेला मेघाचा मार्ग रामटेकला कसा जुळतो हेंहि त्याने दाखविलें नव्हतें. सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या आमच्या 'कालिदास' ग्रंथाच्या प्रथमावृत्तींत आम्ही या प्रश्नाची संक्षेपाने प्रथमच चर्चा केली. या चर्चेत सरगुजा संस्थानांतील रामगड हा रामगिरि या मताचें श्री. टिकेकर म्हणतात त्याप्रमाणे केवळ दिग्दर्शन केलें नसून

चिकित्सक परीक्षण केलें होतें आणि रामगड हा नर्मदेच्या ईशान्येस असल्यामुळे तो त्या नदीच्या दक्षिणेस असलेला रामगिरि होऊंच शकत नाही, असें स्पष्टपणें दाखविलें होतें. नंतर नागपूरजवळच्या रामटेकास तें वर्णन लागू पडतें हें दाखवून इतर प्रमाणांनीहि रामटेकच रामगिरि होय हें सिद्ध केलें होत. त्यानंतर एप्रिल, सन १९४४ च्या 'सह्याद्रीं'त व इतरत्र या प्रश्नाची सविस्तर चर्चा करून तोच सिद्धांत दृढ केला होता. मध्यंतरींच्या काळांत रामटेक येथील लक्ष्मणाच्या देवळांतील यादवकालीन शिलालेख, वाकाटकांचे रामटेक-जवळच्या नन्दिवर्धन नामक राजधानीपासून दिलेले अनेक ताम्रपट, महानुभावीय ग्रंथांतील तेराव्या शतकांतील रामटेकविषयक उल्लेख ज्ञात होऊन रामटेक हाच रामगिरि या मताला उपोद्बलक असा बराच पुरावा उपलब्ध झाला होता, त्याचा उपयोग आमच्या मराठी व इंग्रजी लेखांत केला होता. या पुराव्यामुळे या मताला सर्वमान्यता मिळून डॉ. जायस्वाल, रा. ब. का. ना. दीक्षित डॉ. अळतेकर, डॉ. रमेशचंद्र मुजुमदार इत्यादि विद्वानांनी आपापल्या ग्रंथांत त्याचा स्वीकार केला होता.* अलीकडे श्री. वा. कृ. परांजपे यांनी 'मेघदूतावर नवा प्रकाश' या ग्रंथांत रामगड पक्षाचें जोराचें समर्थन केलें आहे. पण त्यांचीं सर्व प्रमाणें भ्रामक आहेत आणि मेघदूतांतील श्लोकांचा त्यांनी केलेला अर्थ ओढाताणीचा अतएव अग्राह्य आहे, हें महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या गेल्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या आमच्या लेखांत सविस्तर दाखविलें होतें. त्याचा परिणाम श्री. टिकेकरांवर झालेला दिसतो. कारण त्यांनी आपल्या लेखांत श्री. परांजप्यांच्या पुस्तकाची मोघम प्रशंसा केली असली तरी त्यांच्या मतावर आम्ही घेतलेल्या एकाहि आक्षेपाचें खंडन केलें नाही. उलट 'रामगड हा रामगिरि नसेल कदाचित्' या शब्दांत त्या आक्षेपांचें महत्त्व कबूल केलें आहे. पण असें असलें तरी 'रामटेक मात्र रामगिरि खास नव्हे' असें त्यांचें म्हणणें आहे. त्यांच्या समर्थनार्थ त्यांनी दिलेल्या प्रमाणांचा संक्षेपाने यथाक्रम विचार करूं.

---

* हे उतारे अलीकडे प्रसिद्ध झालेल्या 'मेघदूतांतील रामगिरि अर्थात् रामटेक' या पुस्तकाच्या शेवटीं दिले आहेत ते पहावे.

टिकेकरांच्या आक्षेपांचीं उत्तरें

(१) वाकाटकराज्ञी प्रभावतीगुप्ता हिच्या ऋद्धपुर येथे सापडलेल्या ताम्रपटांत तो रामगिरिस्वामीच्या पादुकांजवळ दिला होता (रामगिरिस्वामिनः पादमूलात्) असा निर्देश आहे. हा रामगिरिस्वामी म्हणजे रामगिरीवरील देवळांतील भगवान् रामचंद्र होय. त्याकाळीं त्याची पादुकारूपाने पूजा होत होती, असें या उल्लेखावरून दिसतें. हा रामगिरि म्हणजे वाकाटकांच्या नन्दिवर्धन राजधानीपासून केवळ तीन मैलांवर असलेलें रामटेक होय. कालिदासाच्या मेघदूतांत 'वन्द्यैः पुंसां रघुपतिपदैरङ्कितं मेखलासु' असें रामगिरीचें वर्णन केलें आहे त्याच्याशी वरील उल्लेख जुळतो, असें आम्ही म्हटलें होतें. त्यावर "रामगिरिस्वामी हा कोणी 'गिर' गोस्वामी असावा" असा श्री. टिकेकर यांचा जांवईशोध आहे. स्वामी हा बहुमानार्थी शब्द विशेषनामानंतर जोडतात असें आपल्या अनुमानाचें समर्थनहि ते करतात. पण हें अनुमान मान्य करण्यापूर्वीं वाकाटककाळीं हीच पद्धत प्रचलित होती हें त्यांनी दाखविणें जरूर आहे. हल्ली उत्तर हिंदुस्थानांत सैंपाक्यास 'महाराज' म्हणतात म्हणून वाकाटकांच्या ताम्रपटांत 'वाकाटकांना महाराजश्रीप्रवरसेनः' याचा अर्थ 'वाकाटकांचा सैंपाकी प्रवरसेन' असा करणें जितकें हास्यास्पद होईल तितकेंच वरील अनुमानहि होणार आहे. प्राचीन काळीं 'स्वामी' हा शब्द भगवान् विष्णूच्या (क्वचित् सूर्यासारख्या इतर देवांच्या) नांवानंतर आणि 'ईश्वर' हा शब्द भगवान् शंकर याच्या नांवानंतर लावला जात असे. याचीं हवीं तितकीं उदाहरणें प्राचीन लेखांतून देतां येतील. एक दोन येथे देतों. गुप्तकालीन दामोदरपूर ताम्रपटांतील 'भगवतः श्वेतवराहस्वामिनो देवकुले' हा निर्देश पाहा (एपिग्राफिया इंडिका, पु. १५, पृ. १४२) यांतील 'भगवत्' आणि 'देवकुले' (देवळांत) या शब्दांवरून येथे कोणी 'गिर' गोसावी अभिप्रेत नसून भगवान् विष्णूचा वराह अवतार विवक्षित आहे हें स्पष्ट दिसेल. कारीतलाई येथील कलचुरिकालीन शिलालेखांत सोमेश्वर नामक मंत्र्याने स्थापिलेल्या वराहमूर्तीचा सोमस्वामी असा उल्लेख आला आहे. (आमचा ग्रंथ 'कलचुरि नृपति आणि त्यांचा काल' पृ. ८१ पाहा) या उदाहरणांवरून स्वामिशब्दान्त प्रत्येक नांव 'गिर' गोसाव्याचें नव्हे हें स्पष्ट होईल.

शिवाय गोसाव्याच्या पायांजवळ दिलेला एकहि ताम्रपट आम्हांस माहीत नाही. टिकेकरांस माहीत असल्यास त्यांनी जरूर दाखवावा.

रामगिरिस्वामिन् म्हणजे भगवान् रामचंद्र

तेव्हा 'रामगिरिस्वामिनः पादमूलात्' याचा अर्थ 'रामगिरीवर भगवान् विष्णूच्या पादुकांजवळून' असा करणें अयोग्य नाही असें आता टिकेकरहि कबूल करतील असें वाटतें. 'रामगिरि' या पर्वताच्या नांवावरून तेथे विष्णूच्या कोणत्या अवताराची पूजा होत होती याबद्दल अनुमान करणें कठीण जाऊं नये. प्रभावती गुप्तेच्या दुसऱ्या ताम्रपटांतील दान 'भगवत्पादमूले निवेद्य' (भगवंताच्या पादुकांना अर्पण करून) नंतर भगवद्भक्त आचार्य चनालस्वामीला दिलें होतें तें दानहि रामगिरि येथील भगवान् रामचंद्राच्या पादुकांजवळ दिलें होतें असें अनुमान केल्यास तें चूक होणार नाही. प्रभावती-गुप्तेचा मुलगा द्वितीय प्रवरसेन याच्याहि काळचें एक दान असेंच भगवत्पाद-मूलाजवळ दिलें होतें. (वाकाटकनृपति आणि त्यांचा काळ, पृ. २४८–४९ पाहा) तेव्हा रामगिरिस्वामी याचा अर्थ रामचंद्र असा करणें मुळीच अवघड नाही.

श्री. गुप्ते यांच्या विधानाचा विपर्यास

(२) भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकांत श्री. य. रा. गुप्ते यांनी ऋद्धपूरताम्रपट प्रकाशित करतांना 'रामगिरि येथील स्वामींच्या पादमूलाहून' असा अर्थ केला आहे खरा.* कदाचित् त्यावेळीं 'रामगिरि-स्वामी' म्हणजे रामचंद्र ही कल्पना त्यांना सुचली नसेल. पण म्हणून वरील

---

* असें शब्दशः भाषांतर करतांना 'स्वामी' शब्दाचा 'देव' हाच अर्थ श्री. गुप्ते यांना विवक्षित होता हें इंडियन् अँटिक्वरी (पु. ५३, पृ. ४८) मधील त्यांच्या लेखांतील पुढील वाक्यावरून स्पष्ट होईल—

"The grant is issued from the feet of the god of Rāmagiri, which appears to be Rāmṭek in the Central Provinces."

अर्थ संभवत नाही असें म्हणतां येणार नाही. इतर अनेक विद्वानांनी तसा अर्थ केला आहे, हें मागे दाखविलें आहेच. श्री. गुप्ते यांनी हा ताम्रपट प्रसिद्ध केल्यावर गेल्या पस्तीस वर्षांत वाकाटकांच्या इतिहासाविषयीं आपल्या ज्ञानांत पुष्कळच प्रगति झाली आहे.

आपल्या मताला उपोद्बलक म्हणून श्री. गुप्ते यांचें वरील भाषांतर उद्धृत करतांना श्री. टिकेकर यांनी श्री. गुप्ते यांचेंच दुसरें मत डावललें आहे. ऋद्धपुर ताम्रपटावरील लेखांत श्री. गुप्ते म्हणतात, 'कवि कालिदास-कृत मेघदूताच्या पहिल्या श्लोकांत (कश्चित्कांता...रामगिर्याश्रमेषु) ज्या रामगिरीचें नांव आलें आहे त्याचाच उल्लेख यांत आहे...रामगिरि ५ व्या व ६ व्या शतकांत सुविश्रुत असावा असें मानण्यांत यत्किंचितहि चूक होत नाही. हें ठिकाण कोणतें याविषयी आता रणें माजविण्याचें कारण नाही. हें मध्यप्रांतांतील रामटेक अथवा रामगड असावें असें प्रभावतीगुप्ताच्या या लेखावरून उघड दिसतें'.* श्री. गुप्ते यांचें भाषांतर स्वीकारावयाचें पण त्यांचें रामगिरि म्हणजे रामटेक हें मात्र टाकावयाचें यांत अर्धजरतीयन्यायाचा दोष पदरीं येतो.

वेवन्दस्वामी(?) हा रामगिरिस्वामीचा शिष्य नव्हे

(३) समग्र ऋद्धपुर ताम्रपट वेवन्दस्वामीलिखित आहे, असें श्री. टिकेकर सांगतात व हा वेवन्दस्वामी रामगिरिस्वामीचा कोणी शिष्य असावा अशी कल्पना करतात यांतहि त्यांची दिशाभूल झाली आहे. ऋद्धपूर ताम्र-पटाच्या शेवटच्या दोन ओळींतील शब्द 'दूतक(को) देवनन्दस्वामि(मी) ली(लि)खितं प्रभुसिङ्घेन' असे आहेत (वाकाटकनृपति आणि त्यांचा काळ, पृ. २४२ पाहा). टिकेकरांनी कोणा तज्ज्ञास त्या पत्र्याचा छाप दाखवून खात्री करून घ्यावी. त्या ताम्रपटाचा लेखक प्रभुसिंह होता. देवनन्दस्वामी

---

* श्री. गुप्ते यांनी रामगड म्हटलें असलें तरी त्यांना सरगुजा संस्थानांतील रामगड विवक्षित नव्हतें हें उघड आहे (मागील टीप पहा). वाकाटकाचें राज्य सरगुजा संस्थानावर नव्हतें.

हा दूतक (राजाज्ञा सचिवालयांत पोचविणारा) होता. तो रामगिरिस्वामीचा तर राहोच, पण दुसऱ्या कोणाचा शिष्य होता असा स्पष्टास्पष्ट निर्देश त्या ताम्रपटांत नाही.

रामटेक येथे रामलक्ष्मणाचीं मंदिरें यादवांच्या काळींहि होतीं

(४) ' रामटेक येथे प्रथम लक्ष्मणाचें मंदिर होतें, रामाचें मंदिर मागाहून कोणीतरी बांधलेलें दिसतें ' असा तर्क आमच्या माथीं मारून टिकेकरांनी ' रामाचें व लक्ष्मणाचेंहि मंदिर रामटेकच्या गडावर नव्हतें, हीं मंदिरें पहिल्या रघुजीने बांधलीं ' अशी टीका केली आहे. तीहि सर्वस्वी गैरलागू आहे. रामाच्या मंदिराच्या अगोदर लक्ष्मणाचें मंदिर गडावर बांधलें होतें, असें आम्ही कोठेहि म्हटलें नाही. लक्ष्मणाच्या देवळांतील रामदेवराव यादवाच्या काळचा शिलालेख सरदेसाई स्मारक ग्रंथांत (पृ. ११५–१३४) आम्ही वीस वर्षांपूर्वी प्रथम प्रसिद्ध केला. त्याचे संपादक श्री. टिकेकरच होते. त्यांतील आमचें विधान पुढीलप्रमाणें आहे—' कालिदासाच्या काळींहि रामगिरीवरील **देवालयांत** श्रीरामचंद्राची पादुकारूपाने पूजा होत असे, असें स्पष्ट दिसतें. यानंतर कांही काळाने तेथे राम व सीता यांच्या मूर्ति बसविण्यांत आल्या व लक्ष्मणाचेंहि देऊळ बांधण्यांत आलें, असें दिसतें. म्हणून सध्या रामटेकवर श्रीरामचंद्राचें देऊळ मागे व लक्ष्मणाचें पुढे दिसतें. ' याचा अर्थ लक्ष्मणाचें देऊळ पूर्वी बांधलें असा होतो काय ? श्री. परांजप्यांप्रमाणे श्री. टिकेकरहि सत्यापलाप आणि असत्यसूचन यांत पटाईत दिसतात.

शिलालेखांतील राम, लक्ष्मण व सीता यांच्या मूर्तींचे उल्लेख

रामटेकवरील रामलक्ष्मणांचीं देवळें रघुजी भोसल्यांनी बांधलीं नसून तीं तेराव्या शतकांत रामदेवराव यादवाच्या काळींहि अस्तित्वांत होतीं हें लक्ष्मणाच्या देवळांतील खालील श्लोकांवरून स्पष्ट होईल—

मालां पुष्पमयीमिव क्षितिमिमां बिभ्रच्छिरोभिर्विभुः
श्रीरामावतरे हरेः सहचरः शंखोऽप्यशंखात्मकः ।

आस्ते सोऽत्र समस्तभक्तजनतातत्तन्मनोवांछितं
संयच्छञ्जनकाधिराजतनयानाथान्तिके लक्ष्मणः ॥
यन्नामस्मरणात्प्रयाति निखिलः पापाद्रिरुच्चैः क्षयं
या विश्वैकपतिव्रताध्वनि गुरुर्देवी दयैकापगा ।
या शापेन निनाय भस्मकणिकाभूयं न लंकापतिं
कर्ता मे दयिताऽस्य नाशमिति साप्यत्रास्ति रामान्तिके ॥
इहाचलेन्द्रे दशकंठशत्रोर्विलोक्य मूर्तिं खलु...मर्त्यः ।
प्रयाणकाले न करोति भीतिं...संहृतिघोरमूर्तेः ॥

(सरदेसाई स्मारक ग्रंथ, पृ. १२९)

या श्लोकांत अनुक्रमें लक्ष्मण, सीता व राम यांच्या रामटेकावरील (इहाचलेन्द्रे) मूर्तींचें वर्णन आलें आहे. यादवकाळीं रामलक्ष्मणाचींच नव्हे, तर इतर अनेक देवदेवतांचीं देवळें गडावर होतीं हें त्या शिलालेखावरून आम्ही दाखविलें आहे.

महानुभावीय ग्रंथांतील रामलक्ष्मणांच्या देवळांचे उल्लेख

रामटेकच्या गडावर भोसलेपूर्व कालांत रामलक्ष्मणांचीं देवळें होतीं, याचा हा एवढाच पुरावा नाही. तेराव्या शतकांत रचलेल्या महानुभावांच्या स्थानपोथींतहि या देवळांचा उल्लेख आहे. तेराव्या शतकांत पुण्यक्षेत्र म्हणून रामटेकची ख्याति दूरवर पसरली होती. म्हणून गुजराथेंतून महानुभावपंथ-संस्थापक हरिपाळदेव उर्फ श्रीचक्रधर या स्थानाच्या यात्रेकरितां आपल्या मातापित्यांच्या आडकाठीस न जुमानतां रामटेकास येऊन दहा महिने राहिले होते. श्रीचक्रधर जेथे जेथे राहिले त्या सर्व स्थलांचें सविस्तर वर्णन स्थानपोथींत दिलें आहे. या कारणामुळेच रामटेक येथील गडावरील भोगराम व गुप्तराम यांचीं देवालयें, कर्पूरबावली व सेंदुरबावली हे जलाशय, अंबाळे तळें वगैरेंचें वर्णन स्थानपोथींत आलें आहे. सध्या आपणांस आवश्यक असे राम-लक्ष्मणांच्या देवळांचे व सीतेच्या न्हाणीचे उल्लेख आलेला स्थानपोथींतील खालील उतारा पाहा—

रामाचें देउळ पूर्वाभिमुख : रामाचेयां देउळापुढें लक्ष्मनाचें देउळ पूर्वाभिमुख : लक्षीमनाचेया देउळा दक्षीने न्हाणि : न्हानिये उत्तरे आसन. न्हाणि सीतेची ॥ (डॉ. वि. भि. कोलते यांनी संपादिलेली स्थानपोथी, पृ. ४–५) यांतील रामलक्ष्मणाच्या देवळांचें वर्णन व सीतेच्या न्हाणीचें स्थान यथातथ्य आहे हें कोणासहि रामटेकास जाऊन पाहतां येईल.

पण मग कै. या. मा. काळे यांनी 'पहिल्या रघुजीने आपणास गोंड-राजावरील स्वारींत यश आल्यास रामटेकच्या गडावर श्रीरामाच्या मूर्ति बसवूं व देवालय बांधूं असा नवस केला होता' असें कसें लिहिलें, असा प्रश्न उपस्थित होतो. त्याचें उत्तर देणें कठीण नाही. श्री. काळे यांचा आधार 'नागपूरकर भोसल्यांची बखर' हाच होय. हिची दुसरी आवृत्ति त्यांनीच संपादिली आहे. तींत यासंबंधी पुढील उतारा आहे. (पृ. ४८–४९)—

बखरींतील उल्लेख

"तेथून कुच करून रामक्षेत्रास फौजेसुद्धा आले. तेथे आंबकुंडावर स्नान करून नवस केला जे 'आमची कार्यसिद्धि झाल्यास गडावर रामचंद्रजीची स्थापना करून जागा ब्राह्मणास अग्रहार धर्मादाय देऊं.' असा निश्चय करून निघाले."

बखरींतील या उताऱ्यांत आपण देवळें बांधूं असा उल्लेख नाही. देवळें यादवकालापूर्वीपासून गडावर होतींच. फक्त त्यांत मूर्ति नव्हत्या. त्या रघुजीने स्थापन केल्या असें वरील उताऱ्यावरून दिसतें. त्या काळांत वऱ्हाडां-तील कित्येक देवळांतील मूर्ति मुसलमान भग्न करतील या भीतीने जमिनींत गाडून ठेवल्या होत्या. त्या अलीकडे सापडल्या आहेत. उदाहरणार्थ, मेहकरची शार्ङ्गधराची मूर्ति सन १८८८ मध्ये आणि वाशीमची बालाजीची मूर्ति सन १७६० मध्ये जमीन खणतांना सापडली असें श्री. काळे यांनी आपल्या वऱ्हाडच्या इतिहासांत (पृ. ४६३) म्हटलें आहे. ते म्हणतात—'मेहकर व वाशीमच्या मूर्ति फार जुन्या आहेत. दोन्हीहि अवरंगजेबाच्या दक्षिणेच्या स्वारीच्या वेळीं अगर त्यापूर्वी मुसलमान फोडतील म्हणून जमिनींत पुरलेल्या होत्या व जुनीं देवळें नामशेष झालीं होतीं.' रामटेकच्या मूर्तींच्या विषयींहि असेंच झालें असावें. तेथील पुजारी सांगतात की रघुजीने जयपुराहून मूर्ति

आणल्या होत्या पण त्यास दृष्टांत झाला की 'सुरनदींत आमच्या मूर्ति आहेत त्या बसवाव्या.' त्याप्रमाणे त्याला जुन्या मूर्ती सापडल्या. त्यांची त्याने देवळांत स्थापना केली व ब्राह्मणांस गावें इनाम देऊन देवांच्या पूजा-अर्चेची व्यवस्था केली ती आजपर्यंत चालत आली आहे.

वरील वृत्तांतावरून श्री. टिकेकर यांना राम-लक्ष्मणांच्या देवळांच्या बाबतींत उत्पन्न झालेला संशय दूर होईल अशी आशा आहे.*

प्राचीन काळीं विष्णूच्या पादुकांची पूजा प्रचलित होती

(५) 'रामटेकवर सीतेची न्हाणी आहे, पण रामाची मूर्ति नाहीं देऊळहि नाही' हें श्री. टिकेकरांचें विधान चुकीचें आहे. याविषयी आता जास्त लिहावयास नको. 'नुसत्या पादुकांची पूजा प्राचीन काळापासून चालू राहण्याचें कारण काय?' असा ते प्रश्न करतात. त्याचेंहि उत्तर सोपें आहे. प्राचीन काळीं विष्णूची पादुकारूपाने पूजा केली जात असे. अद्यापि गयेला विष्णुपदाची पूजा केली जाते. तेव्हा प्रभावतीगुप्तेच्या ताम्रपटांत रामगिरि-स्वामीच्या पादमूलांचा उल्लेख आला तर त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांही नाही. वाकाटकांच्या इतर कांही ताम्रपटांत भगवंताच्या पादमूलांचा निर्देश आहे. तोहि रामगिरीवरील रामचंद्राच्या पादुकांचाच होय हें मागे दाखविलें आहे. कालिदासाच्या मेघदूतांतील "वन्द्यैः पुंसां रघुपतिपदैरङ्कितं मेखलासु" हें वर्णन याच प्रकारचें आहे. कांही वर्षांपूर्वी बैतूल जिल्ह्यांतील पट्टन गावीं वाकाटकनृपति द्वितीय प्रवरसेन याचा ताम्रपट सापडला होता तो आम्ही एपिग्राफिया इंडिकामध्ये (पु. २४, पृ. ८१) प्रसिद्ध केला आहे त्यांत महापुरुषाच्या (भगवान् विष्णूच्या) पादमूलाचा (पादुकांचा) उल्लेख आहे. तेव्हा या आक्षेपांत कांही तथ्य नाही. रामगिरि(रामटेक)वर प्रथम पादुकांची पूजा होत होती. मागाहून राम, लक्ष्मण व सीता यांच्या मूर्ति बसविण्यांत आल्या असें दिसतें.

---

* रघूजीने करविलेल्या मूर्ति नुकत्याच रामटेक येथे सापडल्या आहेत.

कालिदासविषयक अनुमानांना भक्कम आधार

(६) रामटेकचें वाकाटककालीन महत्त्व, कालिदासाचें नंदिवर्धनास आगमन आणि नंदिवर्धनाहून रामटेकास भेट इत्यादि घटना वर्णन करतांना आम्ही 'असेल' 'असावें' अशा शब्दांचा उपयोग केला असल्याने त्या तर्कप्रतिष्ठित आहेत, असें टिकेकर म्हणतात त्याचा आता विचार करूं. भारताच्या प्राचीन इतिहासाचीं साधनें इतकीं अत्यल्प आहेत कीं कित्येक प्रसंगीं अनुमानांचा आश्रय करावा लागतो हें खोटें नाही. पण आमचीं अनुमानें 'गिर–गोसावी' सारखीं बिनबुडाचीं नसतात. त्यांना कांही तरी निश्चित सिद्धांतांचा आधार असतो. उदाहरणार्थ, नंदिवर्धन ही वाकाटकांची एकेकाळची राजधानी होती, प्रभावतीगुप्ता आपल्या अल्पवयी मुलाच्या वतीने राज्यकारभार करीत होती, ती विष्णूपासक होती, तिच्या दरबारीं गुप्तांच्या अधिकाऱ्यांचें प्रभुत्व होतें इत्यादिविषयीं आता संशय नाही. प्रभावतीचा पुत्र द्वितीय प्रवरसेन याच्या नांवावर मोडणारें सेतुबंध काव्य कालिदासाने रचलें अशी आख्यायिका त्या काव्याच्या एका टीकाकाराने उल्लेखिली आहे. नंदिवर्धन राजधानीपासून अवघ्या तीन मैलांच्या अंतरावर असलेली रामटेकची टेकडी प्राचीन काळापासून रामगिरि म्हणून विख्यात आहे. लक्ष्मणाच्या देवळांतील शिलालेखांत तसेंच महानुभावांच्या ग्रंथांत तिचें हें नांव आलें आहे. इतके आधार असतांना कालिदास नंदिवर्धनास आला होता, रामटेकला त्याने भेट दिली आणि तेव्हा त्याला मेघदूताची कल्पना सुचली इतकें अनुमान केलें असतां तें तर्कप्रतिष्ठित म्हणून निराधार मानलें जावें काय ? श्री. टिकेकर यांचें असें कोणतें अनुमान आहे जें यापेक्षा भक्कम आधारावर अधिष्ठित आहे तें त्यांनी स्वतः सांगावें.

वरील विवेचनावरून 'रामगड हा रामगिरि नसेल कदाचित्, पण रामटेक मात्र रामगिरि खास नव्हे' या टिकेकरांनी ठासून केलेल्या विधानांत किती तथ्य आहे तें ठरविण्याचें काम पूर्वग्रहदूषित नसलेल्या निःपक्षपाती वाचकांवर सोपवून हा लांबलेला लेख पुरा करतों.

---

३. रामगड हा रामगिरि नव्हे*

' संजय ' मासिकाच्या मे महिन्याच्या अंकांत (पृ. ११५-१४५) श्री. वा. कृ. परांजपे यांनी ' रामगड हाच रामगिरि ' या शीर्षकाचा लेख लिहून रामगडपक्ष प्रस्थापित करण्याचा पुनः प्रयत्न केला आहे. श्री. परांजपे यांचें ' मेघदूतावर नवा प्रकाश ' हें पुस्तक १९५८ च्या जुलै महिन्यांत प्रसिद्ध झालें. त्यांतील प्रमाणाभासांचें स्वरूप उघड करण्याकरितां आम्ही ऑक्टोबर १९५८ च्या महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या अंकांत चिकित्सात्मक लेख लिहिला होता. त्यांतील आपल्या मतावरील टीका तीव्र होती अशी परांजप्यांची तक्रार आहे. पण या तीव्र वटिकेचा बराच परिणाम झालेला दिसतो. कारण तिच्यामुळे या नवीन लेखांत रामगडावरील हाथीफोड गुहा म्हणजे रामायणांत वर्णिलेलें ऋक्षबिल, रघुवंशांतील ' प्रययावातिथेयेषु वसन् ऋषिकुलेषु सः । दक्षिणां दिशमृक्षेषु वार्षिकेष्विव भास्करः ॥ ' या श्लोकांत ऋक्ष पर्वताचा उल्लेख आहे, इत्यादि बिनबुडाचीं भरमसाट विधानें गाळलीं आहेत. किंबहुना, ' रामगड हाच रामायणांत वर्णिलेला चित्रकूट ' या विलक्षण मताचा आग्रहहि त्यांनी आता सोडलेला दिसतो. कारण ते लिहितात, ' चित्रकूटापासून (चित्रकूट म्हणजे रामगड धरा किंवा हल्लीचा बुंदेलखंडांतील धरा) सूर्याप्रमाणे सरळ दक्षिणेकडे गोदावरीपर्यंत भिडणाऱ्या या कालिदासाच्या राममार्गावर रामटेक पडत नाही. ' (संजय, पृ. १०३) हा आग्रह सोडल्याबद्दल त्यांचें अभिनन्दन केलें पाहिजे. पण हा आग्रह सोडल्याबरोबर त्यांच्या सिद्धान्ताचा पायाच उखळून पडला आहे. कारण, ' कालिदासाचा रामगिरि रामायणांत वर्णिला असलाच पाहिजे; रामायणांत चित्रकूट व ऋष्यमूक या दोनच पर्वतांवर रामाचें वास्तव्य होतें. त्यांपैकी ऋष्यमूक रामगिरि होऊं शकत नाही, आणि आमच्या रामगडास रामायणांतील वर्णन जुळतें म्हणून चित्रकूट म्हणजे रामगड आणि तोच मेघदूतांतील रामगिरि ' असा त्यांचा दावा होता.

* संजय, जुलै १९५९.

' रामगिरि चित्रकूट असो वा नसो ' (संजय, १३०) असें म्हटल्याबरोबर रामायणाचा आधार सुटून त्यांचें मत मेघदूतांतील पुराव्यावरच अवलंबून आहे, असें ठरतें. वास्तविक पाहतां वादाचा विषय ' मेघदूतांतील रामगिरि कोणता ? ' असा असल्यामुळे रामायणांतील पुराव्याचा विचार करण्याची जरूरी नाही. रामायण व मेघदूत हीं एकाच कवीने रचलीं नाहीत. शिवाय कालिदास सर्वत्र रामायणास अनुसरतो असें नाही. (पाहा, आमचा ग्रंथ ' कालिदास ' द्वितीयावृत्ति, पृ. १३९.) रामायणांत रामगिरीचा उल्लेखहि नाही. तथापि रामायणांतील तथाकथित पुरावा घेतला तरी रामगड पक्ष सिद्ध होऊं शकत नाही असें आम्ही दाखविलें होतें. याची आणखी चर्चा पुढे येईल.

परांजप्यांच्या लेखांतील सत्यापलाप

परांजप्यांच्या प्रस्तुत लेखांत नेहमीप्रमाणे सत्यापलाप व असत्यसूचन यांचीं अनेक उदाहरणें आहेत. आपल्या पुस्तकांत यांनी अनेक ठिकाणीं रामगड हा ३२०० फूट उंच आहे असें विधान ठासून केलें होतें. आणि त्या मानाने रामटेक अगदी तुच्छ आहे असें म्हटलें होतें. (मे. न. प्र., पृ. २३, २५, ६९, ७७ इ.) यांपैकी पहिली उंची समुद्रसपाटीपासून आहे असें ते आता सांगतात. याच न्यायाने रामटेकची उंची सर्व्हेच्या नकाशांत दिल्याप्रमाणें १५०८ फूट मानली पाहिजे होती. पायथ्यापासून उंची मोजावयाची तर ती तशी दोन्ही पर्वतांच्या बाबतींत सांगितली पाहिजे. ती तशी न सांगणें हा वकिली डावपेंच होय. वास्तविक, हा उंचीचा मुद्दा गैरलागू आहे. कालिदासाने रामगिरीला तुंग म्हटलें आहे खरें, पण तुंग शब्दाने किती उंची अपेक्षित आहे हें कोणीहि कोठेहि सांगितलें नाही. कालिदास केवळ उत्तुंग पर्वतांचेंच वर्णन करतो असेंहि नाही. आमच्या लेखांत व पुस्तकांत हें सर्व दाखविलें असतांहि परांजपे पुनः तींच तींच विधानें करून शिळ्या कढीला ऊत आणीत आहेत.

सत्यापलापाचें आणखी एक उदाहरण पाहा. 'विदर्भाची पूर्व मर्यादा वर्धा नदी नसून तो पूर्वेस छत्तीसगडापर्यंत पसरला होता ' या आमच्या विधानाचा

अर्थ छत्तीसगड विदर्भांत होता असा परांजपे करीत आहेत. ' पश्चिमेस भारत पाकिस्तानपर्यंत पसरलें आहे ' याचा पाकिस्तान भारतांत अंतर्भूत आहे असा मूर्खपणाचा अर्थ एखादें शाळकरी पोरहि करणार नाही. पण येन केन प्रकारेण प्रभावती गुप्तेच्या ताम्रपटाचा संबंध रामगडाशी जोडण्याकरितां परांजपे असाहि अर्थ करण्यास प्रवृत्त झाले आहेत.

परांजप्यांनी पगडी फिरवली

साहित्यपत्रिकेंतील लेखांत व नंतर आमच्या रामगिरिविषयक पुस्तकांत परांजप्यांचीं प्रमाणें मेघदूतांतील वर्णनास कशीं जुळत नाहीत हें आम्ही सविस्तर दाखविलें होतें. तें पाहिल्यावर परांजप्यांनी पगडी फिरविली आहे. पण तसें प्रांजळपणें कबूल केलें नाही. याचें एक उदाहरण येथे देतों. मेघदूतांतील १९ व्या श्लोकांत

रेवां द्रक्ष्यस्युपलविषमां विन्ध्यपादे विशीर्णां
भक्तिच्छेदैरिव विरचितां भूतिमङ्गे गजस्य ॥

यांचें भाषांतर ' आम्रकूटाची हद्द ओलांडून गेल्यावर पाषाणांच्या योगाने उंचसखल झालेल्या विंध्य पर्वताच्या पायथ्याशीं अनेक फाट्यांत–प्रवाहांत–विखुरलेली नर्मदा नदी हत्तीच्या शरीरावर काढलेल्या चित्रविचित्र पट्टयांच्या वेलबुट्टीसारखी दिसेल ' असें परांजप्यांनी केलें होतें, व ' हें दृश्य जेथे नर्मदा नदी अमरकंटकावरून खाली उतरते व ज्या ठिकाणीं तिला आसपासच्या डोंगराळ मुलखांतून अनेक जलौघ–प्रवाह–उपप्रवाह येऊन मिळतात, तेंच हें ठिकाण होय ' असें त्याचें समर्थनहि केलें होतें. [मे. न. प्र., पृ. ९५]. मेघदूतांतील वर्णनाप्रमाणें मेघाला नर्मदा नदी आम्रकूटाजवळ दिसली नसून त्यानंतर बराच मार्ग द्रुततर गतीने आक्रमण केल्यावर विन्ध्य पर्वताच्या पायथ्याशीं खडकाळ भागांत तिचा प्रवाह अनेक भागांत विभक्त झालेला त्याला दिसला, असें आम्ही दाखविलें होतें (मे. रा., पृ. ६१). तें पाहिल्यावर परांजपे आपल्या उत्तरांत आता म्हणतात, ' अहो, तें वर्णन अमरकंटकजवळचें नाही, तर तेथून दहा बारा मैल वाहल्यानंतर नर्मदा नदी ८० फुटांवरून जेथे खाली पडते त्या कपिलधारा नामक तीर्थाचें आहे. '

(संजय, पृ. १२०). वरील श्लोकांतील वर्णन धबधब्याचें आहे असें आतापर्यंत कोणाहि संस्कृत टीकाकाराने म्हटलें नाही. ' उपलविषमे विन्ध्यपादे विशीर्णां रेवाम् ' यांतील ' उपलविषमे ' आणि ' विशीर्णां ' या विशेषणांवरून कालिदासास नर्मदेचा प्रवाह खडकाळ भागांत अनेक स्रोतांत विभक्त झालेला वर्णावयाचा आहे हें उघड आहे. ' धबधबा ' वर्णावयाकरिता कालिदासाने ' विशीर्णाम् ' या विशेषणाचा उपयोग न करतां ' प्रपतिताम् ' यासारख्या पदाचा उपयोग केला असता. (रघुवंशाच्या दुसऱ्या सर्गांतील ' गंगाप्रपातान्त-विरूढशष्पं ' इत्यादि वर्णन पाहा.) येथे धबधबा वर्णावयाचा आहे असें म्हणावयास परांजप्यांस आधार मिळाला तो कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्या मराठी भाषांतरांत (कोणत्याहि संस्कृत टीकेंत नव्हे) आणि बुडत्याला काडीचा आधार या म्हणीप्रमाणें त्यांनी तो पकडला. पण या काडीने त्यांना तरून जातां येणार नाही. कारण आम्रकूट म्हणजे अमरकंटक असता, तर कालिदासाने नर्मदा नदीचा उल्लेख त्याच्या वर्णनांत केला असता. कारण अमरकंटकांतच नर्मदा नदी उगम पावते. पण मेघाला ती नदी तेथे दिसली नसून आम्रकूट ओलांडून बराचसा मार्ग द्रुततर गतीने आक्रमिल्यावर त्याला ती विन्ध्याच्या पायथ्याशी दिसली. तेव्हा आम्रकूट अमरकंटक होणें शक्य नाही. एवढा आटापिटा करून धबधब्याचें वर्णन एका मराठी भाषांतरांतून शोधून काढलें, पण तें असें व्यर्थ झालें हें पाहून परांजप्यांची निराशा होईल. पण त्यास इलाज नाही.

अनेक स्रोतांत विभक्त झालेली नर्मदा

' विशीर्णां रेवाम् ' याचा अर्थ खडकाळ भागांत अनेक स्रोतांत विभक्त झालेली नर्मदा, असा आम्ही केला होता. तसाच अर्थ सर्व संस्कृत टीकाकारांनी आणि इंग्रजी व मराठी भाषांतरकारांनी केला आहे. ' Narmadā parted into streamlets ' हें परांजप्यांनी उद्धृत केलेलें कै. प्रो. का. बा. पाठकांचें भाषांतर, तशींच खालील मराठी भाषांतरें पाहा—

चिं. द्वा. देशमुख—रेवा वाहे उपलविषमीं विंध्यपादीं विशीर्णा ।

ग. ना. कात्रे—तेथे रेवा खळखळ अशी प्रस्तरीं वाहताहे ।

वास्तविक, ' उपलविषमे विन्ध्यपादे विशीर्णा रेवाम् ' याचा अर्थ इतका स्पष्ट आहे कीं त्याकरितां भाषांतरें उद्धृत करण्याची जरूरी नसावी. नर्मदेचें हें दृश्य सातपुडा पर्वत ओलांडून गेल्यावर होशंगाबादजवळच्या भागांत दिसतें. तें आम्ही अनेकवार पाहिलें आहे आणि तें कोणासहि मध्य रेल्वेने इटारसी–भोपाळ या भागांत प्रवास करतांना पाहतां येईल. ' होशंगाबादजवळ नर्मदेचा प्रवाह पुष्ट व विस्तृत असून त्याला खांडे पडत नाहीत ' असें परांजपे लिहितात. नर्मदेचा प्रवाह उन्हाळ्यांत कसा दिसतो याची कल्पना पुण्यांत आपल्या अभ्यासिकेंत बसून करतां येणार नाही. तिजकरिता प्रवास केला पाहिजे.

मेघमार्ग निश्चित करण्याच्या दोन रीति

रामगिरि ते विदिशा हा मेघमार्ग निश्चित करण्याच्या दोन रीति परांजप्यांनी सांगितल्या आहेत. पहिली म्हणजे वाटेंत कोणकोणतीं स्थळें लागतात त्यांवरून मेघाचा मार्ग ठरवावयाचा. परांजपे म्हणतात की, ही रीत योग्य व मान्य होण्यासारखी आहे. दुसरी रीत ही कीं मेघमार्ग दिशांच्या उल्लेखांवरून निश्चित करावयाचा. ही रीत त्यांस एकांगी, अशास्त्रीय व भ्रामक वाटते. पण पहिलीच रीत भ्रामक होण्याचा संभव अधिक आहे. भारतांत एकाच नांवाचीं अनेक स्थळें आहेत. त्यांतून निवड करतांना दिशांचे उल्लेख ध्यानांत घेतले नाहीत तर फसगत हटकून होणार. याचीं उदाहरणें परांजप्यांच्याच लेखांतून पुढे दाखविलीं आहेत.

मेघदूतांतील स्थळें ओळखण्याचा पहिला प्रयत्न

मेघदूतांत उल्लेखिलेलीं स्थळें नामसादृश्यावरून ओळखण्याचा पहिला प्रयत्न त्या काव्याचे पहिले इंग्रजी भाषांतरकार होरेस हेमन विल्सन् यांचा. त्यांनी रामगिरि म्हणजे नागपूरजवळचें रामटेक, आम्रकूट म्हणजे अमरकंटक आणि माल म्हणजे छत्तीसगडाच्या बिलासपूर जिल्ह्यांतील रतनपूरजवळचें माल्डा असें प्रतिपादिलें. याशिवाय त्यांनी एका श्लोकाच्या खालील भाषांतरांत चित्रकूटाचाहि उल्लेख केला—

Next bending downwards
from thy lofty flight
On Chitrakūṭa's humbler peak alight.

विल्सन साहेबांचें भाषांतर पुष्कळ वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालें होतें. तें आता अत्यंत दुर्मिळ झालें आहे. वरील उतारा बेग्लरच्या आर्किऑलॉजिकल सर्व्हे रिपोर्ट, व्हॉ. १३, पृ. ४४ वरून घेतला आहे. विल्सन साहेबानें रामटेक, मालडा, अमरकंटक, चित्रकूट, रेवा हीं स्थळें मेघमार्गावर कशीं जमतात तें पाहण्याचा प्रयत्न केला नाही. या स्थळांस भेट द्यावयाची तर मेघाला अनेकदा मागे पुढे जावयास लागलें असतें. म्हणून बेग्लरने त्याविषयीं पुढील उद्गार काढले आहेत—

"I emphatically record my conviction that, unless Kālidāsa wrote his poem in a deranged state of mind, he could never have meant to send the cloud along the Narmadā river, and across backward and forward from Amarakaṇṭak to the northernmost limit of Bundelkhaṇḍ."

(कालिदासाला मेघदूत लिहितांना वेड लागलें नसेल तर त्याने आपल्या मेघाला नर्मदेच्या काठाने आणि मागे पुढे अमरकंटकापासून बुंदेलखंडाच्या अगदी उत्तरेच्या टोकापर्यंत नेलें नसतें.) या टीकेवरून दिशांचे उल्लेख लक्षांत न घेतां केवळ नामसादृश्यावरून निर्दिष्ट स्थलांची निश्चिति करण्यांत काय धोका आहे तो वाचकांच्या ध्यानांत येईल. परांजप्यांचा प्रयत्न या पहिल्या रीतीचा आहे.

बेग्लर साहेबाने स्वतः रामगड म्हणजे रामायणांत उल्लेखिलेला चित्रकूट आणि तोच कालिदासाचा रामगिरि, हें दाखविण्याचा प्रयत्न केला. पण त्याचीं प्रमाणें त्याचा वरिष्ठ जनरल कनिंग्ह्याम याने आर्किऑलॉजिकल सर्व्हेच्या एकविसाव्या व्हॉल्यूममध्ये (पृ. १०–१३) पूर्णपणें खोडून काढलीं आहेत.

श्री. परांजपे यांनी आपल्या पुस्तकांत आपण नवीन संशोधन केल्याचा आव आणला असला तरी त्यांनी वस्तुतः विल्सन व बेग्लर या साहेबांची उसनवारी केली आहे. रामगिरि म्हणजे रामटेक हें विल्सनचें मत मात्र त्यांनी टाकून देऊन त्याऐवजी रामगिरि म्हणजे रामगड हें बेग्लरचें मत ऋणनिर्देश न करतां स्वीकारलें आहे.

मेघदूतांत वर्णिलेलीं रामगिरि, मालप्रदेश आणि आम्रकूट हीं स्थलें अनुक्रमें रामगड, मालडा व अमरकंटक यांशी जुळविल्यावर मग परांजपे मेघदूतांतील दिशांचे उल्लेख तपासूं लागले. ते मुळीच जमेनात. तेव्हा 'उदङ्मुखः उत्पत' याचा अर्थ 'उत्तरेकडे तोंड करून दक्षिणेकडे उड्डाण कर', 'किंचित्पश्चात् व्रज' याचा अर्थ 'बराचसा पश्चिमेकडे जा', 'तस्यास्तोयमादाय गच्छेः' याचा अर्थ 'त्या नर्मदा नदीचें पाणी पिऊन तिला न ओलांडतां तिच्या काठाकाठाने जा' असे विलक्षण अर्थ त्यांना करावे लागले आहेत. या शब्दांचे अर्थ असे होत नाहीत याची त्यांना आंतून (inner voice ने) जाणीव आहे. म्हणून ते म्हणतात, 'शब्दांच्या वाच्य किंवा उथळ अर्थाने फसून जातां कामा नये.' (संजय, पृ. १२८). आहे की नाही अर्थ करण्याची शास्त्रीय आणि बिनचूक पद्धत ?


मेघदूतांतील स्थलांचा चुकीचा शोध

मेघदूतांत रामगिरिपासून विदिशेपर्यंत खालील स्थळें लागतात—

(१) **माल**—उत्तरेकडे तोंड करून जातांना (उदङ्मुखः) मेघाने माल प्रदेशावर प्रथम आरोहण करावें. (सद्यः सीरोत्कषणसुरभिक्षेत्रमारुह्य मालम्।)

(२) **आम्रकूट**—नंतर किंचित् पश्चिमेला वळून पुनः उत्तरेला गेल्यावर मेघाला आम्रकूट पर्वत लागेल. (किंचित्पश्चाद्व्रज लघुगतिर्भूय एवोत्तरेण।) यांतील 'भूयः' (पुन्हा) या शब्दावरून मालप्रदेशावर आरोहण करण्यापूर्वी मेघाने रामगिरीहून उत्तरेलाच जावयाचें होतें हें सिद्ध होतें.

(३) **नर्मदा**—आम्रकूटानंतरचा मार्ग द्रुततर गतीने आक्रमिल्यावर विन्ध्य पर्वताच्या पायथ्याशीं खडकाळ भागांत मेघाला नर्मदा विशीर्ण झालेली



प्लेट ४ – रामगिरिपासून दशपुरपर्यंत मेघमार्गाचा नकाशा.

दिसेल. (द्रुततरगतिस्तत्परं वर्त्म तीर्णः । रेवां द्रक्ष्यस्युपलविषमां विन्ध्यपादे विशीर्णाम्---इत्यादि).

हा मार्ग रामगडपक्षाला मुळीच जुळत नाही हें आम्ही अनेकवार दाखविलें आहे. पण पुनः एकदा दाखवितों.

(१) माल प्रदेश म्हणजे रतनपुरच्या उत्तरेचा मालडा असें परांजपे म्हणतात. हा प्रदेश रतनपुरच्या उत्तरेस किती मैलांवर आहे हें ते सांगत नाहीत (मे. न. प्र., पृ. ८३). हें मालडा रतनपूरच्या थोडें उत्तरेस त्याच्या परिसरांत (in the vicinity of Ratanpur) आहे असें विल्सन साहेबांचें मत त्यांनी उद्धृत केलें आहे (मे. न. प्र., पृ. ८३). मला हें गाव सर्व्हे ऑफ इंडियाच्या विस्तृत नकाशांत मोठ्या प्रयासाने सापडलें. तें रतनपुरच्या ईशान्येस २२ मैलांवर आहे. मालडाच्या ईशान्येस सुमारें ३८ मैलांवर रामगड आहे. रतनपूर हें पूर्वीच्या कलचुरींच्या दक्षिण कोसलांतील शाखेची राजधानी रत्नपुर होय. हें बिलासपूरच्या उत्तरेस १६ मैलांवर आहे. तेव्हा मालडा रामगडच्या नैर्ऋत्येस सुमारें ३८ मैलांवर आहे. तेंच माल प्रदेश असल्यास मेघाला तेथे जातांना मेघदूतांत वर्णिलेल्याप्रमाणे आपलें तोंड उत्तरेकडे न करतां नैर्ऋत्येकडे करावें लागलें असतें. दिशाविपर्यासाची एवढी ढोबळ चूक कालिदासाने केली असती काय याचा विचार वाचकांनी करावा. शिवाय माल प्रदेश रामगिरीपेक्षा उंचावर होता. ('सद्यः सीरोत्कषणसुरभिक्षेत्रमारुह्य मालम्' यांतील '**आरुह्य**' पद पाहा) मालडाची उंची रामगडपेक्षा जास्त आहे कांय ? अर्थात् नाही. कारण रामगड हा पर्वत आहे आणि मालडा हें लहान गाव आहे. तेव्हा माल प्रदेश हा मालडा होऊं शकत नाही.

(२) आम्रकूट म्हणजे अमरकंटक नव्हे. मेघदूतांतील वर्णनाप्रमाणे माल प्रदेशावर चढल्यावर (आरुह्य) नंतर **किंचित्** पश्चिमेला वळून नंतर **पुनः** उत्तरेला गेल्यावर मेघाला आम्रकूट पर्वत लागणार होता; तेव्हा आम्रकूट रामगिरीच्या वायव्येस असला पाहिजे. पण अमरकंटक रामगडच्या पश्चिमेस [थोडा नैर्ऋत्येसच) आहे. (मे. न. प्र. मधील पृ. ५७ वरील परांजप्यांचा

नकाशा पाहा.*] तेव्हा अमरकंटक आम्रकूट होऊं शकत नाही ही अडचण ध्यानांत आल्यावर **आता** परांजपे 'सद्यः सीरोत्कषण—' या श्लोकांत पाठभेदाचा गोंधळ आहे असें म्हणतात. पाठभेद कोणत्या श्लोकांत नाहीत? अलीकडे अनेक हस्तलिखितांचा विचार करून डॉ. सुशिलकुमार डे यांनी मेघदूताची चिकित्सक आवृत्ति काढली आहे. तींतहि

सद्यः सीरोत्कषणसुरभिक्षेत्रमारुह्य मालं
किंचित् पश्चाद् व्रज लघुगतिर्भूय एवोत्तरेण ॥

असाच शुद्ध पाठ दिला आहे. तेव्हा त्यांतील दिशानिर्देशांतून परांजप्यांची सुटका नाही.

आम्रकूट हा अमरकंटक नव्हे

शिवाय थोडासा विचार केला तर आम्रकूट हा अमरकंटक होणें शक्य नाही हें ध्यानांत येईल. अमरकंटकाचें पूर्वीचें नांव मेकल होतें. नर्मदा नदीचा तेथे उगम होतो म्हणून तिला 'मेकलकन्यका' म्हणतात. पुढे त्या पर्वताला अमरकंटक असें नांव प्राप्त झालें असें दिसतें. हें नांव आम्रकूट याचें अपभ्रष्ट रूप आहे, अशी विल्सन व बेग्लर यांची समजूत होती. तिचाच पुनरुच्चार परांजप्यांनी केला आहे. पण तिला आधार नाही. त्यांनी डॉ. लाचें मत 'स्कन्दपुराणांत आम्रकूटाला अमरकंटक म्हटलें आहे' असें दिलें आहे. तें चूक आहे. स्कन्दपुराणांत आम्रकूटाचें नांव येत नाही. त्यांत त्या पर्वतांचीं नांवें 'अमरंकट' आणि 'अमरकंट' अशीं येतात. पुढील उतारे पाहा—

संहारलक्षणं तद्वदोंकारस्य च संभवः ।
तथैवोंकारमाहात्म्यममरंकटकीर्तनम् ॥

(आवन्त्यखंड, २३०, १५)

अमरकंटमाहात्म्यं कपिलासंगमस्तथा ।
विशल्यासंभवश्चापि भृगुतुंगाद्रिकीर्तनम् ॥

(आवन्त्यखंड, २३०, २१)

---

* शेवटीं जोडलेला मेघमार्गाचा नकाशा पाहा.

तेव्हा त्या पर्वताचे ‘मेकल’ हें नांव कालांतराने लुप्त होऊन त्या जागीं अमरकट किंवा अमरकटक झालें असें दिसतें. तेथे अमरेश्वराचें देवालय आहे. ‘कटक’ म्हणजे पर्वताचें पठार. ‘कटकोऽस्त्री नितम्बोऽद्रेः’ इत्यादि अमरकोश पाहा. अशा नांवांत क्वचित अनुस्वार घुसतो. ‘तपोगिरि’ याचें ‘तपंगिरि’ असें नांव रामटेकच्या शिलालेखांत आढळतें तसाच हा प्रकार. तेव्हा ‘अमरकंटक’ याचें मूळ रूप ‘अमरकटक’ असावें. त्याचा आम्रकूटाशी बादरायण संबंधहि नाही.

मेघाला नर्मदा आम्रकूटाजवळ दिसली नाही

(३) आम्रकूट सोडल्यानंतर कांही अंतर द्रुतगतीने अक्रमण केल्यावर मेघाला नर्मदा नदी विन्ध्य पर्वताच्या पायथ्याशी खडकाळ भागांत प्रस्फुटित-प्रवाहा अशी दिसली, हें वर्णनहि आम्रकूट म्हणजे अमरकंटक या मताविरुद्ध जातें. कारण अमरकंटकाजवळच मेघाला नर्मदा दिसावयास पाहिजे होती.

आमच्या मताचा बुद्धिपुरस्सर केलेला विपर्यास

याच्या उलट मेघदूतांतील रामगिरि ते विदिशा या मार्गाचें वर्णन रामटेकपासून उत्तरेस जाणाऱ्या मार्गाला तंतोतंत जुळतें, हें आम्ही अनेकदां दाखविलें आहे. कालिदासाच्या काळाला आता निदान दीड हजार वर्षें झाल्यामुळे तत्कालीन कांही नांवें सध्या प्रचारांत नाहीत. तथापि या मार्गावरील पठार, पर्वत, नर्मदानदीचें दृश्य इत्यादि मेघदूतांतल्या प्रमाणेंच आहे हें आम्ही सविस्तर दाखविलें आहे (मेघदूतांतील रामगिरि अर्थात् रामटेक, पृ. २६–४५ पाहा.).

आमच्या मतावर परांजप्यांनी घेतलेले आक्षेप बालिश आहेत. कांही ठिकाणीं आमच्या मताचा विपर्यास करून टीका केली आहे. उदाहरणार्थ, “पूर्वी डॉ. मिराशी माल जबलपुराजवळ होतें असें सांगत होते” हें विधान घ्या (संजय, पृ. १३५). यासंबंधी आमचें पूर्वीचें विधान असें आहे— “मालक्षेत्र रामटेकच्या उत्तरेस सातपुड्याच्या पठारावर असावें असें वाटतें. कारण कल्याणीच्या चालुक्यांच्या एका उत्कीर्ण लेखांत द्वितीय आचुगी राजाने

' माल ' देश काबीज केल्यावर जबलपुरजवळच्या त्रिपुरीच्या हैहयांचा पराभव केला, असें म्हटलें आहे " (कालिदास, पृ. १२४). याचा अर्थ मालप्रदेश जबलपुरच्या मार्गावर होता असा आहे. मेघदूतांत वर्णिलेला मालप्रदेश शिवनी–छपाराचें पठार असावें, कारण तें नागपूर–रामटेक–जबलपुर या मार्गावर आहे व या मार्गाने बसची रहदारी अद्यापि चालू आहे.

रामायणांतील पुराव्याचें परीक्षण

मेघदूतांतील रामगिरि कोठे होता हें ठरविण्यास मेघदूतांतील पुरावाच घेतला पाहिजे हें कोणीहि कबूल करील. तेथे रामायणांतील पुरावा अग्राह्य आहे. कारण आपणांस रामायणांतील रामगिरि शोधावयाचा नाही. वास्तविक रामायणांत रामगिरीचें नांवहि येत नाही. पण रामायणांतील पुरावा आमच्या मताविरुद्ध जातो म्हणून आम्ही तो लक्षांत घेत नाही असा गैरसमज परांजपे पसरवीत आहेत. म्हणून त्यासंबंधी चार शब्द लिहिले पाहिजेत. याविषयी आम्ही इतरत्र लिहिलें तेंच येथे उद्धृत केलें म्हणजे पुरे.

रामटेकला रामाचे पाय लागले नव्हते असें परांजपे पुनः पुनः ठासून सांगतात. तेव्हा त्यांच्या जवळ भगवान् राम सीतेसह ज्या ज्या आश्रमांत राहिले त्यांची पूर्ण यादी असली पाहिजे. ती त्यांनी जरूर प्रसिद्ध करावी. त्यांचा आधार वाल्मीकिरामायण. तेव्हा तें या बाबतींत काय म्हणतें तें पाहूं.

धर्मभृताच्या आश्रमांत कांही काळ राहिल्यावर राम अनेक ऋषींच्या आश्रमांत राहत राहत दहा वर्षें घालविते झाले, असें रामायणाच्या अरण्यकांडांतील सर्ग ११, श्लो. २३–२७ मध्ये म्हटलें आहे. हे श्लोक आम्ही ' नवभारत ' मासिकाच्या एप्रिल १९५९ च्या अंकांतील ' रामगिरि विदर्भांत स्थिर आहे ' या शीर्षकाच्या लेखांत दिले आहेत ते पाहावे. या श्लोकांत भगवान् रामचंद्र भिन्न भिन्न ऋषींच्या आश्रमांत कोठे दीड महिना, कोठे तीन, चार, पांच, सहा, आठ महिने तर कोठे वर्षभर राहत राहत दहा वर्षें घालविते झाले, असें म्हटलें आहे. अर्थात् हे आश्रम निदान पंचवीस तीस असावे. यांपैकी कांही पर्वतावर किंवा त्यांच्या पायथ्याशीहि असतील. यांची संपूर्ण यादी आणि नक्की ठिकाणें जोपर्यंत परांजप्यांस उपलब्ध झालीं नाहीत

तोंपर्यंत रामटेकचा (रामगिरि म्हणून) निर्देश रामायणांत नाही, या आक्षेपांत कांहीच ' राम ' राहत नाही.

हाच आक्षेप परांजप्यांच्या मतावर

शिवाय, हा आक्षेप परांजप्यांच्या मतालाहि तितकाच बाधक होणारा आहे. त्यांचें पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर 'रामगड हाच रामायणांत वर्णिलेला चित्रकूट ' या विलक्षण मतावर टीकेची झोड उठली. आणि तें मत वाल्मीकि-रामायणांतील चित्रकूट पर्वताच्या स्थलनिर्देशाशीं मुळीच जुळत नाही असें आमच्याप्रमाणें अनेकांनी दाखविलें. या चरचरीत अंजनाने परांजप्यांची दृष्टि थोडी निवळलेली दिसते. म्हणून आतां त्यांनी रामगड म्हणजे चित्रकूट हा आग्रह सोडलेला दिसतो. रामगड चित्रकूट नसेल तर रामटेकप्रमाणे त्याचाहि उल्लेख रामायणांत कोठेहि आला नाही, हा आक्षेप त्यांच्या मतावरहि तितकाच लागू पडतो.

परांजप्यांची पळवाट

हा आक्षेप आपल्या विरुद्ध घेतला जाईल हें ध्यानांत आल्यावर आता त्यांनी पुढील पळवाट काढली आहे. ते म्हणतात, 'सर्व प्राचीन टीकाकार रामगिरि राममार्गावर व दंडकारण्यांत मानीत आहेत... आता दंडकारण्य म्हणजे हल्लीच्या मध्यप्रदेशाचा पूर्वभाग (छोटा नागपूर, छत्तीसगड, गोंडवन किंवा बस्तर संस्थान). या भागांतच रामगड आहे, म्हणून तो रामगिरि होण्याला योग्य. सुदैवाने कालिदासाचा राममार्ग समजण्यास त्याच्याच हातचा एक उत्तम पुरावा उपलब्ध आहे. राम वनवासाला निघाले तेव्हा चित्रकूट पर्वतावर आले आणि दक्षिणायनांत सूर्य उत्तरेकडून दक्षिणेला जातो तसे राम सरळ दक्षिणेकडे आले, असें रघुवंशाच्या बाराव्या सर्गांत वर्णिलें आहे. हल्लीचा चित्रकूट जरी खरा मानला तरी तेथून राम सरळ खाली दक्षिणकडे आला आणि नंतर त्याच्या लगत दक्षिणेला असलेल्या पूर्व गोदावरीच्या काठच्या पंचवटीला आला असें सरळ निष्पन्न होतें. कालिदासाच्या राममार्गावर रामटेक पडत नाही" (संजय, पृ. १३०). आता या नवीन प्रमाणाचा विचार करूं.

रघुवंशांतील श्लोकांचा खरा अर्थ

रघुवंशाच्या बाराव्या सर्गांतील यासंबंधीं श्लोक पाहा—

रामस्त्वासन्नदेशत्वाद् भरतागमनं पुनः ।
आशङ्क्योत्सुकसारंगां चित्रकूटस्थलीं जहौ ॥
प्रययावातिथेयेषु वसन् ऋषिकुलेषु सः ।
दक्षिणां दिशमृक्षेषु वार्षिकेष्विव भास्करः ॥

'या श्लोकांत ऋक्षपर्वताचा उल्लेख आहे. तो ऋक्ष म्हणजेच विंध्य रामायणांत वर्णिलेलें ऋक्षबिल म्हणजे रामगडावरची हाथीफोड गुहा. म्हणून रामगड हाच चित्रकूट' वगैरे बिनबुडाचीं भरमसाट विधानें परांजपे आता (आमच्या टीकेनंतर) करीत नाहीत हें सुदैव! आता बुंदेलखंडांतल्या चित्रकूटापासून लंबा (perpendicular) सारख्या सरळ रेषेंत रामगड येतो, रामटेक येत नाही, असें त्यांचें नवीन अनुमान आहे. कालिदासाच्या वरील श्लोकांत 'सूर्य दक्षिणायनांत पावसाळ्यांतील नक्षत्रांतून दक्षिणेस जातो तसा राम चित्रकूटाहून दक्षिण दिशेस आतिथ्यशील ऋषींच्या आश्रमांत राहत राहत गेला' एवढेंच म्हटलें आहे. त्याच्या प्रवासाची दिशा लंबाप्रमाणे सरळ होती असा अर्थ त्या श्लोकांत विवक्षित नाही. नक्षत्रेंहि अगदी सरळ रेषेंत नाहीत. तसेंच रामगडहि बुंदेलखंडांतील चित्रकूटच्या थेट दक्षिणेस नाही. चित्रकूटाचे रेखांश ८१·१० आणि रामगडचे ८२·५५ असे आहेत. तेव्ह रामगड सरळ रेषेच्या थोडा पूर्वेस आहे तसें रामटेक (रेखांश ७९·२५) थोडें पश्चिमेस आहे. तेंहि चित्रकूटाच्या दक्षिणेस आहे. तेव्हा त्याला रघुवंशांतील वर्णन विरोधी नाही.

रामटेक दंडकारण्यांतच

रामगड दंडकारण्यांत आणि म्हणून रामाच्या मार्गावर आहे, तसें रामटेक नाही असें परांजपे वारंवार ठासून सांगतात आणि त्याचें प्रमाण म्हणून श्री. आबा चांदोरकरांच्या संशोधनाचा वरचेवर हवाला देतात. तेव्हा त्याचाहि विचार केला पाहिजे.

दंडकारण्य कोठे होतें याविषयी रामायणाच्या उत्तरकांडांत फार महत्त्वाची माहिती दिली आहे. तिचा सारांश असा—

'सीतात्यागानंतर एके दिवशीं अयोध्येंत एक ब्राह्मणपुत्र अकालीं मरण पावला. अधर्माचरणाशिवाय असें होणें शक्य नाही अशी खात्री असल्यामुळे राम त्याच्या शोधार्थ निघाले. तेव्हा त्यांना दक्षिण दिशेस शैवल पर्वताच्या उत्तरभागीं एका सरोवराजवळ शम्बूक नामक शूद्र मुनि तपश्चर्या करीत असलेला दिसला. त्याकाळच्या समजुतीप्रमाणें तें अधर्माचरण होतें. म्हणून रामचंद्रांनी त्याचा वध केला. तेव्हा त्याला दिव्य स्वरूप प्राप्त होऊन त्याने रामास म्हटलें, 'रामा, मी आता अगस्त्याच्या दर्शनास जात आहे, तुम्हीहि त्यांचें दर्शन घ्यावें.' त्याप्रमाणे राम अगस्त्याश्रमीं गेले. अगस्त्य ऋषीने त्यांचें स्वागत करून त्यांना एक दिव्य आभरण भेट म्हणून दिलें, आणि तें आपणांस विदर्भ देशाच्या सुदेव नामक नृपतीचा पुत्र श्वेत याजकडून प्राप्त झाल्याचा वृत्तांत सांगितला. [उत्तरकांड, सर्ग ३७–३८ पाहा.] हा श्वेत त्यापूर्वी मृगपक्षिविवर्जित अशा घोर अरण्यांत तपश्चर्या करीत होता, असें अगस्त्याकडून समजतांच रामाने विचारलें—

'भगवंस्तद्वनं घोरं तपस्तप्यति यत्र सः ।
श्वेतो वैदर्भको राजा कथं तदमृगद्विजम् ॥'

'ज्या ठिकाणीं तो **विदर्भ नृपति** श्वेत घोर तपश्चर्या करीत होता तें वन पशु व ब्राम्हण यांनी रहित असें कसें झालें?' असा प्रश्न विचारला. तेव्हा अगस्त्याने रामाला दण्ड नामक राजाची कथा सांगितली. तो म्हणाला, 'रामा, पूर्वी मनुपुत्र इक्ष्वाकु याला शंभर पुत्र झाले. त्यांच्यापैकी सर्वांत लहान दण्ड हा अत्यंत मूर्ख व अडाणी निघाला. त्याला त्याच्या पित्याने विन्ध्य आणि शैवल या पर्वतांमधील प्रदेशाचें राज्य दिलें. त्याने एकदा भार्गव मुनीच्या कन्येवर बलात्कार केला. तेव्हा त्या मुनीने 'या राजाच्या राज्याभोवतालचा शंभर योजनें प्रदेश धुळीच्या वर्षावाने बेचिराख होईल' असा शाप दिला, तेव्हा त्यांतील लोक इतरत्र रहावयास गेले. दण्ड नृपतीचें राज्य नष्ट झाल्यावर तेथे घोर अरण्य झालें.

तस्यासौ दण्डविषयो विन्ध्यशैवलयोर्नृप ।
ततः प्रभृति काकुत्स्थ दण्डकारण्यमुच्यते ॥

(उत्तरकांड, ७९, १८–१९

तसेंच दण्डाचें राज्य सोडून लोक जेथे राहावयास गेले तें जनस्थान म्हणून प्रसिद्ध झालें.

तपस्विनः स्थिता ह्यत्र जनस्थानमतोऽभवत् ॥

(उत्तरकांड, ७९, २०)

तेव्हा एका काळीं सुसमृद्ध असलेला विदर्भ देश ब्राह्मणशापाने अरण्यमय होऊन त्याला रामायणकालीं दण्डकारण्य हें नांव प्राप्त झालें. हा दण्ड राजा विदर्भांचा होता असें रामायणांत स्पष्ट म्हटलें आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत त्याला दाण्डक्य असें म्हटलें असून तो भोजवंशी होता असें सांगितलें आहे —

दाण्डक्यो नाम भोजः कामात् ब्राह्मणकन्यामभिमन्यमानः सबन्धुराष्ट्रो विननाश ॥ (अर्थशास्त्र, १, ६)

भोज हें विदर्भांच्या राजघराण्याचें नांव होतें. कालिदासानेहि तें दिलें आहे. 'भोजेन दूतो रघवे विसृष्टः ।' (पाहा रघुवंश, ५, ३९) तेव्हा दंडकारण्य हें छत्तीसगड, गोंडवन, बस्तर यांत नसून विदर्भांतच होतें. अद्यापि विदर्भांतील संकल्पांत 'दण्डकारण्ये गोदावर्या उत्तरे तीरे' असा त्याचा उल्लेख केला जातो. या प्रदेशांतच रामटेक आहे. तेव्हा तें चित्रकूटापासून दक्षिणेकडच्या राममार्गावरच आहे. याच्या उलट रामगड दंडकारण्यांत येत नसल्यामुळे राममार्गावर नाही. तेव्हा हा आक्षेप परांजप्यांवरच उलटणारा आहे.

परांजप्यांच्या शास्त्रशुद्ध पांच कसोट्या

'रामगिरिनिर्णयार्थ डॉ. मिराशी एकच कसोटी मानतात, कारण इतर कसोट्या रामटेकविरुद्ध जातात. वास्तविक या बाबतींत पांच कसोट्या आहेत'

असा कांगावा परांजपे करीत आहेत. तेव्हा त्यांनी मानलेल्या पांचहि कसोट्यांचा विचार करूं.

(१) **पहिली कसोटी**—रामगिरि पर्वत कोठें आहे याचा मेघदूतांतील निर्देश—मेघदूतांत रामगिरि पर्वत कोठें आहे हें सांगितलें नाही. त्याचे कांही टीकाकार तो चित्रकूट आहे असें म्हणतात. पण तें शक्य नाही हें आम्ही दाखविलें आहे. (मे. रा., पृ. ४६–४८). दुसरे कांही टीकाकार तो दंडकारण्यांत आहे असें म्हणतात. तें खरें असल्यास तें रामटेकास जुळतें, रामगडास जुळत नाही हें मागे दाखविलें आहे.

दुसरी कसोटी—रामगिरीचीं लक्षणें – हीं सर्व रामटेकच्या बाबतींत जुळतात हें आम्ही दाखविलें आहे. (मे. रा., पु. २६–३५) रामटेकाचें पूर्वीचें नांव रामगिरिच होतें. तें रामटेकवरील लक्ष्मणांच्या देवळांतील शिलालेखांत आलें आहे. तेथे सीतेची न्हाणी आहे. तिचा उल्लेख सातशे वर्षांपूर्वीच्या महानुभावी वाङ्मयांत आला आहे. रामटेकवर कुटजपुष्पें अद्यापि आढळतात. वाकाटककालीं–सुमारें दीड हजार वर्षांपूर्वी–तेथे भगवान् रामचंद्राच्या पादुकांची पूजा होत असे हें 'रामगिरिस्वामिनः पादमूलात्' या ताम्रपटांतील निर्देशावरून स्पष्ट होईल. प्राचीन काळीं विष्णूच्या नांवाच्या शेवटीं सामान्यतः 'स्वामिन्' हें पद लावलें जात असे असें आम्ही म्हटलें होतें. त्यावर परांजपे म्हणतात, "'रामगिरिस्वामिनः पादमूलात्' याचा अर्थ फार तर रामगिरि नांवाच्या डोंगरावरील विष्णूच्या पादुकांजवळून असा होईल." राम हा विष्णूचा अवतार आहे एवढी साधी गोष्ट परांजप्यांस माहीत असेल अशी आमची कल्पना होती. यासंबंधी त्यांनी मुद्दाम वेड पांघरलें असल्यास त्यांस पुनः सांगतों की विष्णूच्या अवतारांच्या नांवाशेवटींहि स्वामिन् शब्द लावण्याचा प्रघात होता. त्याचीं उदाहरणें श्वेतवराहस्वामिन् व सोमस्वामिन् अशीं कोरीव लेखांतून आम्ही दिलीं होतीं. (नवभारत, एप्रिल १९५९, पृ. ३. मागे, पृ. १० पाहा.) 'रामगिरि' या नांवावरून तेथे रामाचीच पूजा केली जात असावी असें कोणीहि सांगेल. रामटेक वाकाटकाच्या नन्दिवर्धन राजधानीपासून केवळ तीन मैलांवर आहे,

प्रभावती गुप्तेने आपला ताम्रपट तेथून देणें हेंच जास्त संभवनीय आहे. परांजपे म्हणतात त्याप्रमाणे ती दूरवरच्या आपल्या सामंताच्या राज्यांतील रामगडास गेली होती असें मानण्यास यत्किंचित्‌हि आधार नाही. शिवाय वाकाटकांनी भगवत्पादमूलांजवळ दिलेले इतरहि ताम्रपट आहेत ते काय रामगडहून दिले होते? रामगिरिस्वामी हा कोणी गिरी गोसावी होता या जावई शोधाचें निराकरण आम्ही 'वसंत' मासिकाच्या फेब्रुवारी १९५९ च्या अंकांत केलें आहे तें पाहावें. (मागे, पृ. १० पाहा.) ताम्रपटांतील पुराव्याला अव्वल दर्जाचा मानण्यांत येतें. तो अशा रीतीने रामटेकला सर्वस्वी अनुकूल आहे.

याच्या उलट रामगडचें पूर्वी रामगिरि असें नांव होतें याला पुरावा नाही. 'रघुपतिपदैरङ्कितं' याचा अर्थ त्या पर्वतावर अनेक ठिकाणीं रामाचीं पाउलें उमटलीं होतीं असा श्री. परांजपे करतात ! रामाच्या नंतर हजारों वर्षांनी कालिदास झाला. तोपर्यंत रामाचीं पाउलें मातींत उमटलेलीं दिसत होतीं असें त्यांस म्हणावयाचें आहे काय ? तें शक्य नाही हें सांगणें नकोच. तेव्हा रामगिरीवर कालिदासकाळीं रामाच्या पादुका होत्या एवढाच अर्थ येथे विवक्षित आहे. रामगडावर पादुका कोरल्या आहेत त्या एका भिंतीवर आहेत. भिंतीवर रामाचीं पाउलें 'उमटलीं' असें समजावयाचें काय ? शिवाय हीं 'पाउलें रामाचीं' असें समजण्यास आधार कोणता, तर तेथील लोक तसें सांगतात, हा होय. लोकांचें सांगणें कित्येकदा कसें अविश्वसनीय असतें हें सर्वांस माहीत आहे. नाशिकजवळचीं बौद्ध लेणीं अद्यापि पांडवलेणीं म्हणून प्रसिद्ध आहेत ! दुसरें तसलें उदाहरण रामगडवरील मूर्तींचें. तेथे राम, लक्ष्मण व सीता यांच्या मूर्ति आहेत असें लोकांच्या सांगण्यावरून परांजप्यांनी मानलें. (मे. न. प्र., पृ. १५८) आणि सीता रामाच्या उजव्या बाजूस आहे म्हणून या मूर्ति फार प्राचीन आहेत असें अनुमान त्यांनी काढलें, पण यांत त्यांची फसगत झाली आहे. ते रामाची म्हणून समजतात ती मूर्ति वास्तविक बलरामाची आहे, सीतेची म्हणून समजतात ती आहे रेवतीची, आणि लक्ष्मणाची म्हणून समजतात ती आहे रामाची. तेव्हा तेथील जनश्रुति अत्यंत अविश्वसनीय आहे. शिवाय, रामगडवरील या भिंतीवरील पादुकांमध्ये एक मांडी घालून बसलेल्या

माणसाचें चित्र आहे ते तेथे कां काढलें आहे ? तेव्हा या पादुका रामाच्या असणें शक्य नाही. त्या जुन्या, कालिदासकालाइतक्या प्राचीन, आहेत याला प्रमाण नाही. हीच गोष्ट तेथील प्रवाहांत सीतादेवीने स्नान केले या दंतकथेची. अशा पोंचट दंतकथांवरून रामगडला रामगिरि म्हणणें फार धाष्टर्याचें आहे.

तेव्हा रामगिरीचीं लक्षणें रामगडला मुळीच जमत नाहीत. तीं रामटेकला पूर्णपणें जमतात हें इतरत्र सविस्तर दाखविलें आहे.

तिसरी कसोटी—मेघाच्या प्रवासाची दिशा—ही कसोटीहि रामटेकासच सर्वस्वी अनुकूल आहे. रामगडास रामगिरि मानल्यास दिशानिर्देश अगदी चुकतात, हें मागे दाखविलें आहे.

चौथी कसोटी—मेघमार्गावर लागणाऱ्या स्थळांचा शोध—रामटेक-पक्षास हीं स्थळें सर्वस्वी अनुकूल आहेत. माल म्हणजे शिवनी—छपाऱ्याचें पठार. हें रामटेकच्या उत्तरेस असून उंचावर आहे. याचें प्राचीन नांव आता प्रचलित नाही. कदाचित् माल म्हणजे पठार एवढाच अर्थ विवक्षित असावा. तें चढून गेल्यावर किंचित् पश्चिमेकडे वळून उत्तरेस गेल्यावर सातपुड्याचें शिखर अमरवाड्याजवळ लागतें, तो आम्रकूट पर्वत. तेथून पुढे कांही अंतर द्रुततर गतीने गेल्यावर मेघाला नर्मदा नदी विंध्याच्या पायथ्याशीं लागते. उन्हाळ्यांत तिचें दृश्य मेघदूतांत वर्णिल्याप्रमाणेच असतें.

याच्या उलट रामगडपक्षांत हीं स्थळें अनुक्रमें मालडा, अमरकंटक व नर्मदा मानल्यास कालिदासावर दिशाविपर्यासाचा महान् दोष येईल. यासंबंधी विवेचन मागे केलें आहे.

पांचवी कसोटी—मेघाचा भौगोलिक म्हणजे नैसर्गिक मार्ग—मेघदूतांतील मेघाचा मार्ग नैसर्गिक आहे हें एक थोतांड आहे. कालिदास आपणास हवें त्या ठिकाणीं मेघास नेतो. माल प्रदेशावर चढल्यावर तो त्याला किंचित् पश्चिमेकडे जाऊन नंतर उत्तरेस जाण्यास सांगतो. विदिशेस पोचल्यावर तो त्याला वांकडी वाट करून उज्जयिनीस जाण्यास सांगतो. या दोन्ही ठिकाणीं मेघ आपली दिशा बदलतात असें समजावयाचें काय ? अर्थात् नाही.

सामान्यतः मेघ दक्षिणेंतून उत्तरेकडे जातात या प्रत्यक्ष दृश्यावर कालिदासाने मेघदूताचें कथानक रचलें आहे. तेव्हा ही कसोटी भ्रामक आहे. आणि ती कोणत्याहि पक्षास सर्वस्वी जुळणार नाही.

श्री. परांजप्यांच्या लिखाणाने तज्ज्ञ वाचक फसणार नाहीत. पण अजाण वाचकांचा बुद्धिभेद होण्याचा संभव आहे. म्हणून त्यांच्या पुस्तकास पुस्तकाने आणि लेखास लेखाने उत्तर द्यावें लागलें. याचा विचार ते निराग्रही वृत्तीने करतील अशी आशा आहे.

['संजय' मासिकाच्या 'मे १९५९'च्या अंकांतील श्री. वा. कृ. परांजपे यांच्या रामटेक पक्षावरील आक्षेपांचा परामर्ष घेणारा लेख संपादकांकडे पाठविल्यानंतर 'त्यांचा आणखी एक लेख प्रसिद्ध होणार आहे. त्यांतील मुद्द्यांस जरूर तर उत्तर द्यावें' अशी सूचना त्यांच्याकडून आली. तदनुसार श्री. परांजप्यांच्या दुसऱ्या लेखांतील कांही विधानांचा परामर्श येथे घेतला आहे.]

'ऋक्षेषु' शब्दांतील ध्वनि

प्रययावातिथेयेषु वसन् ऋषिकुलेषु सः । दक्षिणां दिशमृक्षेषु वार्षिकेष्विव भास्करः ॥ या रघुवंशांतील श्लोकांत 'ऋक्ष' शब्दावर श्लेष आहे असें मानून त्याचा रामायणांतील ऋक्षबिलाशीं बादरायण संबंध जोडून तें ऋक्षबिल म्हणजेच रामगड येथील हाथीफोड विवर असें नवीन संशोधन परांजप्यांनी केलें होतें. व त्यावरून आपला रामगड हा ऋक्षपर्वताच्या परिसरांत होता असें अनुमान काढलें होतें. हीं सर्व अनुमानें कशीं चूक आहेत हें आमच्या 'मेघदूतांतील रामगिरि अर्थात् रामटेक' या पुस्तकांत (पृ. ६६–६८) सविस्तर दाखविलें आहे. वरील श्लोकांतील 'ऋक्षेषु' पदावर मुळीच श्लेष नाही; तसा श्लेष कोणाहि संस्कृत टीकाकाराने मानला नाही. शिवाय ऋक्षेषु याचा अर्थ 'ऋक्षपर्वतांत' असा होणें शक्य नाही, कारण संस्कृतांत पर्वतांचीं नांवें अनेकवचनांत योजीत नाहीत वगैरे गोष्टी आम्ही परांजप्यांच्या नजरेस आणल्या होत्या. त्यांच्या जागीं सत्याची चाड असणारा दुसरा कोणी असता तर त्याने संस्कृत व्याकरणाचा पुरावा आपणांविरुद्ध जातो हें पाहतांच आपली

चूक प्रांजळपणें कबूल केली असती. पण परांजप्यांनी तसें न करतां श्लेषांतील दुसऱ्या अर्थाला व्याकरणाच्या बंधनाची आवश्यकता नसते असा अजब शोध लावला आहे. हा शोध ऐकून संस्कृत अलंकारशास्त्रकार दचकून जातील. बाण, सुबन्धु, श्रीहर्ष इत्यादि अनेक संस्कृत ग्रंथकारांनी हजारों श्लेष आपल्या ग्रंथांत योजिले आहेत. त्यांतून निघणाऱ्या दोन्ही अर्थांत कोठेहि व्याकरण-नियमांचा भंग केलेला आढळत नाही. श्लेषांतील दुसऱ्या अर्थाला व्याकरणनियमांचें बंधन नसतें तर श्लेषालंकार साधणें अत्यंत सोपें झालें असतें व त्याकरितां संस्कृत कवींनी परांजप्यांस धन्यवाद दिले असते. त्यांच्या दुर्दैवाने हा शोध फार उशीरा लागला!

श्लेषांतील दुसऱ्या अर्थाला व्याकरण नियमांचें बन्धन नसतें हें सिद्ध करण्याकरितां परांजप्यांनी 'शकुन्तलावण्यम्' हें 'शाकुन्तलां'तील उदाहरण दिलें आहे. परांजपे म्हणतात, "याचे दोन अर्थ (१) शकुन्त+लावण्यम् (पक्ष्याचें लावण्य) आणि (२) शकुन्तला+वण्यम् असे आहेत. यांपैकी दुसरा अर्थ व्याकरणदुष्ट आहे. (कारण 'वण्यम्'चा कांहीच अर्थ होत नाही.) तसाच ऋक्षेषु या शब्दावरील श्लेष आहे." हें उदाहरण देतांनाहि परांजप्यांची फसगत झाली आहे. 'शाकुन्तलां'तील तापसीचें मूळ वाक्य 'सउन्दलावण्णं पेक्ख' असें प्राकृतांत आहे. याचे दोन अर्थ 'सउन्द+लावण्णं' (शकुन्तलावण्यम्) आणि 'सउन्दला+वण्णं' (शकुन्तलावर्णम्) असे होतात. दुसऱ्या अर्थांतहि सामासिक शब्दाचा दुसरा घटक अर्थहीन नाही. सर्वदमनाने या शब्दांचा दुसरा अर्थ ध्वनिसादृश्यामुळे घेतल्यामुळे 'माझी आई (शकुन्तला) कोठे आहे' असें या तापसीला विचारलें. तेव्हा या उदाहरणावरून 'श्लेषांतील दुसऱ्या अर्थाला व्याकरण नियमांचें बंधन नसतें' हा सिद्धांत स्थापित होत नाही.

आपल्या पक्षाला उपोद्बलक असा आपाततः द्व्यर्थी भासणारा शब्द दिसल्यास परांजपे व्याकरणनियमांची तमा बाळगत नाहीत; एवढेंच नव्हे तर त्यांना वर्णभेदाचीहि अडचण भासत नाही.

आपृच्छस्व प्रियसखममुं तुंगमालिङ्ग्य शैलं
वन्द्यैः पुंसां रघुपतिपदैरंकितं मेखलासु ।

या मेघदूतांतील रामगिरिवर्णनपर श्लोकांत 'मेखलासु' या शब्दाचा 'मध्यभागावर' किंवा 'पृष्ठभागावर' या अर्थी उपयोग केला आहे. या शब्दावर श्लेष आहे असें आतापर्यंत कोणाहि टीकाकाराला किंवा टिप्पणीकाराला वाटलें नाही. पण 'जें न देखे रवि तें देखे कवि' या न्यायाने परांजप्यांच्या काकदृष्टीला येथेहि श्लेष दिसला. ते म्हणतात, "मेखलासु आणि मेकलासु एकच ! कारण 'ख' आणि 'क' हीं एकाच क वर्गांतील अक्षरें नव्हत का ? तेव्हा येथे कालिदासाने रामगिरि हा मेखला प्रदेशांत आहे, हें खुबीने व्यंजनेने ध्वनिसादृश्याच्या बळावर सुचविलें आहे" बिचारा कालिदास स्वर्गांत म्हणत असेल, 'या मित्रापासून मला वांचव !' श्लेषामध्ये व्याकरणनियमांची व वर्ण–भिन्नतेची अडचण मानावयाची नसेल तर हव्या त्या शब्दांवर श्लेष मानून त्यांतून आपणांस इष्ट तो अर्थ काढतां येईल. असल्या संशोधनांत मुळीच ताळतंत्र राहणार नाही.

बरें, 'मेखलासु' याचा अर्थ 'मेकलासु' असा अर्थ कां घ्यावयाचा ? तर तो रामगडला जुळतो म्हणून ! हा अर्थ स्वीकारल्यास परांजप्यांच्या मताप्रमाणे रामगडला 'चित्रकूट' 'रामगिरि' 'मेकल' 'ऋक्ष' अशीं अनेक नांवें होतीं असें मानावें लागेल. या अनुमानाला यत्किंचित्‌हि पुरावा नाही हें मागे दाखविलें आहेच.

परांजप्यांचा हटवादीपणा

रामगडावरील मूर्ति सीता, राम व लक्ष्मण यांच्या असून त्यांमध्ये सीता रामाच्या उजवीकडे असल्यामुळे त्या फार प्राचीन आहेत असें रामगड पक्षाला अनुकूल असें अनुमान परांजप्यांनी केलें होतें. या मूर्तीचे वस्त्रविरहित फोटो 'नवभारत' मासिकाच्या मार्च १९५९ च्या अंकांत प्रसिद्ध करून आम्ही साधार दाखविलें होतें की परांजपे समाजात त्या मूर्ति सीता व राम यांच्या नसून रेवती व बलराम यांच्या आहेत. बलरामाच्या डोक्यावर नागाची फणा व हातांत नांगर व मुसळ हीं आयुधें आहेत. (मागे, पृ. ३–६ पाहा.) इतकीं प्रमाणें दिल्यांवर परांजपे आपली चूक कबूल करतील अशी कोणीहि अपेक्षा केली असती. पण परांजपे तसे कच्च्या गुरूचे चेले नाहीत. ते म्हणतात, "ती मूर्ति

रामाची नसली तरी लक्ष्मणाची असावी, कारण लक्ष्मणहि शेषाचा अवतार होता." पण लक्ष्मणाच्या डोक्यावर कोठेहि शेषाच्या फणा दाखवीत नाहीत हें शिल्पशास्त्राचें प्राथमिक ज्ञान असलेला कोणीहि सांगेल. प्राचीन वाङ्मयाचें संशोधन करतांना केवळ कल्पनाशक्तीने भागत नाही. त्याकरितां संस्कृत व्याकरण, अलंकारशास्त्र, शिल्पशास्त्र, वगैरेंचें ज्ञान आवश्यक असतें, विशेषतः आपली चूक कोणी दाखवून दिली तर ती कबूल करण्याइतपत प्रांजळपणा अंगीं असावा लागतो. राजतरंगिणीकार कल्हण म्हणतो—

श्लाघ्यः स एव गुणवान् रागद्वेषबहिष्कृता ।
भूतार्थकथने यस्य स्थेयस्येव सरस्वती ॥

(न्यायाधीशाच्या प्रमाणे ज्याची वाणी प्रेम व द्वेष यांपासून मुक्त असून सत्यार्थकथनांत निश्चल असते तोच गुणवान् पुरुष प्रशंसार्ह होतो.)

श्री. परांजपे आपली आग्रही वृत्ति टाकून देऊन सर्व प्रमाणांचा सत्यान्वेषणबुद्धीने विचार करण्यास तयार होतील तर त्यांस 'रामटेक हाच मेघदूतांतील रामगिरि' हें पटवून देण्यास वेळ लागणार नाही. कारण भर्तृहरीने म्हटलें आहे—

अज्ञः सुखमाराध्यः सुखतरमाराध्यते विशेषज्ञः ।

अडाणी माणसाला कोणतीहि गोष्ट पटवून देणें सोपें असतें. जो विशेषज्ञ आहे त्याला पटवून देणें तर फारच सोपें. पण आग्रही व हेकेखोरहि माणसाच्या गळीं कोणतीहि गोष्ट उतरवणें कठीण आहे असा या वादांत आमचा अनुभव आहे.

कुचेष्टेशिवाय प्रतिष्ठा वाढत नाही, असा परांजप्यांचा समज झालेला दिसतो. त्यामुळे त्यांच्या लेखांत प्रतिपक्ष्यांविषयी अधिक्षेपाचे व उपहासाचे उद्गार सर्वत्र आढळतात. संशोधनाची ही शिष्टसंमत पद्धत नव्हे व अशा लिखाणास कोणीहि सूज्ञ वाचक महत्त्व देत नाही, हें त्यांच्या नजरेस आणून या वादाची रजा घेतों.

---

४. रामशेज हा रामगिरि नव्हे*

'नवभारत' मासिकाच्या जुलैच्या अंकांत प्रा. कृ. मो. शेंबवणेकर यांनी कालिदासाच्या 'मेघदूतां'तील रामगिरीचा शोध लावण्याचा आपल्या परीने प्रयत्न केला आहे. त्यांचीं प्रमाणें येणेप्रमाणें—

शेंबवणेकरांचें मत : रामशेज हाच रामगिरि

"मेघदूताचा टीकाकार मल्लीनाथ रामगिरि म्हणजे चित्रकूट असें सांगतो. तो चुकला असणें शक्य नाही. कारण तो बहुश्रुत होता. शिवाय दुसरे अनेक टीकाकार त्याच्या पूर्वी होऊन गेले असल्यामुळे त्याला मार्गदर्शक होते. हा चित्रकूट उत्तरेंतील प्रयागच्या दक्षिणेस सुमारें ७० मैलांवर असणारा चित्रकूट असणें शक्य नाही, कारण तो नर्मदेच्या उत्तरेस आहे. तेव्हा तो चित्रकूट दक्षिणेंत असला पाहिजे. वराहमिहिर आपल्या बृहत्संहितेंतील कूर्मविभाग प्रकरणांत 'कर्णाट–महाटवी–चित्रकूट–नासिक्य–कोल्लगिरि–चोलाः' असे दक्षिणेंतील विभाग सांगतो. यांत गोवलेला चित्रकूटपर्वत महाटवी ऊर्फ विन्ध्याटवी व नासिक यांच्या सांनिध्यांत व मध्यावर आहे. रघुवंशांतील वर्णनाप्रमाणे राम उत्तरेंतील चित्रकूट सोडून सरळ दक्षिणेंतील दंडकारण्यांत पंचवटी विभागांत येऊन राहिला. कालिदासाच्या कल्पनेप्रमाणे रामनिवास गोदावरीच्या परिसरांतच होता. नाशिकच्या उत्तरेस रामशेजचा डोंगर प्रसिद्ध आहे. हाच वराहमिहिराने उल्लेखिलेला चित्रकूट. याचें दुसरें नांव रामगिरि असें होतें–असल्यास कालिदासाने तें वाचकांचा घोटाळा टाळण्याकरितां घेतलें असेल. कदाचित् तें नांव त्या पर्वतास यक्षाने दिलें असेल. बहुधा शापदात्या कुबेरानेच ती निवड केली असावी. कारण रामाने, त्याच्यापासून रावणाने हिरावून घेतलेलें पुष्पक विमान त्याला परत केलें होतें. म्हणून तो कृतज्ञ होता. तेव्हा प्राचीन काळीं रामशेजच्या पर्वतराजीलाच रामगिरि असें नांव होतें–

* नवभारत, जुलै १९५९

असण्याचा संभव बराच आहे. रामशेजला मेघदूतांत सांगितलेला मार्ग सर्व दृष्टींनी उत्तम जमतो. कारण उत्तरेस निघालेल्या मेघास गोदावरी पाठीं पडते, व आम्रकूट नामक पर्वत प्रथमच नजरेस पडतो. नासिकच्या उत्तरेस सप्तशृंग, साल्हेर, मुल्हेर वगैरे डोंगर प्रसिद्धच आहेत. तेथून पुढे गेल्यावर विंध्य पर्वतांतील काळ्या खडकांत फुटून विभागलेली नर्मदा मार्गांत सहजच आडवी येते आणि त्यानंतरचा उज्जयिनीवरून जाणारा मार्ग, त्यावरील नद्या व नगरें, आणि सरतेशेवटीं हिमालयाच्या पायथ्याशीं असलेलें कनखल तीर्थ व क्रौंचपर्वत हीं सर्व सुसंबद्ध स्थळें आहेत. उदाहरणार्थ, शोर्पारग (सोपारा) विभागांत एक रामतीर्थ असल्याचा उल्लेख नहपानाचा जावई ऋषभदत्त याच्या नाशिकच्या लेखांत आहे. तेव्हा रामशेज हाच रामगिरि होय. ”

या मताचें परीक्षण

श्री. शेंबवणेकरांचें मत शक्य तों त्यांच्या शब्दांत (पाल्हाळ गाळून) दिलें आहे. आता त्याचें परीक्षण करूं.

श्री. शेंबवणेकरांचें मुख्य प्रमाण मल्लीनाथाने रामगिरीला चित्रकूट मानलें आहे हें होय व तें त्यांच्या नेहमीच्या प्रवृत्तीस अनुरूप आहे. मल्लीनाथाने रामगिरि हा चित्रकूट कसा, हें सांगितलें नाही. तो आपल्या पूर्वीच्या वल्लभदेव नामक टीकाकाराची री ओढत होता यांत संशय नाही. वल्लभदेवाने मात्र याचें कारण पुढील शब्दांत दिलें आहे : ‘ रामगिरिरत्र चित्रकूटः, न तु ऋष्यमूकः, तत्र सीताया वासाभावात् । ’ म्हणजे ‘ रामगिरि हा चित्रकूट होय. तो ऋष्यमूक असणें शक्य नाही. कारण त्या ठिकाणीं रामाबरोबर सीता राहिली नव्हती. ’ हें कारण देतांना वल्लभदेवाच्या दृष्टीसमोर रामायणांत वर्णिलेले चित्रकूट व ऋष्यमूक हेच पर्वत होते हें उघड आहे. यांपैकी चित्रकूट हा प्रयागापासून सुमारें ७० मैलांवर असलेला पर्वत होय. तो मेघदूतांतील रामगिरि होऊं शकत नाही हें शेंबवणेकरांनाहि मान्य आहे. म्हणून ते चित्रकूट दक्षिणेंत नाशिकाजवळ होता अशी कल्पना करतात. ही कल्पना वल्लभदेवाच्या आणि त्याला अनुसरणाऱ्या मल्लीनाथाच्या मनांत होती याला यत्किंचितहि आधार नाही.

चित्रकूट नाशिकजवळ नव्हता

चित्रकूट नाशिकजवळ होता असें सिद्ध करण्यास शेंब्रवणेकरांनी पुढील प्रमाणें दिलीं आहेत—

पहिलें प्रमाण

(१) "वराहमिहिराच्या बृहत्संहितेंत 'कर्णाट–महाटवी–चित्रकूट–नासिक्य–कोल्लगिरि–चोलाः ।' असा चित्रकूटाचा नाशिकजवळ निर्देश केला आहे. तेव्हा तो नाशिकाजवळ असला पाहिजे."

या प्रमाणाचें परीक्षण

वराहमिहिराने केलेला हा निर्देश श्लोकांत आहे. श्लोकांत वृत्तानुरूप रचना करावी लागते. त्यामुळे 'नासिक्य' शब्दाजवळ चित्रकूटाचा उल्लेख आहे म्हणून तो पर्वत नाशिकजवळ असेलच असें नाही. उदाहरणार्थ, कोल्लगिरि व चोल यांचे उल्लेख पाहा. कोल्लगिरि हा सातपुडा असावा असें श्री. शेंब्रवणेकरांना वाटतें. पण त्याच्या जवळचा चोल देश भारताच्या अगदी दक्षिणेस मद्रासच्या सभोवार आहे. या दोहोंतील अंतर पाहा. शिवाय नाशिकजवळ चित्रकूट नांवाचा पर्वतच नाही. तसेंच महाटवी म्हणजे विंध्याटवी यालाहि प्रमाण नाही. याच्या उलट महाटवी म्हणजे समुद्रगुप्ताच्या दक्षिण दिग्विजयांत उल्लेखिलेलें महाकान्तार असावें. समुद्रगुप्तानें कोसल (दक्षिण कोसल किंवा छत्तीसगड)च्या राजाचा पराभव केल्यावर महाकांतारच्या व्याघ्रराज नामक राजास जिंकलें. म्हणून हें महाकांतार सध्याच्या बस्तर जिल्ह्यांत होतें असें मानलें जातें. अद्यापि बस्तरमध्ये घनदाट अरण्य आहे. या भागांत चित्रकूट नामक पर्वत बरसुर गांवाच्या पूर्वेस दहाबारा मैलांवर आहे. तोच वराहमिहिरानें उल्लेखिलेला असावा.

दुसरें प्रमाण

(२) नाशिकजवळच्या पर्वताचें नांव चित्रकूट होतें हें गृहीत धरल्यावर त्याला कालिदासाने रामगिरि कसें म्हटलें यासंबंधी प्रा. शेंब्रवणेकरांची उपपत्ति अशी—

" राम उत्तरेकडील चित्रकूट सोडल्यावर सरळ दक्षिणेंत दंडकारण्यांत पंचवटी विभागांत येऊन राहिला. रामायणांत राम अनेक ऋषींच्या आश्रमांत राहिल्याचें वर्णन आहे ते सर्व आश्रम गोदावरीच्या परिसरांतच होते. अर्थातच कालिदासाच्या रामगिरीवर राम सीतेसह राहत होता तो पर्वत पंचवटीजवळच असला पाहिजे, म्हणून रामगिरीचा शोध नाशिकजवळच केला पाहिजे. "

या प्रमाणाचें परीक्षण

राम चित्रकूटावरून निघाल्यावर मध्ये कोठेहि न थांबतां सरळ गोदावरीच्या तीरीं पंचवटीस आला असें समजण्यास रामायणांत आधार नाही. वाल्मीकीच्या वर्णनाप्रमाणे रामाने ऋषींच्या आश्रमांत कोठे तीन, चार, पांच, सहा, आठ महिने तर कोठे वर्षभर राहत राहत दहा वर्षें घालविलीं. हे आश्रम उत्तरेकडील चित्रकूटापासून दक्षिणेकडील गोदावरीपर्यंत पसरलेले होते. कालिदासाने या प्रकरणांत रामाला वर्षाऋतूंतील दक्षिणेस जाणाऱ्या सूर्याची उपमा दिली आहे ती अगदी समर्पक आहे. हीं नक्षत्रें एका ठिकाणीं गोळा झालेलीं नसून सूर्यमार्गावर पसरलीं आहेत. ऋषींचे आश्रमहि असेच होते. चित्रकूटाहून मध्यंतरीं कोठेहि न थांबतां एकदम गोदातीरीं येण्यास रामाजवळ या वेळीं विमान नव्हतें ! असो.

रामनिवास गोदातीरीं जनस्थानांत होता म्हणून रामगिरिहि गोदावरीच्या परिसरांत पंचवटीजवळ असला पाहिजे हें अनुमान हेत्वाभासदुष्ट आहे. कसें तें पाहा—

रामनिवास जनस्थानांत होता.

रामनिवास रामगिरीवर होता.

म्हणून रामगिरि जनस्थानांत होता. यांतील हेत्वाभास तर्कशास्त्राचा कोणीहि विद्यार्थी दाखवून देईल.

तिसरें प्रमाण

(३) "नाशिकच्या उत्तरेस रामशेजचा डोंगर आहे तोच रामगिरि होय. रामटेकच्या नांवावरून व गुप्तकालीन शिलालेखावरून जर त्याचा राम-

गिरीशीं संबंध जोडावयाचा तर रामशेजचा कां जोडूं नये. सोपाऱ्याजवळ रामतीर्थ पुरातन कालापासून प्रसिद्ध आहे. ”

या प्रमाणाचें परीक्षण

भारतांत रामाच्या नांवाशीं संबद्ध असे अनेक पर्वत आहेत. त्यांतून रामगिरीसाठी निवड करावयाची असेल तर पुढील कसोट्या जुळल्या पाहिजेत.

(१) त्याचें तें नांव कालिदासकालीं प्रचलित होतें, याला पुरावा पाहिजे.

(२) तेथून उत्तरेस जाणारा मेघमार्ग मेघदूतांतल्याप्रमाणे तंतोतंत असला पाहिजे.

या कसोट्यांस नागपूरजवळचें रामटेक उतरतें हें आम्ही अनेकदा दाखविलें आहे. केवळ रामटेक या नांवावर आमची भिस्त नाही. कालिदास-काळीं रामटेकला रामगिरि हें नांव होतें हें प्रभावती गुप्तेच्या ताम्रपटांतील ‘ रामगिरिस्वामिनः पादमूलात् ’ या उल्लेखावरून स्पष्ट आहे. पुढे तेराव्या शतकांतील रामदेवराव यादवाच्या काळच्या शिलालेखांत तर त्याचें रामगिरि हेंच नांव आलें आहे. त्याच काळांतील महानुभावांच्या लेखांत तेथील सीतेच्या न्हाणीचा उल्लेख आहे. आज निदान सात–आठशें वर्षें रामटेकची पुण्यक्षेत्र म्हणून प्रसिद्धि आहे. तेथून विदिशेपर्यंतचा मेघमार्ग अगदी मेघदूतांतल्या-प्रमाणेच आहे. म्हणून रामटेक हाच रामगिरि असें आमचें म्हणणें आहे.

आता या कसोट्या रामशेजला कितपत जुळतात तें पाहूं.

(१) नाशिकच्या उत्तरेच्या पर्वताला आता रामशेज म्हणतात. हें नांव अत्यंत प्राचीन कालापासून चालत आलें आहे याला प्रमाण नाही. वराह-मिहिराच्या बृहत्संहितेंतील चित्रकूटाचा निर्देश याला अनुलक्षून नाही हें मागे दाखविलें आहे. ‘ याचें पूर्वीचें नांव चित्रकूट होतें, पण वाचकांचा घोटाळा टाळण्याकरिता कालिदासाने त्याला रामगिरि म्हटलें ’ ही केवळ कल्पना आहे. तिला मुळीच आधार नाही. तसें असतें तर त्याचें चित्रकूट नांव कोठेतरी आलें असतें. त्याला हें नांव यक्षाने किंवा कुबेराने दिलें असावें हें अनुमानहि असेंच बिनबुडाचें आहे. मल्लीनाथ रामगिरि म्हणजे चित्रकूट म्हणतो म्हणून

रामशेजला चित्रकूट नांव असें मानावयांचें तर त्याच्या पूर्वीचा स्थिरदेव नामक टीकाकर 'रामगिरिर्दण्डकान्तः प्रसिद्धः' असें म्हणतो त्यावरून तो दंडकारण्यांत होता असें कां मानूं नये? तसें मानल्यास तें रामटेकला अनुकूलच होईल. रामायणांतील उत्तरकांडावरून एकेकाळीं सुसमृद्ध असलेल्या विदर्भ देशाचें रामाच्या काळीं दंडकारण्यांत रूपांतर झालें होतें असें स्पष्ट दिसतें. (याविषयी सविस्तर विवेचन मागे पृ. ३१–३२ वर पाहा). रामटेक याच भागांत आहे. पण रामशेज मात्र दंडकारण्यांत येत नाही.

'रामशेज' पक्षावर सर्वांत प्रबळ आक्षेप हा की तेथून उत्तरेचा मार्ग मेघदूतांतल्याप्रमाणे नाही. **रामगिरीचा शोध करतांना मेघमार्ग ही अविवाद्य कसोटी मानली पाहिजे.** मेघदूतांतील वर्णनाप्रमाणें रामगिरीहून उत्तरेस जातांना मेघाला प्रथम माल नामक पठार लागावयाचें होतें. नंतर त्याने किंचित् पश्चिमेला वळून पुनः उत्तरेला गेल्यावर त्याला आम्रकूट पर्वत लागणार होता. नंतर द्रुततर गतीने कांही मार्ग आक्रमिल्यावर त्याला विंध्यपर्वताच्या पायथ्याशीं खडकाळ भागांत विशीर्ण झालेली नर्मदा दिसणार होती. नंतर त्याने **विदिशेस** जावयाचें होतें. पुढे तसेंच उत्तरेस सरळ न जातां **वाकडी वाट करून त्याने उज्जयिनीस जावयाचें होतें.**— हा मार्ग रामशेजास कसा जुळतो हें श्री. शेंब्रवणकरांनी दाखविलें नाही. त्यांच्या 'रामशेज' पक्षांत 'माल' व 'आम्रकूट' यांनी कोणतीं स्थलें विवक्षित आहेत हें त्यांनी स्पष्ट केलें नाही. तसेंच रामशेजहून उत्तरेस कांही अंतर गेल्यावर किंचित् पश्चिमेस वळून पुनः उत्तरेचा मार्ग आक्रमिल्यावर मेघाला विदिशा कशी लागेल हेंहि त्यांनी दाखविलें नाही. याकरिता विदिशा रामशेज पर्वताच्या वायव्येस असावयास पाहिजे. पण नकाशांत ती ईशान्येस आहे. रामशेज पर्वत नाशिकच्या उत्तरेस सात मैलांवर आहे. त्याचे रेखांश ७३°, ८०′ आहेत तर विदिशेचे रेखांश ७७°, ८०′ आहेत. तेव्हां विदिशा रामशेजच्या वायव्येस नसून ईशान्येस आहे. रामशेजहून निघाल्यावर किंचित् पश्चिमेस वळून पुनः उत्तरेस जातांना विदिशा मेघाला लागली नसती. म्हणून आपल्या लेखांत मेघमार्गाचें वर्णन देतांना प्रा. शेंब्रवणेकरांनी विदिशेचा उल्लेख **बुद्धिपुरस्सर** गाळलेला दिसतो. (या लेखाच्या आरंभीं

त्यांच्या लेखांतून दिलेला उतारा पाहा.) विदिशाच काय, उज्जयिनीहि (रेखांश ७५°,७५') रामशेजहून पश्चिमेस किंचित् वळून उत्तरेस जातांना लागणार नाही. ती कांही मैल पूर्वेस राहील. तेव्हा मेघमार्गाचें वर्णन रामशेजला मुळीच जुळत नाही. म्हणून **रामगिरि रामशेज नव्हे.**

हा लेख संपण्यापूर्वी एका गोष्टीविषयी चार शब्द लिहिले पाहिजेत. आमचें सध्याचें वास्तव्य विदर्भांत असलें तरी रामगिरि हा नागपूरजवळचें रामटेक होय हें प्रतिपादण्यांत प्रांताभिमान हें मुळीच कारण नाही. केवळ सत्यान्वेषण हाच हेतु आहे. रामटेकला मेघदूतांतील वर्णन जुळतें, त्याला प्राचीन शिलालेखाचा, ताम्रपटाचा व महानुभावीय वाङ्मयाचा भक्कम आधार आहे अशी आमची पक्की खात्री झाली असल्यामुळे आम्ही त्या पक्षाचें समर्थन करतों. आमच्या प्रतिपक्षांनीहि याच निराग्रही बुद्धीने या प्रश्नाचा विचार करावा अशी त्यांस विनंती करून हा लांबलेला लेख पुरा करतों.

५. पुनश्च रामशेज !*

प्रा. शेंबवणेकर यांनी ' नवभारत ' मासिकाच्या जुलैच्या अंकांत नाशिकच्या उत्तरेस कांही मैलांवर असलेला रामशेज डोंगर हाच कालिदासाने मेघदूतांत वर्णिलेला रामगिरि असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला होता. त्या लेखांतील त्यांचीं प्रमाणें कशीं आभासात्मक आहेत हें आम्ही ' नवभारता 'च्या ऑगष्टच्या अंकांत सविस्तर दाखविलें होतें. भगवान् रामचंद्र गोदावरीच्या परिसरांत कांही काळ राहत होते म्हणून मेघदूतांत वर्णिलेलें राम व सीता यांचें निवासस्थानहि गोदावरीच्या परिसरांतच असलें पाहिजे हें अनुमान कसें हेत्वाभासदुष्ट आहे हें आम्ही स्पष्ट केलें होतें. आणि प्रा. शेंबवणेकरांनी आपलें मत सिद्ध करण्याकरिता मुख्य दोन कसोट्या रामशेजच्या बाबतींत कशा जुळतात हें दाखविलें पाहिजे असें म्हटलें होतें. त्या दोन कसोट्या येणेप्रमाणें :

(१) रामशेजचें रामगिरि हें नांव कालिदासकाळीं प्रचलित होतें.

(२) रामशेजहून उत्तरेस अलकेपर्यंत जाणारा मेघमार्ग मेघदूतांतल्या-प्रमाणे तंतोतंत आहे.

प्रा. शेंबवणेकरांनी ' नवभारत 'च्या सप्टेंबरच्या अंकांत आमच्या लेखाला उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. पण त्यांत त्यांच्या मतावर आम्ही घेतलेल्या आक्षेपांचें साधार निराकरण न करतां दंडकारण्यांत नाशिकजवळची हल्लीची पंचवटी होती किंवा नाही या अवांतर बाबीचीच प्रदीर्घ चर्चा केली आहे. दंडकारण्य कोठे होतें हें रामायणांतील पुराव्यावरून ठरविलें पाहिजे. बाण, भवभूति इत्यादि उत्तरकालीन ग्रंथकारांचीं विधानें त्या मानाने गौण मानलीं पाहिजेत. तथापि त्यांचाहि पुढे विचार करूं.

रामायणाच्या उत्तरकांडांत (सर्ग ३७–३८) विदर्भ देशाच्या दंडनामक राजाने एका मुनिकन्येवर बलात्कार केल्यामुळे त्याच्या विन्ध्य व शैवल पर्वतां-

---

* नवभारत, ऑक्टोबर १९५९

मधील राज्याचें घोर अरण्यांत रूपांतर झालें अशी कथा आली आहे. त्या काळीं दंडाचें राज्य सोडून लोक जेथे राहावयास गेले तें जनस्थान म्हणून प्रसिद्ध झालें (तपस्विनः स्थिता ह्यत्र जनस्थानमतोऽभवत् ।) असेंहि तेथे म्हटलें आहे. अर्थातच जनस्थान व पंचवटीहि दंडकारण्यांत नव्हती हें उघड आहे. दंडकारण्याचा कांही भाग पंचवटीच्या दक्षिणेस पसरला होता असें प्रा. शेंबवणेकर म्हणतात पण तें बरोबर नाही. भवभूतिहि दंडकारण्याविषयीं 'एतानि खलु...जनस्थानपर्यंतदीर्घारण्यानि दक्षिणां दिशमभिवर्तन्ते' (हीं अरण्यें जनस्थानापर्यंत दक्षिण दिशेस पसरलीं आहेत) असेंच म्हणतो. हें जनस्थान व त्यांतील पंचवटी गोदावरीच्या उगमाजवळ (नाशिकजवळ) नसून त्याच्या पूर्वेस गोदावरीला इतर नद्या मिळतात त्या ठिकाणीं असलीं पाहिजेत असें अनेक विद्वानांचें मत आहे. 'उत्तररामचरिता'च्या दुसऱ्या अंकाच्या शेवटीं :

अन्योन्यप्रतिघातसंकुलचलत्कल्लोलकोलाहलै-
रुत्तालास्त इमे गभीरपयसः पुण्याः सरित्संगमाः ॥

असें पंचवटीजवळच्या नदीसंगमांचें वर्णन आलें आहे तें नाशिकजवळच्या लहान प्रवाहाच्या गोदावरीस मुळीच जुळत नाही. तेव्हा जनस्थान व पंचवटी विदर्भाच्या दक्षिणभागीं असलीं पाहिजेत.

वरील विवेचनाने प्रा. शेंबवणेकरांच्या रामशेजचा पायाच निखळला आहे असें वाचकांच्या ध्यानांत येईल. कारण नाशिक व त्याजवळची सध्याची पंचवटी रामायणांत वर्णिल्याप्रमाणें विदर्भांत किंवा त्याला लागून होती असें मानण्यास यत्किंचित्हि प्रमाण नाही.

नाशिकजवळचा रामशेज डोंगर हा रामगिरि होय हें सिद्ध करण्याकरितां उपरिनिर्दिष्ट दोन कसोट्या त्याला जुळल्या पाहिजेत असें आम्ही म्हटलें होतें. त्यांपैकी पहिल्या कसोटीविषयीं प्रा. शेंबवणेकरांनी कांहीहि लिहिलें नाही. रामशेजचें प्राचीन नांव कोणतें होतें याविषयीं कांहीहि माहिती नाही. दुसऱ्या कसोटीची चर्चा करतांना प्रा. शेंबवणेकरांनी मान्य केलें आहे की 'मेघदूतांतील सर्व कविनिर्दिष्ट स्थळें स्पष्ट गमकें समजून **त्यांच्या अनुरोधाने** मेघमार्गाचें

परीक्षण केलें पाहिजे. ' पण स्वतः त्यांनी तसें परीक्षण मात्र केलें नाही, हें पुढे दाखविलें आहे.

कालिदासाने मेघाचा मार्ग सांगतांना तो आकाशांतून जाणार आहे हें लक्षांत न घेतां त्याला भूमिमार्गानेच पाठविलें आहे. असें प्रा. शेंबवणकरांचें म्हणणें आहे. कालिदासासारखा कवि अशी ढोबळ चूक करील हें संभवत नाही. प्रा. शेंबवणेकर म्हणतात, 'नासिकपंचवटी विभागांतला रामगिरि कवीला अभिप्रेत होता असें मानलें तर त्यावरून निघणारा मेघ आज मुंबई-आग्रा सडकेने निघणाऱ्या प्रवाशाप्रमाणें कांही पूर्वेकडे व बराचसा उत्तरेकडे जाणारा असें मानणें भाग आहे.' पण हा द्राविडी प्राणायाम करण्याची आवश्यकता काय ? इतकें करूनहि मेघमार्गाचें वर्णन या मार्गाला जुळत नाही, हें सहज दाखवितां येईल. कालिदास कोठेहि मेघाला पूर्वेकडे वळावयास सांगत नाही. याच्या उलट माल प्रदेशावर चढल्यावर मेघाने किंचित् पश्चिमेकडे वळून नंतर पुनः उत्तर दिशेने जावें (सद्यःसीरोत्कषण-सुरभिक्षेत्रमारुह्य मालं किञ्चित्पश्चाद्व्रज लघुगतिर्भूय एवोत्तरेण ॥) असें यक्ष म्हणतो. श्री. परांजपे 'उदङ्मुखः उत्पत' याचा अर्थ 'उत्तरेकडे तोंड करून पश्चिमेकडे उड्डाण कर' असा करतात, तर प्रा. शेंबवणेकर 'किश्चित्पस्चाद्व्रज' याचा अर्थ 'कांही पूर्वेकडे जा' असा सुचवितात. दोन्ही अर्थ चुकीचे आहेत, हें संस्कृतचें सामान्य ज्ञान असलेला कोणीहि विद्यार्थी सांगेल. कालिदासाने स्पष्टपणें उल्लेखिलेल्या दिशांची अशी ओढाताण कां करावयाची, तर मेघदूतांत वर्णिलेला रामगिरि हा अनुक्रमें सरगुजा संस्थानांतला रामगड आणि नाशिकजवळचा रामशेज ठरावा म्हणून ! हें योग्य आहे काय, हें सुज्ञ वाचकांनी ठरवावें.

नाशिकजवळच्या रामशेजहून निघून मेघ, प्रा. शेंबवणेकर म्हणतात त्याप्रमाणें, सध्याच्या मुंबई–आग्रा रस्त्याने गेला असता तरी त्याला मेघदूतांत वर्णिलेलीं, विदिशा आणि उज्जयिनी हीं नगरें आणि वेत्रवती, वननदी, सिंधु, शिप्रा आणि गम्भीरा या नद्या या अनुक्रमाने लागल्या नसत्या हें भारताचा नकाशा पाहिल्यास कोणाच्याहि ध्यानांत येईल. मेघदूतांतील

वर्णनाप्रमाणें रामगिरीहून उत्तरेस जातांना मेघाला प्रथम विदिशा नगरी आणि तिच्या जवळची वेत्रवती नदी लागावयाची होती. नंतर त्यानें उत्तरेस जातांना उज्जयिनी वाटेवर पडत नव्हती तरी वांकडी वाट करून त्या नगरीला भेट द्यावयाची होती, असें मेघदूतांत वर्णिलें आहे. रामशेजहून निघून मुंबई–आग्रा रस्त्यानें मेघ गेला असता तर त्याला उज्जयिनीला जाण्यास वाकडी वाट मुळीच करावी लागली नसती. ती नगरी त्याच्या मार्गावरच पडली असती. उलट त्यानंतर विदिशेस जावयास मात्र त्याला वाकडी वाट करून पूर्वेकडे वळावें लागलें असतें. त्यानंतरचीं स्थळें उज्जयनीच्या उत्तरेस असल्यामुळे मेघाला पुनः विदिशेहून उज्जयिनीस **परत यावें लागलें असतें.** कालिदासानें मेघदूतांत वेत्रवती, वननदी, सिंधु आणि शिप्रा या नद्यांचें वर्णन **या अनुक्रमानें** केलें आहे. मेघ उज्जयिनीस प्रथम जाऊन नंतर त्यानें विदिशेस भेट दिली असती तर **या नद्यांचा अनुक्रम उलटा झाला असता.** तेव्हा मेघदूतांतील मेघमार्गाचें वर्णन शेंबवणेकरांच्या मतास सर्वस्वीं विरोधी आहे. आम्ही अनेकदा म्हटल्याप्रमाणें रामगिरीचें स्थान ठरविण्यास मेघमार्ग ही अविवाद्य कसोटी मानली पाहिजे. **तो मार्ग ज्या पर्वताला जुळत नाही तो रामगिरि होऊं शकत नाही.**

रामशेजहून निघाल्यावर थेट उत्तरेस न जातां मेघ हल्लीच्या प्रवाशां-प्रमाणे मुंबई–आग्रा मार्गानें गेला असावा अशी कल्पना प्रा. शेंबवणेकरांनी आपल्या पक्षाला सावरून धरण्याकरिता केली होती. पण ती अशी त्यांच्या आंगलट येत आहे. मेघमार्गाचें वर्णन आपल्या पक्षाविरुद्ध जात आहे ह्याची जाणीव झाल्यामुळे प्रा. शेंबवणेकर म्हणतात, 'आम्ही या दृष्टीने वरील प्रदेशाचा अभ्यास केला नसल्यामुळे यांतील तपशीलाविषयीं खात्री सांगू शकत नाही, हें प्रांजळपणें कबूल करतों.' प्रा. शेंबवणेकरांचा प्रांजळपणा प्रशंसनीय आहे, पण या विषयाचा पूर्णपणें अभ्यास करून खात्री पटल्यावर मगच त्यांनी आपल्या अभिनव रामशेज पक्षाचा पुरस्कार करावयास हवा होता. तसें न केल्यामुळे त्यांनी वाचकांचा बुद्धिभेद मात्र केला आहे.

शिवाय, नाशिकजवळून निघालेल्या मेघानें मुंबई–आग्रा सडकेनेच कां जावयाचें हें समजत नाही. दक्षिणेंतून उत्तरेस किंवा उत्तर भारतांतून दक्षिणा-

पथास जाण्याचा हा एकच मार्ग प्राचीन काळीं उपलब्ध होता असें नाही. महाभारतांतील नलोपाख्यानांत—

'एते गच्छन्ति बहवः पन्थानो दक्षिणापथम् ।' (हे अनेक मार्ग उत्तरेंतून दक्षिण भारतास जात आहेत) असें म्हटलें आहे. उत्तरेंतून शत्रूंच्या दक्षिण भारतावर स्वाऱ्या झाल्या त्या सर्व मुंबई–आग्रा रस्त्याने झाल्या नाहीत. उदाहरणार्थ, इ. स. आठव्या शतकांतील अरबांनी गुजराथेंतील नवसारी मार्गाने दक्षिणेंत घुसण्याचा प्रयत्न केला होता. नाशिकहून उत्तरेंत जाणारा अशा तऱ्हेचा पश्चिमेकडील मार्गहि कालिदासास माहीत होता, हें रघुवंशांतील रघुदिग्विजयाच्या वर्णनावरून स्पष्ट आहे. तेथे म्हटलें आहे की, दिग्विजय करीत करीत रघु अपरान्त (उत्तरकोंकण) देशास पोचला. तेथील राजाचा पराजय करून त्याने त्रिकूट पर्वताला आपला जयस्तंभ केलें (रघु. ४, ५९). हा त्रिकूट पर्वत कोणता याबद्दल विद्वानांत मतभेद होता. पण सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी नाशिकजवळच्या अंजनेरी गावीं सापडलेल्या ताम्रपटांत तेथील देवालयाला दिलेल्या देणग्यांत 'पूर्वत्रिकूट' नामक विषयाच्या (जिल्ह्याच्या) लोकांवर बसविलेल्या कराचा उल्लेख आहे. त्यावरून नाशिकच्या पश्चिमेस लागणाऱ्या पर्वतराजीस त्रिकूट हें नांव होतें हें निश्चित झालें आहे. तेव्हा रघूची सेना नाशिकजवळ आली होती यांत संशय नाही. तेथून उत्तरेस जातांना रघूने **स्थलमार्गाचा** अवलंब करून पारसीक, यवन वगैरे उत्तरेंतील राजांचा पराभव केला (रघु, ४, ६०–६४). रघूबरोबर त्याची चतुरंग सेना होती. या सेनेसह तो पश्चिमेकडच्या मार्गाने उत्तर भारतांत गेला होता हें उघड आहे. त्याकरितां त्याने मुंबई–आग्रा रस्त्याचा अवलंब केला नव्हता; कारण नंतर त्याने मध्यभारतांतील देश जिंकल्याचें वर्णन रघुवंशांत आलें नाही. चतुरंग सेनेसह रघूला ज्या स्थलमार्गाने जातां आलें तो मार्ग आकाशसंचारी मेघाला आक्रमितां आला नसता असें म्हणतां यावयाचें नाही. ज्या अर्थीं मेघदूतांत या पश्चिमेकडील मार्गाचें वर्णन नसून माल प्रदेश, आम्रकूट (सातपुड्याचें शिखर), नर्मदा, विदिशा, वेत्रवती इत्यादि दक्षिण व उत्तर भारतांतील मध्य भागच्या नद्या, पर्वत व नगरांचें वर्णन आहे त्या अर्थीं रामगिरि नाशिकजवळचा रामशेज डोंगर होणें शक्य

नाही. कारण मेघदूतांत वर्णिलेला मार्ग त्याला मुळीच जुळत नाही. तो रामगिरि नर्मदेच्या दक्षिणेस विदर्भातच असला पाहिजे.

" रामटेकचें रामगिरीशीं ऐक्य साधूं पाहणाऱ्यांना पूर्वीच्या दोन तीन पिढ्यांचे परिश्रम लाभदायक झाले तसें आमच्या बाजूस कांही साधन नाही." अशी परिदेवना प्रा. शेंबवणेकरांनी केली आहे. रामगिरिविषयक संशोधनांत आम्हांस पूर्वीच्या संशोधकांचें साहाय्य झालें अशी प्रा. शेंबवणेकरांची कल्पना झालेली दिसते. पण ती चूक आहे. प्रो. विल्सनने रामटेक हें रामगिरि असावें असें केवळ विधान केलें होतें खरें, पण त्याचें प्रमाणांनी समर्थन केलें नव्हतें. त्याने सुचविलेली मालप्रदेश म्हणजे रतनपुरच्या परिसरांतील मालडा, आम्रकूट म्हणजे अमरकंटक हीं समीकरणें रामटेकहून विदिशेस जाणाऱ्या मेघमार्गास जुळणारीं नाहीत म्हणून त्याज्य ठरवावीं लागलीं. रामगिरि म्हणजे रामटेकच कां याविषयी शिलालेख, ताम्रपट, संस्कृत व महानुभावीय वाङ्मय यांचे आधार द्यावे लागले. तेव्हा आम्हास पूर्वगामी संशोधकांचें फारसें साहाय्य झालें नाही. प्रा. शेंबवणेकरांस इतरांचें साहाय्य होत नसल्यास त्यांनी आपला अभिनव सिद्धांत प्रकाशित करण्याची घाई करावयास नको होती. असो.

आम्ही शेंबवणेकरांना पूर्वी दिलेल्या उत्तरामुळे असो किंवा अन्य कांही कारणामुळे असो, रामगिरि म्हणजे रामशेज डोंगर या मताविषयी त्यांचा आग्रह आता कमी झालेला दिसतो. कारण ते आपल्या नवीन लेखाच्या आरंभीं लिहितात—' कालिदासास अभिप्रेत असलेला रामगिरि प्रायः नासिक-जवळची रामशेज नामक उंच डोंगराची रांग किंवा **गोदावरीच्या परिसरांतील अन्य पर्वत** असला पाहिजे.' (जाड टाईप आमचा.) आमच्या प्रस्तुत लेखांतील विवेचनाने त्यांच्या मनांतील एतद्विषयक विकल्प नाहीसा होऊन रामटेक हाच रामगिरि असणें शक्य आहे याविषयी त्यांची खात्री होईल अशी आशा आहे.

६. जैन वाङ्मयांतील रामगिरि*

कविकुलगुरु कालिदासाने निर्वासित यक्षाचें निवासस्थान म्हणून आपल्या मेघदूतांत वर्णिलेला रामगिरि हा कोठे होता या विषयी गेल्या दोन वर्षांत बरीच चर्चा झाली आहे. ती वाचल्यावर अहमदाबादच्या गुजरात कॉलेजांतील प्राध्यापक डॉ. वा. म. कुळकर्णी यांनी जैन वाङ्मयांतील रामगिरि-विषयक उल्लेखांकडे माझें लक्ष वेधलें आणि त्या उल्लेखांचा उपयोग मेघदूतांतील रामगिरीचें स्थान निश्चित करण्याकरितां होतो काय हें पाहावें आणि आपला निर्णय लेखरूपाने प्रसिद्ध करावा अशी पत्रद्वारें विनंती केली. डॉ. कुल्कर्णी यांनी माझ्या निदर्शनास आणलेल्या उल्लेखांचें परीक्षण करून मी माझें मत त्यांस कांही महिन्यांपूर्वी कळविलें होतें, पण लेख लिहिण्यास सवड झाली नव्हती. प्रस्तुत लेखांत त्यांची चर्चा करीत आहे.

जैन वाङ्मयांत रामगिरीचा पहिला उल्लेख† विमलसूरीच्या 'पउमचरियां'त ('पद्मचरितां'त) आला आहे. विमलसूरीचा काल निश्चित नाही. पउमचरियांतील (प. ११८, १०३) निर्देश खरा मानल्यास तें काव्य महावीर तीर्थंकरांच्या निर्वाणानंतर ५३० या वर्षी पूर्ण झालें असावें. डॉ. याकोबी यांनी महावीरांच्या निर्वाणाचा काल खिस्तपूर्व ४७७ हा ठरविला आहे. तेव्हा पउमचरिय खिस्तोत्तर ५३ या वर्षी पूर्ण झालें असें मानलें पाहिजे. पण हा काल सर्वांस मान्य नाही. पउमचरियाच्या शेवटीं आपण नाइलकुलवंशांतील राहु याचा शिष्य विजय याचा शिष्य आहों अशी माहिती विमलसूरि देतो. नाइल (नागिल) वंश हा नगेन्द्रगच्छच असून तो खिस्तोत्तर

---

* नवभारत, आक्टोबर १९६०.

† डॉ. याकोबींनी संपादिलेल्या आणि भावनगर येथे प्रसिद्ध झालेल्या 'पउमचरिया'च्या आवृत्तीचा उपयोग प्रस्तुत लेखांत केला आहे. खिस्तोत्तर सातव्या शतकांत रविषेणाचार्याने संस्कृतांत 'पद्मचरित' काव्य रचलें तें 'पउमचरिया'चें विस्तृत रूपांतर आहे.

९३ या वर्षी स्थापन झाला असें कल्पसूत्रांतील उल्लेखावरून दिसतें. अर्थातच पउमचरिय खिस्तोत्तर ५३ व्या वर्षी लिहिलें जाणें संभवनीय नाही. डॉ. याकोबींच्या मतें तें काव्य खिस्तोत्तर तिसऱ्या शतकांतील असावें. इतर कांही विद्वान हा काळ एक शतक मागे नेतात. तथापि हें काव्य सध्या ज्ञात असलेल्या प्राकृत काव्यांत सर्वांत प्राचीन आहे, असें दिसतें.

विमलसूरीने रामचरित हा आपल्या काव्याचा विषय केला आहे. पद्म हें रामाचेंच दुसरें नांव होय. बौद्ध ग्रंथकारांनी ज्याप्रमाणें वाल्मीकिरामायणांतील रामकथा लक्षांत घेऊन तिजमध्ये आपल्याला इष्ट ते फेरफार केले त्याप्रमाणेंच विमलसूरीनेहि त्या रामायणांतील कथा घेऊन तींतील असंभाव्य वाटणारा भाग गाळून किंवा त्याला निराळें रूप देऊन आपलें काव्य रचलें आहे. राक्षसांना वानरांनी मारणें, कुंभकर्णाने सहा सहा महिने निद्रा घेणें आणि जागें झाल्यावर हत्तीसारखे विशाल प्राणी गिळंकृत करणें, रावणाला दहा तोंडें असणें इत्यादि वाल्मीकिरामायणांतील वर्णन असंभाव्य म्हणून असत्य आहे असें विमलसूरीचें म्हणणें आहे. यांपैकी कांहींची उपपत्ति त्याने निराळ्या रीतीने लावली आहे. उदाहरणार्थ, वानर हे पुच्छधारी प्राणी नसून वानरांचें लांछन धारण करणारे विद्याधर होते. तसेंच रावणाने नऊ रत्नांचा हार गळ्यांत घातल्यामुळे त्यांत पडलेल्या त्याच्या मुखाच्या प्रतिबिंबामुळे तो दशमुखी आहे असें वाटत असे, अशी उपपत्ति विमलसूरीने लावली आहे.

विमलसूरीने वाल्मीकिरामायणांतील कथेंत बरेच फेरफार केले असले तरी रामाची कथा बहुतांशीं तशीच आहे. दशरथ वृद्ध झाल्यामुळे पद्माला (रामाला) राज्याभिषेक करूं इच्छितो, पण कैकेयी आपल्याला दिलेल्या वराची आठवण देऊन तें राज्य आपल्या भरत नामक पुत्राकरितां मागते. तेव्हा पद्म (राम), लक्ष्मण व सीता यांसह, वनाला जाण्यास निघतो. भरताला हें रुचत नाही. तथापि कैकेयी व राम यांच्या सांगण्यावरून तो पद्म परत येईपर्यंत राज्यकारभार पाहण्यास तयार होतो.

रामवनवासांतील कांही घटना विमलसूरीने वाल्मीकिरामायणांतल्या प्रमाणे वर्णिल्या आहेत; पण कांही भिन्न आहेत वनवासांत हिंडत हिंडत राम, लक्ष्मण व सीता वंशस्थपुरास आले. त्या नगराच्या राजाने आग्रह केला तरी

रामानें त्यांत प्रवेश न करतां त्याजवळच्या वंशगिरीवर वास केला. त्या पर्वताचें वर्णन करतांना विमलसूरि म्हणतो—

नाणाविहतरुछन्ने नाणाविहपक्खिकलरवुग्गीए ।
वरकुसुमगन्धपवणे निज्झरपवहन्तविमलजले ॥ ४, ४

(त्या पर्वतावर नानाविध तरूंची दाट छाया होती, अनेक प्रकारचे पक्षी मधुर कूजन करीत होते, उत्कृष्ट पुष्पांचा सुगन्ध दरवळत होता आणि विमल जलाचे निर्झर वाहत होते.)

त्या ठिकाणीं त्या नृपतिश्रेष्ठानें रामादिकांकरितां सर्व प्रकारचे सुखोपभोग पुरविले आणि त्या पर्वतावर रामाच्या आज्ञेनें अनेक जिनश्रेष्ठांचीं मंदिरें बांधलीं.

(तत्थेव वंससेले पउमाणत्तेण नरवरिन्देणं ।
जिणवरभवणाइ तउं निवेसियाइं पभूयाइं ॥)

नंतर कांही काल तेथे घालविल्यावर रामानें लक्ष्मणास म्हटलें—

अह अन्नया कयाई भणिक रामेण तत्थ सोमित्ती ।
मोत्तूण इमं ठाणं अन्नं देसं पगच्छामो ॥
निसुव्विणज्जइ कण्णरवा महाणई तीए परएणं ।
मणुयाण दुग्गमं चिय तरुबहलं दण्डयारण्णं ॥

राम लक्ष्मणाला म्हणाला, ' आता आपण हें ठिकाण सोडून दुसरीकडे जाऊंया. कर्णरवा नांवाच्या नदीपलीकडे मनुष्यांना दुर्गम असें दाट झाडीचें दण्डकारण्य आहे. त्यांत आपण झोपडी बांधून राहूं. ' त्याप्रमाणे राम, लक्ष्मण व सीता तेथून निघून दण्डकारण्याकडे निघालीं. नंतर विमलसूरि म्हणतो—

रामेण जम्हा भवणोत्तमाणि
जिणिन्दचन्दाण निवेसियाणि ।
तत्थेव तुङ्गे विमलप्पभाणि
तम्हा जणे रामगिरी पसिद्धो ॥

त्या तुंग पर्वतावर रामानें जिनेन्द्राकरितां उत्कृष्ट आणि देदीप्यमान अशीं मंदिरें बांधविलीं म्हणून तेव्हापासून तो पर्वत रामगिरि या नांवानें प्रसिद्ध झाला.

पउमचरियांतील हें रामगिरीचें वर्णन कितपत यथातथ्य होतें हें सांगतां येत नाही. त्यांत बराचसा भाग काल्पनिक असावा. तथापि त्यावरून विमलसूरीच्या काळीं (ख्रिस्तोत्तर दुसऱ्या–तिसऱ्या शतकांत) दण्डकारण्याच्या उत्तरेस रामगिरि नांवाचा पर्वत प्रसिद्ध होता असें मात्र स्पष्ट दिसतें. त्या ठिकाणीं रामाचा निवास कांही काळ झाल्यामुळे त्या पर्वताला हें नांव प्राप्त झालें होतें असें विमलसूरि सांगतो. रामगिरि पर्वताचें हें भौगोलिक स्थान रामटेकाला जुळणारें आहे. रामटेकवर शम्बूकाच्या तपश्चर्येचें स्थान दाखविण्यांत येतें. शम्बूक जेथे तपश्चर्या करीत होता, तेथून भयंकर श्वापदांनी ज्यांतील गिरिगव्हरें व्यापिलीं आहेत असें दण्डकारण्य दक्षिण दिशेस पसरलें होतें असें भवभूतिहि उत्तररामचरितांत सांगतो.* तेव्हा रामटेक हेंच विमलसूरीस विवक्षित असावें. निदान ख्रिस्तोत्तर ४०० पासून रामटेक रामगिरि नांवानें प्रसिद्ध होतें हें वाकाटकांच्या कोरीव लेखांवरून सिद्ध झालें आहे.† पुण्यक्षेत्र म्हणून त्याची प्रसिद्धि त्यापूर्वी एक दोन शतकें असल्यास नवल नाही.

रामगिरीवर जैनांचीं मंदिरें होतीं हें वर्णन मात्र काल्पनिक दिसतें. कारण तशा मंदिरांचे अवशेष रामटेकच्या टेकडीवर आढळत नाहीत. पण त्या टेकडीवर नसलीं तरी त्याच्या आसपास जैनमंदिरें असावीं. त्यांपैकी एका मंदिरांतील शांतिनाथ या जैन तीर्थंकराची सुंदर व भव्य पंधरा फूट उंचीची

---

* 'एतानि खलु सर्वभूतरोमहर्षणान्युन्मत्तचण्डश्वापदकुलसङ्कुलगिरिगह्वराणि जनस्थानपर्यन्तदीर्घारण्यानि दक्षिणां दिशमभिवर्तन्ते ।' उत्तरामचरित, २।१५.

† 'रामगिरिस्वामिनः पादमूलात्' हा वाकाटक राज्ञी प्रभावती गुप्ता हिच्या ऋद्धपूर ताम्रपटांतील उल्लेख पाहा. 'मेघदूतांतील रामगिरि अर्थात् रामटेक,' पृ. १०८.

मूर्ति कांही वर्षांपूर्वी रामटेकच्या परिसरांत सापडली होती, ती फार प्राचीन आहे असें म्हणतात. धार्मिक जैन समाजाच्या उदार दातृत्वानें ती मूर्ति रामटेक येथे एका प्रशस्त जैनमंदिरांत बसविली आहे. त्याच आवारांत पार्श्वनाथ व चंद्रप्रभु यांचीं मंदिरें आहेत. रामटेकजवळ नागार्जुनाची म्हणून एक टेकडी दाखविण्यांत येते. शिवाय रामटेकजवळ एका तळ्याच्या काठीं कांही पुरातन अवशेष दिसतात ते बौद्धविहाराचे असावे असें कै. रा. ब. काशीनाथपंत दीक्षित यांचें मत झालें होतें. तेव्हा रामटेक हें स्थान हिंदू, जैन व बौद्ध या तीनहि धर्मांच्या दृष्टीने पवित्र होतें.

पउमचरियांतील रामगिरीचें वर्णन रामगडच्या मात्र सर्वस्वी विरुद्ध जातें. कारण त्या पर्वतावर किंवा त्याच्या समंतात् जैन धर्माच्या मंदिराचे अवशेष सापडले नाहीत, आणि त्याच्या दक्षिणेस दण्डकारण्य होतें असेंहि प्राचीन संस्कृत वाङ्मयांतील त्या अरण्याच्या वर्णनावरून दिसत नाही.

७. मेघदूतांतील देवगिरि*

कविकुलगुरु कालिदासाचें भौगोलिक ज्ञान यथातथ्य होतें अशी ख्याति आहे. त्याने अनेक पर्वत, नद्या, नगरें वगैरेंचें वर्णन आपल्या ग्रंथांत केलें आहे; पण त्यांत कोठेहि यत्किंचित् चूक आढळत नाही. उलट प्रत्येक भौगोलिक स्थानाचें यथातथ्य चित्र मोजक्या शब्दांत काढण्यांत त्याचा हातखंडा आहे. मेघदूतांत त्याने रामगिरीपासून अलकेपर्यंतच्या मार्गावर मेघाला लागणाऱ्या अनेक देशांचें, पर्वतांचें, नद्यांचें व नगरांचें वर्णन केलें आहे. त्यांतील बहुतेकांचा शोध लागला आहे; पण कांहींच्या बाबतींत अद्यापि निश्चितपणा नाही. अशा एका स्थलाचा शोध प्रस्तुत लेखांत करावयाचा आहे.

देवगिरीचा उल्लेख

रामगिरीहून उत्तरेंत जातांना मेघाला वाटेंत मालप्रदेश, आम्रकूट पर्वत रेवा (नर्मदा) नदी, दशार्ण देश व त्याची विदिशा नामक राजधानी लागेल, असें यक्षाने म्हटलें आहे. या सर्वांचा शोध प्रस्तुत लेखकाच्या 'मेघदूतांतील रामगिरि' (संशोधनमुक्तावलि, सर १, पृ. ५३–६४) या लेखांत लावलेला आढळेल. विदिशेपासून उत्तरेस अलकेला जातांना वाटेंत उज्जयिनी लागली नसती. तरीहि कालिदासाला त्या नगरीचेंहि वर्णन मेघदूतांत यावें अशी इच्छा असल्याने त्याने मेघाला मुद्दाम वांकडी वाट करून उज्जयिनीस नेलें आहे. उज्जयिनीचें व तिच्या परिसरांतल्या वननदी, सिन्धु, निर्विन्ध्या, शिप्रा, गन्धवती व गम्भीरा, या लहानसहान नद्यांचें रमणीय वर्णन केल्यावर कालिदासाने पुढील तीन श्लोकांत देवगिरि व त्यावरच्या कार्त्तिकेयाच्या देवालयाचें वर्णन केलें आहे.

---

* तरुण भारत, दीपावलि अंक, १९५८.

त्वन्निष्यन्दोच्छ्वसितवसुधागन्धसम्पर्करम्यः
स्रोतोरन्ध्रध्वनितसुभगं दन्तिभिः पीयमानः ।
नीचैर्वास्यत्युपजिगमिषोर्देवपूर्वं गिरिं ते
शीतो वायुः परिणमयिता काननोदुम्बराणाम् ॥४२॥

तत्र स्कन्दं नियतवसतिं पुष्पमेघीकृतात्मा
पुष्पासारैः स्नपयतु भवान् व्योमगङ्गाजलार्द्रैः ।
रक्षाहेतोर्नवशशिभृता वासवीनां चमूना-
मत्यादित्यं हुतवहमुखे संभृतं तद्धि तेजः ॥४३॥

ज्योतिर्लेखावलयि गलितं यस्य बर्हं भवानी
पुत्रप्रेम्णा कुवलयदलप्रापि कर्णे करोति ।
धौतापाङ्गं हरशशिरुचा पावकेस्तं मयूरं
पश्चादद्रिग्रहणगुरुभिर्गर्जितैर्नर्तयेथाः ॥४४॥

(बा मेघा! तुझ्या जलवर्षावाने सुगन्धित झालेल्या भूमीच्या संपर्काने रम्य वाटणारा, हत्तींनी सेवन केला जात असतां त्यांच्या सोंडेतील रंध्रांत मधुर आवाज करणारा आणि वनांतील उंबरांना पिकविणारा गार वारा तूं देवगिरीला जाण्याची इच्छा करीत असतां तुझ्या खाली वाहत राहील. ४२.

त्या ठिकाणीं नेहमी वस्ती करून राहिलेल्या कार्तिकेयावर तूं स्वतः पुष्पमेघाचें स्वरूप धारण करून आकाशगंगेच्या जलाने आर्द्र झालेल्या पुष्पांची वृष्टि करावी. तो कार्तिकेय म्हणजे भगवान् शंकराने देवसेनांच्या रक्षणार्थ अग्नीच्या मुखीं ठेवलेलें सूर्यापेक्षाहि प्रखर असें आपलें तेज होय. ४३.

ज्याचें तेजोवलययुक्त असें पिच्छ पार्वती आपल्या पुत्रावरच्या प्रेमास्तव स्वतःच्या कर्णावर कुवलयदलाशेजारीं धारण करते, आणि ज्यांचे नेत्रकोण भगवान् शंकराच्या मस्तकावरील चंद्राच्या तेजाने शुभ्र झाले आहेत अशा त्या कार्तिकेयाच्या मयूराला तूं नंतर गिरिगुहांत घुमणाऱ्या आपल्या गर्जनांनी नाचवावें. ४४.)

यानंतरच्या श्लोकांत मेघानें कार्त्तिकेयाची पूजा केल्यावर कांहीं अन्तर जावें (उल्लंघिताध्वा), म्हणजे त्याला चर्मण्वती नदी लागेल, असें यक्षानें म्हटलें आहे.

वरील श्लोकांवरून आपणांस काय माहिती मिळते तें पाहूं.

उज्जयिनीच्या वायव्येस सुमारें २० मैलांवर गंभीरा नदी लागते. ती ओलांडल्यावर एक उदुंबर वृक्षांचें वन लागत असे. त्यामध्ये देवगिरि नामक पर्वतावर कालिदासाच्या काळीं सुविख्यात असलेलें असें कार्त्तिकेयाचें देवालय होतें. कालिदास इतर स्थलांच्या वर्णनास सामान्यतः एखादाच श्लोक देतो, पण या स्थलाच्या वर्णनास त्यानें तीन श्लोक दिले आहेत. त्यावरून त्याचें तत्कालीन महत्त्व ध्यानांत येतें. त्यानंतर कांही अंतर गेल्यावर मेघाला चर्मण्वती (चंबळा) नदी लागेल असें यक्षानें म्हटलें आहे. चर्मण्वती ओलांडल्यावर मेघास दशपुर (मन्दसोर) येथे जावयाचें होतें. तेव्हा देवगिरि हा पर्वत उज्जयिनी व मन्दसोर यांच्यामध्ये, त्यांतहि गम्भीरा व चर्मण्वती यांच्यामधील वनप्रदेशांत होता, असें स्पष्ट दिसतें.

अनेकविध तर्क

हा देवगिरि पर्वत नक्की कोठे होता, याविषयी अनेकांनी अनेकविध तर्क केले आहेत. मेघदूत काव्याच्या आवृत्त्या व अनुवाद अनेकांनी प्रकाशित केले आहेत; पण त्यांपैकी बहुतेकांनी 'देवगिरि हा माळव्याच्या मध्यभागीं असलेला एक पर्वत' एवढेंच म्हटलें आहे. कांहींनी 'झांशीच्या नैऋत्येस ६० मैलांवर देवगड आहे व तेथे कार्त्तिकेयाचें देऊळ आहे, तेंच देवगिरीचें स्थान' असें म्हटलें आहे खरें, (डॉ. वा. गो. परांजपे यांनी संपादिलेलें 'मेघदूत' टिप्पणी, पृ. १६०) पण तें बरोबर दिसत नाही. हें देवगड वेत्रवती (बेटवा) नदीच्या काठी आहे. मेघदूतांत वर्णिलेला देवगिरि गम्भीरा व चर्मवण्ती या नद्यांमधील प्रदेशांत होता, पण हें देवगड गंभीरा नदीच्या पश्चिमेस नसून ईशान्येस जवळ जवळ २०० मैलांवर आहे. अर्थातच तें मेघाच्या मार्गावर पडत नाही. दुसरी गोष्ट ही कीं, या देवगड येथे कार्त्तिकेयाचें देऊळ होतें याला पुरावा नाही.

तेथे अनेक जैन तीर्थंकरांच्या देवळांचे अवशेष सापडले आहेत. तेथे एक गुप्तकालीन देवालयहि भग्न स्वरूपांत अवशिष्ट आहे व तें तेथील शिल्पकृतींच्या उत्कृष्टतेमुळे सुविख्यात झालें आहे. (माधवस्वरूप वत्स यांचें ' दि गुप्त टेंपल ॲट देवगिरि ' पाहा). पण तें देवालय स्कन्द किंवा कार्त्तिकेय याचें नसून विष्णूचें होतें, हें त्याच्या भिंतींत बसविलेल्या शिल्पपट्टांवरून स्पष्ट दिसतें. एका शिल्पपट्टांत मयूरवाहन कार्त्तिकेयाची मूर्ति कोरली आहे खरी, पण तो शिल्पपट्ट अनन्तशायी विष्णूचा असून त्यांत कार्त्तिकेयाचा अन्तर्भाव गौणरूपाने केला आहे. तेव्हा हें गुप्तकालीन देवालय कार्त्तिकेयाचें नसून विष्णूचें होतें, हें उघड आहे. कनिंग्हाम् व माधवस्वरूप वत्स यांनी देवगड येथील अवशेषांचें वर्णन केलें आहे, पण त्यांपैकी कोणीहि तेथे कार्त्तिकेयाचें देवालय होतें असें म्हटलें नाही. तेव्हा वरील विधान कांही गैरसमजामुळे केलेलें दिसतें. शिवाय हें ठिकाण उज्जयिनी ते दशपुर (मन्दसोर) या मार्गावर पडणारें नसून त्याच्या पूर्वेस सुमारें २०० मैलांवर आहे हें मागे सांगितलें आहेच. तेव्हा तें मेघदूतांतील देवगिरि असणें शक्य नाही.

कै. का. बा. पाठक यांचें मत

देवगिरीच्या स्थानाविषयी दुसरें मत कै. प्रा. काशिनाथ बापूजी पाठक यांचें. सन १८९४ मध्ये त्यांनी मेघदूताची पहिली आवृत्ति प्रसिद्ध केली. तिच्यांत श्लो. ४५ वरच्या टिप्पणींत देवगिरि हें माळव्याच्या मध्यभागीं चंबळा नदीच्या दक्षिणेस नकाशांत दिसत असलेलें देवगड होय. या टेकडीवर कार्त्तिकेयाचें देऊळ होतें, असें तें म्हणतात. या देवगडाचें नक्की स्थान त्यांत सांगितलें नाही. तसेंच कार्त्तिकेयाचें देऊळ होतें याला प्रमाण काय, हेंहि त्यांनी स्पष्ट केलें नाही. देवगिरीच्या शोधाकरितां सर्व्हे ऑफ इंडियाचा विस्तृत डिग्री नकाशा क्रमांक ४६ एम् याचें बारकाईने निरीक्षण केल्यावर मला देवगड नांवाचें एकच गांव चंबळा आणि गंभीरा व शिप्रा या नद्यांमध्ये रेखांश ७५'२७, अक्षांश २३'५३ या ठिकाणीं सापडलें. हें गांव शिप्रा व चंबळा या नद्यांच्या संगमाच्या थेट दक्षिणेस पांच मैलांवर आहे. गंभीरा नदी शिप्रेला मिळते, म्हणून हें गाव

मेघदूतांतल्या वर्णनाप्रमाणे गंभीरा–चर्मण्वती (चंबळा) या नद्यांमधील प्रदेशांत आहे असें म्हणण्यास हरकत नाही. चंबळा नदी या गावाच्या पश्चिमेस पांच मैलांवर वाहते. हें गाव डोंगराळ भागांत वसलें आहे आणि तें उज्जयिनी–मन्दसोर या मार्गावर आहे या गावाच्या जवळच्या टेकडीस देवगिरि असें नांव प्राचीन काळीं असणें शक्य आहे. नागपुराजवळच्या रामगिरीवरून त्यालगतच्या गावाला जसें रामटेक असें नांव पडलें आहे तसेंच देवगिरीवरून देवगड हें ग्रामनाम प्रचलित झालें असावें. हें गाव मी स्वतः पाहिलें नाही. त्यामुळे तेथे कांही प्राचीन अवशेष आहेत किंवा नाहीत हें मला माहीत नाही. कै. प्रा. पाठकांनीहि तें समक्ष पाहिलें नव्हतें. या गावाची पुरातत्त्व-खात्यातर्फे पाहणी होणें जरूर आहे. भोपाळच्या पुरातत्त्वखात्याच्या शाखेस मी तशी सूचना केली आहे. या देवगड गावाची भौगोलिक परिस्थिति मात्र मेघदूतांतल्या देवगिरीप्रमाणे आहे यांत संशय नाही. उज्जयिनीहून दशपुरला (मन्दसोरला) जातांना मेघाला उज्जयिनीच्या वायव्येस सुमारें २० मैलांवर गंभीरा नदी पार करावी लागली असेल. तेथून पुढे उत्तर दिशेने ३०–३५ मैल गेल्यावर देवगड (प्राचीन देवगिरि), नंतर वायव्य दिशेस पांच मैलांवर चंबळा नदी आणि पुढे सुमारें पंचवीस मैलांवर मन्दसोर (प्राचीन दशपूर) लागलें असावें. हा मार्ग मेघदूताच्या खालील श्लोकांत वर्णिल्याप्रमाणे आहे यांत संशय नाही.

आराध्यैनं शरवणभवं देवमुल्लंघिताध्वा
सिद्धद्वन्द्वैर्जलकणभयाद्वीणिभिर्मुक्तमार्गः ।
व्यालम्बेथाः सुरभितनयालम्भजां मानयिष्यन्
स्रोतोमूर्त्या भुवि परिणतां रन्तिदेवस्य कीर्तिम् ॥४५॥

[त्या कार्तिकेयाची आराधना करून कांही अंतर गेल्यावर वीणाधारी सिद्धदम्पतींनी जलबिंदूंच्या भयाने ज्याला वाट करून दिली आहे, अशा त्वां यज्ञामध्ये अनेक वृषभांचा संहार झाल्यामुळे नदीरूपाने पृथ्वीवर उत्पन्न झालेल्या रन्तिदेवाच्या कीर्तीला मान देण्याकरितां चर्मण्वती (चंबळा) नदीवर (कांही काळ) वाकावें.]

देवगडची भौगोलिक स्थिति मेघदूतांत वर्णिल्याप्रमाणे असली तरी त्या गावाजवळ टेकडी व तिच्यावर प्राचीन काळचे अवशेष आहेत काय हें पाहणी करून निश्चित समजल्याशिवाय हा स्थलनिश्चय पक्का झाला असें म्हणतां येत नाही. तेव्हा वरील भौगोलिक स्थितीला जुळणाऱ्या व ज्याची पाहणी झाली आहे अशा आणखी एका स्थलाचा विचार करूं.

देवडुंगरी म्हणजे देवगिरि

ग्वालेर संस्थानच्या पुरातत्त्वखात्याचे माजी संचालक श्री. मो. ब. गर्दे यांनी कालिदासाने उल्लेखिलेल्या देवगिरीचें स्थान निश्चित करावें, या उद्देशाने उज्जयिनीजवळच्या प्रदेशांत प्रवास करून देवगिरि म्हणजे उज्जयिनी–नागडा या रेल्वेमार्गावर असलेल्या उन्हेल स्टेशनच्या वायव्येस तेरा–चौदा मैलांवर असलेली देवडुंगरी होय, असें आपलें मत प्रदर्शित केलें आहे.*

देवगिरी आणि देवडुंगरी यांतील नाम-सादृश्य सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. शिवाय कालिदासाने वर्णिल्याप्रमाणे हें ठिकाण गम्भीरा व चंबळा या नद्यांमधील प्रदेशांत आहे. देवडुंगरी ही एक लहानशी टेकडी १००० फूट लांब, ४०० फूट रुंद आणि १०० फूट उंच अशी आहे. तिच्या आसमंतांतच्या भागीं दुसरी टेकडी नाही. या टेकडीवर दोन अलीकडे बांधलेलीं देवालयें आहेत. एक भैरवाचें आणि दुसरें देवधर्मराजाचें. हा देवधर्मराज घोड्यावर बसलेला व हातांत भाला घेतलेला असा दाखविला आहे. महाराष्ट्रांत स्कंद–कार्त्तिकेयाची पूजा खंडोबाच्या रूपाने केली जाते, तर मध्यहिंदुस्थानांत ती देवधर्मराजरूपाने सध्या प्रचलित आहे. देवडुंगरीवरील हें देवधर्मराजाचें देवालय गुप्तकालाइतकें प्राचीन नाही खरें, पण तें तेथील कार्त्तिकेयाच्या

---

* Cf. 'Deva Ḍungri is 13 or 14 miles, half by a metalled road and half by a cart track, to the north–west of Unhel Station on the Ujjain–Nagda branch line of the B. B. and C. I. Railway.' Mr. M. B. Garde in the Annual Report of the Archaeological Survey of India for 1925–1926, page 192.

पुरातन देवालयाच्या ठिकाणीं नंतरच्या काळांत बांधलें असावें. तेव्हा देवडुंगरी हें मेघदूतांतील देवगिरि होय, असें मत श्री. गर्दे यांनी व्यक्त केलें आहे.

मला उपलब्ध असलेल्या सर्व्हे ऑफ इंडियाच्या विस्तृत नकाशांत उन्हेलच्या सभोंवार सुमारें १५ मैलांच्या टापूंत या देवडुंगरीचें नांव शोधण्याचा मी प्रयत्न केला, पण मला तें ठिकाण सापडलें नाही. उन्हेल स्टेशनच्या पश्चिमेस तीनचार मैलांवर चंबळा नदी वाहते. उन्हेल स्टेशनच्या बरोबर वायव्य दिशेस देवडुंगरी होती असें मानलें तरी हें अंतर पांचसहा मैलांपेक्षा जास्त नाही. तेव्हा उन्हेल–चंबळा या प्रदेशांत देवगिरि असल्यास तेथून चंबळा नदीस पोंचण्यास मेघास मोठासा मार्ग आक्रमावा लागला नसता. पण कालिदास तर वरील श्लोकांत देवगिरीहून 'कांही अंतर गेल्यावर' (उल्लंघिताध्वा) मेघाला चंबळा नदी लागेल असें वर्णन करतो. तेव्हा श्री. गर्दे म्हणतात त्याप्रमाणे उन्हेल स्टेशनच्या वायव्येस तेरा–चौदा मैलांवर देवडुंगरी असल्यास ती कालिदासाचा देवगिरि होय, असें म्हणतां येणार नाही.

देवडुंगरीचें स्थान

देवडुंगरी सर्व्हे ऑफ इंडियाच्या विस्तृत नकाशांत न सापडल्यामुळे मीं माझे स्नेही भारतीय पुरातत्त्वखात्याचे सध्या भोपाळला असलेले सुपरिंटेंडेंट श्री. कृष्ण देव यांस देवडुंगरीच्या आसपासच्या एकदोन गावांचीं नावें कळविण्याविषयी विनंति केली. त्यांनी आपल्या उत्तराबरोबर त्या भागाचा विस्तृत नकाशाहि पाठविला आहे. त्यावरून देवडुंगरी टेकडी उन्हेल गावच्या (श्री. गर्दे म्हणतात त्याप्रमाणे त्या गांवापासून पश्चिमेस पांच मैलांवर असलेल्या उन्हेल स्टेशनच्या नव्हे) थेट उत्तरेस (वायव्येस नव्हे) सुमारें १० मैलांवर अंत्रालिया गावाजवळ आहे, असें दिसतें, उज्जयिनीहून मन्दसोरला जाण्याच्या मार्गावरच ती आहे. उज्जयिनीपासून वायव्य दिशेस वीस मैल गेल्यावर मेघाला गम्भीरा नदी पार करावी लागली असावी. तेथून पुढे ४–५ मैलांवर देवडुंगरी आहे. देवडुंगरी (प्राचीन देवगिरि) येथील कार्त्तिकेयाची आराधना केल्यावर वायव्येस तीस मैल गेल्यावर चंबळा (प्राचीन चर्मण्वती) आणि पुढे सुमारें पंचवीस मैलांवर मन्दसोर (प्राचीन

दशपुर) लागतें. तेव्हा देवडुंगरीचें भौगोलिक स्थान मेघदूतांत वर्णिल्याप्रमाणे आहे, यांत संशय नाही.

देवगिरि येथील कार्त्तिकेयाचें देवालय कालिदासाच्या काळीं सुप्रसिद्ध होतें असें दिसतें. त्यांतील कार्त्तिकेयाच्या दर्शनास सिद्धदम्पती येत असत, अशी तत्कालीन समजूत कालिदासाने वर उद्धृत केलेल्या 'आराध्यैनं शरवणभवम्' इत्यादि श्लोकांत उल्लेखिली आहे. माळवा व सौराष्ट्र येथील पश्चिम क्षत्रपांचा उच्छेद केल्यावर द्वितीय चन्द्रगुप्त–विक्रमादित्याने उज्जयिनी येथे आपली राजधानी केली. कालिदासाचेंहि तेथेच वास्तव्य होतें, हें त्याने मेघास मुद्दाम वांकडी वाट करून उज्जयिनीस जावयास सांगितलें आहे त्यावरून, आणि उज्जयिनी व तिच्या परिसरांतील लहानसहान नद्यांचेंहि त्याने जें रम्य वर्णन केलें आहे त्यावरून स्पष्ट दिसतें. उज्जयिनीच्या वायव्येस सुमारें २५ मैलांवर असलेल्या देवगिरि येथील कार्त्तिकेयाच्या सुप्रसिद्ध देवालयास द्वितीय चंन्द्रगुप्ताचा आश्रय होता असें अनुमान केल्यास तें बहुधा चूक होणार नाही. किंबहुना, या देवालयाच्या प्रभावामुळेच त्याने आपल्या मुलाचें नांव कुमारगुप्त असें ठेवलें, असेंहि म्हणण्यास हरकत नाही. गुप्त राजे विष्णूचे उपासक होते. ते स्वतःस परमभागवत म्हणवत. द्वितीय चंद्रगुप्तालाहि कोरीव लेखांत हेंच विशेषण लावलें आहे. असें असतांहि त्याने आपल्या मुलाला कार्त्तिकेयाचें नांव ठेवलें याचें कारण तो भगवान् कार्त्तिकेयाच्या प्रसादाने झाला अशी त्याची श्रद्धा होती, हें असावें. कुमारगुप्तहि कार्त्तिकेयाचा भक्त होता. हें त्यांच्या सोन्याच्या नाण्यांवरच्या मयूरवाहन कार्त्तिकेयाच्या आकृतींवरून स्पष्ट दिसतें. त्यानेहि आपल्या मुलाचें नांव स्कन्दगुप्त असें ठेवलें. कालिदासाने आपलें कुमारसंभव काव्य कार्त्तिकेयाच्या चरित्रावरच रचलें आहे. या सर्वांत उज्जयिनीजवळच्या देवगिरि येथील कार्त्तिकेयाच्या देवळाचा प्रभाव दिसतो, असें मानण्यास हरकत नाही.

---

८. कालिदासाचें जन्मस्थान :
छत्तीसगडांतील मालडा ![*]

प्रस्तुत लेखाचें वरील शीर्षक पाहून आमचे वाचक बुचकळ्यांत पडतील. ते म्हणतील, ‘ आतापर्यंत बंगाल, काश्मीर, माळवा या प्रदेशांत कालिदास जन्मला असें कांही संशोधक प्रतिपादीत असत. पण त्याची जन्मभूमि छत्तीसगडांतील मालडा या क्षुद्र गावीं होती असें आम्ही कधी ऐकलें नाही. ’ त्यांना सांगावयाचें आहे कीं पुण्याचे श्री. वा. कृ. परांजपे यांचें हें अगदी ताजें अभिनव संशोधन आहे आणि तें त्यांनी नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या आपल्या Fresh Light on Kālidāsa's Meghadūta ह्या ग्रंथांत मांडलें आहे. या संशोधनाचा साक्षात्कार त्यांना गेल्या एकदोन वर्षांतच झाला आहे. कारण त्यापूर्वी त्यांनी लिहिलेल्या ‘ मेघदूतावर नवा प्रकाश ’ या मराठी पुस्तकांत (पृ. ८४-८५) ‘ पादपूरणार्थक अव्ययाप्रमाणे मेघमार्गाच्या स्थळ नकाशांत मध्येच बरीचशी जागा कोरी राहूं नये एवढ्याकरिता कालिदासाने या माल पठाराचा उपयोग करून घेतला आहे. रामगिरि आणि आम्रकूट या दोन स्थळांच्या दरम्यान जी मोठी तूट, पोकळी किंवा खड्डा पडत होता तो भरून काढण्याकरितां ही भर होय. मालक्षेत्र हा यांमधील दुवा ’ असें म्हटलें होतें, व तें माल पठार म्हणजे छत्तीसगडांतील मालडा होय हें विल्सनचें मत ऋणनिर्देश न करतां स्वीकारलें होतें. त्यावेळीं पादपूरणार्थक अव्ययाप्रमाणे अनावश्यक व क्षुद्र दिसणाऱ्या मालडाचें अखिल जगाला वंदनीय अशा कालिदासाच्या जन्मस्थानांत रूपांतर झालें, ही श्री. परांजपे यांच्या संशोधनाची किमया ! हें अभिनव संशोधन खालील प्रमाणांवर अधिष्ठित आहे—

---

[*] नवभारत, जानेवारी, १९६१.

श्री. परांजप्यांचीं प्रमाणें

(१) मेघदूतांत—

स्थानादस्मात्सरसनिचुलादुत्पतोदङ्मुखः खं
दिङ्नागानां पथि परिहरन् स्थूलहस्तावलेपान् ॥

या श्लोकांत यक्ष मेघाला उत्तरेकडे तोंड करून उड्डाण करावयास सांगतो, पण त्याने उत्तरेकडे तोंड करावयाचें तें फक्त मांगल्याकरितां. त्याच्या उड्डाणाची दिशा पश्चिम — नव्हे दक्षिण — होती. कारण पुढील एका श्लोकांत 'सद्यः सीरोत्कषणसुरभिक्षेत्रमारुह्य मालं, किञ्चित्पश्चाद्व्रज लघुगतिर्भूय एवोत्तरेण ॥' असा मालक्षेत्राचा उल्लेख आहे. हें माल रामगिरीच्या—पूर्वीच्या सरगुजा संस्थानांतील रामगडच्या – दक्षिणेस होतें. कारण मेघदूताचा अत्यंत प्राचीन टीकाकार स्थिरदेव म्हणतो, 'मालं पाश्चात्यसीमान्तं दक्षिणाश्रितम्' वल्लभदेव हा टीकाकारहि 'मालं हि दक्षिणाशास्थम्' असें म्हणून 'किञ्चित्पश्चात्प्रवलय गतिम्' असा पाठ स्वीकारतो. तेव्हा मेघाने दक्षिणेकडचें माल ओलांडल्यावर गिरकी मारून (wheeling back) पुनः उत्तरेला जावयाचें आहे. हें माल म्हणजे रतनपुराजवळचें मालडा—कारण (अ) या दोन नांवांत साम्य आहे आणि (आ) तें आम्रकूट म्हणजे अमरकंटक याच्या परिसरांत आहे.

हें माल रामगिरीच्या (रामगडच्या) दक्षिणेस आहे; मेघास तर तर उत्तरेस जावयाचें होतें. तेव्हा कालिदासाने मेघास तेथे मुद्दाम नेलेलें दिसतें. अर्थात् त्याला त्याबद्दल विशेष आपुलकी वाटत होती, हें उघड आहे. तेव्हा तें त्याचें जन्मस्थान असावें.

(२) 'माल' प्रदेशाला कालिदासाने क्षेत्र म्हटलें आहे. याचें कारण बहुधा भगवान् रामचंद्र तेथे वनवासांत आले असावे. या कारणास्तवहि कालिदासाने मेघाला मालक्षेत्राला नेलें असावें. पण तेथे मेघाने किंचित् थांबावयाचें. म्हणून मुख्य मार्गापासून हें आडवळण (deviation) फार झालें नाही.

वरील प्रमाणांचें परीक्षण

आता परांजप्यांच्या या तर्कांचें—नव्हे तर्कटांचें—परीक्षण करूं.

श्री. परांजप्यांना येन केन प्रकारेण सरगुजा संस्थानांतील रामगड हा मेघदूतांतील रामगिरि हें ठरवावयाचें आहे. त्याकरिता कालिदासाच्या श्लोकांची कितीहि ओढाताण करावी लागली तरी त्याची क्षिति ते बाळगत नाहीत. आम्रकूट (त्यांच्या मतें अमरकंटक), नर्मदा वगैरे मेघदूतांत उल्लेखिलेलीं स्थलें व नद्या हीं रामगडच्या पश्चिमेस आहेत. कालिदास तर मेघाला 'उत्पतोदङ्मुखः खम्' (उत्तरेकडे तोंड करून आकाशांत उड्डाण कर) असें सांगतो. तेव्हा हें उत्तरेकडे तोंड करणें मांगल्यार्थ मानलें पाहिजे, हा परांजप्यांचा तर्क! नंतर मेघानें पश्चिमेकडे (उत्तरेकडे नव्हे) गेलें पाहिजे असा त्यांचा आग्रह! इतकें करूनहि माल (मालडा) हें रामगडच्या पश्चिमेस नसून नैऋत्येस राहतें ही अडचण राहतेच. त्यावर तोडगा त्यांना 'मालं हि दक्षिणाश्रितम्' या स्थिरदेवाच्या टीकेंत सापडला. तेव्हा माल हें मालडा हें सिद्ध झालें! तेव्हा मेघानें अलकेला जातांना प्रथम उत्तरेकडे न जातां दक्षिणेकडेच उड्डाण केलें पाहिजे हें ओघानेच आलें! अशी ही माल = मालडा या समीकरणाची उपपत्ति आहे.

मेघदूताच्या टीकाकारांच्या विधानाचा खरा अर्थ

श्री. परांजपे कालिदासाच्या श्लोकांचा सरळ अर्थ न करतां आपणाला अनुकूल असा अर्थ कोणा टीकाकारानें केला आहे काय, हें पाहत असतात. आमचे प्राचीन टीकाकार एरव्ही कितीहि व्युत्पन्न असले तरी भूगोलाच्या बाबतींत बरेच अनभिज्ञ होते. म्हणून त्यांनी रामगिरि म्हणजे चित्रकूट असें विलक्षण समीकरण मांडलें आहे. श्लोकांत निर्देशिलेल्या दिशा पाहून त्यांना अनुसरून त्यांनी त्या त्या स्थानांच्या दिशा आपल्या टीकांत दिल्या आहेत. 'किंचित्पश्चाद् व्रज लघुगतिर्भूय एवोत्तरेण' यांत मालप्रदेश चढल्यावर मेघानें उत्तरेस जावयाचें असें सांगितलें असल्यामुळे माल प्रदेश दक्षिणेस आहे, असें स्थिरदेव म्हणतो, तर याच श्लोकांत मेघाला किंचित् पश्चिमेस वळण्यास सांगितलें असल्यामुळे सुमतिविजय हा टीकाकार 'पूर्वस्यां दिशि

मालं मालाख्यं देशं किञ्चित् स्तोकमारुह्य ' (पूर्व दिशेस असणाऱ्या माल देशावर किंचित् काळ चढून) असें स्पष्टीकरण करून मालप्रदेश पूर्वेस आहे असें सांगतो. या दोन्ही दिशा रामगिरीस अनुलक्षून सांगितल्या नसून त्यापुढच्या मेघगतीच्या दृष्टीने सांगितल्या आहेत. परांजपे त्या दिशा रामगिरीस (त्यांना अभिप्रेत असलेल्या रामगडास) अनुलक्षून घेतात. मालडा हें रामगडच्या दक्षिणेस (वस्तुतः नैऋत्येस) असल्यामुळे त्यांना स्थिरदेवाचें म्हणणें ग्राह्य वाटतें व त्यावर ते आपली ' कालिदासाच्या जन्मस्थाना'ची इमारत उभारतात, आणि सुमतिविजयाचें म्हणणें त्याच्या चुकीमुळे किंवा नकलकारांच्या हस्तदोषांमुळे झालें असावें, असें अनुमान करतात (फ्रेश लाइट, पृ. ७४). वास्तविक पाहतां माल पूर्वेस होतें हा तर्कहि तितकाच सबळ होईल, कारण रामगडच्या पूर्वेसहि बंगालांत मालडा नांवाचें स्थल आहे आणि तें जिल्ह्याचें ठिकाण असल्यामुळे रतनपूरच्या उत्तरेस असलेल्या मालडा खेड्यापेक्षा जास्त प्रसिद्ध आहे. मेघास अलकेस जावयाचें असल्याने तो पूर्वेस कसा जाईल असा आक्षेपहि या मतावर घेतां येणार नाही. दक्षिणच्या मालडा खेड्यास भेट दिल्यावर गिरकी मारून मेघाला पुनः पश्चिमेस जातां येतें, तर पूर्वेच्या मालडा या जास्त प्रसिद्ध अशा ठिकाणाहून तशीच गिरकी मारून त्याला पश्चिमेला कां जात येऊं नये ?

स्थिरदेव मेघास दक्षिणेस जाण्यास सांगत नाही

वस्तुतः स्थिरदेवाचा आधार—परांजपे आपल्या मतास देतात तो—आभासात्मक आहे. कारण तो ' उत्पतोदङ्मुखः खम् ' याचा अर्थ मेघाने उत्तरेकडे तोंड करून दक्षिणेकडे जावें असा मुळीच करत नाही. उलट त्याच श्लोकांत पुढे आलेल्या ' दिङ्नागानां पथि परिहरन् स्थूलहस्तावलेपान् ' या पादांतील ' दिङ्नागानां ' या अनेकवचनाचें समर्थन करतांना स्पष्टच म्हणतो— ' बहुत्वमेवात्र विवक्षितं यदम्बुदं प्रति यक्षो भणति दिगन्तराणि परिहृत्य **त्वयो-त्तरैव हरित् तूर्णं गन्तव्येति** भावः । (यक्ष मेघाला सांगतो **तूं इतर दिशा सोडून उत्तर दिशेनेच त्वरेने जावें**). तेव्हा स्थिरदेव मेघाला दक्षिण

दिशेच्या मालप्रदेशाकडे (मालडा खेड्याकडे) पाठवील हें शक्य नाही. 'माल प्रदेश दक्षिणेंत आहे (रामगिरीच्या दक्षिणेस नव्हे). तुला तेथून उत्तरेस जावयाचें आहे. तेव्हा तूं दिङ्नागांच्या स्थूल शुंडादंडांना बाजूला सारून आकाशांतून उत्तर दिशेचाच मार्ग आक्रमण कर ' असा अर्थ स्थिरदेव या श्लोकांतून काढत आहे. इतर टीकाकारांचाहि अभिप्राय असाच आहे.

कालिदासाचें जन्मस्थान छत्तीसगडांत आहे या अभिनव सिद्धान्ताची उभारणी स्थिरदेवाच्या 'मालं दक्षिणाश्रितम्' या वचनावर परांजप्यांनी केली असल्यामुळे त्या प्रमाणाचा फोलपणा इतक्या विस्तारानें दाखवावा लागला. आता 'तुष्यतु दुर्जनः' न्यायानें मालप्रदेश दक्षिणेंत आहे असें मानलें तरी तो मालडा असणें शक्य नाही हें परांजप्यांच्या प्रमाणांचें चिकित्सक परीक्षण करून दाखवितों. त्यांचीं एतद्विषयक प्रमाणें क्रमानें घेऊं.

मालप्रदेश म्हणजे मालडा नव्हे

(१) माल प्रदेश म्हणजे मालडा या समीकरणाचें पहिलें प्रमाण 'दोन्ही नामांतील सादृश्य' हें अत्यंत भ्रामक आहे; कारण यासारखीं गांवें इतरत्र–उदाहरणार्थ बंगालांत–आहेत हें मागे दाखविलें आहे. दुसरें असें की रतनपूरजवळचें मालडा गाव हें दीड दोन हजार वर्षांइतकें प्राचीन आहे हें सिद्ध झालें नाही. तेथे प्राचीन अवशेष असते तर त्यांचा उल्लेख बिलासपुर जिल्हा गॅझेटीयरमध्ये किंवा कनिंग्हामच्या रिपोर्टांत आला असता. शिवाय 'आरुह्य' या पदानें सूचित केल्याप्रमाणे तें पठार नाही व रामगडहून जास्त उंचावर नाही.

आम्रकूट म्हणजे अमरकंटक नव्हे

(२) दुसरें प्रमाण मालडा हें आम्रकूटाच्या (अमरकंटकाच्या) परिसरांत आहें हेंहि असेंच बिनबुडाचें आहे. आधी आम्रकूट म्हणजे अमरकंटक हें सिद्ध झालें नाही. परांजप्यांनी अमरकंटक हें 'आम्रकूट' नांवाचें अपभ्रष्ट रूप मानलें असावें. पण त्याला आधार नाही. अमरकटक (किंवा अमरकंटक) हें संस्कृत नांव आहे. कटक म्हणजे पर्वताचें पठार. 'कटकोऽस्त्री नितम्बोऽद्रेः'

हें अमरकोशांतील वचन पाहा. तेव्हा 'देवांचें निवासस्थान असलेलें पर्वताचें पठार' असा अर्थ 'अमरकंटक' नामाचा होतो. नर्मदा नदीचें उगमस्थान म्हणून अमरकंटकाचा उल्लेख अनेक पुराणांत येतो. ('संजय' मासिकाच्या जुलै १९५९ च्या अंकांतील आम्ही उद्धृत केलेले स्कन्दपुराणांतील उतारे* पाहा.) आम्रकूटाचा मात्र तसा उल्लेख कोठेहि येत नाही. (प्रो. दीक्षितार यांची पुराणांची सूचि पाहा). आम्रकूट हें नांव त्या पर्वताच्या शिखरावरील आम्रवनावरून पडलें होतें व तें कालिदासाने मेघदूत श्लोक १४ मध्ये सूचित केलें आहे. तेव्हा आम्रकूट म्हणजे अमरकंटक नव्हे. ज्या समीकरणावर परांजप्यांचें मत मुख्यतः आधारलेलें आहे, त्याचा पाया असा डळमळीत झाला आहे.

माल हें पुण्य-क्षेत्र नव्हतें

(३) मालप्रदेशाला कालिदासाने क्षेत्र म्हटलें आहे हें परांजप्यांचें विधानहि असेंच बिनबुडाचें आहे. 'सद्यःसीरोत्कषणसुरभिक्षेत्रमारुह्य मालम्' यांतील क्षेत्रान्त पद सामासिक असून तें 'माल' याचें विशेषण आहे येथे 'क्षेत्र' याचा अर्थ 'शेत' असा आहे. नुकतींच नांगरल्यामुळे जेथील शेतें (पावसाचे थेंब पडल्याकारणाने) सुगन्धित झालीं आहेत असा अर्थ येथे विवक्षित असून तो स्थिरदेव या अत्यंत प्राचीन टीकाकाराने दिला आहे. येथे क्षेत्र याचा अर्थ पुण्यक्षेत्र असा कोणीहि टीकाकार करीत नाही. तेव्हा माल (मालडा) या खेडेगावचा संबंध भगवान् रामचन्द्राच्या निवासाशीं जोडण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. अर्थातच मेघाला माल प्रदेशाकडे नेण्याचें हें कारण होऊं शकत नाही.

तेव्हा मालप्रदेश रामगिरीच्या दक्षिणेस नव्हता तर रामगिरि ते अल्का या मार्गावरच होता. अर्थातच तेथे गेल्यावर मेघाला गिरकी मारण्याचें कांही कारण नव्हतें. 'प्रवलय गतिम्' असा पाठ घेतला तरी 'प्रवलय' याचा अर्थ '**वळव**' असाच होतो. माल प्रदेशावर आरोहण केल्यावर मेघाने

---

* मागे, पृष्ठ २६ पाहा.

किंचित् पश्चिमेकडे वळून नंतर पुन्हा उत्तरेस जावयाचें होतें. 'पुन्हा' (**भूयः**) या पदावरून रामगिरि ते मध्यप्रदेश हा मेघाचा प्रवास उत्तर दिशेनेच व्हावयाचा होता हें उघड आहे. दिशांचे हे सर्व उल्लेख रामटेक-पक्षाला उत्कृष्ट रीतीने जमतात हें आम्ही अनेकवार दाखविलें आहे. तेव्हा माल प्रदेश मालडा होऊं शकत नाही हें स्पष्ट आहे.

कालिदासाला मालप्रदेशाविषयीं उत्कट प्रेम नव्हतें

मालप्रदेश रामगिरि ते अलका या मार्गावरच असल्याने त्याचा उल्लेख करण्यांत कालिदासाने कांही विशेष आपुलकी दाखविली असें होत नाही. अर्थातच तें त्याचें जन्मस्थान होतें हा तर्क सर्वस्वी निर्मूल आहे.

उज्जयिनीचा दाखला गैरलागू

मेघ विदिशेला पोचल्यावर तेथून अलकेच्या मार्गावर उज्जयिनी पडत नव्हती (वक्रः पन्था यदपि भवतः प्रस्थितस्योत्तराशाम्) तरी कालिदासाने उज्जयिनीच्या वर्णनास पूर्ण अकरा श्लोक दिले आहेत. या श्लोकांत उज्जयिनीच्या अगणित संपत्तीचें, शिप्रा नदीवरून पहाटे वाहणाऱ्या मंजुळ, सुगन्धि व शीत वायूचें, तेथील निरनिराळ्या स्थलांबद्दल प्रसिद्ध असलेल्या प्राचीन कथांचें, त्या नगरींतील प्रसिद्ध महाकाल नामक शिवालयाचें, त्यांतील सायंकाळच्या आरतीच्या वेळीं होणाऱ्या वेश्यानृत्याचें व रात्रीं प्रियकरांस भेटण्यास जाणाऱ्या अभिसारिकांचें इतकें सुंदर वर्णन केलें आहे की उज्जयिनीस कालिदास राहत असावा हें अनुमान संभवनीय वाटतें. त्याचेंच अनुकरण करून परांजप्यांनी मालक्षेत्र (छत्तीसगडांतील मालडा) रामगड ते विदिशा या मार्गावर पडत नव्हतें तरी कालिदासाने मेघाला मुद्दाम तेथे नेलें आहे त्यावरून तें त्याचें जन्मस्थान असावें, असें अनुमान केलें आहे, पण तें मुळीच ग्राह्य वाटत नाही. मालक्षेत्र कालिदासाचें जन्मस्थान असतें तर त्याचें वर्णन करतांना 'सद्यः सीरोत्कषणसुरभिक्षेत्रमारुह्यमालम्' (त्यांतील शेतें नुकतींच नांगरल्यामुळे सुगन्धित झालीं आहेत) एवढा पाद लिहून त्याचें समाधान झालें असतें काय, याचा विचार वाचकांनी करावा. तेव्हा अनेक प्रकारें श्लोकांची ओढाताण करून व वडाची साल पिंपळाला लावून परांजप्यांनी मेघाला

मालड्याला नेलें असलें तरी त्यांचें उद्दिष्ट साध्य होत नाही हें पाहून 'भक्षितेऽपि लशुने न शान्तो व्याधिः' या संस्कृत म्हणीची आठवण होते.

छत्तीसगड म्हणजे पूर्वमालव नव्हे

कालिदास हा माळव्याचा कवि असें सामान्यतः मानण्यांत येतें. त्या समजुतीचा फायदा आपल्या लाडक्या मालडास मिळावा म्हणून परांजपे छत्तीसगडास पूर्वमालव असें नांव होतें असें सांगतात (पृ. १७६). यांत ते स्वतःस हास्यास्पद करून घेत आहेत. छत्तीसगडाचें प्राचीन नांव कोसल किंवा दक्षिण कोसल असें होतें व तें रामायणकालापासून प्रसिद्ध आहे. अनेक प्राचीन कोरीव लेखांत त्या प्रदेशाचें हेंच नांव आलें आहे. रघुवंशांतील राजांस 'उत्तरकोसलेश्वर' म्हणण्यांत (रघुवंश, सर्ग ३, श्लो. ५). कालिदासहि छत्तीसगडाचें 'दक्षिणकोसल' हें नांव सूचित करीत आहे. माल प्रदेश हा जसा कधीहि छत्तीसगडांत नव्हता तसें मालव हें नांवहि त्याला कधीहि प्राप्त झालें नव्हतें. असे बिनबुडाचे काल्पनिक तर्क करून परांजप्यांनी वाचकांची दिशाभूल करूं नये, अशी त्यांस स्नेहभावाची सूचना आहे.

येथवर परांजप्यांच्या इंग्रजी ग्रंथांत प्रथमच मांडलेल्या एका अभिनव सिद्धांताचें परीक्षण केलें. प्रस्तुत लेख संपविण्यापूर्वी त्यांच्या आणखी कांही विधानांचा परामर्श घेणें जरूर आहे.

आमच्या लेखांचा परिणाम

'प्रो. मिराशी आमच्या रामगड मतावर अनेक लेख नियतकालिकांत लिहून हल्ला चढवितात' अशी तक्रार परांजप्यांनी केली आहे (पृ. २२९). पण आम्ही कितीहि लेख लिहिले तरी परांजप्यांच्या सुपीक कल्पनाशक्तींतून निर्माण होणाऱ्या सर्व सिद्धांतांचें खंडन करणें अशक्य आहे. तथापि ते स्वतः कबूल करीत नसले तरी आमच्या लेखांनी त्यांचे अनेक कुतर्क नष्ट झाले आहेत. त्यांपैकी कांही असे आहेत—

(१) 'प्रययावातिथेयेषु' इत्यादि श्लोकांत (रघु. १२.२४) 'ऋक्षेषु' पदावर श्लेष असून त्याचा एक अर्थ ऋक्ष पर्वत (रामगड) असा आहे. (आता ते असें म्हणत नाहीत.)

(२) रामगडावरील मूर्ति सीता, राम व लक्ष्मण यांच्या असून रामाच्या उजव्या हातास सीतेची मूर्ति असल्याने त्या अत्यंत प्राचीन आहेत. (आता ते त्या मूर्ति रेवती, बलराम व राम यांच्या आहेत हें कबूल करतात. पृष्ठ १५७ पाहा.)

(३) 'तोयमादाय गच्छेः' या मेघदूतांतील नर्मदानदीच्या उल्लेखावरून मेघाने ती नदी न ओलांडतां तिच्या काठाकाठाने जावयाचें होतें. (आता मेघाने नर्मदानदीचा एखादा उत्तरेचा फाटा ओलांडला असेल, असें परांजपे म्हणतात.)

(४) रामाचा आश्रम चित्रकूट पर्वतावर (रामगडावर) होता. (आता श्री. परांजपे तो त्याच्या पायथ्याशी होता हें मान्य करतात आणि त्याच्या समर्थनार्थ आम्ही आपल्या पुस्तकांत दयानंद ग्रन्थमालेंतील रामायणाच्या आवृत्तींतून प्रथमच उद्‌धृत केलेले श्लोक ऋणनिर्देश न करतां देतात. पृ. १८६ पाहा).

ऋक्षबिल म्हणजे हाथीफोड बोगदा नव्हे

वरील व इतर अनेक ठिकाणीं आम्ही प्रथमच प्रकाशांत आणलेल्या साधनसामग्रीचा उपयोग श्री. परांजप्यांनी केला आहे आणि आपलीं कांही मतें बदललीं आहेत. तेव्हा आमच्या लेखांनी त्यांचा फायदाच झाला आहे. पण तसें कबूल करण्याचें सौजन्य मात्र त्यांनी दाखविलें नाही.

इतर कांही ठिकाणीं मात्र त्यांनी आपलीं पूर्वींची मतें पुनः अभिनिवेशाने मांडलीं आहेत. उदाहरणार्थ, रामगडावरील हाथीफोड बोगदा हा रामायणांत वर्णिलेलें ऋक्षबिल होऊं शकत नाही हें आम्ही आपल्या 'मेघदूतांतील रामगिरि अर्थात् रामटेक' या पुस्तकांत (पृ. ६४–६९) सविस्तर दाखविलें असतांहि ते कबूल करीत नाहीत. संस्कृतांत बोगद्याला 'बिल' म्हणत नाहीत 'रन्ध्र' म्हणतात. हिमालयांतील क्रौंचरन्ध्राचा उल्लेख कालिदासाने मेघदूतांत (श्लो. ५९) केला आहे तो पाहा. या रन्ध्रांतून हंस उत्तरेस मानससरोवराकडे जात असतात. बिल म्हणजे एका बाजूस बंद असलेलें बीळ. तेव्हा हाथीफोड बोगद्यास ऋक्षबिल म्हणणें शक्य नाही. शिवाय रामायणांत (किष्किन्धा-

कांड, ५०, ३) ज्या ऋक्षविलाचें वर्णन आलें आहे तें विन्ध्यपर्वताच्या दक्षिण पश्चिम (किंवा नैर्ऋत्य) शिखरांत किंवा त्याच्या थोडें दक्षिणेस होतें. हाथीफोड बोगदा विंध्याच्या पूर्वभागांत आहे. तेव्हा तें ऋक्षविल होऊं शकत नाही. हें आमच्या लेखांत अनेकवार दाखविलें असतांहि परांजपे आपला दुराग्रह सोडीत नाहीत.

नर्मदानदीचें मेघदूतांतील वर्णन पावसाळ्यांतील नव्हे

तीच गोष्ट नर्मदेच्या ' उपलविषमे विन्ध्यपादे विशीर्णाम् ' या वर्णनाची. हें वर्णन अमरकंटकापासून दहा मैलांवर पावसाळ्यांत दिसणाऱ्या नर्मदानदीच्या धबधब्याचें आहे असें परांजपे आता म्हणतात. पूर्वी तें अमरकंटकाजवळ अनेक दिशांहून येऊन मिळणाऱ्या स्रोतांचें आहे असें म्हणत होते. हीं दोन्ही मतें चूक आहेत. मेघाला नर्मदा नदी दिसली ती आम्रकूट पर्वत ओलांडून द्रुततर गतीनें कांही प्रदेश आक्रमिल्यावर दिसली. (मे. श्लो. १९). आम्रकूट हा अमरकंटक मानल्यास त्याच्याजवळ मिळणाऱ्या स्रोतांस हें वर्णन जुळणार नाही. हें वर्णन धबधब्याचेंहि नव्हे. कारण त्यावेळीं पावसाळा सुरू झाला नव्हता. ' सर्व पूर्व मेघ म्हणजे पावसाळ्याचीं शब्दचित्रें होत ' असें श्री. परांजपे म्हणतात (पृ. २४२), पण तें बरोबर नाही. ग्रीष्म ऋतु संपून पावसाळा सुरू होणार या सुमाराचें वर्णन पूर्वमेघांत आहे. हें कोणासहि खालील पंक्तींवरून पटेल—

(१) मेघालोके भवति सुखिनोऽप्यन्यथावृत्ति चेतः । (श्लो. ३)

(२) आ कैलासाद्बिसकिसलयच्छेदपाथेयवन्तः
सम्पत्स्यन्ते नभसि भवतो राजहंसाः सहायाः ॥ (श्लो. १०)

(३) त्वामासारप्रशमितवनोपप्लवं साधु मूर्ध्ना
वक्ष्यत्यध्वश्रमपरिगतं सानुमानाम्रकूटः ॥ (श्लो. १५)

(४) सौभाग्यं ते सुभग विरहावस्थया व्यञ्जयन्ती
कार्श्यं येन त्यज्यति विधिना स त्वयैवोपपाद्यः ॥ (श्लो. २९)

(५) तस्याः किञ्चित्करधृतमिव प्राप्तवानीरशाखं
हृत्वा नीलं सलिलवसनं मुक्तरोधोनितम्बम् ॥ (श्लो. ४३)

पूर्वमेघांत पावसाळ्याचीं शब्दचित्रें आहेत, असें म्हणणाऱ्याला मेघदूताचें रहस्य समजलें नाही असें म्हटलें पाहिजे. तेव्हा नर्मदा नदीचें 'उपलविषमे विन्ध्यपादे विशीर्णाम्' हें वर्णन उन्हाळ्यांत तिचा प्रवाह विंध्य पर्वताच्या पायथ्याशीं अनेक स्रोतांत विभक्त होतो त्याचें आहे असें मानलें पाहिजे. नर्मदा नदीचें हें दृश्य इटारर्सा–भोपाळ या मार्गाने मध्य रेल्वेच्या प्रवाशास ग्रीष्मऋतूच्या अखेरीस पाहतां येतें.

रामटेक पक्षाविषयी कांही मतें

मेघदूतांतील रामगिरि म्हणजे नागपूरजवळील रामटेक हें मत आता सर्व नामांकित विद्वानांना मान्य झालें आहे. त्यांपैकी कांहींचीं–रा. ब. का. ना. दीक्षित, डॉ. काशीप्रसाद जायसवाल, डॉ. अ. स. आळतेकर, प्रो. नीळकंठशास्त्री, डॉ. रमेशचंद्र मुजुमदार यांचीं––मतें आम्ही आपल्या 'मेघदूतांतील रामगिरि अर्थात् रामटेक' या पुस्तकाच्या पुरवणींत दिलीं आहेत तीं पाहावीं. या मताचा पुरस्कार करण्यांत आमची प्रादेशिक वृत्ति (regional affinity) दिसते. असें श्री. परांजपे म्हणतात (पृ. २४५). तसा आरोप ते वरील विद्वानांच्या बाबतींत करूं शकत नाहीत. म्हणून ते म्हणतात, 'अहो, हीं मतें माझें संशोधन प्रसिद्ध होण्यापूर्वीचीं आहेत.' आपल्या संशोधनाच्या सामर्थ्याविषयी हा त्यांचा आत्मविश्वास अभिनन्दनीय आहे. तथापि त्यांत कांहीच तथ्य नाही, हें त्यांच्या आणि आमच्या पुस्तकांवर कै. ज. स. करंदीकर यांनी केसरींत जे अभिप्राय व्यक्त केले त्यावरून दिसून येईल. श्री. परांजपे यांच्या पुस्तकाविषयी श्री. करंदीकर म्हणतात—"मेघाच्या प्रवासाचा मार्ग दाखवून तो रामगडला जुळतो, रामटेकला जुळत नाही, असें दाखविण्यासाठी श्री. परांजपे यांना पुष्कळच लटपट आणि शब्दांच्या अर्थाची ओढाताण करावी लागली आहे. श्लोक १४ मधील 'उदङ्मुखः खं उत्पत' याचा अर्थ उत्तरेकडे तोंड करून आकाशांतून उडत जा, असा सरळ असतांना,

' शुभशकुन म्हणून उत्तरेकडे तोंड कर, पण पश्चिमेकडे जा ' असा वेडावाकडा अर्थ केला आहे. रामटेकहून मार्ग सरळ उत्तरेकडे जातो, रामगड घेतल्यास 'उदङ्मुखः उत्पत ' हें विधान जुळत नाही. पुढे श्लोक १६ मध्ये माल पठारावरून थोडासा पश्चिमेला जाऊन मग पुनः उत्तरेच्या मार्गानें जा, असें म्हटलें आहे. यांतील ' भूय ' (पुनः) या पदावरून मालपठारापर्यंतचा प्रवास उत्तर दिशेनेच व्हावयाचा हें उघड दिसतें. रामगडपासून अमरकंटक-पर्यंतचा मार्ग तर उत्तरेऐवजीं नैर्ऋत्य दिशेचा आहे. तेथून पुढे भिलसा-पर्यंतचा मार्ग बहुतांशीं पश्चिम व किंचित् उत्तरेचा असा आहे. या मार्गाला ' किञ्चित् पश्चाद्व्रज लघुगतिर्भूय एवोत्तरेण ' हें वर्णन मुळीच जुळत नाही." नंतर कांही दिवसांनी आमच्या पुस्तकाचें केसरींत परीक्षण करतांना कै. करंदीकरांनी म्हटलें होतें की " रामगड ते विदिशा आणि रामटेक ते विदिशा असे मार्ग दाखविणारे दोन्ही नकाशे डोळ्यांपुढे धरल्यास कालिदा-साच्या मेघाचा मार्ग रामटेकशीं जुळतो, रामगडशीं जुळत नाही, हें उघड होतें. " कै. ज. स. करंदीकरांची हीं विधानें प्रादेशिक वृत्तीमुळे केलीं होतीं असें परांजपेहि म्हणूं शकणार नाहीत. कारण ते विदर्भाचे रहिवासी नसून पुण्याचे होते. तेव्हा भूगोल श्री. परांजप्यांच्या सिद्धान्ताविरुद्ध जातो हें स्पष्ट आहे.

संशोधनांत वस्तुनिष्ठ पद्धति आवश्यक

ऐतिहासिक संशोधन वस्तुनिष्ठ पद्धतीने केलें पाहिजे. उपलब्ध साधनांना स्वतः बोलूं दिलें पाहिजे. त्यांच्यावर स्वतःच्या मताचें दडपण घालूं नये. तसेंच कोणी आपल्या मतांतील दोष दाखविल्यास ते प्रांजळपणे कबूल करावे. असें केलें नाही तर ते संशोधन सत्याचें न होतां त्याचें पर्यवसान कल्पित कादंबरींत होतें एवढा धडा जरी श्री. परांजपे या वादापासून शिकले तरी त्याचें सार्थक्य होईल.

९. भीष्म विवाहित होते काय ?*

पंडित सीतारामशास्त्री कुरुंदकर यांनी 'युगवाणी 'च्या दीपावलि विशेषांकांत 'भीष्म विवाहित की अविवाहित' या शीर्षकाचा एक अत्यंत विचारोद्बोधक लेख लिहिला आहे. महाभारतांत भीष्म पितामहांची व्यक्ति-रेखा अनन्यसाधारण आहे. शौर्य, चारित्र्य, विद्वत्ता इत्यादि गुणांमुळे ते इतर पात्रांमध्ये विशेष उठून दिसतात. अशा महापुरुषाबद्दल फार प्राचीन काळापासून सर्वांस अत्यंत आदर वाटत आला आहे. प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्णांनी ज्यांच्याबद्दल

> **'तस्मिन्नस्तमिते भीष्मे कौरवाणां धुरन्धरे ।**
> **ज्ञानान्यस्तं गमिष्यन्ति · · · · · · · · · ॥'**

असें म्हटलें त्यांच्या थोरवीचें काय वर्णन करावें ?

भीष्मप्रतिज्ञेचा अर्थ

भीष्म पितामहांच्या चरित्रांतील ज्या एका घटनेबद्दल सर्वांना अत्यंत आदर वाटत आला आहे ती घटना म्हणजे त्यांनी आपल्या पित्याच्या सुखाकरिता केलेली ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा ही होय. या प्रतिज्ञेचा उल्लेख महा-भारतांतच अनेक ठिकाणीं आला आहे. उदाहरणार्थ, भारतीय युद्धांत भीष्म धारातीर्थी पडले हें संजयाकडून ऐकल्यावर धृतराष्ट्र विचारतो—

> **कथमाचक्ष्व मे योधा हीना भीष्मेण पांडव ।**
> **बलिना देवकल्पेन गुर्वर्थे ब्रह्मचारिणा ॥**

(भीष्मपर्व, अ. १४, श्लो. २)

या श्लोकांत भीष्मांनी पित्याकरिता ब्रह्मचर्याचें आमरण आचरण केल्याचा उल्लेख आहे. यासारखाच श्लोक पुनः (भीष्मपर्व, अ. १२०, श्लो. १)

---

* युगवाणी, डिसेंबर, १९५९.

आला आहे. त्यावरून या भीष्मप्रतिज्ञेची भीषणता आणि तिच्याविषयी लोकांना वाटत असलेला आदर व्यक्त होत आहे. पण या प्रतिज्ञेचें नक्की स्वरूप काय होतें, याविषयी प्राचीन काळापासून मतभेद आहे. सध्या सामान्यतः भीष्मांनी सत्यवतीचा पिता दाश (धीवर) याच्या खात्रीकरिता आपण विवाहच करणार नाही अशी प्रतिज्ञा केली होती अशी समजूत आहे. उदाहरणार्थ, कै. चिं. वि. वैद्य आपल्या The Mahābhārata : A Criticism या ग्रंथांत म्हणतात--Śantanu would not disinherit Bhīshma, who, however, of his own accord, relieved his father from difficulty and not only renounced his right to the heirship but resolved not to marry at all so that there might be no progeny from him to quarrrel with Satyavatī and the sons that might be born to her." (पृ. ९३). यामध्ये आपण मुळी विवाहच करणार नाही अशी प्रतिज्ञा भीष्मांनी केली, असें कै. वैद्यांनी म्हटलें आहे. वैद्यांचा महाभारताचा अभ्यास दीर्घकालीन आणि गाढ होता. त्यांनी महाभारतावर इंग्रजी व मराठीमध्ये अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्यांचा 'महाभारताचा उपसंहार' हा ग्रंथ त्यांच्या महाभारताच्या सूक्ष्म चिकित्सक अध्ययनाची साक्ष देतो. या अभ्यासामुळे त्यांना 'भारताचार्य' अशी सार्थ पदवी मिळाली होती. अशा विद्वान् व चिकित्सक अभ्यासकाचें मत भीष्मांनी विवाहच केला नाही असें होतें. याच्या उलट पं. सीतारामशास्त्रींनी भीष्म अगोदरच विवाहित झाले होते आणि त्यांच्या प्रतिज्ञेचा अर्थ 'मी यापुढे स्त्रीसंग करणार नाही' असा होता असें प्रतिपादिलें आहे. त्यांनी त्या मताचीं कारणेंहि दिलीं आहेत. त्यांचा पुढे विचार करूं. प्रथम हें सांगितलें पाहिजे की हें मतहि नवीन नाही. कांही प्राचीन टीकाकारांनी भीष्मप्रतिज्ञेचा असाहि अर्थ केला आहे. उदाहरणार्थ, महाभारताचा टीकाकार नीलकंठ याने आपलें मत पं. सीतारामशास्त्र्यांप्रमाणेच दिलें आहे. तो उतारा पुढे देऊं. मराठी प्राचीन कवि मुक्तेश्वर याने 'आजिपासोनि निजनेमस्त । अक्षय

ब्रह्मचर्य व्रत । अंगिकारिलें म्यां निश्चित । पितयालागीं सद्भावें ॥ (आदिपर्व, अ. २३, श्लो. ७०) असें मुळास धरून भाषांतर केलें आहे. तें या बाबतींत स्पष्ट नाही. पण मोरोपंतांनी मात्र भीष्मांनी स्त्रीसंग वर्ज्य करण्याची प्रतिज्ञा केली असें स्पष्टपणे म्हटलें आहे—

गांगेय म्हणे 'त्यजिला स्त्रीसंग, सशंक दाशवर ज्यांत'।
अनृत वदेन तरि गळो हें, न रणमुखीं कदा, शव रजांत ॥

(आदिपर्व, अ. १३, आ. ९६)

भीष्मप्रतिज्ञेच्या अर्थाच्या बाबतींत असा मतभेद दिसत असल्यामुळे उपलब्ध प्रमाणांचा जरा बारकाईने विचार करणें जरूर आहे.

'भीष्म विवाहित होते' या मताचीं प्रमाणें

पं. सीतारामशास्त्री यांनी 'भीष्म विवाहित होते' हें दाखविणारीं पुढील प्रमाणें दिलीं आहेत.

(१) भीष्मांनी नैष्ठिक ब्रह्मचर्य अंगिकारिलें नव्हतें. तेव्हा ब्रह्मचर्याश्रम संपवून पितृगृहीं आल्यानंतर शंतनु सत्यवतीच्या प्रेमपाशांत सापडण्यापूर्वी भीष्मांचा विवाह झाला असलाच पाहिजे.

(२) गीता प्रेसने प्रकाशित केलेल्या महाभारताच्या प्रतींत

अद्यप्रभृति मे दाश ब्रह्मचर्यं भविष्यति ।
अपुत्रस्यापि मे लोका भविष्यन्त्यक्षया दिवि ॥

या सर्व प्रतींत आढळणाऱ्या प्रतिज्ञेनंतर खालील श्लोक आले आहेत.

न हि जन्मप्रभृत्युक्तं मम किञ्चिदिहानृतम् ।
यावत्प्राणा ध्रियन्ते वै मम देहसमाश्रिताः ॥
तावन्न जनयिष्यामि पित्रे कन्यां प्रयच्छ मे ।
परित्यजाम्यहं राज्यं मैथुनं चापि सर्वशः ॥

असा मैथुनत्यागाचा अर्थात् स्त्रीसंगवर्जनाचा स्पष्ट उल्लेख आहे.

असाच उल्लेख पुढे एका प्रसंगाच्या वर्णनांत आला आहे. विचित्रवीर्याच्या अकालीं निधनानंतर सत्यवतीने भीष्मास 'त्याच्या दोन्ही स्त्रियांच्या

ठिकाणीं धर्मविहित नियोगपद्धतीने पुत्रोत्पत्ति करावी' असें सुचवितांच भीष्मांनी उत्तर दिलें—

> असंशयं परो धर्मस्त्वया मातरुदाहृतः ।
> राज्यार्थे नाभिषिच्येयं नोपेयां जातु मैथुनम् ।
> त्वमपत्यं प्रति च मे प्रतिज्ञां वेत्थ वै पराम् ॥

(आदिपर्व, संभवपर्व, अ. १०३, श्लो. १३)

यांतहि विवाहत्यागाचा उल्लेख नसून स्त्रीसंगत्यागाचाच आहे. त्यावरूनहि त्या प्रतिज्ञेच्या वेळीं भीष्म विवाहित होते हेंच सिद्ध होतें.

(३) भीष्मांनी शंभर अश्वमेध केले होते (अश्वमेधशतैरिजे) असें श्रीकृष्णांनी म्हटलें होतें. श्रौत यज्ञ करण्यास पत्नीची जरूरी असते. अर्थात् भीष्मांनी यज्ञ केले त्या वेळी ते विवाहित असलेच पाहिजेत. हा एकच उल्लेख भीष्म विवाहित होते हें सिद्ध करण्यास पुरेसा आहे.

वरील प्रमाणांचें परीक्षण

आता आपण या प्रमाणांचें परीक्षण करूं. (१) प्रथमच हें सांगितलें पाहिजे की भीष्म विवाहित होते यासंबंधी स्पष्ट पुरावा महाभारतांत आला नाही. आणि पं. सीतारामशास्त्रींनीहि हें कबूल केलें आहे. गंगेने आपला पुत्र भीष्म याला शंतनुच्या स्वाधीन केल्यावर शंतनु राजा आपल्या राजधानीस आला आणि त्याला त्याने यौवराज्याभिषेक केला. त्यानंतर चार वर्षें गेल्यावर दाशकन्या सत्यवती शंतनूच्या दृष्टीस पडली असें म्हटलें आहे—

> स तथा सह पुत्रेण रममाणो महीपतिः ।
> वर्तयामास वर्षाणि चत्वार्यमितविक्रमः ॥

(आदिपर्व, १००, ४४-४५).

या चार वर्षांत काय काय घटना झाल्या याचें वर्णन महाभारतांत नाही. भीष्म हा शंतनूचा एकुलता एक मुलगा. तो महर्षींकडून सांगोपांग वेद, विविध शास्त्रें व धनुर्वेद शिकला होता. अशा राजकुमाराचा विवाह या

काळांत झाला असता तर यौवराज्याप्रमाणे त्याचेंहि वर्णन महाभारतांत आलें पाहिजे होतें. भीष्माने पुढे राज्यावरचा हक्क सोडला म्हणून त्याच्या यौवराज्याचा उल्लेख येणें जसें आवश्यक, त्याप्रमाणेच त्याने पुढे स्त्रीसंग वर्ज्य करण्याची प्रतिज्ञा केली असल्यास अगोदर त्याचा विवाह झाला होता, हें सांगणें आवश्यक होतें. पण त्याचा उल्लेख भारताच्या कोणत्याहि आवृत्तींत आला नाही. पुढे दाशासमोर केलेल्या प्रतिज्ञेंत—

अद्यप्रभृति मे दाश ब्रह्मचर्यं भविष्यति ।
अपुत्रस्यापि मे लोका भविष्यन्त्यक्षमा दिवि ॥

असा श्लोक महाभारताच्या सर्व प्रतींत आढळतो. पण त्यांत केवळ ब्रह्मचर्याचा उल्लेख आहे. ब्रह्मचर्य हें विवाहित अवस्थेंत स्त्रीसंग न करण्याने तसेंच मुळी विवाहच न करण्यानेहि पाळतां येईल. अद्यप्रभृति (आजपासून) या शब्दावरून त्या घटनेपूर्वी भीष्म विवाहित असल्यामुळे ब्रह्मचर्य पाळत नव्हते, पुढे मात्र स्त्रीसंग वर्ज्य करून त्यांनी तें पाळण्याची प्रतिज्ञा केली असें म्हणणें शक्य आहे. पण पूर्वी विवाह झाला नसतांहि ‘ यापुढे माझें ब्रह्मचर्य राहील ’ असें म्हणणें अगदी असंभवनीय वाटत नाही. तेव्हा वरील श्लोकावरून निर्णय होत नाही. पं. सीताराम-शास्त्री यांनी यानंतर गीताप्रेसच्या आवृत्तींत आलेल्या खालील श्लोकाचा उल्लेख केला आहे तो मात्र या बाबतींत महत्त्वाचा आहे.

यावत्प्राणा ध्रियन्ते वै मम देहं समाश्रिताः ।
तावन्न जनयिष्यामि पित्रे कन्यां प्रयच्छ मे ।
परित्यजाम्यहं राज्यं मैथुनं चापि सर्वशः

या श्लोकांत मैथुनत्यागाचा स्पष्ट उल्लेख असल्यामुळे सीताराम-शास्त्री म्हणतात तसा भीष्मप्रतिज्ञेचा अर्थ केला पाहिजे आणि भीष्म विवाहित होते हें मानलें पाहिजे. पण हे श्लोक मूळच्या महाभारतांत होते काय याचा संशय आहे. गेल्या दोन अडीच हजार वर्षांत महाभारताच्या स्वरूपांत पुष्कळच फरक झाला आहे. अनेक कवींनी व लेखकांनी आख्यानें, वर्णनें, तीर्थांच्या यात्रा व देवादिकांच्या स्तुति वगैरेंचे

प्रक्षेप करून महाभारताचा पुष्कळच विस्तार केला आहे. म्हणून भारताच्या भिन्न भिन्न प्रदेशांतून महाभारताच्या पोथ्या जमवून आणि भारताबाहेर गेलेल्या पोथ्यांच्या नकला आणवून त्या सर्वांचा चिकित्सक पद्धतीने अभ्यास करून महाभारताची शक्य तों जुनी प्रत निश्चित करण्याचा प्रयत्न पुण्याचे भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंडळ गेली चाळीस वर्षे अविरतपणे करीत आहे. या दीर्घकालानंतर आता तें कार्य पूर्ण झालें आहे. महाभारताच्या या चिकित्सक आवृत्तींत सर्वांत शुद्ध ठरलेला पाठ देऊन तळटीपांत भिन्न भिन्न हस्तलिखितांत आढळणारे विविध पाठ दिलेले असतात. त्यांवरून कित्येकदा सबंध अध्यायच महाभारतांत घुसडलेले आढळतात. विवाद्य प्रश्नांचा योग्य तऱ्हेने निर्णय करावयाचा असेल तर या चिकित्सक आवृत्तीचें साहाय्य घेतलें पाहिजे.

चिकित्सक आवृत्तीचा पुरावा

प्रस्तुत प्रकरणीं या आवृत्तीचा पुरावा पाहिला असतां तो निश्चितपणे या श्लोकांच्या विरुद्ध जातो. त्या आवृत्तींत भीष्माची प्रतिज्ञा खालील श्लोकांत दिली आहे—

अद्यप्रभृति मे दाश ब्रह्मचर्यं भविष्यति ।
अपुत्रस्यापि मे लोका भविष्यन्त्यक्षया भुवि ॥

पण पं. सीतारामशास्त्रींनी गीताप्रेसच्या आवृत्तींतून उद्धृत केलेलें ' न हि जन्मप्रभृत्युक्तं मम किञ्चिदिहानृतम् ।...परित्यजाम्यहं राज्यं मैथुनं चापि सर्वशः ॥ ' हे श्लोक प्रक्षिप्त म्हणून भांडारकर मंडळाच्या आवृत्तींत तळटीपेंत दिले आहेत. गीताप्रेसच्या आवृत्तींतहि (आदिपर्व, पृ. १३८–३९) हे श्लोक कंसांत दिले आहेत. त्यावरून त्या आवृत्तीच्या संपादकास ते प्रक्षिप्त वाटले असावे. ग्रंथारंभींच्या निवेदनांत ते म्हणतात—' दाक्षिणात्यपुस्तकेषूपलभ्यमानानामतिरिक्तश्लोकानामप्युपयोगिनो भागा ग्रन्थेस्मिन् यथास्थानं ( ) कोष्टकबद्धाः संनिवेशिताः । ' त्यावरून हे श्लोक उत्तर भारतीय पोथ्यांत आढळत नाहीत हें उघड आहे. पुण्याच्या चित्रशाळेने छापलेल्या आवृत्तींतहि ते आढळत नाहीत.

त्याप्रमाणेच सत्यवतीने भीष्मास नियोगाकरिता सांगितलें त्यावेळच्या भीष्माच्या उत्तराचे खालील श्लोक गीताप्रेसने दिले आहेत—

असंशयं परो धर्मस्त्वया मातरुदाहृतः ।
राज्यार्थे नाभिषिञ्चेयं नोपेयां चापि मैथुनम् ॥
त्वमपत्यं प्रति च मे प्रतिज्ञां वेत्थ वै पराम् ॥

या श्लोकांतील मधली पंक्ति भांडारकर मंडळाच्या आवृत्तींत तसेंच चित्रशाळेच्या आवृत्तींतहि आढळत नाही. मध्याच्या ठिकाणीं ती अयोग्यहिं वाटते. ही पंक्ति घालवयाचीच झाली तर ती प्रतिज्ञेच्या उल्लेखानंतर आली पाहिजे होती. तेव्हा तीहि प्रक्षिप्त आहे यांत संशय नाही.

महाभारतांतील एतद्विषयक इतर उल्लेख

या दोन उल्लेखांखेरीज स्त्रीसंगपरिहाराचा निर्देश महाभारतांत आढळत नाही. कांही ठिकाणीं भीष्मांना त्याच्या दूषकांनी 'तृतीय प्रकृति' किंवा 'क्लीब' म्हटलें आहे खरें, पण त्याचें कारण त्यांनी स्त्रीसंग वर्ज्य केला हें जसें संभवतें, तसेंच त्यांनी विवाह केला नाही किंवा नियोगाला संमति दिली नाही हेंहि संभवतें. सभापर्वांत (अध्याय ४१) श्रीकृष्णाला अग्रपूजेचा मान द्यावा, या भीष्मांच्या सूचनेमुळे चिडून गेलेला शिशुपाल म्हणतो—

युक्तमेतत्तृतीयायां प्रकृतौ वर्तता त्वया ।
वक्तुं धर्मादपेतार्थं त्वं हि सर्वकुरूत्तमः ॥

(षंढ असलेल्या त्वां श्रीकृष्णाला अग्रपूजेचा मान द्यावा असें अधर्म्य भाषण करणें योग्यच आहे. कारण तशाच प्रकारच्या सर्व कौरवांचा तूं नायक आहेस.)

भीष्माच्या ब्रह्मचर्यप्रतिज्ञेचा अधिक्षेप करतांना शिशुपाल त्यांनी नियोगविधीने आपल्या भावजईच्या ठिकाणीं पुत्रोत्पत्ति करण्यास संमति दिली नाही याचा उल्लेख करतो—

दारयोर्यस्य चान्येन मिषतः प्राज्ञमानिना ।
तव जातान्यपत्यानि सज्जनाचरिते पथि ॥

को हि धर्मोऽस्ति ते भीष्म ब्रह्मचर्यमिदं वृथा ।
यद्धारयसि मोहाद्वा क्लीबत्वाद्वा न संशयः ॥
(सभापर्व, ४१, २४–२५)

तेव्हा यासारख्या उल्लेखांवरून भीष्मांनी विवाह केला होता हें सिद्ध होत नाही.

भीष्मांचे अश्वमेध यज्ञ

यानंतर पं. सीताराम शास्त्रींनी दिलेलें तिसरें प्रमाण भीष्मांनी शंभर अश्वमेध यज्ञ केले (अश्वमेधशतैरिजे ।) हें होय. श्रौत यज्ञाकरितां पत्नीची जरूरी लागते. तेव्हा भीष्म विवाहित होतें असें त्यांचें अनुमान आहे. या श्लोकाचा त्यांनी संदर्भ दिला नव्हता म्हणून मी त्यांना तो विचारला. तेव्हा त्यांनी प्रो. पी. पी. एस्. शास्त्री यांनी संपादिलेल्या महाभारताच्या भीष्मपर्वांतील, अध्याय २१, श्लोक १५ मधील श्रीकृष्णाच्या भाषणांतील खालील उल्लेखाकडे माझें लक्ष वेधलें—

स एव भीष्मः कुरुवंशकेतुर्येनाहृतास्त्रिशतं वाजिमेधाः ॥

हा श्लोक गीताप्रेसच्या तसेंच चित्रशाळाप्रेसच्याहि आवृत्तींत आहे. या श्लोकांत भीष्मांनी तीनशें अश्वमेध केल्याचा उल्लेख आहे. भीष्मांनी एकहि अश्वमेध केला असता तरी त्यांनी विवाह केला होता असें मानणें प्राप्त आहे. म्हणून पं. सीतारामशास्त्रींनी या प्रमाणावर विशेष जोर दिला आहे. पण भीष्माने असे तीनशें अश्वमेध केले याला प्रमाण आहे काय ? भीष्म दीर्घायुषी होते. निधनसमयीं त्यांचें वय १८६ वर्षांचें असावें असें अनुमान आहे (पं. सिद्धेश्वरशास्त्रीकृत प्राचीन चरित्रकोश, पृ. ४१३). तें खरें मानलें तरी त्यांच्या हातून इतके अश्वमेध झाले असतील असें वाटत नाही. किंबहुना त्यांच्या एकाहि अश्वमेधाचा महाभारतांत उल्लेख नाही. अश्वमेध यज्ञ करण्यापूर्वी यज्ञीय अश्व पृथ्वीवर यथेच्छ फिरण्याकरितां सोडावा लागतो आणि तो कोणी पकडल्यास त्याच्याबरोबर युद्ध करून त्याचा पाडाव करावा लागतो. नंतर अश्वमेध यज्ञ करण्याचा अधिकार राजाला प्राप्त होतो.

युधिष्ठिराने भारतीय युद्धानंतर एक अश्वमेध केला. त्याचें वर्णन महाभारताच्या आश्वमेधिक पर्वांत आहे, पण भीष्माच्या तीनशें अश्वमेधांपैकी एकाचाहि महाभारतांत अन्यत्र उल्लेख नाही. तेव्हा या अश्वमेधाबद्दल संशय उत्पन्न होतो. भांडारकर मंडळाच्या आवृत्तींत—

' स एष भीष्मः कुरुवंशकेतुर्येनाहृतास्त्रिशतो वाजिमेधाः ॥ '

असा पाठ दिला आहे. त्यांतील ' त्रिंशतो ' हे पद आर्ष आहे. या पाठात भीष्माने तीस अश्वमेध केले होते असें म्हटलें आहे. या पाठावरहि वरील आक्षेप लागू पडतो. या पाठासंबंधी भीष्मपर्वाचे संपादक डॉ. बेलवलकर म्हणतात, ' The fact of Bhīshma having performed 30 (or 300) Aśvamedhas is not known from other parts of the epic. ' [भीष्मांनी तीस (किंवा ३००) अश्वमेध यज्ञ केल्याबद्दल महाभारतांत इतरत्र उल्लेख नाही.] म्हणून त्यांनी ' येनार्दितास्त्रैशताः शौरिसंघाः ' अशा दुसऱ्या पाठाकडे अंगुलिनिर्देश केला आहे. ऐतिहासिक काळांत समुद्रगुप्ताने एक, पुष्यमित्राने दोन आणि प्रवरसेनाने चार अश्वमेध केल्याचे उल्लेख आढळतात. जास्तींत जास्त अकरा अश्वमेध विष्णुकुंडीवंशी प्रथम माधववर्म्याने केल्याचा उल्लेख आहे. तेव्हा तीनशें किंवा तीसहि अश्वमेध भीष्मांनी खरोखर केले होते काय, याबद्दल मोठा संदेह उत्पन्न होतो. तेव्हा हें प्रमाणहि निर्णायक म्हणतां येत नाही.

भीष्म अविवाहित होते याविषयीं प्रमाण

पण मग यासंबंधी कांही निर्णायक पुरावा महाभारतांत सापडतो काय, असा प्रश्न उपस्थित होतो. या संबंधांत आम्ही महाभारताच्या खालील श्लोकाकडे वाचकांचें लक्ष वेधतों.

आदिपर्वाच्या संभवपर्व नामक भागांत (अ. १०३) सत्यवती भीष्मांना नियोगविधीने विचित्रवीर्याच्या दोन पत्नींच्या ठिकाणीं पुत्रोत्पत्ति करावयास सांगतांना म्हणते—

इमे महिष्यौ भ्रातुस्ते काशिराजसुते शुभे ।
रूपयौवनसंपन्ने पुत्रकामे च भारत ॥९॥

तयोरुत्पादयापत्यं संतानाय कुलस्य नः ।
मन्नियोगान्महाभाग धर्मं कर्तुमिहार्हसि ॥१०॥
राज्ये चैवाभिषिच्यस्व भारताननुशाधि च ।
दारांश्च कुरु धर्मेण मा निमज्जीः पितामहान् ॥११॥

यांतील पहिल्या दोन श्लोकांत भीष्मांना नियोगाचा आग्रह करून नंतर सत्यवती त्यांना त्यांच्या पूर्वीच्या प्रतिज्ञेंतून सोडवत आहे. ती म्हणते, ‘ माझ्या आज्ञेने याप्रमाणे नियोगविधि केल्यावर तूं स्वतःस राज्याभिषेक करवावा आणि भारतदेशाचें राज्य करावें. **तसेच धर्माने विवाह करावा.** (ब्रह्मचारी राहून) पितरांचा अधःपात करूं नको. ’ ‘ दारांश्च कुरु धर्मेण ’ याचा सरळ अर्थ ‘ धार्मिक विधीने पत्नी कर ’ असा आहे. पण नीलकंठाचा ग्रह भीष्म अगोदरच विवाहित होते असा झाला असल्याने त्याने त्या शब्दांचा अर्थ ‘ ब्रह्मचर्यसंकल्पात्प्रभृति त्यक्तान् संतत्यर्थमङ्गीकुरु ’ (तूं ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा केलीस, तेव्हापासून आपल्या पत्नीचा त्याग केला होतास तिचा संततीकरिता पुनः अंगीकार कर) असा केला आहे, पण तो ओढाताणीचा आहे, हें संस्कृतचें सामान्य ज्ञान असलेला कोणीहि सांगेल. नीलकण्ठ म्हणतो तसा अर्थ विवक्षित असता तर सत्यवतीने खालीलसारखा शब्दप्रयोग केला असता––

दारांश्चैवाभिगच्छ त्वं मा निमज्जीः पितामहान् ॥

या ठिकाणीं सत्यवती भीष्मांना संतत्यर्थ विवाह करण्याचा आदेश देते, त्यावरून त्यांचा यापूर्वी विवाह झाला नव्हता हें उघड आहे. **वर दिलेले श्लोक याच क्रमाने सर्व आवृत्तींत** (भांडारकर मंडळाच्या आवृत्तींतहि) **याच शब्दांत व याच क्रमाने आढळतात.** तेव्हा त्यांच्या खरेपणाविषयी संशय नाही.

भीष्म विवाहित होते अशी समजूत कशी झाली ?

पण मग ‘ भीष्म विवाहित होते, त्यांनी स्त्रीसंगत्यागाची प्रतिज्ञा केली होती ’ अशी समजूत कशी प्रचलित झाली, असा प्रश्न उपस्थित होतो. त्याचें उत्तर येणेंप्रमाणे––

भीष्मांची प्रतिज्ञा अत्यंत कठोर होती. ऐश्वर्य, आरोग्य, इत्यादि सर्व परिस्थिति अनुकूल असतां आमरण ब्रह्मचर्याचें आचरण करणें याला फार मोठा इंद्रियनिग्रह आवश्यक आहे. तो भीष्मांनी आपल्या पित्याच्या सुखाकरिता आनंदाने केला हें पाहून अप्सरा, देव व ऋषि यांनी त्यांच्यावर पुष्पवृष्टि केली, असें महाभारतांत म्हटलें आहे. तसेंच त्यांचें पूर्वीचें नांव नांव देवव्रत होतें तरी तेव्हापासून त्यांनी त्यांचें भीष्म असें नांव ठेवलें असेंहि म्हटलें आहे.

ततोऽन्तरिक्षेऽप्सरसो देवाः सर्षिगणास्तदा ।
अभ्यवर्षन्त कुसुमैर्भीष्मोऽयमिति चाब्रुवन् ।।

अविवाहित अवस्थेंत ब्रह्मचर्याचें पालन करणें यापेक्षा विवाहित असतांना तें करणें याला शतपट इंद्रियनिग्रह लागतो. अशा ब्रह्मचर्य व्रताला असिधाराव्रत अशी संज्ञा आहे. असिधाराव्रत म्हणजे तरवारीच्या धारेवर उभें राहण्याचें व्रत. हें जसें अत्यंत कठीण, तसेंच विवाहित तरुण स्त्रीपुरुषांनी इंद्रियनिग्रह करून ब्रह्मचर्यव्रत पाळणें हें कठीण—युवा युवत्या सार्धं यन्मुग्धभर्तृवदाचरेत् । अन्तर्निवृत्तसंगः स्यादसिधाराव्रतं हि तत् ।। अशी या व्रताची व्याख्या कोशकारांनी दिली आहे. असें हें खडतर व्रत भगवान् रामचंद्रांनी चौदा वर्षें आचरलें. भीष्माची प्रतिज्ञा ऐकून देव व ऋषि यांनी त्यांच्यावर पुष्पवृष्टि केली. तेव्हा त्यांचेंहि ब्रह्मचर्यव्रत या प्रकारचेंच अत्यंत खडतर असलें पाहिजे असें वाटून ते विवाहित असूनहि ब्रह्मचर्याचें आचरण करीत होते ही कल्पना प्रचलित झाली आणि नंतर त्यांच्या प्रतिज्ञेंत स्त्रीसंगत्यागाचा निर्देश घुसडला गेला असें दिसतें. कदाचित् ब्रह्मचर्य आचरण करणें म्हणजे काय याचा स्पष्ट अर्थ सांगणें हाहि हे श्लोक घुसडण्यांत हेतु असावा. अशा तऱ्हेचीं अनेक स्थळें दाक्षिणात्य पाठपरंपरेंत आढळतात. म्हणून त्या पाठपरंपरेंतील केवळ आदिपर्वांतील श्लोकसंख्या सुमारें १३०० श्लोकांनी अधिक झाली आहे. या पाठपरंपरेविषयी कै. डॉ. सुखटणकर लिहितात—'Not only is the Southern text thus appreciably longer than the other, the story itself of the Southern

recension, as compared with that of the Northern, is, owing to many of these additions, much richer in details, leaving little or nothing to the imagination of the reader or the hearer.' (दाक्षिणात्य पाठपरंपरेंत उत्तरेंतील पाठपरंपरेपेक्षा अधिक श्लोक आहेत इतकेंच नाही तर त्या पाठपरंपरेत त्यायोगें जास्त बारीकसारीक गोष्टी आल्या आहेत. त्यामुळे वाचकांना किंवा श्रोत्यांना फारच थोड्या ठिकाणीं आपली कल्पनाशक्ति लढवावी लागते.)

मैथुनवर्जनाचे किंवा स्त्रीसंगत्यागाचे उल्लेख दाक्षिणात्य पाठपरंपरेंतच आढळतात, हे मागे दाखविले आहे. त्याचा उद्देश ब्रह्मचर्याचें स्पष्टीकरण करणें हाच असावा. मूळ पाठांत ते उल्लेख नव्हते इतकेंच नाही तर 'तूं आता विधिवत् विवाह कर' या सत्यवतीच्या सांगण्यावरून भीष्मांचा त्यापूर्वी विवाह झाला नव्हता हें स्पष्ट आहे.

---

१०. त्रिविक्रमभट्ट : विदर्भांतील एक संस्कृत कवि*

विदर्भांत प्राचीन काळीं मोठमोठे संस्कृत व प्राकृत कवि होऊन गेले. गुणाढ्य, सर्वसेन, प्रवरसेन, दण्डी, भवभूति, राजशेखर इत्यादि कवींनी आपल्या संस्कृत व प्राकृत काव्यांनी वैदर्भी व वच्छोमी रीतींना सर्वमान्यता मिळवून दिली. या कवींची उज्वल परंपरा ज्याने पुढे चालविली आणि संस्कृत वाङ्मयांत एका नवीन प्रकारचा उपक्रम ज्याने केला अशा एका थोर संस्कृत कवीचा परिचय प्रस्तुत लेखांत करून द्यावयाचा आहे.

फार प्राचीन काळापासून संस्कृतांत गद्य व पद्य असे दोन काव्यप्रकार प्रचलित होते. अश्वघोष, कालिदास, भारवि, माघ यांचीं सौंदरनंद, बुद्धचरित, रघुवंश, कुमारसंभव, मेघदूत, किरातार्जुनीय, शिशुपालवध इत्यादि काव्यें पद्यमय आहेत, तर दण्डी, बाण, सुबन्धु यांची अवंतीसुन्दरी, कादम्बरी, वासवदत्ता हीं गद्यांत आहेत. याशिवाय गद्यपद्यमय काव्याचा एक नवीनच प्रकार कांही काळाने संस्कृतांत प्रचलित झाला. त्याला 'चम्पू' असें नांव देण्यांत आलें. 'गद्यपद्यमयं काव्यं चम्पूरित्यभिधीयते' अशी चम्पूकाव्याची व्याख्या विश्वनाथाने साहित्यदर्पणांत केली आहे. चम्पूकाव्याचीं कांही उदाहरणें संस्कृत वाङ्मयांत अद्यापि उपलब्ध आहेत. त्या सर्वांमध्ये त्रिविक्रमभट्टाचें नलचम्पू अथवा दमयन्तीकथा हें चम्पूकाव्य सर्वांत प्राचीन आहे. यानंतर चम्पूभारत, चम्पूरामायण, देशराजचरित इत्यादि चम्पूग्रंथ रचण्यांत आले आणि चम्पूकाव्यरचनेची परंपरा कांही काळ अव्याहत चालू राहिली. असो.

त्रिविक्रमभट्टाचा काळ बऱ्याच निश्चितपणें ठरवितां येतो. आपल्या काव्याच्या प्रास्ताविक भागांत त्याने बाण कवीचा उल्लेख खालील श्लोकांत श्लेषाच्या योगें केला आहे.

---

* इंडियन नॅशनल कांग्रेस, ६४ वें अधिवेशन, स्मारक ग्रंथ, सन १९५९.

शश्वद्बाणद्वितीयेन नमदाकारधारिणा ।
धनुषेव गुणाढ्येन निःशेषो रञ्जितो जनः ॥

बाण कवि हर्षवर्धनाच्या (खिस्तोत्तर ६०६ ते ६४७) दरबारीं होऊन गेला. तेव्हा त्रिविक्रमभट्ट खिस्तोत्तर सातव्या शतकानंतर झाला असावा. नलचम्पूंतील ' पर्वतभेदि पवित्रम् ' इत्यादि पुढे उद्धृत केलेला श्लोक धाराधिपति भोज याने आपल्या सरस्वतीकण्ठाभरणांत (परिच्छेद ४, श्लोक १९२) दिला आहे. भोज हा खिस्तोत्तर अकराव्या शतकाच्या पूर्वार्धांत सुमारें १०१५ ते १०५५ या अवधींत होऊन गेला. तेव्हा त्रिविक्रमभट्ट खिस्तोत्तर अकराव्या शतकापूर्वी होऊन गेला, यांत संशय नाही. त्रिविक्रमभट्टाच्या कालाच्या या दोन पूर्वापरमर्यादा झाल्या. पुढे दाखविल्याप्रमाणे नलचम्पूकार त्रिविक्रमभट्ट हा शांडिल्य गोत्री नेमादित्याचा पुत्र होता. राष्ट्रकूट नृपति तृतीय इन्द्र याचे गुजराथेंत बगुम्रा येथे सापडलेल्या शके ८२६ (सन ९२५) च्या दोन ताम्रपटांतील प्रशस्ति नेमादित्याचा पुत्र त्रिविक्रमभट्टाने रचली असें त्यांत म्हटलें आहे. या त्रिविक्रमाचें गोत्र त्या प्रशस्तींत दिलें नाही. तथापि या दोन्ही त्रिविक्रमांच्या पित्याचें नांव एकच असल्यामुळे आणि त्यांची लेखन-शैलीहि एकाच तऱ्हेची श्लेषप्रचुर असल्यामुळे ते एकच दिसतात. तेव्हा नलचम्पूकार त्रिविक्रमभट्ट खिस्तोत्तर दहाव्या शतकाच्या आरंभीं होऊन गेला, असें म्हणतां येतें.

नलचम्पूमध्ये त्रिविक्रमभट्ट स्वतःविषयी बरीच माहिती देतो. तो वेदविद्यापारंगत व ब्रह्मवेत्त्या शांडिल्यगोत्री ब्राह्मणांच्या कुलांत जन्मला होता. त्याच्या पित्याचें नांव कांही हस्तलिखितांत नेमादित्य तर इतर कांहींत देवादित्य असें दिलें आहे. त्याच्या आजाचें नांव श्रीधर होतें, हें त्याने खालील श्लोकांत सांगितलें आहे.

तेषां वंशे विशदयशसां श्रीधरस्यात्मजोऽभू-
द्देवादित्यः स्वमतिविकसद्वेदविद्याविवेकः ।
उत्कल्लोलां दिशि दिशि जनाः कीर्तिपीयूषसिन्धुं
यस्याद्यापि श्रवणपुटकैः कूणिताक्षाः पिबन्ति ॥

नंतर तो स्वतःविषयी म्हणतो—

तैस्तैरात्मगुणैर्येन त्रिलोक्यास्तिलकायितम् ।
तस्मादस्मि सुतो जातो जाड्यपात्रं त्रिविक्रमः ॥

या श्लोकांत त्रिविक्रमभट्टाने अत्यंत विनयाने स्वतःला जाड्यपात्र किंवा मंदबुद्धि म्हटलें आहे. नलचम्पूच्या विवृतिनामक टीकेच्या कर्त्याने त्रिविक्रमभट्ट हा खरोखरीच मन्दबुद्धि होता, अशी कल्पना करून त्याच्या हातून नलचम्पू-सारखा विविधालंकारांनी नटलेला श्लेषप्रचुर चम्पूग्रंथ कसा निर्माण झाला, हें दाखविण्याकरिता खालील दन्तकथा दिली आहे—

' त्रिविक्रमभट्टाचे वडील देवादित्य अखिलशास्त्रज्ञ असून कोणा एका राजाच्या सभेंत राजपंडित म्हणून होते. एकदा ते परगावीं गेले असतां कोणी पंडित राजसभेंत येऊन शास्त्रार्थांत माझ्याशीं वाद करावा किंवा मला अजयपत्र द्यावें, असें राजसभेंतल्या पंडितांस आव्हान देता झाला. राजपंडित देवादित्य परगावीं गेले असल्यामुळे राजाने त्यांच्या त्रिविक्रमभट्ट नामक पुत्रास वादा-करितां पाचारण केलें. भट्टाने कुलस्वामिनी सरस्वतीची अनन्यभावाने प्रार्थना करून वादांत यशःप्राप्तीची याचना केली. तेव्हा देवीने प्रसन्न होऊन ' तुझा पिता येईपर्यंत मी तुझे मुखीं राहीन ' असा त्याला वर दिला. सरस्वतीचा प्रसाद होतांच त्रिविक्रमभट्टाने प्रतिवादी पंडिताचा शास्त्रार्थांत पराजय करून राजसन्मान मिळविला. आपले वडील परत येईपर्यंतच सरस्वती आपल्या मुखांत राहणार हें जाणून त्रिविक्रमभट्टाने नलचम्पू रचण्यास आरंभ केला. त्याचा सातवा उच्छ्वास संपण्याच्या वेळीं देवादित्य परत आले आणि लागलीच त्रिविक्रमभट्टाच्या मुखींची सरस्वती लुप्त झाली. म्हणून नलचम्पू अर्धवट राहिला आहे. '

या दंतकथेंत कांहीच तथ्य दिसत नाही. त्रिविक्रमभट्टाच्या पूर्वजांना राजाश्रय होता असें दिसत नाही. याच्या उलट त्यांचें वर्णन करतांना ते भारताचें व्याख्यान करणारे मोठे विद्वान् पुराणिक होते तरी त्यांनी राजाश्रय घेतला नव्हता (महाभारतिकाश्च न येऽरं गोपजीविनः ।) असें त्याने श्लेषयुक्त विरोधाने सूचित केलें आहे. स्वतः त्रिविक्रमभट्टालाहि नलचम्पू रचतेवेळीं राजाश्रय होता असें दिसत नाही.

त्रिविक्रमभट्ट विदर्भाचा निवासी होता हें नलचम्पूवरून स्पष्ट दिसतें. आपणास आपल्या देशाचें वर्णन करण्यास संधि मिळावी म्हणून त्यानें नलदमयंतीकथा मुद्दाम निवडली असें दिसतें. त्याच्या ग्रंथांत नलराजाच्या निषध देशाविषयीं सामान्य रूपाचें वर्णन आहे, पण विदर्भांतील अनेक नद्यांचें, आश्रमांचें, तीर्थांचें व स्थलांचें बारीक वर्णन आलें आहे. विदर्भ देशाविषयीं त्याचें प्रेम खालील श्लोकांत व्यक्त झालें आहे—

देशानां दक्षिणो देशस्तत्र वैदर्भमण्डलम् ।
तत्रापि वरदातीरमण्डनं कुण्डिनं पुरम् ॥
वीरपुरुषं तदेतद्वरदातटनामकं महाराष्ट्रम् ।
दक्षिणसरस्वती सा वहति विदर्भा नदी यत्र ॥

विदर्भांतील भोजकट प्रदेश, पयोष्णी (पूर्णा), वरदा (वर्धा) व विदर्भा ह्या नद्या, वरदा व विदर्भा नद्यांच्या संगमावर वसलेलें कुण्डिनपुर, भार्गव, मार्कण्डेय आणि जमदग्नि ऋषींचे आश्रम, महावराहाचें देवालय व त्याजवळच त्याच्या अंगापासून उत्पन्न झालेल्या पयोष्णी नदीचा उगम इत्यादिकांचें सूक्ष्म वर्णन नलचम्पूंत आलें आहे. त्यावरून त्रिविक्रमभट्ट विदर्भाचा रहिवासी होता याविषयीं मुळीच संशय राहत नाही. पवित्र पयोष्णी नदीबद्दल तर कवीला परमादर आहे व तो खालील श्लोकांत व्यक्त झाला आहे—

पर्वतभेदि पवित्रं जैत्रं नरकस्य बहुमतङ्गहनम् ।
हरिमिव हरिमिव हरिमिव वहति पयः पश्यत पयोष्णी ॥

(पयोष्णी नदीचा हा प्रवाह पाहा. तो पर्वताला फोडून जाणारा व व पवित्र आहे आणि म्हणून तो पर्वताला भेदणारें वज्र धारण करणाऱ्या इंद्रासारखा आहे. तसेंच स्वतःच्या पावित्र्यानें जनांचें नरकापासून रक्षण करणारा अत एव नरकासुरावर विजय मिळविणाऱ्या विष्णुसारखाहि तो आहे. शिवाय सर्व जनांना वन्द्य व खोल असल्यानें अनेक हत्तींना ठार मारणाऱ्या सिंहाशींहि त्याचें सादृश्य आहे.)

चक्रधरं विषमाक्षं कृतमदकलराजहंससंचारम् ।
हरिहरविरञ्चिसदृशं भजत पयोष्णीतटं मुनयः ॥

(हे मुनींनो ! पयोष्णीच्या तीरीं निवास करा. या तीरावर चक्रवाक पक्षी असल्यामुळे तें चक्रधारी विष्णूप्रमाणे, त्याच्या तीरीं विभीतकवृक्ष दाटीने उगवले असल्यामुळे तें विषमनेत्र शंकराप्रमाणे आणि त्यावर मदयुक्त मधुर आवाजाचे राजहंस इतस्ततः हिंडत असल्यामुळे राजहंसवाहन ब्रह्मदेवाप्रमाणे आहे. अर्थात् त्याचें ब्रह्मा, विष्णु व महेश या तीन्ही देवांशीं साद्दश्य आहे.)

वरील दोन उदाहरणांवरून त्रिविक्रमभट्टाच्या श्लेषप्रचुर शैलीची कल्पना वाचकांस येईल. ज्यांना अशी शैली साधत नाही त्या कवींना तो बालकांमध्ये गणतो—

अप्रगल्भाः पदन्यासे जननीरागहेतवः ।
सन्त्येके बहुलालापाः कवयो बालका इव ॥

स्वतःच्या ग्रंथांत सभङ्गश्लेषाचा प्रचुर उपयोग केल्यामुळे आपला ग्रंथ दुर्बोध झाला, याची जाणीव त्याला आहे. तथापि वाचकांनी त्यामुळे उद्विग्न होऊं नये; कारण कवीला अनेक प्रकारच्या शैलींत काव्य करण्याची आवड असते असें तो म्हणतो—

वाचः काठिन्यमायान्ति भङ्गश्लेषविशेषतः ।
नोद्वेगस्तत्र कर्तव्यो यस्मान्नैको रसः कवेः ॥

सहाव्या उच्छ्वासाच्या आरंभीं कवीने चन्द्रोदयाचें वर्णन खालील श्लोकांत केलें आहे.—

उदयगिरिगतायां प्राक्प्रभापाण्डुताया-
मनुसरति निशीथे शृङ्गमस्ताचलस्य ।
जयति किमपि तेजः साम्प्रतं व्योममध्ये
सलिलमिव विभिन्नं जाह्नवं यामुनं च ॥

[भावार्थ—चंद्रोदयामुळे पूर्वदिशा शुभ्र दिसूं लागली आणि अन्धकार अस्ताचलाच्या शिखराकडे जाऊं लागला. अशा वेळी प्रयागामध्ये गंगेचें व यमुनेचें जल भिन्न भिन्न दिसतें, त्याप्रमाणें आकाशांत चंद्रप्रकाश व अंधकार दिसत आहेत आणि चंद्राचें तेज जास्तच खुलत आहे.]

या श्लोकांतील कल्पना सहृदयांना इतकी आवडली की, त्यांनी कवीला 'यमुनात्रिविक्रम' अशी पदवी दिली. त्याविषयी एका टीकाकाराने म्हटलें आहे—

प्राच्याद्विष्णुपदीहेतोरपूर्वोऽयं त्रिविक्रमः ।
निर्ममे विमलव्योम्नि यत्पदं यमुनामपि ॥

[प्राचीन काळच्या त्रिविक्रमापेक्षा (विष्णूच्या वामनावतारापेक्षा) हा त्रिविक्रम अपूर्व आहे. पूर्वीच्या त्रिविक्रमाने आपल्या पदाने (पायाने) आकाशांत गंगानदी उत्पन्न केली, तर या त्रिविक्रम कवीने आपल्या पदाने (शब्दमय वर्णनाने) विमल अशा आकाशांत केवळ गंगाच नव्हे, तर यमुना नदीहि निर्माण केली.]

नलचम्पूचे सात उच्छ्वास आहेत. त्यांमध्ये इन्द्रादि देवांच्या प्रसादाने नल अदृश्य होऊन भीम नृपतीच्या अन्तःपुरांत प्रवेश करतो व दमयन्तीला देवांचा निरोप कळवितो, येथपर्यंत नलदमयन्तीकथा आली आहे. यापुढील उच्छ्वास त्रिविक्रम कवीने रचले होते किंवा नाही, हें माहीत नाही.

प्राचीन काळचे कवि इतरांनी आपल्या काव्याचें अपहरण करूं नये म्हणून प्रत्येक सर्गाच्या शेवटच्या श्लोकांत कांही खूण घालून ठेवीत असत. हीच गोष्ट प्राचीन प्राकृत काव्यांतहि आढळते. उदाहरणार्थ, सर्वसेनाच्या प्राकृत हरिविजय काव्याच्या प्रत्येक सर्गाच्या शेवटीं 'उत्साह' शब्द, आणि प्रवरसेनाच्या सेतुबन्ध काव्यांत तशाच ठिकाणीं 'अनुराग' शब्द ग्रथित केला आहे. भारवीने किरातार्जुनीयांत 'लक्ष्मी' शब्दाचा आणि माघाने 'श्री' शब्दाचा असाच उपयोग केला आहे. त्रिविक्रमभट्टानेहि या कवींचें अनुकरण करून आपल्या रचनेची खूण म्हणून 'हरचरणसरोज' हा शब्द गुंफला आहे. उदाहरणार्थ, तिसऱ्या उच्छ्वासाच्या शेवटचा श्लोक पाहा—

हरचरणसरोजाराधनावाप्तपुण्यः
परमसुकृतकन्दो वन्दनीयः स कोऽपि ।
अपि जयतु स यस्तां दुर्लभां लप्स्यतेऽस्मि-
न्निति कथितकथः सन्सोऽपि हंसो व्यरंसीत् ॥

नलचम्पूच्या रचनेमुळे त्रिविक्रम कवीची कीर्ति दिगन्तीं पसरून त्याला तत्कालीन महाप्रतापी राष्ट्रकूट सम्राट् तृतीय इंद्र (इ. स. ९१५ ते ९२८) याच्या दरबारीं आश्रय मिळाला. या राजाच्या शक संवत् ८३६ च्या (सन ९१५ च्या) दोन ताम्रपटांतील प्रशस्ति नेमादित्याचा पुत्र त्रिविक्रमभट्ट याने रचली, असा उल्लेख आहे. हा त्रिविक्रमभट्ट नलचम्पूकारच असावा. ही प्रशस्तिहि सुंदर शैलींत लिहिली आहे. तींत ठिकठिकाणीं श्लेषांचा उपयोग केला आहे. कांही ठिकाणच्या श्लेषाने संशोधकांना बुचकळ्यांत पाडलें आहे. उदाहरणार्थ, इन्द्र राजाच्या विजयाचें वर्णन करणारा खालील श्लोक घ्या—

कृतगोवर्द्धनोद्धारं हेलोन्मूलितमेरुणा ।
उपेन्द्रमिन्द्रराजेन जित्वा येन न विस्मितम् ॥

[उपेन्द्राने (विष्णूचा अवतार कृष्ण याने, पक्षीं, तन्नामक राजाने) गोवर्धनाचा (गोकुळांतील पर्वताचा, पक्षीं, तन्नामक राजाचा किंवा स्थलाचा) उद्धार केला होता, पण इन्द्र राजाने लीलेने मेरूचें (तन्नामक पर्वताचें, पक्षीं, तन्नामक राजाचें) उच्चाटन केलें असतांहि त्याला गर्व झाला नाही.]

या श्लोकांतील गोवर्धन व मेरु कोण याबद्दल संशोधकांत दीर्घ काळ वाद माजून राहिला आहे.

त्रिविक्रमभट्टाने नलचम्पूशिवाय मदालसाचम्पू ग्रंथ लिहिला होता असें डॉ. वेबरने प्रथम बर्लिन येथील संस्कृत हस्तलिखितांच्या सूचीमध्ये म्हटलें होतें. त्याचीच पुनरुक्ति डॉ. कीथ, डॉ. दे वगैरे संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासकारांनी तो ग्रंथ न पाहतांच आपापल्या ग्रंथांत केली आहे. मदालसाचम्पू हा ग्रंथ कै. ज. वा. मोडक आणि का. ना. साने यांनी पुष्कळ वर्षांपूर्वी (सन १८८२ मध्ये) प्रसिद्ध केला होता. तो आता दुर्मिळ झाला आहे. त्याची प्रत भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिरांतून मागवून आम्ही चिकित्सकपणें वाचली तेव्हा तो ग्रंथ नलचम्पूकार त्रिविक्रमभट्टाचा नव्हे याविषयी आमची खात्री झाली.

मदालसाचम्पू ह्या ग्रंथांत मार्कंडेय पुराणांतील ऋतुध्वज व मदालसा यांची कथा सुंदर शैलींत वर्णन केली आहे. या वर्णनांत ठिकठिकाणीं अनेक

अलंकार व दीर्घ समास यांचा उपयोग केला आहे. यांत श्लेषाचाहि क्वचित् उपयोग केलेला आढळतो. उदाहरणार्थ, खालील श्लोकांतील श्लेष पाहा—

माधवस्यानुषंगेऽपि सामोदो नार्जुनोऽभवत् ।
पलाशास्तु महामोदमापुरेतन्महाद्भुतम् ॥

(या श्लोकाचा सकृद्दर्शनीं अर्थ दिसतो तो हा—कृष्णाच्या संगतींत अर्जुनाला आनंद झाला नाही, पण पलाश (पल+अश् पासून) म्हणजे मांसभक्षी राक्षस मात्र अतिशय आनंदित झाले हें मोठेंच आश्चर्य ! यांतील विवक्षित अर्थ हा कीं, वसंत ऋतु आला असतांहि अर्जुनवृक्षांना सुगन्ध आला नाही, पण पळस मात्र आनंदित झाले.)

तथापि मदालसाचम्पूमध्ये श्लेषाचा फारच थोडा उपयोग केला आहे. त्यामुळे हा त्रिविक्रम नलचम्पूकर्त्याहून भिन्न दिसतो. त्याची शैली पुष्कळच सोपी व प्रसन्न आहे. शिवाय तो आपल्या गोत्राचा किंवा पूर्वजांचाहि निर्देश करीत नाही. आणखी असें,की, मदालसाचम्पूचे सहा ' उल्लास ' आहेत, पण त्यांपैकी एकाच्याहि शेवटच्या श्लोकांत ' हरचरणसरोज ' असें पद दिसत नाही. तेव्हा हा त्रिविक्रम नलचम्पूकार शाण्डिल्यगोत्री त्रिविक्रमभट्टाहून निराळा दिसतो. केवळ नामसादृश्यावरून ते एक असावेत अशी डॉ. वेबर, कीथ, दे वगैरेंची समजूत झालेली दिसते.

———

प्राचीन भारतीय कोरीव लेख

११. पंढरपूरचा शिलालेख*

महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या एप्रिल–जून १९५६ च्या अंकांत डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी पंढरपुरास सापडलेला एक महत्त्वाचा शिलालेख ठशासह प्रकाशित केला आहे.† हा लेख बराच खराब झाला आहे. त्यामुळे त्याचें वाचन निःसंदिग्धपणें करता येत नाही. डॉ. तुळपुळे यांनी मोठ्या परिश्रमानें त्याचें वाचन करून त्यावरून कांही अनुमानें काढली आहेत. त्यांचा विचार व्हावा अशी त्यांनी आपल्या लेखाच्या शेवटीं इच्छा प्रदर्शित केली आहे. म्हणून त्यांतील कांही प्रश्नांविषयी येथें चार शब्द लिहिण्याचें योजिलें आहे.

या लेखाची मिति पहिल्या तीन ओळींत दिली आहे. पहिल्या ओळीच्या शेवटीं 'सकु' अशीं अक्षरें डॉ. तुळपुळे यांनी वाचलीं आहेत, पण तीं ठशांत तरी दिसत नाहीत. दुसऱ्या व तिसऱ्या ओळींतील शब्द 'सालवण षुरि १११० सौम्ये दिवा सुक्रे' असें त्यांनी वाचले आहेत. सालवण हें शालिवाहन याचें अपभ्रष्ट रूप आहे असें त्यांनी एका तळटीपेंत सांगितलें आहे. पण हें रूप प्राचीन लेखांत कोठे आलेलें मला माहीत नाही. ठशाचें जरा बारकाईने निरीक्षण केल्यास येथील नांव 'सालाहण' आहे असें दिसेल. ज्याला आपण सध्या 'शालिवाहन' म्हणतों त्याचें मूळ नांव 'सातवाहन' असें होतें. तें नाणेघाट व नाशिक येथील लेण्यांतील लेखांत आलें आहे. याचेंच 'सादवाहन' असें दुसरें रूप नाशिकच्या दुसऱ्या एका लेण्यांतील लेखांत, तसेंच कांही नाण्यांवर आढळतें. याशिवाय तिसरें

---

* महाराष्ट्र साहित्य पत्रिका, वर्ष ३०, अंक ११८.

† म. सा. प., वर्ष ३०, अंक ११७, पृ. २६–३३.

' सालाहण ' असें रूप कांही प्राकृत गाथांत येते. गाथासप्तशतींतील क्रमांक ४६७ ची खालील गाथा पाहा—

आवण्णाइँ कुलाइं दो व्विअ जाणन्ति उण्णइं णेउम् ।
गोरीअ हिअअदइओ अहवा सालाहणणरिन्दो ॥

यामध्ये ' सालाहण ' असें रूप आलें आहे. तेंच उद्योतनसूरीच्या कुवलयमालेंत आलें आहे.* या रूपाचें पुढे ' शालिवाहन ' असें संस्कृतीकरण होऊन तें प्रचलित झालें. ' सालवण ' असें रूप मात्र कोठेहि येत नाही. तेव्हा येथील नांवहि ' सालाहण 'च असावें. या नांवांतील तिसरें अक्षर ' ह ' दिसतें. त्याचें पांचव्या ओळीच्या आरंभीं आलेल्या ' हा 'शीं बरेंच साम्य आहे.

' सालाहण ' शब्दाच्या नंतर डॉ. तुळपुळे ' षुरि ' असें वाचतात, व तो शब्द ' सौर ' शब्दाचें अपभ्रष्ट रूप आहे असें मानतात. संवत्सरसंख्येपूर्वी असा शब्द आलेला मला माहीत नाही. सौर व चान्द्र असें संवत्सरगणनापद्धतींचे निदर्शक शब्द कोरीव लेखांत येत नाहीत. ' सालाहणा 'नंतर अब्दे, वत्सरे, वर्षे यासारखा किंवा यापासून निघालेला शब्द अपेक्षित आहे; पण तसा शब्द ठशावरून वाचतां येत नाही. यानंतरची संख्या त्यांनी १११० अशी वाचली आहे. यांतील पहिला, तिसरा व शेवटचा अंक बराच स्पष्ट दिसतो. दुसरा अंक मात्र अस्पष्ट आहे. पण त्याचेंहि वाचन बरोबर असावें. पुढील शब्द सौम्ये असा वाचून डॉ. तुळपुळे यांनी तें संवत्सरनाम धरलें आहे. दाक्षिणात्य पद्धतीप्रमाणे शके १११० ला सौम्य संवत्सर येत नसून कीलक येतो. त्याच्यानंतरच्या वर्षाचें नांव मात्र सौम्य येतें. या अडचणीचा परिहार ' संवत्सर चालू व शकांक गतशकाचा असा अनेक ताम्रशिलालेखांतून आढळणारा प्रकार येथेहि आहे ' असें म्हणून डॉ. तुळपुळे यांनी केला आहे; पण तो बरोबर नाही. पिल्ले जंत्रींतील किंवा आपल्या प्रचलित पंचांगांतील शकांकसंख्या ही गत वर्षांचीच असते. संवत्सरनाम मात्र वर्तमान वर्षाचें असतें अशी वस्तुस्थिति आहे. तेव्हा सौम्ये हें वाचन बरोबर असल्यास ही

---

* काव्यमीमांसा, गायकवाड्स् ओरिएंटल सीरिज, नोटस् पृ. १२.

अडचण नाहीशी होत नाही. तथापि अशा चुका कांही कोरीव लेखांत आढळतात यांत संशय नाही.* संवत्सरनामानंतर मास, पक्ष व तिथि यांचा उल्लेख अपेक्षित आहे. पण फक्त दिवा सुक्रे असे शब्द वाचले आहेत. ते विलक्षण वाटतात. तथापि या अस्पष्ट ठशावरून यापेक्षा निराळें वाचन सुचवितां येत नाही.

प्रस्तुत लेखांतील सालाहणाचा उल्लेख महत्त्वाचा आहे. हल्ली आपण ज्याला 'शालिवाहन शक' म्हणतों तो मूळचा शकनृपतींचा होता. तो केव्हा व कोणी सुरू केला व त्याचा महाराष्ट्रांत कसा प्रसार झाला याचें विस्तृत विवेचन प्रस्तुत लेखकाने इतरत्र केलें आहे.† या शकाच्या अनेक लेखांत 'शकानामपि भूभुजाम्', 'शकनृपकालातीतसंवत्सर', 'शकनृपति-राज्याभिषेकसंवत्सर', 'शकवर्ष' इत्यादि शब्दांनी तो आरंभीं शकराजांनी सुरू केला होता हें दर्शविलें आहे. किंबहुना, शक हा शब्दहि 'काल' या अर्थी मराठींत सुरू झाला याचें कारणहि हेंच आहे. वराहमिहिर व कल्हण यांनीहि या कालाचें शककर्तृकत्व आपल्या ग्रंथांत उल्लेखिलें आहे. पुढे हळूहळू या कालाचा शालिवाहन राजांशीं संबंध जोडण्यांत आला. यादवांच्या अनेक लेखांत या कालाच्या वर्षांचा निर्देश करतांना 'शकनृपकालातीतसंवत्सर' असाच शब्दप्रयोग केलेला आढळतो. उदाहरणार्थ, रामदेवराव यादवाच्या कारकीर्दीच्या अखेरीस शके १२२२ मध्ये दिलेल्या पुरुषोत्तमपुरी ताम्रपटाच्या ३३ व्या ओळींत कालाचा असाच निर्देश आहे.‡ ठाणें येथे सापडलेल्या त्याच्या शके ११९४ च्या ताम्रपटांत मात्र 'शालिवाहन शके ११९४' असा कालनिर्देश होता असें त्या ताम्रपटाचें जें वाचन प्रसिद्ध झालें आहे त्यावरून समजलें जातें.§ हा ताम्रपट आता उपलब्ध नाही. त्याच्या वाचनाबरोबर त्याचा ठसा प्रसिद्ध झाला नव्हता. म्हणून हें वाचन बरोबर होतें, किंवा वाचणाऱ्याने स्वतः शालिवाहन हा शब्द त्यांत घातला हें समजण्यास साधन

---

* कॉर्पस् इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम्, पु. ४, पृ. ५७० व ५७६ पाहा.

† संशोधनमुक्तावलि, सर पहिला, पृ. १५१–१५७.

‡ एपिग्राफिया इंडिका, पु. २५, पृ. २११. पुढे लेख क्रमांक १५ पाहा.

§ कीलहॉर्न्‌ची दक्षिणेंतील कोरीव लेखांची यादी, क्रमांक ३७०.

नाही. तत्कालीन यादवांच्याच नव्हे तर इतर राजवंशांच्याहि कोरीव लेखांत शालिवाहनाचा उल्लेख येत नाही म्हणून दुसराच पक्ष संभवनीय वाटतो. त्यानंतर विजयनगराच्या राजांच्या कांही लेखांत मात्र कालनिर्देश करतांना 'शालिवाहना'चा उल्लेख केलेला आढळतो.* म्हणून त्या राजांच्या काळीं हिंदु धर्माच्या पुनरुज्जीवनाची जी लाट उसळली होती तिच्यामुळे या काळाचा संबंध शालिवाहनाशीं जोडण्यांत आला असें कांहींनी प्रतिपादिलें होतें. हें मत बरोबर असल्यास प्रस्तुत लेखांत सालाहणाचा (शालिवाहनाचा) उल्लेख असल्यामुळे त्याच्या खरेपणाविषयी शंका उत्पन्न होईल. पण अलीकडे श्री. ग. ह. खरे यांनी यादवनृपति कृष्ण याच्या काळचा शके ११७२ चा तासगांव-ताम्रपट प्रसिद्ध केला आहे.† त्याच्या आरंभींच्या श्लोकांत 'स्वस्ति श्रीमति शालवाहनशके' असा कालाचा स्पष्ट निर्देश आहे, त्यावरून यादवकालांतच 'हा काल शालिवाहनाने सुरू केला' असें मत प्रचलित होऊं लागलें होतें असें दिसतें. आतापर्यंत शालिवाहनाचा उल्लेख असलेला शके ११७२चा हाच पहिला कोरीव लेख असें मानण्यांत येत असे. डॉ. तुळपुळे यांनी प्रसिद्ध केलेला शके १११० चा प्रस्तुत लेख हा ६२ वर्षें अगोदरचा आहे या कारणानेहि त्याचें महत्त्व आहे. त्यांत 'शालिवाहना'चें 'सालाहण' असें प्राचीन रूप दिसावें हें योग्यच होय.

विवेचनाच्या ओघांत डॉ. तुळपुळे यांनी शके ४३८ मधील पाण्डरङ्गपल्ली, जयद्विट्ठ व पंडराधीशेन या शब्दांचा उल्लेख केला आहे व त्यावरून पंढरपुरांत विठ्ठलभक्ति फार प्राचीन काळापासून (कदाचित् ६ व्या शतकापासून) चालू होती असें अनुमान केलें आहे. प्रस्तुत शिलालेखाच्या अर्थाशीं त्याचा घनिष्ठ संबंध नाही. तथापि पंढरपूरच्या व विठ्ठलदेवतेच्या प्राचीनत्वाच्या बाबतींत या ताम्रपटाचा उल्लेख आणखी दोन संशोधकांनी—डॉ. सालेतोर व श्री. ग. ह. खरे यांनी—केला असल्यामुळे त्याविषयी चार शब्द लिहिणें प्राप्त आहे.

---

* पूर्वोक्त लेखांची यादी, क्रमांक ४६५ व ४७५ पाहा.

† द. म. इ. साधनें, खं. ३, पृ. ६५.

हा ताम्रपट कोल्हापूरजवळच्या एका खेड्यांत सापडला होता. तो प्रो. कुंदनगार व फादर हेरास यांच्या मार्फत म्हैसूरचे डॉ. कृष्ण यांच्याकडे गेला. त्यांनी तो ठशासह म्हैसूर आर्किऑलॉजिकल सर्व्हेच्या सन १९२९ च्या वार्षिक अहवालांत (पृ. १९७–२०८) प्रसिद्ध केला आहे. या लेखांत कोणत्याहि शकाचा निर्देश नाही. तथापि त्यांत उल्लेखिलेला राष्ट्रकूटवंशाचा मूळ पुरुष मानाङ्क हा वाकाटक हरिषेणाच्या (सुमारें इ. स. ४६०)* अगोदर होऊन गेला असणें शक्य नाही. त्याचा काल सुमारें इ. स. ४७० असावा. तो ताम्रपट मानाङ्काचा नातू अविधेय याने दिला होता. तेव्हा त्याचा काल इ. स. ५०० ते ५२० हा असावा. या ताम्रपटांत भाद्रपद संवत्सराचा निर्देश आहे. हें संवत्सर गुरूच्या द्वादश-संवत्सरचक्रांतील असलें पाहिजे. तें सुमारें १० एप्रिल इ. स. ५१६ या वर्षी सुरू झालें. अशा अनुमानपरंपरेने या कोल्हापूर–ताम्रपटाचा काळ डॉ. कृष्ण यांनी इ. स. ५१६ किंवा शके ४३८ असा ठरविला होता. तोच डॉ. सालेतोर,† श्री. ग. ह. खरे‡ यांनी पूर्वी व डॉ. तुळपुळे यांनी आता वीकारला आहे. मागे डॉ. कृष्ण व डॉ. अळतेकर यांच्यामध्ये या राष्ट्रकूटांच्या साम्राज्यविस्ताराबद्दल व काळाबद्दल वाद झाला होता. त्या निमित्ताने मला या ताम्रपटाचा बारकाईने अभ्यास करावा लागला. त्यानंतर या राष्ट्रकूटांसंबंधी 'मानपूरचे राष्ट्रकूट' या शीर्षकाचा लेख मी भांडारकर प्राच्यविद्या मंदिराच्या ॲनल्समध्ये§ व भारत इतिहास संशोधन मंडळाच्या त्रैमासिकांत|| प्रसिद्ध केला. त्यामध्ये डॉ. कृष्ण यांच्या मताचें व वाचनाचें परीक्षण केलें होतें. त्याची पुनरुक्ति येथे करीत नाही. पण थोडक्यांत सांगतों

---

* हरिषेणाचा हा काळ बरोबर वाटत नाही. तो इ. स. ४७५ ते ५०० या काळांत होऊन गेला असावा. कांहींच्या मतें तो ५०० ते ५२० या काळांत राज्य करीत असावा.

† इंडियन् हिस्ट्रॉरिकल् क्वार्टर्ली, पु. ११, पृ. ७६९–७७८.

‡ श्रीविठ्ठल आणि पंढरपूर, प्रथमावृत्ति, पृ. ७.

§ ॲनल्स्, पु. २५, पृ. ३६–५०.

|| भा. इ. सं. मं. त्रै., पु. २८, पृ. १.

कीं हे राष्ट्रकूट वाकाटकांनंतर उदयास आले नसून ते त्यांचे समकालीन होते. अर्थातच ते चौथ्या–पांचव्या शतकांत महाराष्ट्रांत राज्य करीत होते. वाकाटकांच्या लेखांत कुन्तलेशांचा पराभव केल्याचा व कुन्तल राजकन्येशीं विवाह केल्याचा उल्लेख येतो तो या राष्ट्रकूटांविषयी असावा. कालिदास विक्रमादित्याचा दूत म्हणून कुन्तलेशाच्या दरबारीं गेला होता व पुढे त्याने 'कुन्तलेश्वरदौत्य' नामक ग्रंथ लिहिला अशी आख्यायिका अनेक प्राचीन संस्कृत ग्रंथांत उल्लेखिलेली आढळते. तींतील कुन्तलेश म्हणजे हे राष्ट्रकूट असावे असेंहि त्या लेखांत दाखविलें होतें.* हें मत आता अनेकांनी मान्य केलें आहे. त्या लेखांत मी डॉ. कृष्ण यांच्या वाचनांतहि कांही दुरुस्त्या सुचविल्या होत्या. त्या सर्वांचा निर्देश येथे करण्याची आवश्यकता नाही. तथापि जयद्विठ्ठ व पण्डराद्रिशेन यांमध्ये विठ्ठल व पंढरपूरचा उल्लेख आला आहे असें मानण्यांत येतें, तेव्हा त्या शब्दांच्या वाचनाचा विचार करूं.

कोल्हापूर–ताम्रपटच्या १३ ते १७ या ओळींचें वाचन डॉ. कृष्ण, यांनी पुढीलप्रमाणे केलें आहे—

'तत्त्वज्ञानविपश्चिते भार्ग्गवगोत्राय जयद्विट्ठायोपविद्धरस्थानाभिषिक्ताय छन्दोगाय विसदत्रिविद्याय चतुःवेदपण्डितायातिधर्म्मिणे ब्राह्मणशतामधैशद्बिरिदविनयाच्चष्टभरतवाक्याएदमष्टधर्मासपिण्डादात्मनः प्रजायशोभिवृद्धये...'

हें वाचन अत्यंत असमाधानकारक आहे हें उघड आहे. या ताम्रपटाच्या दुसऱ्या पत्र्याच्या पहिल्या बाजूवरील कांही ओळी आता अस्पष्ट झाल्या आहेत. कांही ठिकाणीं लेखकाने घसीटी लिपींत लिहिल्याने अक्षरें वाचणें कठीण जातें. हा ताम्रपट अत्यंत प्राचीन असल्याने त्याचें शक्य तों निर्दोष वाचन होणें अवश्य आहे. पण तो आता गहाळ झाला आहे. डॉ. कृष्णांनी आपल्या लेखाबरोबर छापलेले ठसेहिं कांही ठिकाणीं अस्पष्ट आहेत. तेव्हा त्यांवरून शुद्ध वाचन करणें कठीण आहे. तथापि सध्याच्या परिस्थितींतहि कांही दुरुस्त्या सुचवितां येतील. चौदाव्या ओळींत जयद्विट्ठ

* याविषयी सविस्तर माहिती 'कालिदासाचें कुन्तलेश्वरदौत्य (संशोधनमुक्तावलि, १, पृ. ६५–७५) यांत मिळेल.

वाचून डॉ. कृष्णांनी तें दान दिलेल्या ब्राह्मणाचें नांव मानलें आहे. या ठिकाणचा ठसा अत्यंत अस्पष्ट असल्याने हीं अक्षरें त्यावरून वाचतां येत नाहीत. तथापि दान दिलेल्या ब्राह्मणाचें नांव या ठिकाणीं आलें असणें शक्य नाही एवढें मात्र निश्चित. तें नांव पुढे ब्राह्मण या शब्दापुढे आलें असलें पाहिजे. ब्राह्मण-नामनिर्देशाचा हा प्रकार अनेक प्राचीन ताम्रपटांत आढळतो. उदाहरणार्थ, कल्चुरि नृपति बुद्ध राजाच्या वडनेर ताम्रपटांतील (इ. स. ६१०) 'ब्राह्मणबोधस्वामिने' हा निर्देश पाहा.* पुढे 'स्थानाभिषिक्ताय' याच्या ठिकाणीं 'स्थानाभिजनाय', 'मासपिण्डात्मनः प्रजायशोभिवृद्धये' याच्याबद्दल 'मातापित्रोरात्मनश्च पुण्ययशोभिवृद्धये' असें वाचलें पाहिजे, हेंहि ठशावरून स्पष्ट दिसतें. तेव्हा डॉ. कृष्णांनी वाचलेल्या जयद्विट्ठ या नांवावरून इ. स. च्या सहाव्या शतकांत विठ्ठलाचें नांव प्रसिद्ध होतें असें या लेखावरून तरी म्हणतां येत नाही.

कोल्हापूर–ताम्रपटाच्या शेवटच्या ओळीच्या अखेरीस डॉ. कृष्ण यांनी 'पण्डराद्रिशेन' असें वाचून 'पण्डराधीशेन' अशी दुरुस्ती सुचविली होती. या वाचनावरून त्यांनी पंढरपुराचें पूर्वीचें नांव पंडर होतें असा तर्क केला आहे. या वाचनाचाहि प्रकार असाच आहे. तेथील अक्षरांचें खरें वाचन 'पण्डराद्रिशेन' असें नसून 'सं १० (+) ५ कार्त्तिक व ५' असें आहे व त्यांत 'अविधेयाच्या कारकीर्दीचें पंधरावें वर्ष, कार्तिक बहुल (कृष्ण) पक्षाची पंचमी' असा कालनिर्देश आहे.† व तोच त्या व पूर्वीच्या ओळींतहि दिला आहे. त्या ओळींचें वाचन डॉ. कृष्णांनी पुढीलप्रमाणे केलें आहे—'लिखितं चेदं राज्यकरवरिसे षोडशे भाद्रपदे कार्त्तिकस्य बहुलपञ्चम्यां' असें केलें आहे तेंहि बरोबर नाही. शुद्ध वाचन 'लिखितञ्चेदं राज्यसंवत्सरे पञ्चदशे भाद्रपदे कार्त्तिकस्य बहुलपञ्चम्यां' असें दिसतें व तें भांडारकार प्राच्यविद्या मंदिराच्या ॲनल्समधील व भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकांतील माझ्या लेखांत दिलें होतें.

* कॉ. इ. इं., पु. ४, पृ. ५०.

† यांतील संवत्सरसंख्या चिन्हांनी दर्शविली आहे. अशा चिन्हांचें वाचन करणें कठीण असतें.

त्याकडे श्री. खरे व तुळपुळे यांचें लक्ष गेलेलें दिसत नाही. ॲनल्समधील लेख प्रसिद्ध झाल्यावर मद्रास येथे हिस्टरी कांग्रेसच्या अधिवेशनप्रसंगीं, १९४४ सालीं, माझी डॉ. कृष्णांशीं गाठ पडली होती. त्या वेळीं आपणांस त्या ताम्रपटाच्या लिपीच्या वाचनाचा पुरेसा सराव नसल्याने आपल्या वाचनांत पुष्कळ चुका राहून गेल्या हें त्यांनी प्रांजलपणें कबूल केलें होतें. सारांश, कोल्हापूर ताम्रपटाच्या लेखाच्या शेवटीं पंडराद्रिशेन असा शब्द नाही. तेव्हा त्यावरून पंढरपूरच्या प्राचीनत्वाबद्दल अनुमान करणें योग्य होणार नाही. दान दिलेल्या गावाचें पाण्डरङ्गपल्ली हें नांव मात्र स्पष्ट आहे. पण तें सध्याच्या पंढरपुराचेंच नांव होतें की काय याबद्दल संशय आहे. डॉ. कृष्ण यांनी त्या ताम्रपटांतील गावें पंढरपुराजवळ सापडतात असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. कांही गावांचीं नांवें मी निराळीं वाचतों व त्यांचा शोध करून तीं इतरत्र* सापडतात असेंहि मीं दाखविलें आहे; पण त्यांची चर्चा येथे करण्याची आवश्यकता नाही.

---

* संशोधनमुक्तावलि, सर ३, पृ. १८.

१२. राष्ट्रकूटनृपति प्रथम अमोघवर्ष याचा जवखेडा ताम्रपट : शक संवत् ७४२

कांही समस्यांचें चिकित्सक परीक्षण*

हा ताम्रपट धुळ्याचे श्री. द. रा. भट यांनी एपिग्राफिया इंडिका या सुप्रसिद्ध संशोधनपर त्रैमासिकांत (पु. ३३, पृ. १२९ इ.) त्याच्या छापांसह प्रसिद्ध केला आहे. अमोघवर्षाच्या कारकीर्दींतील हा कालानुक्रमाने पहिला ज्ञात ताम्रपट असल्यामुळे तो फार महत्त्वाचा आहे आणि त्याच्या योगें तत्कालीन कांही समस्यांवर बराच प्रकाश पडतो, म्हणून त्याविषयी येथे विचार करण्याचें योजिलें आहे.

हा ताम्रपट राष्ट्रकूट नृपति प्रथम अमोघवर्ष याने गत शक संवत् ७४२ मध्ये आषाढ शुक्ल अष्टमीस झालेल्या उत्तरायण संक्रान्तीस दिला होता. त्याचा उद्देश त्या राजाने त्या तिथीस वायिपद्रक† नामक गाव एका ब्राह्मणास दान दिला हें नमूद करण्याचा होता. या तिथीची इंग्रजी तारीख २२ जून सन ८२० येते, हें श्री. भट यांनी दाखविलें आहे. त्यांच्या मतें अमोघवर्ष हा सहा वर्षांचा असतां सन ८१४ मध्ये गादीवर आला. तेव्हा प्रस्तुत ताम्रपट दिला, त्यावेळीं त्याचें वय केवळ बारा वर्षांचें असावें. दान दिलेलें गाव ज्या प्रादेशिक विभागांत होतें त्याचें नांव श्री. भट यांनी 'एकाशय' असें वाचलें आहे. पण या नांवाचें नगर किंवा गाव त्यांना सापडलें नाही. त्यांनी प्रसिद्ध केलेल्या छापावरून तें नांव 'प्रकाशया' असावें असें दिसतें.

---

* विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक, १९६०, पृ. ४१–६४.

† दान दिलेल्या गावाचें नांव श्री. भट यांनी 'वोयिपद्रक' असें वाचलें आहे. पण ए. इं. च्या संपादकांनी दाखविल्याप्रमाणे 'वायिपद्रक' असें वाचलें पाहिजे.

या ग्रामनामाचें पहिलें अक्षर त्रिकोणाकृति नसल्यामुळे तें 'ए' नव्हे. ओळ ५६ मधील 'एवं' शब्दांतील 'ए'ची आकृति पहा. प्रस्तुत ठिकाणीं पहिलें अक्षर 'प्र' दिसतें. त्याच्या खालच्या भागीं डावीकडे वळविलेला रकार स्पष्ट आहे. तेव्हा येथे 'प्रकाशयान्तर्गतवायिप्रद्रकनामा ग्रामः' असें वाचलें पाहिजे. हें प्रकाशया गाव पश्चिम खानदेश जिल्ह्यांतील तळोदा गावापासून १० मैलांवर असलेलें तापी नदीच्या तीरावरील 'प्रकाश' गाव असावें. ईश्वरराात नामक राजाचा गुजराथेंत कल्छल येथे सापडलेला अपूर्ण ताम्रपट मी माझ्या कल्चुरि ग्रंथांत प्रसिद्ध केला आहे तेथे या गावाचें नांव 'प्रचकाशा' असें आलें आहे.* हें गाव फार प्राचीन असून तेथे भारत सरकारच्या पुरातत्त्व खात्यानें अलीकडे उत्खनन केलें आहे. ज्या ठिकाणीं प्रस्तुत ताम्रपट सापडला होता तें जवखेडा गाव प्रकाशच्या ईशान्येस सुमारें पंधरा मैलांवर आहे. या ताम्रपटांत दान दिलेल्या वायिपद्रक गावाच्या चतुःसीमा दिल्या आहेत त्या अशा—पूर्वेस लघुमोयिपद्रक, दक्षिणेस उम्ब्ररोपिका ग्राम, पश्चिमेस त्याच गावाची सीमा आणि उत्तरेस विन्ध्य पर्वत. हीं गावें श्री. भटांना सापडलीं नाहीत. पण सर्व्हे ऑफ इंडियाच्या विस्तृत नकाशावरून मोयिपद्रक हें प्रकाश गावाच्या वायव्येस असलेलें मोहिदा आणि उम्भरोपिका† हें दक्षिणेस एका मैलावरचें उमरी असावें. या गावांपासून ४–५ मैलांवर टेकड्या दिसतात. दान दिलेले वायिपद्रक हें या गावांजवळ होतें असें मानल्यास त्याच्या उत्तरेस पर्वत होता हा निर्देशहि जमतो. त्या पर्वताचें सध्याचें नांव सातपुडा आहे. पण प्राचीन काळीं सातपुडा (ऋक्ष) आणि विन्ध्य यांचा घोटाळा होत असे हें पुराणांतील उल्लेखांवरून दिसतें.‡ प्रस्तुत ताम्रपट देतांना अमोघवर्षाचा मुक्काम निस्वपुरकग्रामांत होता असें त्यांत म्हटलें आहे. हें त्यांच्या राजधानीचें ठिकाण असावें असें श्री. भट म्हणतात. पण एपिग्राफिया इंडिकाच्या संपादकांनी म्हटल्याप्रमाणे 'निस्वपुरक' हें एक

---

* कॉर्पस् इंस्क्रिप्शनम् इंडिकॅरम्, पु. ४, पु. ६०३ इ.

† श्री. भट यांनी हें ग्राम चुकीने उम्बरोपिका असें वाचलें आहे.

‡ कांही पुराणांत तापी, पयोष्णी (पूर्णा) आणि निर्विन्ध्या या विन्ध्य पर्वतांत उगम पावतात असें म्हटलें आहे.

'ग्राम' किंवा गाव होतें, राजधानीचें नगर नव्हतें हें स्पष्ट आहे. श्री. भट म्हणतात कीं निस्वपुरक हें मध्यभारतांतील कुक्षि गावाजवळचें निसरपुर असावें, पण याला नामसादृश्याशिवाय दुसरें प्रमाण नाही. शिवाय हें गाव जवखेड्याहून पुष्कळच दूर नर्मदेच्या उत्तरेस आहे. निस्वपुरकाला जुळेल असें गाव जवखेड्याच्या जवळपास दिसत नाही. कदाचित् प्रकाशच्या ईशान्येस १० मैलांवरचें नवलपुर हें प्राचीन निस्वपुरक असेल.

प्रस्तुत ताम्रपटांतील दानाचा उल्लेख खालीलप्रमाणे आहे—

एवमयं ग्रामः...गंगाजाह्नवीमिव* पवित्रीकृतशरीरया श्रीमदसगव्वा-भट्टारिकया विज्ञप्तेन प्रतिपादितो... । (गंगाजाह्नवीप्रमाणे जिचें शरीर पवित्र झालें आहे अशा असगव्वा भट्टारिकेने विनंती केल्यावर राजाने हा गाव दान दिला.) या असगव्वा भट्टारिकेविषयी प्रस्तुत ताम्रपटांत जास्त माहिती आली नाही. तथापि श्री. भट म्हणतात—"जिच्या विनंतीवरून प्रस्तुत दान केलें होतें ती असगव्वा राष्ट्रकूट घराण्यांतील असावी. तथापि ती अमोघवर्षाची राणी असेल असें वाटत नाही. कारण सन ८०८ मध्ये जन्मलेला अमोघवर्ष हें दान देतांना सुमारें १२ वर्षांचा असावा. शिवाय ही असगव्वा सम्राज्ञी होती असें दर्शविणारी पदवीहि तिच्या बाबतींत योजिली नाही." यावर एपिग्राफिया इंडिकाचे संपादक लिहितात, "असगव्वेच्या नांवाशीं भट्टारिका हें उपपद जोडलें आहे. त्यावरून ती अमोघवर्षाची राणी असावी. तो राजा अल्पवयस्क होता हें कांही विरुद्ध प्रमाण होत नाही. प्राचीन काळीं लहानपणीं विवाह होत असत. रामायणांतील रामाचें व महाभारतांतील विचित्रवीर्याचें विवाहकाळीं वय पाहा." या प्रश्नाविषयी असा मतभेद असल्यामुळे त्याचा थोडा बारकाईने विचार करूं.

श्री. भट व एपिग्राफिया इंडिकाचे संपादक या दोघांनीहि शक संवत् ७४२ (सन ८२०) या वर्षीं प्रस्तुत दान करतांना अमोघवर्ष बारा वर्षांचा

* येथे 'गंगाजाह्नवीभ्याम्' असें वाचावें असें ए. इं. च्या संपादकांनी सुचविलें आहे पण तें बरोबर नाही. गंगा आणि जाह्नवी हीं येथे एकाच नदीचीं नांवें विवक्षित आहेत. मराठींतील 'गंगाभागीरथी'-हा प्रयोग पाहा. 'गंगाजाह्नव्या इव' असें वाचावें.

होता असें मानलें आहे. अमोघवर्षाचा जन्म केव्हा झाला, याविषयी विद्वानांमध्ये मतभेद आहे. 'राष्ट्रकूट नृपति आणि त्यांचा काल' या आपल्या सुप्रसिद्ध पुस्तकांत डॉ. अळतेकरांनी अमोघवर्ष हा सन ८१४ मध्ये गादीवर आला तेव्हा त्याचें वय केवळ सहा वर्षांचें होतें असें म्हटलें आहे.* तेंच मत स्वीकारून श्री. भटांनी अमोघवर्ष सन ८०८ मध्ये जन्मला असें मानलें आहे. प्रस्तुत लेखकाने सुमारें २५ वर्षांपूर्वी अमोघवर्षाचा पिता तृतीय गोविंद याचे दोन ताम्रपट संपादितांना हें मत चुकीचें आहे असें प्रथम दाखविलें होतें.† त्या लेखांतील प्रमाणें खाली दिलीं आहेत—

तृतीय गोविंदाचे शक संवत् ७२७ ते ७३४ या अवधींतील ताम्रपट आणि प्रथम अमोघवर्षाचा संजान ताम्रपट यांत गोविंदाच्या कारकीर्दीतील घटनांचा पुढील क्रम वर्णिला आहे—शक संवत् ७१५ च्या सुमारास गोविंद गादीवर आला. त्यानंतर लवकरच त्याचा भाऊ स्तंभ याच्या नेतृत्वाखाली बारा राजांनी त्याच्या विरुद्ध बंड उभारलें. तेव्हा आपल्या भावाला शह देण्याकरिता गोविंदाने कैदेंत असलेल्या मुत्तरस नामक गंग नृपतीस मुक्त केलें. पण तोच शत्रूंस जाऊन मिळाला. तेव्हा गोविंदाने त्या सर्वांचा पराभव करून गंग राजास पुनः बंदींत टाकलें. या सर्व घटना इतक्या थोडया अवधींत घडल्या कीं त्यांचें वर्णन कवीने खालीलप्रमाणे केलें आहे.‡

यावन्न भ्रुकुटी ललाटफलके यस्योन्नते लक्ष्यते
विक्षेपेण विजित्य तावदचिराद्बद्धः स गंगः पुनः ।

गोविंदाच्या उंच कपाळावर आठी दिसते न दिसते तोंच गंग राजाचा पराभव करून त्याला बंदींत टाकण्यांत आलें. तेव्हा या घटना गोविंद गादीवर आल्यावर एकदोन वर्षांत (शके ७१६ ते ७१७) घडून आल्या असाव्या. पुढील चार पांच वर्षें गोविंदाच्या मध्य व उत्तर भारतांतील स्वाऱ्यांत गेलीं.

---

* The Rāshṭrakūṭas and their Times, pp. 71–72

† ए. इं., पु. २३, पृ. २०४ इ.

‡ पूर्वोक्त, पु. १३, पृ. २१९–२०.

त्याने प्रथम मध्य भारतांतील प्रतीहार नृपति द्वितीय नागभट व त्याचा सहाय्यक चन्द्रगुप्त यांचा पराजय केला. नंतर त्याने कनोजवर चाल करून चक्रायुध व त्याचा मित्र बंगालचा धर्मपाल यांना जिंकलें. पुढे तशीच चाल करीत तो हिमालयाच्या पायथ्यापर्यंत गेला. त्याचे घोडे तेथील नद्यांचें पाणी प्याले आणि त्याच्या हत्तींनी त्यांत यथेच्छ बुड्या मारल्या. नंतर तो नर्मदा नदीपर्यंत परत आला आणि त्या नदीच्या काठाकाठाने आक्रमण करीत त्यानों माल्व, कोसल, कलिंग, वंग, डाहल (चेदि) आणि ओड्र (ओरिसा) देश जिंकले. नंतर तो पुनः विंध्य पर्वताच्या पायथ्याशीं नर्मदातीरीं आला आणि माराशर्व राजाच्या श्रीभवन (सध्याचें सारभोण) येथे त्याने त्या वर्षीचा पावसाळा घालविला. या सर्व घटना शक संवत् ७१७ ते ७२१ या कालांत घडून आल्या असाव्या. श्रीभवन येथे त्याचा पुत्र अमोघवर्ष याचा जन्म झाला. गोविंदाच्या कांही शेवटच्या ताम्रपटांत म्हटलें आहे की, श्रीभवन येथे पावसाळा घालविल्यावर गोविंद आपल्या सैन्यासह तुंगभद्रा नदीतीरीं आला.* पण संजान ताम्रपटांत मात्र असें वर्णन आढळत नाही.† शिवाय मी सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी संपादिलेल्या अंजनवती ताम्रपटावरून असें स्पष्ट दिसतें की शक संवत् ७२२ च्या पावसाळ्यामध्ये गोविंद आपल्या मयूरखंडी नामक राजधानींत होता.‡ तेव्हा उत्तर भारतांतील दिग्विजयानंतर गोविंदाने कांही काळ आपल्या राजधानींत दक्षिण भारतांतील स्वाऱ्यांची तयारी करण्यांत घालविला असें दिसतें. त्यानंतर शक संवत् ७२५ मध्ये त्याचा मुक्काम तुंगभद्रेच्या काठीं अलंपुर किंवा हेलापुर येथे होता हें त्याच्या झरिका व इतर

---

* 'नीवा श्रीभवने घनावनघनव्याप्तांबरां प्रावृषं तस्मादागतवान् समं निजबलैरातुंगभद्रातटम् ।'–ए इं. पु. २३, पृ. २२०.

† पूर्वोक्त, पु. १८, पृ. २४६.

‡ हा ताम्रपट शक संवत ७२२ मध्ये सूर्यग्रहणप्रसंगीं गोविंदाने तुलापुरुष महादान दिलें त्या वेळीं दिला होता. हें ग्रहण आषाढ अमावास्येस (२५ जून सन ८००) होतें, हें मी इतरत्र दाखविलें आहे. पूर्वोक्त, पु. २३, पृ. १०.

कांही ताम्रपटांवरून स्पष्ट होतें.* तेथून त्यानें केरल, चोल, पांड्य आणि पल्लव या राजांवर स्वाऱ्या केल्या. दूरचा लंकेचा राजाहि त्याला शरण आला आणि त्याने गोविंदाचा हेलापुरीं मुक्काम असतांना आपला व आपल्या मंत्र्याचा असे दोन पुतळे गोविंदाकडे पाठविले.

गोविंद व अमोघवर्ष यांच्या ताम्रपटांवरून गोविंदाच्या स्वाऱ्यांचा जो कालक्रम वर दिला आहे त्यावरून अमोघवर्षाचा जन्म शक संवत् ७२१ (इ. स. ७९९) मध्ये झाला असावा हें स्पष्ट आहे. अर्थातच शक संवत् ७३७ (इ. स. ८१५) मध्ये तो गादीवर बसला† तेव्हा तो सोळा वर्षांचा होता. तेव्हा संजान ताम्रपटांतील आपला पुत्र या जगाचा भार पेलण्यास समर्थ आहे हें पाहून गोविंद स्वर्गास गेला‡ हें वर्णन अतिशयोक्तीचें दिसत नाही.

माझ्या लेखांतील प्रमाणांचें महत्त्व पटल्यामुळे कै. डॉ. अळतेकरांनी नंतर आपल्या मतांत बराच फरक केला. भारतीय विद्या भवनने अलीकडे प्रकाशिलेल्या इतिहासाच्या चौथ्या भागांत डॉ. अळतेकरांनी राष्ट्रकूटांच्या इतिहासावर एक प्रकरण लिहिलें आहे. त्यांत ते म्हणतात, 'अमोघवर्ष गादीवर आला तेव्हा तो तेरा चौदा वर्षांचा मुलगा होता. म्हणून त्याच्या पित्याने तो वयांत येईपर्यंत गुजराथचा मांडलिक आपला पुतण्या कर्क याची

---

* विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक १९५८, पृ. १०.

† डॉ. अळतेकरांनी दाखविल्याप्रमाणे शक संवत् ७३७ (सन ८१५) हें अमोघवर्षाच्या कारकीर्दीचें पहिलें वर्ष होतें. The Rāshṭrakūṭas and Their Times, p. 71. अमोघवर्षाचा जन्म शकसंवत् ७२१ मध्ये झाला असल्यास तो गादीवर आला त्या वेळीं १६ वर्षांचा असावा.

‡ ए. इं., पु. १८, पृ. २४६.

रीजंट म्हणून नेमणूक केली होती.* पण कर्काच्या या रीजन्सीचें कांहीहि प्रमाण मिळत नाही. अमोघवर्ष गादीवर आला तेव्हा सोळा वर्षांचा होता हें आम्ही मागे दाखविलें आहे. कौटिल्याने या वर्षी पुरुष वयांत येतो असें म्हटलें आहे. (द्वादशवर्षा स्त्री प्राप्तव्यवहारा भवति, षोडशवर्षः पुमान्।) हर्ष याच वयांत गादीवर बसला होता, किंबहुना त्याने दिग्विजयाचाहि आरंभ केला होता. तेव्हा कर्काला रीजंट नेमण्याची आवश्यकता नव्हती. डॉ. अळतेकरांना कर्क रीजंट म्हणून राष्ट्रकूटांच्या राजधानींत शासनव्यवस्था पाहत होता असें वाटण्याचें कारण कर्क आणि त्याचा धाकटा भाऊ गोविंद यांच्या दानपत्रांचीं वर्षे एकमेकांत मिसळलेलीं दिसतात हें होय.† त्यावरून कर्क हा राष्ट्रकूटांच्या राजधानींत असतांना गोविंद गुजराथेंत त्याचा प्रतिनिधि म्हणून राज्यकारभार पाहत होता अशी कल्पना त्यांनी केली. पण ती बरोबर नाही. कारण गोविंदाने शक संवत् ८३२ (इ. स. ८१०) मध्ये तृतीय गोविंदाच्या हयातींतच दिलेला ताम्रपट सापडला आहे.‡ त्या वेळीं कर्काला रीजंट म्हणून नेमण्याचें कांहीच कारण नव्हतें. कर्क व गोविंद यांच्या

---

* प्रो. नीलकंठ शास्त्री अमोघवर्ष गादीवर आला तेव्हा बारा वर्षांचा होता असें मानतात. History of India, Part I, p. 233. गादीवर येण्याच्या वेळीं अमोघवर्षाचें वय १२, १३ किंवा १४ वर्षांचें असल्यास त्याचा पिता तृतीय गोविंद याच्या उत्तर भारतांतील स्वाऱ्या शक संवत् ७२२ (जेव्हा तो मयूरखंडीस होता) आणि ७२५ (जेव्हा त्याचा मुक्काम अलंपुरास होता) यामधील काळांत झाल्या असें मानावें लागेल. हा काळ अत्यल्प आहे.

† कर्काचे ताम्रपट शक संवत् ७३४ आणि ७३८ या वर्षी आणि त्याचा लहान भाऊ गोविंद याचे ताम्रपट शक संवत् ७३२, ७३५ आणि ७४९ या वर्षी दिले आहेत.

‡ ए. इं., पु. २६, पृ. २४८ इ.

ताम्रपटांचीं वर्षें एकमेकांत मिसळलेलीं आढळतात याचें खरें कारण असें दिसतें की दोघांनाहि स्वतंत्रपणें एकमेकांच्या संमतिशिवाय ग्रामदानें करण्याचा अधिकार होता. शिवाय कर्क हा अमोघवर्षाच्या बालवयांत राष्ट्रकूट राजधानींत रीजंट म्हणून राज्यकारभार पाहत असता तर त्याने दिलेला एखादा तरी ताम्रपट सापडला असता. पण तसा ताम्रपट अद्यापि मिळाला नाही. म्हणून कर्क रीजंट म्हणून कांही काळ राज्यकारभार करीत होता असें दिसत नाही. पुढे चालुक्य व राष्ट्रकूट राजांनी बंड करून अमोघवर्षाला पदच्युत केलें त्या वेळीं मात्र कर्काने त्याला मदत करून त्याचें राज्य त्यास मिळवून दिलें, यांत संशय नाही.

वर दाखविल्याप्रमाणे अमोघवर्षाचा जन्म शकसंवत् ७२१ मध्ये झाला असल्यास तो हा ताम्रपट देण्याच्या वेळीं शकसंवत् ७४२ मध्ये एकवीस वर्षांचा होता हें स्पष्ट आहे. अर्थातच तो स्वतः राज्यकारभार पाहत होता. प्रस्तुत ताम्रपट कोणा रीजंटाने दिला असल्याचा त्यांत स्पष्टास्पष्ट उल्लेख नाही. तेव्हा असगव्वा भट्टारिका त्याची राणी असणें अशक्य नाही. तें सिद्ध करण्यास रामायण–महाभारतांतील बालविवाहाचे उल्लेख शोधण्याची आवश्यकता नाही. पण असगव्वा भट्टारिकेचें वर्णन प्रस्तुत ताम्रपटांत आलें आहे त्यावरून ती अमोघवर्षाची पत्नी होती असें दिसत नाही.* अमोघवर्ष तिचें 'गंगाजाह्नवी इव पवित्रीकृतशरीरा' असें वर्णन करतो त्यावरून त्याला तिच्याविषयी पराकाष्ठेचा आदर वाटत होता हें स्पष्ट आहे. तेव्हा असगव्वा ही त्याची माता दिसते. ती त्यावेळीं गतभर्तृका होती. अद्यापि महाराष्ट्रांत

---

* ती सम्राज्ञी असती तर तिची पदवी परमभट्टारिका अशी दिली असती. जेठवाई ताम्रपटांतील 'परमेश्वरी परमभट्टारिका श्रीशीलमहादेवी' हा निर्देश पाहा.

वयस्क गतभर्तृका स्त्रीला गंगाभागीरथी म्हणण्याचा प्रघात आहे. प्रस्तुत ताम्रपटांतील उल्लेख अगदी याच तऱ्हेचा आहे. तिच्या नांवाला भट्टारिका पद जोडलें आहे तें तिच्या राजवंशाचें द्योतक आहे. वाकाटकवंशी द्वितीय प्रवरसेनाच्या ताम्रपटांतील त्याच्या प्रभावतीगुप्ता नामक मातेचा उल्लेख 'मातृभट्टारिका' असा केला आहे* तो पाहा.

तेव्हा प्रस्तुत ताम्रपटावरून इतर माहितीबरोबरच तृतीय गोविंदाच्या राणीचें असगव्वा असें नांव प्रथमच आढळतें यांत त्याचें महत्त्व आहे.†

---

* वाकाटक नृपति आणि त्यांचा काळ, पृ. २१०.

† तृतीय गोविंदाच्या महादेवीचें (पट्टराणीचें) नांव गामुंडब्बे असें इतरत्र आलें आहे.

१३. शिलाहार नृपति मुम्मुणि याचा ठाणें ताम्रपट : शक संवत् ९७०

हा ताम्रपट सन १९५६ मध्ये ठाणें येथे जिल्हा कचेरी व चर्च यांच्या मधील जागेंत कांही बांधकाम करण्याकरितां खणलें तेव्हा सापडला होता. तो ठाण्याचे श्री. हरिदास प्रेमजी ठक्कर यांचे हातीं आला. त्यांनी तो श्री. हेडगे, मुंबई विधान सभा सदस्य, यांचेमार्फत मुंबई (आता महाराष्ट्र) राज्याचे डायरेक्टर ऑफ आर्काइव्ज् डॉ. प. म. जोशी यांच्याकडे पाठविला. डॉ. जोशी यांनी त्याचे फोटो वाचनार्थ मजकडे पाठविले त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

वर्णन—या ताम्रपटाचे पांच पत्रे आहेत. त्यांतील पहिल्या व शेवटच्या पत्र्याच्या आंतील बाजूवर आणि बाकीच्या पत्र्यांच्या दोन्ही बाजूंवर प्रस्तुत लेख कोरला आहे. पत्र्यांची रुंदी १२$\frac{3}{2}$ इंच आणि उंची १० इंच असून ते एका कडींत ओवले आहेत. तिच्यावर शिलाहारांची गरुडांकित मुद्रा आहे. पत्रे, कडी व मुद्रा यांचें वजन जवळ जवळ पावणेतेरा शेर आहे.

अक्षरवटिका व भाषा--प्रस्तुत लेख खिस्तोत्तर अकराव्या शतकांतल्या नागरी लिपींत लिहिला आहे. अक्षरांचे खालील विशेष उल्लेखनीय आहेत—'अ' चा आकार सध्याच्या हिंदी 'अ' सारखा आहे. संयुक्ताक्षराचा पहिला अवयव असलेल्या 'क' ला डाव्या बाजूस गांठ आहे. 'ख' च्या डाव्या बाजूच्या अवयवाला अद्यापि शेपूट फुटली नाही. 'झ', 'ण्ण' मधील दुसरा 'ण' आणि 'श' यांचेहि आकार उल्लेखनीय आहेत. द्रम्मांची संख्या सांगताना आंकड्यांचा उपयोग केला आहे. त्यांमध्ये पांच, सात, आठ व नऊ या आंकड्यांचे आकार ध्यानांत घेण्यासारखे आहेत.

भाषा--संस्कृत आहे. आरंभींच्या मंगल श्लोकानंतर शिलाहार वंशी मुम्मुणि राजाची वंशावळ प्रथम कपर्दीपासून दिली आहे. हा भाग पद्यांत

असून त्याचे वीस श्लोक विविध वृत्तांत आहेत. त्यानंतर दान देणाऱ्या मुम्मुणि राजाचें वर्णन, त्याचीं बिरुदें, त्याच्या कांही अमात्यांचीं नांवें गद्यांत दिलीं असून त्यापुढे दानाच्या महत्त्वाबद्दलचे श्लोक आले आहेत. त्यानंतर दानाचा प्रसंग व काल, दान ज्यांस दिलें होतें त्या ब्राह्मणांचे नामनिर्देश, दान दिलेल्या ग्रामांचे व जमिनींचे निर्देश, त्यांच्या चतुःसीमा वगैरे भाग पुनः गद्यांत लिहिला असून त्यानंतर दानाच्या संरक्षणाबद्दल शापाशीर्वादात्मक श्लोक घातले आहेत. शेवटीं या दानास मुम्मुणि राजाची संमति उल्लेखिली असून नंतर लेखकाचा नामनिर्देश केला आहे. एकंदर लेख १८६ ओळींचा असून त्यांत विविधवृत्तांत लिहिलेले ३३ श्लोक आहेत.

भाषा सामान्यतः शुद्ध आहे. लेखनपद्धतींतील खालील विशेष उल्लेखनीय आहेत. सर्व ठिकाणीं ' ब ' बद्दल ' व ' लिहिला आहे. क्वचित् ' श ' बद्दल ' स ' आढळतो. उदारणार्थ, ' यसो ' (ओ. १३–१४) पाहा. रेफानंतर येणाऱ्या व्यंजनाचें द्वित्व केलें आहे. उ. कपर्द्दी (ओ. ५) पाहा.

विषय—शिलाहारनृपति महामण्डलेश्वर, पश्चिमसमुद्राधिपति ' त्यागजगज्झंप ', ' राजमार्तण्ड ' इत्यादि बिरुदें धारण करणाऱ्या मुम्मुणि-राजानें शक संवत् ९७० सर्वधारी संवत्सराच्या फाल्गुन पौर्णिमेस चंद्रग्रहण-प्रसंगीं तीर्थाच्या ठिकाणीं स्नान करून भगवान् सूर्याला अर्घ्य देऊन आणि भगवान् उमापतीची (शंकराची) पूजा करून आपली पट्टराणी श्रीपद्माराज्ञी हिच्या कल्याणाकरिता कांही विद्वान् व सच्छील ब्राह्मणांना ग्रामदान व भूदान केलें, त्या वेळीं हा ताम्रपट दिला होता. वरील तिथीची इंग्रजी तारीख २० फेब्रुवारी सन १०५९ अशी येते. त्या दिवशीं चन्द्रग्रहण होतें व त्या वर्षीच्या संवत्सराचें नांवहि सर्वधारीच होतें म्हणून ह्या ताम्रपटाच्या खरेपणाविषयी संशय नाही.

वर सांगितल्याप्रमाणे प्रस्तुत ताम्रपटांत मुम्मुणि राजाची वंशावळ अगदी आरंभापासून दिली आहे. त्याच्या वंशाचें नांव ' सीलार ' (ओ. ५) व सि(शि)लाहार (ओ. ३६) अशा दोन प्रकारांनी येतें. शिलाहार राजे स्वतःस शंखचूड नागाकरितां स्वदेहार्पण करणाऱ्या जीमूतवाहन नामक

विद्याधराचे वंशज समजत असत. शिलाहार वंशाच्या तीन शाखा होत्या. एक उत्तर कोकणांत स्थानक (ठाणें) येथून राज्य करीत होती. या भागांत १४०० गावें असून त्यांमध्ये पुरी हें मुख्य होतें असा उल्लेख आला आहे. दुसरी शाखा दक्षिण कोकणांत गोवा किंवा वलीपत्तन येथून आणि तिसरी कोल्हापूर येथून राज्य करीत होती. प्रस्तुत ताम्रपट उत्तर कोकण शाखेचा आहे.

या ताम्रपटांत मुम्मुणि राजाची वंशावळ पुढीलप्रमाणे दिली आहे. कपर्दी, त्याचा मुलगा पुलशक्ति, त्याचा मुलगा धाकटा कपर्दी, त्याचा मुलगा वप्पुवन्न, त्याचा मुलगा झंझराज, त्याचा भाऊ गोग्गिराज, त्याचा मुलगा प्रथम वज्जड, त्याचा सुलगा अपराजित, त्याचा मुलगा द्वितीय वज्जड, त्याचा भाऊ अरिकेसरी, त्याचा पुतण्या छित्तराज, त्याचा धाकटा भाऊ नागार्जुन आणि नंतर त्याचा दुसरा भाऊ मुम्मुणि. मुम्मुणि राजाने अंबरनाथ येथील शिवालयाची दुरुस्ती केली होती. त्या शिवालयांत त्याचा शिलालेख आहे.

प्रस्तुत ताम्रपटांत **करहाट** (कऱ्हाड) येथून आलेल्या पुढील चौदा ब्राह्मणांना **वरेटिका विषयांतील** (जिल्ह्यांतील) **एकसाल, भूतबलि वडवली, आसलग्राम, उम्बरवली** आणि आसलग्रामाजवळचा—ज्याचें नांव आता ताम्रपटांत अस्पष्ट झालें आहे असा—आणखी एक गाव, या गांवांतील उत्पन्नाबद्दल कांही भाग **द्रम्मरू**पाने, तसेंच त्यांतील घरापाठीमागे एक एक द्रम्म आणि **कुमारगद्याणक** दान दिलें होतें असा निर्देश आहे. ते ब्राह्मण येणेप्रमाणें—

ब्राह्मणाचें नांव	पित्याचें नांव	गोत्र	शाखा
१ नारायण पंडित	तिक्कपैय	जामदग्निवत्स	ऋग्वेदी
२ राम्ब पंडित	(वरील ब्राह्मणाचा भाऊ)		
३ लक्ष्मीधर पंडित	(वरील ब्राह्मणाचा भाऊ)		ऋग्वेदी
४ कर्णाट केशवभट्ट	...	...	ऋग्वेदी

ब्राह्मणाचें नांव	पित्याचें नांव	गोत्र	शाखा
५ गोपति पंडित	राम्व पंडित	जामदग्निवत्स	ऋग्वेदी
६ धारेश्वर भट्ट	माधव भट्ट	जामदग्निवत्स	ऋग्वेदी
७ नारायण भट्ट	गोवर्द्धन भट्ट	गार्ग्य	ऋग्वेदी
८ चक्रपाणि भट्ट	द्रोणभट्ट	कपि	ऋग्वेदी
९ माधव ज्योतिर्विद्	दांउपैय	आत्रेय	ऋग्वेदी
१० वाम्बदेव भट्ट	रिसिंयप्प भट	आत्रेय	ऋग्वेदी
११ वावलैय	दांउपैय	काश्यप	ऋग्वेदी
१२ दिवाकरैय	सिद्धपैय	भारद्वाज	ऋग्वेदी
१३ जनार्दन	वेव्वलषडंगविद्	काश्यप	ऋग्वेदी
१४ वाम्बण	तिकापैय	आत्रेय	ऋग्वेदी

यांपैकी कांही ब्राह्मणांना पंडित व कांहीना उपाध्याय म्हटलें आहे. ते शास्त्री असावे. इतर कांहींना भट्ट हें उपपद लावलें आहे. ते वैदिक दिसतात. एकाला ज्योतिर्विद् (ज्योतिषी) म्हटलें आहे तर दुसऱ्या एकाचें षडंगविद् (सहा वेदांगें जाणणारा) असें केलें आहे. या ब्राह्मणांपैकी नारायण पंडित व दिवाकरैय यांस प्रत्येकी दोन वांटे व इतरांपैकी प्रत्येकास एक एक असें वांटे द्यावयाचे होते. या दानाचा उद्देश या ब्राह्मणांनी यजन, याजन, अध्ययन, अध्यापन इत्यादि वेदविहित षट्कर्मैं करावीं, बलि, चरु वगैरे पंचमहायज्ञ करावे आणि आपापल्या कुटुंबाचें पालन पोषण करावें हा होता. वरील गावांच्या चतुःसीमा सांगतांना **ऊलसनदी**, **पवहा नदी**, **विकराग्राम** यांचा उल्लेख आला आहे.

याशिवाय वरेटिका विषयाच्या बाहेरील कांही गावांचें उत्पन्न, कांही द्रमरूपाने व कांही धान्य रूपाने, इतर कांही ब्राह्मणांस दिलें होतें. तीं गावें अशीं—

(१) अभ्यन्तरषट्षष्टि विषयांतील—

मूलंद, बोरियला,

(२) शूर्पारकषट्षष्टिविषयांतील—

तृहयणिक, लघु अडणिका, खानुवडा पेढाल, वीरार.

या गावांतील कांही शेतांचें उत्पन्न खालील ब्राह्मणांना दिलें होतें. वरील ब्राह्मणांप्रमाणे हे सर्व ब्राह्मण करहाट (कऱ्हाड) मधून आलेले नसून भिन्न भिन्न ठिकाणांहून आले होते. त्यांची माहिती येणेप्रमाणे—

ब्राम्हणाचें नांव	पित्याचें नांव	मूलस्थान	गोत्र	वेद
१ दद्दपैय	ब्रह्मनायक	मध्यदेश	गार्ग्य	ऋग्वेदी
२ वाप्यैय	धालनषडंगविद्	करहाट	वासिष्ठ	ऋग्वेदी
३ दांउपैद्य	रिसिपैय	करहाट	काश्यप	ऋग्वेदी
४ नागदेवैय	रिसियपैय	करहाट	काश्यप	ऋग्वेदी
५ गोविन्दैय	महीधरैय	करहाट	जामदग्निवत्स	ऋग्वेदी
६ नन्नापैय	मधुवलैय	पुरी	भारद्वाज	गोभिल (सामवेदी)
७ लोकपैय	वावणैय	करहाट	काश्यप	ऋग्वेदी

वरील गावांतील क्षेत्रांचा (शेतांचा) निर्देश करतांना त्यांचीं नांवें (उ. कोट्ठारवेदि क्षेत्र, कुसुम्बी क्षेत्र, वाडक्षेत्र इत्यादि) दिलीं आहेत. त्यांच्या चतुःसीमा सांगतांना इतर शेतांचीं नांवें, क्वचित् डोंगर, उकास (वरकस जमीन), आरामक (बाग), वृक्ष, पाषाणशृंखलिका (ओळीनें लावलेले सीमेचे दगड), लघुवाहलिका (लहान ओढे), गोमार्ग, खज्जन (खारी जमीन), पानीयप्रपात (वरून खाली पडणारा पाण्याचा प्रवाह), क्षारनदी, देवळें (उ. वोलथै भट्टारिका देवी, विष्णुनारायणदेव), राजमार्ग इत्यादिकांचा उल्लेख केला आहे. धान्यांचीं मूटक, खंडिका आणि कुटप (कुडव) अशीं मापें सांगितलीं आहेत. ओळी ११५–११६ मध्ये धान्याचें माप सांगतांना ‘ पांच कुटप कमी असलेला एक मूटक ’ असें प्रथम सांगून नंतर तेंच माप ‘ खंडिका ३ आणि कुडव १५ ’ असें दिलें आहे. त्यावरून खालील कोष्टक ध्यानांत येतें—

२० कुडव—१ खंडिका (खंडी)
४ खंडिका—१ मूटक.

हीं मापें त्या त्या विषयांतील (जिल्ह्यांतील) समजावीं हें सांगण्याकरिता 'तद्विषयमानेन' असा शब्दप्रयोग केला आहे. ओ. १७० मध्ये श्रीस्थानक (ठाणें) येथील धान्याचें माप सांगतांना मात्र 'कल्लिवनमानेन' (नाशिक जिल्ह्यांतील कळवण येथील मापानें) असा निर्देश केला आहे. तसेंच वर उल्लेखिलेल्या लघु अडणिका आणि खानुवडा या गावांतील शेतांवर शुल्ककर माफ नसल्याचा आणि श्रीस्थानक (राजधानीचें नगर ठाणें) येथे आलेल्या अकरा कुसा तांदळावर मात्र तो माफ असल्याचा निर्देश आहे.

मुम्मुणिराजाचे आतापर्यंत तीन कोरीव लेख सापडले आहेत. त्यांमध्ये प्रस्तुत ताम्रपट कालक्रमाने पहिला आहे. त्याची मिति शक संवत् ९७०, सर्वधारी संवत्सर फाल्गुन पौर्णिमा (ता. २० फेब्रुवारी सन १०४९) होती हें मागे सांगितलें आहेच. या तिथीस चन्द्रग्रहण होतें. यानंतर सहा महिन्यांनी शक संवत् ९७१ विरोधी संवत्सर, भाद्रपद शुक्ल पौर्णिमेस शुक्रवारीं, चन्द्रग्रहणप्रसंगीं त्याने आणखी एक ताम्रपट दिला.* त्याची तारीख १५ आगष्ट सन १०४९ येते. शक संवत् ९७१ चें नांव विरोधी होतें व निर्दिष्ट तिथीस चन्द्रग्रहणहि होतें, पण वार मात्र मंगळवार होता. या ठिकाणीं वार लिहितांना लेखकाची चूक झालेली दिसते.†

यानंतरचा त्याचा तिसरा कोरीव लेख अम्बरनाथ येथील शिवालयांत आहे. पं. भगवानलाल इंद्रजी यांनी त्याच्या तिथीचें वाचन शक संवत् ९८२ श्रा[वण] शुद्ध ९ सु(शु)क्रे असें केलें आहे. त्याची इंग्रजी तारीख ९ जुलै सन १०६० अशी येते. पण त्या तिथीचा वार रविवार होता,

* एपिग्राफिया इंडिका, पु. २५, पृ. ५३ इ.

† डॉ. न. प्र. चक्रवर्ती हे 'शुक्रे' च्या ऐवजी 'सुते' असें वाचतात. आणि 'महीसुते' (मंगले) असा अर्थ घेऊन कालनिर्देश जमवतात. पूर्वोक्त, पृ. ५४, टीप १० पाहा.

शुक्रवार नव्हता. या तिथीबरोबर ग्रहण, नक्षत्र वगैरेचा उल्लेख नसल्यामुळे तिचा पडताळा पाहता येत नाही.

दोन्ही ताम्रपटांत मुम्मुणि राजाचें वर्णन ठरीव पद्धतीचें असल्यामुळे त्याच्या कारकीर्दीतील घटनांविषयी कांहीच माहिती मिळत नाही. त्यांमध्ये त्याच्या वर्णनांत 'निजभुजोपार्जितानेकमण्डलसमेतपुरीप्रमुखचतुर्दशग्रामशती-समन्वितकोंकणभुवं समनुशासति' असें म्हटलें आहे. त्यावरून त्याने अनेक प्रदेश जिंकल्याचें कळतें. पण ते कोणते तें समजत नाही.

छित्तराज, नागार्जुन आणि मुम्मुणिराज या शिलाहारनृपतींच्या आश्रयास असलेल्या सोड्ढल कवीने आपल्या उदयसुन्दरी कथेंत या तीन्ही नृपतींचा आदराने उल्लेख केला आहे.* तो मुम्मुणि राजाचें वर्णन 'आक्रान्त-धराविरोधिनखरायुध' 'ज्याचीं तीक्ष्ण आयुधें पृथ्वीचें आक्रमण करणाऱ्या शत्रूंस विरोध करतात' आणि कविकुञ्जरबलैकसंग्रहरुचि' (ज्याला उत्कृष्ट कविरूपी हत्तींच्या सेनेचाच संग्रह करण्याची आवड आहे) असें केलें आहे. हा सोड्ढल कवि पुढे लाट (गुजराथ) देशाचा अधिपति वत्सराज याच्या आश्रयास गेला. त्याची उदयसुन्दरी कथा बाणाच्या कादम्बरीप्रमाणे उत्कृष्ट गद्यशैलींत लिहिली आहे. ती त्याने मुम्मुणिराजाच्या समोर वाचून दाखविली होती. ती ऐकल्यावर मुम्मुणिराजाने त्याचा योग्य आदर केला असें उदय-सुन्दरीकथेंत म्हटलें आहे. सोड्ढलाच्या वर्णनावरून त्या काळीं स्थानक ठाणें ही शिलाहारांची राजधानी होती, असें स्पष्ट होतें.

मुम्मुणिराजाने हें दानपत्र आपल्या राज्यांतील सर्व अधिकाऱ्यांस तसेंच नगरवासी व ग्रामवासी जनांस कळविलें होतें. त्यांमध्ये हंयमननगरांतील पौरत्रिवर्गाचा मुद्दाम निर्देश केला आहे. या प्रकारचा निर्देश या पूर्वीच्या शिलाहारांच्या दानपत्रांतहि आढळतो. त्याची चर्चा यापूर्वी केली आहे.† हंयमन किंवा संजान येथे राष्ट्रकूटांच्या अरबमांडलिकांचें राज्य होतें. तें पुढे सन १०१५ च्या सुमारास शिलाहारांनी जिंकून आपल्या राज्यास जोडलें.

---

* उदयसुन्दरीकथा (गायकवाड संस्कृत ग्रन्थमाला), पृ. १२.

† संशोधनमुक्तावलि, सर ३, पृ. १६२.

तेव्हापासून हंयमननगरांतील पौरत्रिवर्गासहि शिलाहार नृपतींच्या आज्ञा कळविण्यांत येऊं लागल्या.

स्थलनिश्चय—ठाण्याजवळच्या भागास सध्या साष्टी असें नांव आहे. याचें पूर्वीचें नांव **षट्षष्टि** असें होतें कारण यांत सहासष्ट गावें अन्तर्भूत होतीं. याशिवाय **शूर्पारकषट्षष्टि** असाहि एक दुसरा सहासष्ट गावांचा विभाग होता. त्यामध्ये **शूर्पारक** (सध्याचें सोपारा) हें प्रमुख होतें. या विभागापासून ठाणेंजवळच्या विभागाचें भिन्नत्व दर्शविण्याकरितां त्यास **अभ्यन्तरषट्षष्टि** असें म्हटलें आहे. पण या विभागाचें पूर्ण नांव श्रीस्थानकाभ्यन्तरषट्षष्टि विषय असें होतें आणि तें शिलाहार नृपति छित्तराजाच्या भांडुप ताम्रपटांत* आलें आहे. याशिवाय **वरेटिका विषय** नांवाचा तिसरा एक विभाग होता. त्याचें मुख्य गाव **वरेटिका** हें होतें. प्रस्तुत दानपत्रांत उल्लेखिलेलीं गावें या तीन विषयांतील आहेत. वरेटिका विषयाचा उल्लेख शिलाहार नृपति अपरार्काच्या वडवली ताम्रपटांत† आला आहे. त्यावरून वरेटिका हें सध्याच्या वडवली गावाजवळच्या भागाचें नांव असावें. वडवली ठाण्याच्या उत्तरेस सुमारें सहा मैलांवर आहे. वरेटिका विषयांतील **एकसाल** गावाचा पत्ता लागत नाही, पण त्याच्या चतुःसीमेंतील **ऊलस** नदी मात्र सध्या उल्हास नांवाने प्रसिद्ध आहे. आणि ती वडवलीजवळच वाहते. दुसरी नदी **पवहा** हिचा मात्र पत्ता लागत नाही. याच विषयांतील दान दिलेलें दुसरें गाव **भूतबलि** हें सध्याचें भोपड असावें. हें वडवलीचे आग्नेयेस सुमारें दहा मैलांवर आहे. याच विषयांतील तिसरें **वडवली** गाव आपल्या प्राचीन नांवाने अद्यापि ज्ञात आहे. चौथें **आसलग्राम** सध्या या भागांत आढळत नाही. मध्य रेल्वेच्या कल्याण–इगतपुरी फाट्यावर आसनगाव स्टेशन आहे, पण तें वडवलीपासून बरेंच दूर आहे. तसेंच याच विषयांतील **उम्बरवलीग्राम** हें वडवलीच्या जवळपास दिसत नाही. तानसा नदीच्या दक्षिण किनाऱ्यालगत एक उम्बरपाडा गाव आहे, पण तें या वडवलीपासून दूर आहे.

---

* इं. अँ., पु. ५, पृ. २७७.

† जे. बी. बी. आर. ए. एस्., पु. २१, पृ. ५०५.

स्थानकाभ्यन्तरषट्षष्टि विषयांतील मूलंद ग्राम हें सध्याचें मध्य-रेल्वेचें मुलुंड स्टेशन (ठाण्याच्या नैऋत्येस कांही मैलांवर असलेलें) होय. याच विषयांतील काढेवलीपल्लिका ही ठाण्याच्या पश्चिमेस ८ मैलांवरची कांदिवलि असावी.

शूर्पारकषट्षष्टि विषयाचें मुख्य गांव शूर्पारक हें सध्याचें सोपारा होय. प्राचीन काळ हें कोंकणांतील मुख्य शहर होतें. या ठिकाणीं अशोकाच्या शासनांचे तुकडे सापडले आहेत. या विषयांतील तृहयणिक हें तिल्हेर असावें. हें गाव सोपाऱ्याच्या पूर्वेस सुमारें १२ मैलांवर आहे. तसेंच या विषयांतील खानुवडा ग्राम हा सध्याचा खानिवडे गांव असावा. हा सोपाऱ्याच्या ईशान्येस सुमारें ८ मैलांवर आहे. त्याप्रमाणेच या विषयांतील विरार ग्राम हा आपल्या प्राचीन नांवानें सोपाऱ्याच्या उत्तरेस पांच मैलांवर आहे. या दान दिलेल्या गावांशिवाय करहाट, पुरी, स्थानक व कल्लिवन या स्थलांचे उल्लेख आले आहेत. करहाट हें सातारा जिल्ह्यांतील कऱ्हाड. हें प्राचीन काळीं ब्राह्मणवस्तीबद्दल प्रसिद्ध होतें. पुरी हें सध्याचें राजपुरी होय. हें कांही काळ उतरकोंकणची राजधानी होतें. स्थानक हें शिलाहारांच्या राजधानीचें ठिकाण (सध्याचें ठाणें) होय, हें मागे सांगितलें आहे कल्लिवन हें नाशिक जिल्ह्यांतील कळवण असावें. याचाहि निर्देश अनेक कोरीव लेखांत येतो. बाकीच्या गावांचा पत्ता लागत नाही.

वाचन[1]

पहिला पत्रा

१ सिद्धिः [।*] जयश्चाभ्युदयश्च ॥ लभते सर्व्वकार्येषु पूजया गणना यकः । विघ्नं निध्नन्स वः पायादपायाद् गण-

२ नायकः ॥[2] [१*] स वः पातु शिवो नित्यं यन्मौलौ भाति जाह्नवी । सुमेरुसि(शि)खरोद्गच्छदच्छचंद्रकलोप-

---

१ मूळ ताम्रपटाच्या छापावरून.

२ श्लोक १–२ यांचें वृत्त–अनुष्टुभ्.

३ मा। [२ ।।*] जीमूतकेतुतनयो नियतं दयालुर्ज्जीमूतवाहन इति त्रिजगत्प्रसिद्धः। देहं निजं तृणमि–

४ वाकलयन्परार्त्थे यो रक्षति स्म गरुडात्खलु शंखचूडं(डम्) ।। [३ ।।*] तस्यान्वये निखिलभूपतिमौलिनूत्नर–

५ त्नद्युतिच्छुरितनिर्म्मलपादपीठः। श्रीसाहसीक इव साहसिकः कपर्द्दी सीलारवंशतिलको नृप–

६ तिर्व्व(र्ब्ब)भूव ।। [४ ।।*] तस्मादभूच्च तनयः पुलशक्ति-नामा सीमासमः सुरगुरूदितराजनीतिः। निर्ज्जित्य संगरमु–

७ खेखिलवैरिवर्ग्गं निष्कंटकं जगति राज्यमकारि येन ।।[3] [५ ।।*] ततोपि समभूत्सुतो नृपशिरोविभूषामणिः

८ सि(शि)तः शृणिरिवापरोरिकरिणां कपर्द्दी लघुः। यदीययशसा जगत्यतिशयेन शुक्लीकृते न भाति सु–

९ रवारणो न च ससी(शशी) न दुग्धाम्वु(म्बु)धिः[4] ।।[६।।*] तस्मादप्यभवद्विभूतिपदवीपात्रं पवित्रीकृताशेषक्ष्मावलयो म–

१० हीपतिलकः श्रीवप्पुवन्नः सुतः। संग्रामांगणरंगिणासिलतया लूनैक-दन्ता हठात्सर्व्वा येन वि–

११ नायका विरचिता विद्वेषिणां दन्तिनः[5]।। [७।।*] तस्माज्जातस्तनूजो रजनिकर इवानन्दिताशेषलोकः

१२ श्लाघ्यः श्रीझंझराजो दिवसकर इव ध्वस्तनिःशेषदोषः। शंभोर्यो द्वादशापि व्यरचयदचिरात्की–

---

३ श्लोक ३–५ यांचें वृत्त–वसन्ततिलका.

४ वृत्त–पृथ्वी.

५ वृत्त–शार्दूलविक्रीडित.

१३ त्नानि स्वनाम्ना सोपानानीव मन्ये प्रणततनुभृतां स्वर्गमार्गो-
द्यतानां(नाम्)[६] [८॥*] भ्राता तत्र ततस्ततोज्व(ज्ज्व)लय-

१४ सो(शो)राशिप्रकाशीकृताशेषक्ष्मावलयो व(ब)ली वलवतां[७]
श्रीगोग्गिराजो भवत्। चापाकर्षणकर्म्मणि .

१५ प्रवणतां यस्मिन्गते भूपतौ भीष्मद्रोणपृथासुतप्रभृतयश्चित्ते
चमत्कारिताः[८] ॥ [९ ॥*] तस्माद्विस्मयकारिहारि-

१६ चरितप्रख्यातकीर्त्तेः सुतः श्रीमान्वज्जडदेवभूपतिरभूद् भूचक्र-
चूडामणिः। दोर्द्दण्डैकव(ब)लस्य यस्य स-

१७ हसा संग्रामरंगांगणे राज्यश्रीः स्वयमेत्य वक्षसि रतिं चक्रे
मुरारेरिव ॥ [१० ॥*] जयन्त इव वृत्रारेः पुरा-

१८ रेरिव षण्मुखः। ततः श्रीमानभूत्पुत्रः सच्चरित्रोपराजितः[९] ॥
[११ ॥*] कर्ण्णस्त्यागेन यः साक्षात्सत्येन च यु-

१९ धिष्ठिरः। प्रतापाद्दीप्तिमार्त्तण्डः कालदण्डश्च यो द्विषां(षाम्) ॥
[१२ ॥*] शरणागतसामन्ता अपरा अपि जगति रक्षि-

२० ता येन। स जयति यथार्त्थनामा शरणागतवज्रपंजरो देवः[१०] ॥
[१३ ॥*] येन स्वागतमागताय विहितं गो-

२१ म्माय नानाविधं येनैवैयपदेवनाम्नि चलितं राज्यं स्थिरं
कारितं(तम्)। भिल्लम्मामम(न्म)मणम्वु(म्बु)व-

---

६ वृत्त–स्रग्धरा.

७ 'वलवतां' असें वाचावें.

८ श्लोक ९–१० यांचें वृत्त–शार्दूलविक्रीडित.

९ श्लोक ११ व १२ यांचें वृत्त–अनुष्टुभ्.

१० वृत्त–आर्या.

२२ क्षितिभुजां दत्तं च येनाभयं तस्य श्रीविरुदंकरामनृपतेरन्यत्कि-
मावर्ण्यते[११] ॥ [१४ ॥*] श्रीमानभू-

२३ तदनु वज्जडदेवनामा भूपालमस्तकमणिस्तनयो नयज्ञः । अद्यापि
यस्य चरितानि

दुसरा पत्रा : पहिली बाजू

२४ जनाः समस्ता रोमा(मां)चकंचुकितगात्रलता स्तुवन्ति[१२] ॥
[१५ ॥*] तद्भ्राताथ ततोरिकेसरिनृपो जातः स-

२५ तां सम्मतो दृप्तारातिकुलाचलैकदलने दंभोलिलीलां दधत् ।
गत्वा शैस(श)व एव सैन्यसहि-

२६ तो दृष्ट्वा च सोमेश्वरं तस्याग्रे पितुराज्ञया जगदलं यः कीलयित्वा
गतः[१३] ॥ [१६ ॥ *] तद्भ्रातृजो वज्जडदेव--

५७ सूनुः श्रीच्छित्तराजो नृपतिर्व्व(र्ब्ब)भूव । सीलारवंसः(शः)
शिसु(शु)नापि येन नीतः परामुन्नतिमुन्नतेन[१४]

२८ ॥ [१७ ॥*] लम्वा(म्बा)लकानि कुचकुंभतटोपकण्ठप्रभ्रष्ट-
हारलतिकानि निरंजानि । उत्खाततीक्ष्णकरवालविदा-

२९ रितस्य योन्तःपुराणि परिपंथिजनस्य चक्रे[१५] ॥ [१८ ॥*]
हतारिनारीनेत्रांभस्सेकसम्व(संव)र्द्धनादिव । व्र(ब्र)ह्माण्डमण्ड-

३० पं यस्य कीर्त्तिवल्ल्यतिरोहति ॥[१६] [१९ ॥*] दृप्तारातिषु
कोपकालदहनः सौभाग्यनारायणो वारस्त्रीषु ततोनुज-

---

११ वृत्त–शार्दूलविक्रीडित.

१२ वृत्त–वसन्ततिलका.

१३ वृत्त–शार्दूलविक्रीडित.

१४ वृत्त–इन्द्रवज्रा.

१५ वृत्त–वसन्ततिलका.

१६ वृत्त–अनुष्टुभ्.

३१ स्समभवन्नागार्जुनः क्ष्मापतिः ॥ (।) यस्यामानुषमूर्ज्जित
भुजव(ब)लं दूरान्निशम्य द्विषां निद्रा गैव रणांगणव्यसनि–

३२ नी दोर्द्दण्डकण्डूलता ॥[17] [२० ॥*] यदसमा गवि(बि) रान्तर्म्मत्त-
गन्धेभदानप्रसरदनिलशुष्यच्छ्रो(त्स्रो)तसो दिग्ग जेन्द्राः । अ–

३३ रिनगरनिदाहोद्दामदिग्व्यापिधूमप्रसरभयनिमीलल्लो चनान्युन्मिष-
न्ति[18] ॥ [२१ ॥*] तदनु तदनुजन्मा मूर्त्तिमा–

३४ न्मीनकेतुः क्षतरिपुविभवोभून्मुम्मुणिः क्षोणिपालः । विधू नधनुषि
यस्मिन्वाजिनीराजनान्ते व(ब)ल–

३५ भिदपि व(ब)लीयान्वार्षिकं चापमौज्झा(ज्झ)त् ॥ [२२ ॥*]
अथ स्वकीयपुण्योदयात्समधिगतपञ्चमहाशव्द(ब्द) महासाम–

३६ न्ताधिपतितगरपुरपर[मे]श्वरसि(शि)लाहारनरेन्द्रजीमूतवाहनान्व-
यप्रसूतसुवर्ण्णगरुडध्वजपश्चि–

३७ मसमुद्राधिपतित्यागजगज्झम्पसीलारमार्तण्डराजमार्तण्डडमरमैघ-
डम्व(म्ब)ररिपुमुण्डमालालंकृतवस्तुमतीस्व–

३८ यंवरस(श)रणागतवज्रपंजरप्रभृतिसमस्तराजावलीविराजितमहा-
मण्डलेश्वरश्रीमन्मुम्मुणिदेवराजो निजभुजो–

३९ पार्ज्जितानेकमण्डलसमेतं पुरीप्रमुखचतुर्दशग्रामस(श)तीसमन्वित-
समस्तकोंकणभुवं समनुशासति

४० तथैतद्राज्यचिन्ताभारमुद्वहति महामात्यश्रीजोउपैये तथा महा-
साम्धि(न्धि)विग्रहिकश्रीविठपैये स[त्ये]–

४१ तस्मिन्काले प्रवर्त्तमाने स च महामण्डलेस्व(श्व)रश्रीमुम्मुणि-
देवराजः सर्व्वानेव स्वसंव(ब)ध्यमान–

---

१७ वृत्त–शार्दूलविक्रीडित.

१८ श्लोक २१ व २२ वृत्त–मालिनी.

४२ कानन्यानपि समागामिराजपुत्रमंत्रिपुरोहितामात्यप्रधानाप्रधाननि-
योगिकांस्तथा रा–

४३ ष्ट्रपतिनगरपतिविषयपतिग्रामपतिनियुक्तानियुक्तराजपुरुषजनपदां-
स्तथा हंयमन–

४४ नगरपौरत्रिवर्गप्रभृत्तीं(तीं)श्च प्रणतिपूजासत्कारसमादेस(शैः)
संदिशत्यस्तु वः संविदितं यथा ॥

४५ चला विभूतिः क्षणभंगि यौवनं कृतान्तदन्तान्तरवर्त्ति जीवितं-
(तम्)। तथाप्यवज्ञा परलोकसाध–

४६ ने नृणामहो विस्मयकारि चेष्टितं(तम्)[१९] ॥ [२३॥*] तथा
चान्तर्ल्लीनजराराक्षसीप्रारब्ध(ब्ध)ग्रासं यौवनं

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

४७ स्वर्ग्गवासान्नरकपातसन(म)मिष्टसमागमवियोगदुःखं कदली-
ग[र्भ](र्भ)वदसारः संसारः। सहजजराम–

४८ रणसाधारणकं शरीरं पवनचलितकमलिनीदलगतजललवतरलतरे
धनायुषी इति मत्वा

४९ दृढतरविरक्तिवु(बु)द्ध्या संगृह्येह श्व(स्व)दानफलं ॥ कृतत्रेता-
द्वापरेषु तपोत्यर्थ(र्थं) प्रशस्यते। मुन–

५० योत्र तु शंसन्ति दानमेकं कलौ युगे[२०] ॥ [२४ ॥*] न तथा
सफला विद्या न तथा सफलं तपः। यथात्र मुनयः

५१ प्राहुर्द्दानमेकं कलौ युगे ॥ [२५॥*] तथा चोक्तं भगवता व्यासेन।
अग्नेरपत्यं प्रथमं सुवर्ण्णं भूर्व्वैष्णवी

---

१९ वृत्त-वंशस्थ.

२० श्लोक २४ आणि २५ यांचें वृत्त–अनुष्टुभ्.

५२ सूर्यसुताश्च गावः । लोकत्रयं तेन भवेत्प्रदत्तं यः कांचनं गां च महीं च दद्यात् ॥[२१] [२६ ॥*] आस्फोटयन्ति पित–

५३ रः प्रवल्गन्ति पितामहाः । भूमिदोस्मत्कुले जातः स नः संतारयिष्यति[२२] ॥ [२७ ॥*] धवलान्यातपत्राणि दन्तिन–

५४ श्च मदोद्धताः भूमिदानस्य पुष्पाणि फलं स्वर्ग्गे पुरंदरः (स्वर्ग्गः पुरन्दर)॥ [२८ ॥*] इति धर्म्माधर्म्मविचारचतुरचिरन्तनमु–

५५ निवचनान्यवद्धा(धा)र्य स्वकीयपट्टमहाराज्ञीश्रीपद्मैराज्याः श्रेयोर्त्थं मया शकनृपकालातीतस–

५६ म्व(संव)त्सरशतेषु नवसु सप्तत्यधिकेषु सर्व्वधारीसम्व(संव)त्सरान्तर्ग्गतफाल्गुनशुद्धपंचदस्यां(श्यां) यत्रा(त्रां)कतोपि

५७ सम्व(संव)त् ९७० फाल्गुन शुद्ध १५ संजातसोमग्रहणपर्व्वणि सुतीर्त्थे स्नात्वा गगनैक–

५८ चक्रचु(चू)डामणये कमलिनीकामुकाय भगवते सं(स)वित्रे नानाविधकुशु(सु)मश्लाघ्यमा(म)र्घं दत्वा(त्त्वा)

५९ सकलसुरासुरगुरुत्रैलोक्यस्वामिनं भगवन्तमुमापतिमभ्यर्च्चर्य यजनयाजनाध्ययनाध्या–

६० पनादिषट्कर्म्मनिरतेभ्यः क्रतुक्रियाकाण्डसौ(शौ)ण्डेभ्यः परमव्रा(ब्रा)ह्म[णे*]भ्यो महाव्रा(ब्रा)ह्मणेभ्यो यत्रा–

६१ दौ करहाटविनिर्ग्गतजामदग्निवत्सगोत्रजं व(ब)ह्वृचशाखा[२३]महाव्रा(ब्रा)ह्मणश्रीनारायणपण्डितम–[२४]

---

२१ वृत्त–इंद्रवज्रा.

२२ श्लोक २७ व २८ यांचें वृत्त–अनुष्टुभ्.

२३ '–शाखिनं ' असें वाचावें. याप्रमाणेच पुढील पंक्तींत दुरुस्त्या कराव्या.

२४ '–श्रीनारायणपण्डितं ' असें वाचावें.

६२ हाम्रा(ब्रा)ह्मणश्रीतिक्कपैयोपाध्यायसुतं तथैतद्भ्रा(द्भ्रा)तृराम्व-(म्ब)पण्डितं तथैतद्भ्रातृलक्ष्मीधरपण्डितं

६३ [करहाट*]विनिर्ग्गत .... गोत्रजं व(ब)ह्वृर(च)शाखाकर्ण्णाट-[25] केस(श)वभट्टोपाध्याय[26]....सुतं

६४ करहाटविनिर्ग्गतजामदग्निवत्सगोत्रजं व(ब)ह्वृचशाखागोपति-पण्डितं श्रीराम्व(म्ब)पण्डितसुतं

६५ करहाटविनिर्ग्गतजामदग्निवत्सगोत्रजं व(ब)ह्वृचशाखाधारेश्वरभट्टं माधवभट्टसुतं करहाट्ट(ट)–

६६ विनिर्ग्गतगार्ग्यगोत्रजं व(ब)ह्वृचशाखागोवर्द्धनभट्टसुतं नारायण-भट्टं.....

६७ विनिर्ग्गतं कपिगोत्रजं व(ब)ह्वृचशाखाचक्रपाणिभट्टं द्रोणभट्टसुतं कर–

२८ हाटविनिर्गतआत्रेयगोत्रजं व(ब)ह्वृचशाखादांउपैयसुतं माधव-ज्योतिर्वितं(दं)

६९ करहाटविनिर्ग्गतआत्रेयगोत्रजं व(ब)ह्वृचशाखावाम्व(म्ब)देव-भट्ट(ट्टं) रिसियपभट्टसुतं

तिसरा पत्रा : पहिली बाजू

७० करहाटविनिर्ग्गतकास्य(श्य)पगोत्रजं व(ब)ह्वृचशाखावावलैय(यं) दांउपैयसुतं करहा–

७१ टविनिर्ग्गतभारद्वाजगोत्रजं व(ब)ह्वृचशाखादिवाकरैयं सिद्धपैयसुतं करहा–

---

२५ '–शाखिनं' असें वाचावें. याप्रमाणेच पुढेहि दुरुस्ती करावी.
२६ '–भट्टोपाध्यायं' असें वाचावें.

७२ टविनिर्गतकास्य(श्य)पगोत्रजं व(ब)ह्वृचशाखाजनार्द्दनभट्ट(ट्टं) वेव्वलषडंगवित्सुत(तं) ॥

७३ करहाटविनिर्गतआत्रेयगोत्रजं व(ब)ह्वृचशाखावाम्व(म्ब)णं तीक-पैयसुतं प्रभृतिचतुर्द्दश–॥

७४ भ्यो यजनयाजनाध्ययनाध्यापनादिषट्कर्म्मकरणाय व(ब)लिचरुक-वैश्वदेवाग्निहोत्रक्रतुक्रि–

७५ याद्युपसर्प्पणार्त्थं स्वपरिग्रहपोषणार्त्थं च प्राग्लिखितश्रीनारायण-पण्डित तथा दिवाकरै– ॥

७६ याभ्यां वंटक यं द्वयमितरेभ्यो वंटकैकं विधाय वरेटिकाविषयान्त-ष्पाति[२७] एकसालग्रामो

७७ यत्र सिद्धायात्पलाण्डसमं पंचचत्वारिंशद्द्रम्माधिकानि द्रम्माणां चत्वारिंशनान्यंकतोपि[२८] ४४५ य–

७८ स्य चाघाटनानि । पूर्व्वत ऊलसनदी सीमा । दक्षिणतः पनहा नदी । पश्चिमतः सियलिपार्श्वे गो–

७९ मार्ग्गः ॥ उत्तरतोश्वत्थवृक्षस्तथा गोमार्ग्गश्च ॥ तथैतद्ग्रामीय-गृहद्रम्मास्तथा कुम्व(मा)रगदियाणक–

८० श्च ॥ तथैतद्विषयान्तष्पा(न्तःपा)तिभूतव(ब)लिग्रामो यत्र सिद्धायात्पलाण्डसमं त्रयोविंशदधिकं द्रम्म–

८१ शतद्वयमंकतोपि द्र २२३ यस्य चाघाटनानि । पूर्व्वतो विरकः । दक्षिणतः पर्व्वतः ।

८२ पश्चिमतः पर्व्वत एव । उत्तरतो विरक एव ॥ तथैतद्ग्रामीय-गृहद्रम्मास्तथा कुम्व(मा)रगद्दि–

---

२७ '—विषयान्तःपाति ' असें वाचावें.

२८ ' पञ्चचत्वारिंशद्द्रमाधिका द्रम्माणां चत्वारिंशदङ्कतोपि ' असें वाचावें.

८३ यणकश्च ।। छ ।। तथैतद्विषयान्तप्पाति(न्तःपाति)वडवलीग्रामो यत्र सिद्धायात्पलाण्डसमं एकोन–

८४ सप्तत्यधिकं द्रम्मशतद्वयमंकतोपि द्र २६९ यस्य चाघाटनानि । पूर्व्वतोश्वत्थवृक्षस्तथा

८५ पिंपरिवृक्षश्च । दक्षिणत उच्चादेवीसत्कडोंगरिका । पश्चिमतो विरकः । उत्तरतः पव–

८६ हा नदी ।। तथैतद्ग्रामीयगृहद्रम्मास्तथाकुम्व(मा)रगद्दियणकश्च ।। छ ।। तथैतद्विषयान्त–

८७ ष्पाति(तःपाति)आसलग्रामो यत(त्र) सिद्धायात्पलाण्डसममष्ट-चत्वारिंशदधिकानि द्रम्माणां पं–

८८ च शतान्यंकतोपि द्र ५४८ यस्य चाघाटनानि । पूर्व्वतो वडवली-ग्राममध्ये विर–

८९ कः । दक्षिणतो विरक एव । पश्चिमतो वृ(बृ)हत्पर्व्वतः । उत्तरतो विकराग्रामसीमायां

९० विरकः ।। तथैतद्ग्रामीयगृहद्रम्मास्तथा कुम्व(मा)रगद्दियण-कश्च ।। छ ।। तथैतद्विषया–

९१ तष्पाति (न्तःपाति)...ग्रामान्तर्व्वर्त्ति घंटेश्वरक्षेत्रं यत्र सिद्धाया-त्पलाण्डसमुत्पद्यमा(ना) अष्टचत्वारिं–

तिसरा पत्रा : दुसरी बाजू

९२ शद्द्रम्मा यत्रांकतोपि द्र ४८ यस्य चाघाटनानि । पूर्व्वत एकसाल-ग्राममध्ये गोमार्ग्ग–

९३ : । दक्षिणतः पवहानदी । पश्चिमतः श्रीनागेश्वरदेवसत्कपिंपरि-काक्षेत्रं तथा राज–

९४ मार्ग्गश्च । उत्तरतो गोमार्ग्गः ।। तथैतत्क्षेत्रीयगृहद्रम्मास्तथा कुम्व(मा)रगद्दियणकश्च

९५ ॥ छ ॥ तथैतद्विषयान्तष्पाति(यान्तःपाति)व्रा (ब्रा) ह्मणमधुपण्डि-
तप्रभुज्यमानउम्व (म्ब) रवलीग्रामीया–

९६ रुहणात्पंचाशद्द्रम्मा यत्रांकतोपि हस्त द्रम्म द्र ५० ॥ छ ॥ छ ॥

९७ तथा वरेटिकाविषयवा (बा) ह्यं वावैलक (कं) व्रा (ब्रा) ह्मणेभ्यो
यत्रादौ । मध्यदेशविनिर्ग–

९८ ताय गार्ग्यगोत्राय व (ब) ह्वृचशाखिने महाव्रा (ब्रा) ह्मणदद्दपैयाय
महाव्रा (ब्रा) ह्मणव्र (ब्र) ह्म–

९९ नायकसुताय अभ्यन्तरषट्षष्ठी (ष्टि) विषयान्तष्पाति(न्तःपाति)
मूलंदग्रामान्तर्व्वर्त्तिकोट्ठार–

१०० वेढीक्षेत्रं यत्र सिद्धायार्द्धिशतिद्रम्मास्तथैतद्ग्राममानेन पलाण्डा-
द्व्रीहीणां सार्द्ध–

१०१ मूटकैकश्च । यत्रांकतोपि समुत्पद्यमान द्र २० व्रीहिमूडा १॥
यस्य चा–

१०२ घाटनानि ॥ पूर्व्वतः खैरोण्ढाक्षेत्रं । दक्षिणतो वटुककेशवैयसत्क-
वावकः

१०३ । पश्चिमतो वौलथैभट्टारिकासत्ककुसुम्वी (म्बी) क्षेत्रं ॥ उत्तरतो
विप्रतिक्कम्वै (म्बै)यस–

१०४ त्कक्षेत्रं ॥ तथैतत्क्षेत्रप्रतिव(ब)द्धगृहद्रम्माश्चैतस्मा एव ॥ छ ॥
तथा करहाट–

१०५ विनिर्गताय वासिष्ठगोत्राय व(ब)ह्वृचशाखिने व्रा(ब्रा)-
ह्मणधालनष–

१०६ डंगवित्सुताय अभ्यंतरषट्षष्ठी(ष्टि) विषयान्तष्पाति(तःपाति)-
वोरियलाग्रामान्तर्व्वर्त्तिवाडक्षेत्रं

१०७ यत्र सिद्धायात्षट्तृं(त्रिं)शद्द्रम्मास्तथैतद्ग्राममानेन पलाण्डाद्व्रीहीणां पाद्व(दो)नचत्वारि(रो) मूटका–

१०८ श्च । यत्रांकतोपि द्र ३६ व्रीहिमूडा ३॥ यस्य चाघाटनानि । पूर्व्वतः खानुवडा–

१०९ क्षेत्रसत्कऊकासस्तथा आभिट्ठावृक्षश्च । दक्षिणतो विरइका । पश्चिमतः

११० ···ग्रामप्रतिव(ब)द्धकांढेवलीपल्लिका । उत्तरतो विप्रदाउपैयस–

१११ त्कवावकः ॥ तथाऽत्रत्याय निहुरक्षेत्रं यत्र सिद्धायादष्टादश द्रम्मास्त–

चौथा पत्रा : पहिली बाजू

११२ थैतद्ग्राममानेन पलाण्डाद्व्रीहीणां दशकुटपाधिकः सार्धमूटकैकश्च । यत्रांकतोपि द्र १८

११३ व्रीहि मूडा १॥ कु १० [।*] यस्य चाघाटनानि । पूर्व्वतो मानेग्रामः । दक्षिणतो गोमार्ग्गः । पश्चिमतो

११४ गोप्रचारः । उत्तरतश्चिचावृक्षः ॥ तथाऽत्रत्योयवौलपोण्ढाक्षेत्रं । यत्र सिद्धायान्नव द्रम्मा–

११५ स्तथा ग्राममानेन पलाण्डाद्व्रीहीणां पञ्चकुटपोनः मूटकैकश्च । यत्रांकतोपि द्र ९ व्रीहि–

११६ खण्डिका ३ कुडव १५ [।*] यस्य चाघाटनानि । पूर्व्वतो विष्णुनारायणदेवसत्कवावकः । दक्षिण–

११७ तो निहुरक्षेत्रं । पश्चिमतः कुटुम्वि(म्बि)कपांवु(बु)वसत्कारामकः । उत्तरतः खानूवलक्षेत्रं ॥ तथैतत्क्षेत्र–

११८ त्रयप्रतिव(ब)द्धगृहगृहद्रम्माश्चैतस्मा एव ॥छ॥ तथा करहाटविनिर्ग्गताय कास्य(श्य)पगोत्राय व(ब)ह्वृच–

११९ शाखिने व्रा(ब्रा)ह्मणदांउपैयाय व्रा(ब्रा)ह्मणरिसियपैयसुताय सू(शू)र्प्पारिकषट्षष्ठी(ष्टि)विषयान्तष्पा(न्तःपा)तितूहयड-

१२० णिकग्रामान्तर्व्वा(र्व्व)र्त्तिपोण्ढाक्षेत्रद्वयं। यस्य चाघाटनानि। पूर्व्वत इ(ई)शान्यां दिशिमारभ्याग्नेयां दिशि

१२१ यावद[२९]श्वत्थवृक्षस्तथा न्यग्रोधवृक्षस्तथा चिंचावृक्षसंयुक्तो-श्वत्थवृक्षस्तथा खदिरवृक्षस्तथा ऊषरं च।

१२२ दक्षिणतो वांकडिक्षेत्रं तथा सिंघलद्वीपक्षेत्रद्वयं च। पश्चिमतः पाषाणशृंखलिका तथा निखातपा-

१२३ षाणाश्च। उन्त(त्त)रतो मधुक्षेत्रं॥ तथाऽत्रत्याय तोरणी-क्षेत्रद्वयं। यस्य चाघाटनानि॥ पूर्व्वतो नाणेवा-

१२४ पक्षेत्रं वेडेवापक्षेत्रं च। दक्षिणतो राजमार्ग्गः। पश्चिमतः पूर्वभुक्त्या पानीयप्रपातः। उत्तर-

१२५ तो भाभोण्ढाक्षेत्रं॥ एवं क्षेत्रचतुष्टयसिद्धायाद्द्वाविंशद्(ति)द्र-म्माधिकं द्रम्मशतैकं तथैतद्ग्राममाने-

१२६ न पलाण्डाद्व्रीहीणां सार्द्धमूटकचतुष्टयं च। यत्रांकतोपि द्र १२२ व्रीहि मूडा ४॥ तथैतद्ग्रामम-

१२७ ध्ये गृहचतुष्टयं तथैव क्षेत्रचतुष्टयप्रतिव(ब)द्धगृहद्रम्माश्च॥ तथैतद्विषयान्तष्पाति(न्तःपाति) लघुअडणिकान्तर्व्वर्तिमानिक्षेत्रं। यस्य चा-

१२८ घाटनानि॥ पूर्व्वतो वारसौन्दक्षेत्रं। दक्षिणतो जम्वू(म्बू)-वटीक्षेत्रं। पश्चिमः खण्डिवलीग्रामः। उत्तरतः ख-

१२९ ण्डिवलीग्राम एव तथा पूर्व्वभुक्तिश्च॥ तथैतत्क्षेत्रप्रतिव(ब)द्ध-मधुकक्षेत्रं। यस्य चाघाटनानि। पूर्व्वतः श्चो(चो)लि-

---

२९ 'ऐशानीं दिशमारभ्याग्नेयीं दिशं यावत्' असें वाचावें.

१३० क्षेत्रं । दक्षिणतो वेन्दरीकच्छः । पश्चिमतो वेन्दरीकच्छ एव । उत्तरतो लघुवाहलिका ।। तथैतद्ग्रामान(न्त)–

१३१ र्व्वत्तिउत्तेश्रवाक्षेत्रं । यस्य चाघाटनानि । पूर्व्वतः ष्टेंभं । दक्षिणतो गोमार्ग्गः । पश्चिमतो गोमार्ग्गः ।

१३२ उत्तरतो व(ब)न्धः ।। एवं क्षेत्रत्रयसिद्धायात्पंचाशद्द्रम्मा यत्रांकतोपि द्र ५० तथैतद्ग्राममध्ये गृहैकं

१३३ च ।। तथैतद्विषयान्तष्पाति(न्तःपाति)खानुवडाग्रामान्तर्व्वर्त्तिकुसुम्भोलिक्षेत्रं । यस्य चाघाटनानि ।

१३४ पूर्व्वतो मधुवृक्षः । दक्षिणतो राजकीयकुसुंभोलिक्षत्रं । पश्चिमतः क्षारनदी खज्जनं । उत्तरतो

१३५ वटवृक्षस्तथा पूर्व्वभुक्तिश्च ।। तथाऽत्रत्यीयपिंपलवायक्षेत्रं । यस्य चाघाटनानि । पूर्व्वतो वटवृक्षः । दक्षि–

चौथा पत्रा : दुसरी बाजू

१३६ णतः कुसुम्भोलिक्षेत्रं । पश्चिमतो राजकीयकुसुम्भोलिक्षेत्रं । उत्तरतः पूर्वभुक्तिपानीयप्रपातस्तथा डोंग–

१३७ रिका च ।। तथाऽत्रत्यीयचणेवटीक्षेत्रं । यस्य चाघाटनानि । पूर्व्वतो गोमार्ग्गः दक्षिणतो गोमार्ग्ग एव ।

१३८ पश्चिमतः क्षारनदी खज्जनं । उत्तरतः कुसुम्भोलिक्षेत्रं । तथैतत्क्षेत्रप्रतिव(ब)द्धोक्कासश्च । यस्य चाघाटनानि ।

१३९ पूर्व्वतः आगरवेढीक्षेत्रं । दक्षिणतः अर्द्धपादक्षेत्रं तथा चरिका च । पश्चिमतः(त)स्तटाकपाली । उत्तरतस्तलावटीक्षे–

१४० त्रं ।। एवं क्षेत्रचतुष्टयसिद्धायादशीतिद्रम्मा यत्रांकतोपि द्र ८० [।*] तथैतद्ग्राममध्ये गृहत्रयं च ।। छ । छ ।।

१४१ तथा करहाटविनिर्ग्गताय कास्य(श्य)पगोत्राय व(ब)ह्वृचशाखिने व्रा(ब्रा)ह्मणनागदेवैयाय व्रा(ब्रा)ह्मणरिसियपैयसुताय सू(शू)-

१४२ र्प्पारकषट्षष्ठी(ष्टि)विषयान्तष्पाति(न्तःपाति)पेढालग्रामान्त-र्व्वन्ति(र्त्ति)थापडक्षेत्रद्वयं तथा सालियपक्षेत्रद्वयमुभयं क्षेत्रच-

१४३ तुष्ठ(ष्ट)यं। यस्य चाघाटनानि। पूर्व्वतो भम्व(म्ब)नीवाह-क्षेत्रं। दक्षिणतस्तृनी(ती)यराजकीयथापडक्षेत्रं। पश्चिमतः स्त-

१४४ डागपाली। उत्तरतो देइयलाक्षेत्रं॥ तथैतद्ग्रामान्तर्व्वर्त्ति जलूवोण्ढाक्षेत्रं। यस्य चाघाटनानि। पूर्व्वतः स्त-

१४५ खालासत्कवावकः। दक्षिणतः(त)स्तडागिका। पश्चिमतः को-ञ्चोरोण्ढाक्षेत्रं। उत्तरतः खानूक्षेत्रं। एवं क्षेत्रपंचक-

१४६ सिद्धायाद्द्रम्माणां शतमेकं यत्रा(त्रां)कतोपि द्र १०० [।*] तथैतत्क्षेत्रपंचकप्रतिव(ब)द्धगृहद्रम्माश्च ॥छ॥ तथा कर-

१४७ हाटविनिर्ग्गताय जामदग्निवत्सगोत्राय व(ब)ह्वृचशाखिने व्रा(ब्रा)ह्मणगोविन्दैयाय व्रा(ब्रा)ह्मणमहीधैयसुताय सू-(शू)र्प्पारक-

१४८ षष्ठ(ट्ष)ष्ठी(ष्टि)विषयान्तष्पाति(न्तःपाति)पेढालग्रामा-न्तर्व्वन्ति(र्त्ति)देइयलाक्षेत्रं। यस्य चाघाटनानि। पूर्व्वतो राजकीयदेइयलाक्षेत्रं। दक्षिणतः

१४९ सालियपक्षेत्रं। पश्चिमतो देइयलाक्षेत्रसत्कोक्कासः॥ उत्तरतः खोज्जवादलक्षेत्रं॥ तथैतद्ग्रामान्तर्व्वर्त्तिक-

१५० [व]डोच्छिक्षेत्रं तथा कणीक्षेत्रं च। ययोश्चाघाटनानि। पूर्व्वतः पर्व्वतिकासत्कदन्तच्छिदः। दक्षिणतो राजमार्ग्गः

१५१ । पश्चिमतो डोंगरिका । उत्तरतस्तडागिका ॥ एवं क्षेत्रत्रय-
सिद्धायाद्द्रम्माणां शतमेकं । यत्रांकतोपि द्र १००

१५२ तथैतक्षे(त्क्षे)त्रत्रयप्रतिव(ब)द्धगृहद्रम्माश्च ॥छ॥ तथा पुरि-
विनिर्गताय[30] भारद्वाजगोत्राय गोभिलिशाखिने व्रा(ब्रा)-

१५३ ह्मणनन्नपैयाय व्रा(ब्रा)ह्मणमधुवलैयसुताय सू(शू)-
र्प्पारकषष्ठ(ट्ष)ष्ठी(ष्टि)विषयान्तष्पाति[31]पेढालग्रामान्तर्व्वर्त्ति
खानूक्षेत्र-

१५४ द्वयं । यस्य चाघाटनानि । पूर्व्वतो गोमार्ग्गः । दक्षिणतो जलू-
वोंढाक्षेत्रं तथा कोंचौरोण्ढाक्षेत्रं च । पश्चिमतः[32]

१५५ स्तडागं । उत्तरतो राजकीयोक्कासः ॥ एवं क्षेत्रद्वयं(य)-
सिद्धायाद्द्रम्माणां शतैकं । यत्रांकतोपि द्र १०० त-

१५६ थैतत्क्षेत्रद्वयप्र[ति]व(ब)द्धगृहद्रम्माश्च ॥छ॥ तथा करहाट-
विनिर्गताय कास्य(श्य)पगोत्राय व(ब)ह्वृचशाखिने
व्रा(ब्रा)-

१५७ ह्मणलोकपैयाय व्रा(ब्रा)ह्मणवावणैयसुताय सू(शू)र्प्पारकषष्ठ-
(ट्ष)ष्ठी(ष्टि)विषयान्तष्पाति[33]पेढालग्रामान्तर्व्वर्त्तिमाञ्जिल-

१५८ वावाक्षेत्रं । यस्य चाघाटनानि । पूर्व्वतो जोगेश्वरभट्टसत्क-
वावकः । दक्षिणतः कदम्व(म्ब)वृक्षः पश्चि-

१५९ मतो जोगेश्वरभट्ट[स*]त्कवावकः । उत्तरतो मधुवृक्षः ॥
तथैतत्क्षेत्रप्रतिव(ब)द्धप्रदेसै(शै)कः ।

---

३०. 'पुरीविनिर्गताय' असें वाचावें.

३१. '-यान्तःपाति' असें वाचावें.

३२. हा विसर्ग गाळावा.

३३. '-न्तःपाति' असें वाचावें.

१६० यस्य चाघाटनानि । पूर्व्वतो जोगेश्वरभट्टसत्कवावकः । दक्षिणतो व्र(ब्र)ह्मत्रा(दा)यक्षेत्रं । पश्चिमतो

पांचवा पत्रा

१६१ ओढं[भृ]कः । उत्तरतश्चिंचावृक्षः ॥ तथैतद्ग्रामान्तर्व्वर्त्ति आधवाइलाक्षेत्रं । यस्य चाघाटनानि । पूर्व्व-

१६२ तो व्र(ब्र)ह्मवा(दा)यं क्षेत्रं । दक्षिणतः पर्व्वतः । पश्चिमतः पर्व्वत एव । उत्तरतः (त)श्चणेवेढीक्षेत्रं ॥ तथैत-

१६३ द्विषयान्तःपाति[३४]वीरारग्रामप्रतिव(ब)द्धउप्पलपल्लिकान्तर्व्वर्त्ति-कच्छक्षेत्रं । यस्य चाघाटनानि । पूर्व्वतो रा-

१६४ जकीयतखण्डकच्छक्षेत्रं । दक्षिणतो नात्युन्नतवरलीसत्कपानीय-प्रपातः । पश्चिमतो मधुवृक्षः । उ-

१६५ त्तरतः पर्व्वतसत्कपानीयपातः । एवं क्षेत्रत्रयसिद्धायाद्द्रम्माणां शतैकं । यत्रांकतोपि द्र १०० [।*] तथैतत्क्षे-

१६६ त्रत्रयप्रतिव(ब)द्धगृहद्रम्माश्च ॥ छ ॥ एवं चतुराघाटनोपलक्षिता ग्रामास्तथा वावकाश्च सवृक्षमालाकुलाः

१६७ स्वसीमापर्यन्ताः सतृणकाष्ठोदकोपेताः पूर्व्वप्रदत्तदेवदायव्र(ब्र)-ह्मदायवर्ज्जा अचाटभटप्रवेस्या(श्या) अनादेस्या(श्या) अ-

१६८ नासेध्या[:*] प्राग्लिखितक्रमेण समुत्पद्यमानद्रव्योत्पत्ति-संयुक्तास्तथा लिखिल(त)वावैलकदांउपैयसत्कल-

१६९ घुअडणिका तथा खानुवंडा उभयं ग्रामद्वयीयक्षेत्राणां सत्कशुल्क-मुक्तिवर्ज्जं श्रीस्थानके समायातसिद्धायप-

---

३४ 'न्तःपाति-' असें वाचावें.

१७० लाण्डगृहद्रम्मादिपदकीयकलिवनमानेन तंदुलकुं[35]सैकादशसत्क-
शुकमुक्ति[36]सहिता उदकातिसर्ग्गे-
१७१ ण नमस्यवृत्या परमया भक्त्या प्रतिपादिता: ।। तदेतेषां
सान्वयव(ब)न्धूनामपि भुंजतां भोजयतां कृषतां क-
१७२ र्ष[य]तां वा न केनापि परिपंथना करणीया ।। यत उक्तमेव
पुरातनमहामुनिभि: । व(ब)हुभिर्व्वसुधा भु-
१७३ क्ता राजभि: सगरादिभि: । यस्य यस्य यदा भूमिस्तस्य तस्य
तदा फलं(लम्)[37] ।। [२९ ।। *] सद्योदानं निरायासं साया-
१७४ सं दीर्घपालनं(नम्) । अत एवर्षय: प्राहुर्द्दानाच्छ्रेयोनुपालनं-
(नम्) ।। [३० ।। *] दत्वा(त्वा) भूमिं भाविन:
पार्त्थिवेन्द्रान्भूयो भूयो
१७५ याचते रामभद्र: । सामान्योयं धर्म्मसेतुर्न्नृपाणां काले काले
पालनीयो भवद्भि:[38] ।। [६१ ।।] इति मुनिवचनान्य-
१७६ वधार्य समागामिभिर्भूपालैरस्मद्वंशजैरन्यैर्व्वा पालनधर्म्मफल-
लोभ एव करणीय: । न पुन[:*] स्वलोप-
१७७ नपापकलंकाग्रेसरेण केनापि भवितव्यं(व्यम्) ।। यस्त्वेवम-
भ्यर्हितोपि लोभादज्ञानतिमिरपटलावृतमति-
१७८ राच्छिद्या(न्द्या)दाच्छिद्या(द्य)मानमनुमोदेते(त) वा स
पञ्चभिर्म्महापातकैरुपपांतकैश्च लिप्तो रौरवमहारौरवां-
१७९ धतामिश्रा(स्रा)दिनरकांश्चिरमनुत्त(भ)विष्यति ।। तथा
चोक्तं भगवता व्यासेन । स्वदत्तां परदत्ताम्वा (त्तां वा) यो ह-

---

३५ 'तण्डुल-' असें वाचावें.
३६ 'शुल्क-' असें वाचावें.
३७ श्लोक २९ व ३० याचें वृत्त अनुष्टुम्.
३८ वृत्त-शालिनी.

१८० रेत वसुन्त(न्ध)रां(राम्) । स विष्ठायां कृमिर्भूत्वा कृमिभिः सह पच्यत[39] (पच्यते ॥३२॥) इत्या(त्य)पि । भूयोभ्यर्थना । मद्व(द्वं)शजाः पर–

१८१ महीपतिवंशजा वा पापाद[पे]तमनसो भुवि भाविभूपाः । ये पालयंति धर्म्ममिम(मं) समग्र(ग्रं) तेषां मया विर–

१८२ चितोंजलिरेष मूर्द्ध्नि[40] ॥ [३३ ॥*] छ ॥ यथा चैतदेवं तथा शासनदाता लेखकहस्तेन स्वमतमारोपयति । य–

१८३ था मतं मम ।[41] महामण्डलेश्वरश्रीमन्मुम्मुणिराजदेवस्य ।[41] महामण्डलेश्वरश्रीमद्वज्जडदेवराज–

१८४ सूनोर्यदत्र शासने लिखितं(तम्) ॥ लिखित(तं) चैतन्मया श्रीमद्राजानुज्ञया भाण्डागारसेनप्रधान–

१८५ श्रीजोउपैयेन भाण्डागारसेनमहाकविश्रीनागलैयभ्रातृसूनुमा(ना) [।*] यदत्रोनाक्षरमधिकाक्षर–

१८६ म्वा(रं वा) तत्सर्व्वं प्रमाणमिति ॥ छ ॥ छ॥ श्रीर्भवतु स्व(स्वा)मिनः ॥ छ ॥ शिवमस्तु ॥ छ ॥

---

३९. वृत्त–अनुष्टुभ्

४०. वृत्त–वसन्ततिलका.

४१. हा दण्ड अनावश्यक आहे.

१४. यादवनृपति कृष्णदेव याचा नांदगांव शिलालेख : शक संवत् ११७७*

उपलब्धि—हा शिलालेख प्रथम कै. रा. ब. डॉ. हीरालाल यांनी प्रकाशांत आणला. 'मध्यप्रांत व वऱ्हाड यांतील लेखांची यादी' या त्यांच्या पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तींत या लेखाचा अंतर्भाव केला आहे. पण त्याची माहिती त्यांनी अत्यंत संक्षेपाने दिली आहे. कांही वर्षांपूर्वी भारत सरकारचे लेखशास्त्रज्ञ डॉ. छाबडा यांनी या लेखाचा छाप घेऊन मजकडे वाचनार्थ पाठविला. यादव घराण्याविषयीं महाराष्ट्रास जिव्हाळा वाटत असल्यामुळे त्यावरील टिप्पण मी भारत इतिहास संशोधक मंडळाच्या वार्षिक संमेलनाच्या प्रसंगीं, (संमेलन ३४, शके १८६९, सन १९४७मध्ये) वाचलें. यानंतर डॉ. मो. ग. दीक्षित यांनी या लेखाचें संपादन मराठी संशोधन पत्रिकेंत (वर्ष ६, अंक ४, पृ. ९–१२) केलें आहे. त्यांच्या पाठांचें परीक्षण तळटीपांत केलें आहे.

नांदगांव हें खेडें वऱ्हाडांत अमरावतीच्या ईशान्येस २० मैलांवर वसलें आहे. गावाबाहेर एका टेकडीवर खंडेश्वर, देवी व नरसिंह या तीन देवतांचें मिळून एक समान सभामंडप असलेलें देवालय आहे. या देवालयाच्या बाहेरच्या भिंतीवर प्रस्तुत लेख कोरला आहे. अमरावती जिल्हा गॅझेटीयरमध्ये या देवळाचें संक्षिप्त वर्णन दिलें आहे. हें देऊळ हेमाडपंती आहे असें म्हणतात. म्हणजे रामदेवराव यादव नृपतीचा प्रधान हेमाद्रि किंवा हेमाडपंत याने प्रचलित केलेल्या शिल्पपद्धतीचें तें आहे, अशी लोकांची समजूत आहे. पण गॅझेटियरमधील लेखकाच्या मतें तें फार तर दोनशें वर्षांचें जुनें असावें. या प्रश्नाचा पुढे विचार करूं.

---

* ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड २ (भा. इ. सं. मं. त्रै., पृ. ८–११)

प्रस्तुत लेख सहा ओळींचा असून त्याने २ फूट ५ इंच रुंद व ९ इंच उंच इतकी जागा व्यापिली आहे. ज्या दगडावर हा लेख कोरला आहे तो प्रथम गुळगुळीत केला नव्हता. शिवाय आज कित्येक शतकें उन्हापावसांत असल्यामुळे तो बराच खराब झाला आहे. कांही अक्षरें निश्चितपणें वाचतां येत नाहीत. तथापि एकंदरींत लेखांतील मजकुरांविषयीं संशय राहत नाही.

लेखाच्या आरंभींचा भाग संस्कृतांत असून नंतरचा मराठींत आहे. भाषेच्या बाबतींत लक्षांत ठेवावयाची गोष्ट म्हणजे 'ख' बद्दल 'ष' चा उपयोग केला आहे. उदाहरणार्थ लाषोलीए (लाखोलीए) पहा. ही पद्धत यादवकालीन इतर लेखांतहि आढळते रामटेकचा रामदेवराव यादवाच्या काळचा शिलालेख (सरदेसाई स्मारकग्रंथ, पृ. ११५–१३४) पहा. 'वडवा' या शब्दाचा उपयोगहि ध्यानांत घेण्यासारखा आहे. सध्या वडवा याचा अर्थ 'देवळांतील पुजारी' असा आहे. पण यादवकालीं त्याला यापेक्षा व्यापक अर्थ असे. पुरुषोत्तमपुरी येथे सापडलेल्या रामदेवरावाच्या काळच्या ताम्रपटांत 'फुलवडुए' हा शब्द राजाचा 'पुष्परचनाध्यक्ष' या अर्थीं आला आहे. हा शब्द महानुभावांच्या 'शिशुपालवध' या ग्रंथांतहि आढळतो.

प्रस्तुत लेख श्रीमत्प्रौढप्रतापचक्रवर्ती **श्रीकान्हिरदेव** याच्या काळचा आहे. या राजाच्या वंशाचा यांत निर्देश नाही. तथापि 'प्रौढप्रतापचक्रवर्ती' हें बिरुद प्राचीनकाळीं यादववंशी राजांनीच धारण केलें होतें. तेव्हा हा लेख **देवगिरीच्या कृष्णदेवराव यादवाच्या** काळचा आहे यांत शंका नाही. कान्हिर हे 'कृष्ण' या संस्कृत नांवाचें अपभ्रष्ट रूप आहे. या नांवाचे कान्हर, कान्ह, कन्धार असे इतरहि अपभ्रंश कोरीव लेखांत येतात. प्रस्तुत लेख शक ११७७ आनंद संवत्सरीं कोरला होता. या लेखांत महिना, तिथि, वार किंवा नक्षत्र दिलें नसल्यामुळे या कालाचा पडताळा पाहणें शक्य नाही. तथापि वर्तमान शक ११७७ ला आनंद संवत्सर येतो. यावरून या लेखाच्या प्रमाणतेविषयी संशय राहत नाही. सामान्यतः कोरीव लेखांत शकवर्ष गत व संवत्सर वर्तमान असतात. प्रस्तुत लेखांत दोन्ही वर्तमान आहेत, हें विशेष आहे. या शकवर्षी ख्रिस्ती शकाचें वर्ष १२५४–५५ हें येतें. यावरून हा लेख सातशें वर्षांहून जास्त पूर्वीचा आहे हें दिसून येईल.

सन १२५४–५५ हें वर्ष कृष्णदेव यादवाच्या कारकीर्दींत पडतें. कोरीव लेखांवरून या राजानें इ. स. १२४७ पासून १२६० पर्यंत राज्य केलें असें आता निश्चित झालें आहे. या राजाचा दुसरा एक लेख चांदा जिल्ह्यांतील मार्कंडी या गावीं आहे व तो डॉ. यशवंत खुशाल देशपांडे यांनी मंडळाच्या त्रैमासिकांत छापला आहे. यादव राजे हे मूळचे देवगिरीचे. तथापि त्यांनी कृष्णदेवाचा आजा **सिंघण** याच्या कारकीर्दींतच वऱ्हाड जिंकून आपल्या राज्याला जोडला होता. बुल्ढाणा जिल्ह्यांतील अंबडापूर येथे सिंघणाच्या काळचा एक शिलालेख आहे. तो मी एपिग्राफिया इंडिका (पुस्तक २१, पृ. १२७–२८) मध्ये छापला आहे. सिंघणाचा सेनापति **खोलेश्वर** हा आपल्या आंबेगांवच्या शिलालेखांत वरदा (वर्धा) व पयोष्णी पूर्णा या नद्यांच्या तीरावर अग्रहार दिल्याचें व देवळें बांधल्याचें सांगतो. मागें उल्लेखिलेल्या पुरुषोत्तमपुरी ताम्रपटांत कृष्णदेवानें कोसल देशाच्या (म्हणजे सध्याच्या छत्तीसगडच्या) राजास त्रस्त केल्याचें वर्णन आहे. तेव्हा कृष्णाच्या काळचे लेख विदर्भाच्या उमरावती व चांदा जिल्ह्यांत सापडले तर त्यांत आश्चर्य नाही.

या लेखाचा उद्देश कांही लोकांनी खंडेश्वराच्या देवळांत लाखोली किंवा लक्ष फुलें देवाला वाहाण्याकरितां गद्याण नामक नाणीं दिलीं हें नमूद करण्याचा आहे. यांत नऊ लोकांचीं नांवें आलीं आहेत. पैकी पहिल्या आठ जणांनी एका लाखोलीकरितां व नवव्यानें दोन लाखोलींकरितां व्यवस्था केली होती.

गद्याण किंवा गदियाण हें लहानसें सोन्याचें नाणें महाराष्ट्रांत प्रचलित होतें. शक ९३० च्या **खारेपाटण**च्या लेखांत परदेशाहून येणाऱ्या प्रत्येक जहाजावर एक सुवर्ण गद्याण शुल्क किंवा कस्टम्स ड्यूटी म्हणून शिलाहरवंशी **रट्ट** राजानें **शैव** आचार्यांस दान दिल्याचा उल्लेख आहे. किट्टेल साहेबास कर्नाटकांत बेल्लारी व म्हैसूर येथें एक फार्दिंगच्या वजनाचीं सोन्याचीं नाणीं प्रचलित असलेलीं दिसलीं. तीं येथे विवक्षित असावीं. भास्कराचार्यांच्या लीलावतींत गद्यानकाचें वजन पुढीलप्रमाणे दिलें आहे.

तुल्या यवाभ्यां कथितात्र गुञ्जा वल्लस्त्रिगुञ्जो धरणञ्च तेऽष्टौ।
गद्यानकस्तद्द्वयमिन्द्रतुल्यैर्वल्लैस्तथैको धटकः प्रदिष्टः॥

यावरून गद्याणक हें ४८ गुंजा वजनाचें किंवा अधेलीच्या वजनाचें सोन्याचें नाणें होतें हें दिसून येईल.

प्राचीन काळीं देवतांच्या पूजेनिमित्त अशी व्यवस्था करण्याची पद्धत होती. पंढरपूरच्या चौऱ्यायशीच्या लेखांत अशा प्रकारें फुलें, तुळशी वगैरे करितां गद्याण दिल्याचा उल्लेख आहे. हे पैसे कोणा स्थानिक पेढीवर ठेवून त्याच्या व्याजांतून फुलादिकांची व्यवस्था केली जात असे, असें चौऱ्यायशीच्या लेखांवरून दिसतें.

प्रस्तुत लेखावरून नांदगावचें देवालय यादवकालीन आहे हें दिसून येईल. तें हेमाडपंती पद्धतीचें आहे. या शिल्पपद्धतींत मोठमोठ्या दगडांचा उपयोग चुन्याशिवाय केलेला असतो. हेमाद्रिपंडिताने लंकेहून ही शिल्पपद्धति व मोडी लिपी आणिली अशी आख्यायिका आहे. तथापि प्रस्तुत लेखावरून ती शिल्पपद्धति हेमाद्रीने प्रथम प्रचलित केली असें दिसत नाही. कारण तो कृष्णदेवाचा बंधु महादेव याच्या काळीं उदयास आला. तो महादेव व रामदेवराव यांचा प्रधानमंत्री होता. त्याच्या अगोदरच ही शिल्पपद्धति प्रचलित होती असें दिसून येईल.

वाचन[१]

१ ओं स्वस्ति [।*] श्री सकु ११७७ आनंदसंवत्सरे[२] अद्येह श्रीमत्प्रौढप्रतापचक्रवर्तिश्रीका–

२ न्हिरदेवविजयराज्ये तत्पादपद्मोपजीवी समस्तभरभारनिरूपितश्रीपांचो–

---

१. डॉ. छाबडा यांनी पाठविलेल्या छापावरून.

२. 'द 'वरचें अनुस्वारासारखें वर्तुळ शिळेच्या दोषामुळे उत्पन्न झालें असावें. तसेंच वर्तुळ 'आ 'वरहि दिसतें.

३ लिनि[3]. .षु तंनि(तन्नि)रूपिवित्त[4] द्रवीडी वडवो श्रीसोमदेव-
दत्तलाषौलिए १ ।। वडउपं[5]-

४ डितें दत्त लाषौ[ए] ग १ [।*] दे[सै] नायकें दत्त लाषौए ग १
[।*] आसुगिनायकें[6] दत्त लाषौलिए ग १ [।*] ढों-

५ ढिएं[7] दत्त लाषौलिए ग १ [।*] भोपतिनायकें दत्त लाषौए ग १
[।*] धनैएं दत्त लाषौलिए ग १ [।*]

६ नागैएं [द]त्त लाषौए ग १ [।*] प्रति[श्री[8]]ठाकुरें दत्त
लाषौलिए ग १ [।*] ढो[ढ[9]]डदाउ दत्त द्विलाषौ[एं] [।*]

---

३. यानंतरचीं दोन अक्षरें अस्पष्ट झालीं आहेत. दीक्षित 'निबधेषु' असें सुचवितात; पण त्याचा कांही अर्थ होत नाही.

४. 'तन्निरूपित' वाचावें. दीक्षित 'तंनिरूपि वितहवाडी वडवो' असें वाचतात. पण 'वा'वरची वेलांटी छापांत स्पष्ट आहे. तेव्हा 'वाडी' असें वाचन संभवत नाही.

५. दीक्षित येथे 'धनंजयपंडितें' असें वाचतात. पण छापावरून 'धनंजय' पैकी शेवटचीं दोन अक्षरें संभवत नाहीत.

६. दीक्षित येथे 'असुगि-' असें वाचतात, पण त्यांतील पहिलें अक्षर 'आनंद' (ओ. १) मधील 'आ'सारखें आहे.

७. 'ढोंढिएं' मधील मधल्या अक्षराची 'इ' ऱ्हस्व आहे म्हणून दीक्षितांचें वाचन 'ढोढीएं' बरोबर नाही.

८. दीक्षित—'प्रतिआ'. शेवटल्या अक्षरावरची वेलांटी अस्पष्ट आहे. एरव्ही तें अक्षर 'श्री' (ओ. ३) सारखें आहे.

९. हें अक्षर अस्पष्ट आहे. दीक्षित 'ढो[ह]ड' असें वाचतात.

१५. यादवनृपति रामचंद्रदेव याचा पुरुषोत्तमपुरी ताम्रपट : शके १२१२

या ताम्रपटाची माहिती सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी माझे मित्र, त्या वेळीं हैदराबाद येथील ओस्मानिया कॉलेजांत मराठीचे प्राध्यापक असलेले, श्री. र. म. भुसारी यांनी मला दिली. त्यानंतर माझ्या विनंतीवरून हैदराबाद संस्थानांतील पुरातत्त्वखात्याचे संचालक श्री. गुलाम यज्दानी यांनी तो ताम्रपट मिळवून माझ्याकडे पाठविला. भारत सरकारचे लेखशास्त्रज्ञ डॉ. न. प्र. चक्रवर्ती यांनी त्याचे छाप पुरविले. या साधनांवरून मी हा ताम्रपट एपिग्राफिया इंडिका, (पु. २५, पृ. १९९–२२५) मध्ये छाप व इंग्रजी भाषांतरासहित प्रकाशित केला. महाराष्ट्राच्या इतिहासाकरितां याचें अत्यंत महत्त्व असल्यामुळे तो येथे मराठींत प्रसिद्ध करीत आहे.

वर्णन—हा ताम्रपट मराठवाड्याच्या बीड जिल्ह्यांतील परभणी गावाच्या पश्चिमेस सुमारें ४० मैलांवर गोदावरीच्या तीरावर असलेल्या पुरुषोत्तमपुरी या गावीं एका गोसाव्याजवळ होता. याचे तीन पत्रे असून ते फार वजनदार आहेत. त्यांचा आकार–रुंदी १ फू. २½ इं., उंची १ फू. ८ इं. आणि जाडी ⅜ इं.—असा असून वजन जवळ जवळ पावणे चौदा शेर आहे. या राजाचा पैठण ताम्रपटहि असाच वजनदार होता.[१] या पत्र्यांच्या शिरावर १½ इं. व्यासाचें छिद्र कडीकरितां केलें आहे. पण कडी किंवा तिच्यावरील मुद्राहि सापडली नाही. पहिल्या व तिसऱ्या पत्र्यांच्या आंतील बाजूवर आणि मधल्या पत्र्याच्या दोन्ही बाजूंवर लेख कोरला आहे. तो सुस्थितींत असून त्याच्या एकूण १४१ ओळी आहेत. त्यांपैकी पहिल्या पत्र्यावर आणि दुसऱ्या पत्र्याच्या पहिल्या बाजूवर प्रत्येकीं ३४, दुसऱ्या पत्र्याच्या दुसऱ्या बाजूवर ३८ आणि तिसऱ्या पत्र्यावर ३५ ओळी आहेत.

१. इं. अँ., पु. १४, पृ. ३१४ इ.

लेख उत्तम रीतीने लिहिला व कोरला आहे. ५१ व्या ओळींत दोन अक्षरें जास्त लिहिलीं व कोरलीं होतीं त्यांच्यावर दोन उभ्या रेषा काढून तीं बाद केलीं आहेत.

अक्षरवटिका—प्रस्तुत लेख नागरी लिपींत लिहिला आहे. लेखन-पद्धतीचे खालील विशेष उल्लेखनीय आहेत—व्यंजनानंतरचा उकार उभ्या रेषेच्या खाली न लावतां उजव्या बाजूस लावला आहे. उ. विष्णु (ओ. ८१) पाहा. अनेक ठिकाणीं पृष्ठमात्रांचा उपयोग केला आहे. ' ङ ' या अक्षराचें टिंब फक्त कांही ठिकाणींच दिसतें. उ. शाङ्र्ग–(ओ. २–३ आणि ३०) पाहा. ' ध ' अक्षराचा डावा भाग आता पूर्ण झाला आहे. म्हणून धा व वा यांचा घोटाळा होण्याचा संभव नव्हता तरी पूर्वीप्रमाणे ' धा ' अक्षराच्या उभ्या रेषा एका आडव्या रेषेने जोडल्या आहेत.

भाषा—भाषा संस्कृत असून लेखाचा कांही भाग गद्यांत व कांही पद्यांत लिहिला आहे. वंशवर्णनपर भागांतील एक श्लोक (क्र. ४) पूर्णपणें आणि दुसरा (क्र. १३) अंशतः पैठण ताम्रपटांत आला आहे. सर्व लेख सुंदर भाषेंत लिहिला असून कांही ठिकाणीं श्लेषाचा उपयोग मनोरंजक रीतीने केला आहे.

लेखनाचे खालील विशेष उल्लेखनीय आहेत कांही ठिकाणीं ' ष 'बद्दल ' ख ' आणि क्वचित् ' ख ' बद्दल ' ष ' चा उपयोग केला आहे. व आणि ब यांमध्ये भेद केला आहे. क्वचित् ' श ' आणि ' स ' यांचा घोटाळा झाला आहे. कांही ठिकाणीं शेवटच्या ' न् ' पूर्वी अनावश्यक अनुस्वार आला आहे. उ. उल्लासयंन्, ओ. १२ पाहा.

विषय—प्रस्तुत ताम्रपटाचा उद्देश यादववंशी राजा रामचंद्र याने आपला प्रधान महामांडलिक पुरुषै नायक किंवा पुरुषोत्तम यास अग्रहार करण्याकरितां कांही गावें दिलीं आणि पुरुषोत्तमाने त्यांचा आपल्या नांवें **पुरुषोत्तमपुरी** नामक अग्रहार करून तो कांही ब्राह्मणास दान दिला हें नमूद करण्याचा होता. या अग्रहारांत **पोखरी, अडगौ, वाघौरे** आणि **कुरुणपारगौ** अशीं चार गावें अन्तर्भूत होतीं. तीं **कान्हैरी** ' देशा 'च्या कान्हैरी नामक

' खंपणकां 'तील होती. त्यांपैकी पहिल्या तीन गावांच्या बरोबर त्यांच्या खालील वाड्याहि दिल्या होत्या—**साएगाह्वाण, पिंपळगाह्वाण, पालिपोखरी, पिंपळवाडी, काजलकोवि, सोइजणे, सींपविहिरे, गोलेगाह्वाण** आणि **धारवाघौरे**. या अग्रहाराच्या चतुःसीमा येणेप्रमाणें होत्या—पूर्वेस **दांडिगौ** आणि **सादुले**, दक्षिणेस **केशवपुरी, सावरिगवा** आणि **हरिकिनिबगौ**, पश्चिमेस **राजगौ, हिवरे, चिञ्चवली** आणि **द्रुगलेगाह्वाणसहित महादेवपुरी** आणि उत्तरेस **गंगा** (म्हणजे गोदावरी नदी). या गावांतील जमिनीचे ८६ भाग करून त्यांतील दोन देवांकरितां, एक **अग्निष्टिका**[२] आणि **प्रपा**[३] यांच्याकरितां आणि बाकीचे ८३ भाग ८३ ब्राह्मणांस प्रत्येकीं एक एक असे दिले होते. या ब्राह्मणांची व त्यांच्या पित्यांचीं नांवें तसेंच त्यांच्या शाखा आणि गोत्रें ८० ते ११४ ओळींत उल्लेखिलीं आहेत. या ८३ ब्राह्मणांपैकी ५७ ब्राह्मण ऋग्वेदी, २१ कृष्ण यजुर्वेदाच्या तैत्तिरीय शाखेचे, एक काण्व व एक माध्यन्दिन असे दोन शुक्ल यजुर्वेदी, आणि राहिलेले तीन सामवेदी होते. त्यांच्या खालील गोत्रांचा निर्देश आला आहे—काश्यप,

---

२. ' वृत्ति ' म्हणजे उत्पन्नाचा भाग नसून जमिनीचा तुकडा होय हें सोमेश्वर देवाच्या चांजे लेखावरून स्पष्ट आहे. ए. इं., पु. २३, पृ. २८१ पाहा.

३. अग्निष्टिका हेमन्त व शिशिर ऋतूंत विहित असे. तींत योग्य मंत्रांनी अग्नि प्रज्वलित करणें आणि सकाळ व संध्याकाळ ब्राह्मणांस व याचकांस अन्नसंतर्पण करणें यांचा अंतर्भाव होत असे. तिचा प्रारंभ मार्गशीर्ष महिन्यांतील शुभ दिवशीं करण्यांत येई. त्या अग्नीभोवती बसून लोक राजकीय, धार्मिक आणि सामाजिक बाबींची चर्चा करीत. हेमाद्रीच्या चतुर्वर्गचिंतामणींतील दानखंड, प्र. १३ पाहा. लीळाचरित्रांत देवगिरीपासून जवळच पिंपळगांव येथे चाललेल्या अग्निष्टिकेस महानुभावपंथसंस्थापक चक्रधर उपस्थित होते, असें म्हटलें आहे.

३. प्रपा म्हणजे उन्हाळ्यांत तृषित जनांकरिता चालविलेली पाणपोई.

भारद्वाज, जामदग्न्य–वत्स, वसिष्ठ, विष्णुवृद्ध, कौशिक, अगस्त्य, विश्वामित्र, कौंडिन्य, हारित, प्रथम आत्रेय, विष्णुवृद्ध–आंगिरस, वाध्र्यश्व, गौतम, नैध्रुव, देवरात, आत्रेय, वत्स, कपि, गार्ग्य, पूतिमाष, श्रीवत्स आणि लोहित. रामचंद्र नृपतीच्या पैठण ताम्रपटांत ब्राह्मणांच्या कांही उपनामांचा उल्लेख येतो. तशीं फक्त चार उपनामें प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलीं आहेत आणि त्यांतहि **मिश्र**, **दुबे** आणि **त्रिवेदी** हीं उत्तर भारतीय ब्राह्मणांचीं आहेत हें उल्लेखनीय आहे.

प्रस्तुत ताम्रपटांत दोन मित्यांचा उल्लेख आहे. त्या दोन्ही शकसंवताच्या असून त्यांचा निर्देश 'शकनृपकालातीतसंवत्सर' (शकनृपतीचें गत संवत्सर) असा आला आहे. त्याच्याशीं शालिवाहनाचें नांव संबद्ध झालें नाही. हाच प्रकार यादवांच्या इतर ताम्रपटांतील मित्यांच्या बाबतींत आढळतो. याला अपवाद एकच—कृष्णनृपतीचा तासगांव ताम्रपट.[४] शालिवाहनाचें नांव शकसंवताशीं विजयनगरच्या प्रथम बुक्कराय राजाच्या कारकीर्दींत संबद्ध झालें असें कोरीव लेखांच्या पुराव्यावरून म्हणतां येतें.

कालनिर्णय—उपरिनिर्दिष्ट दोन मित्यांपैकी पहिली शक संवत् १२३२, साधारण संवत्सर, भाद्रपद शुक्ल एकादशी, शनिवार ही होय. या तिथीस रामचंद्राने वरील चार गावें पुरुषोत्तम प्रधानास दिलीं होतीं. ही तिथि बरोबर जुळते. गत शकवर्ष १२३२ मध्ये वरील तिथि मध्यम मानानें सूर्योदयापासून ११ तास होती. दाक्षिणात्य पद्धतीप्रमाणे त्या संवत्सराचें नांव साधारण होतें. तसेंच त्या तिथीस वारहि शनिवारच होता. या तिथीची इंग्रजी तारीख ५ सप्टेंबर सन १३१० ही होती. दुसरी मिति शक संवत् १२३२, साधारण संवत्सर, भाद्रपद महिन्यांतील **कपिल षष्ठी** ही होय. या मितींत पक्ष व वार यांचा निर्देश नाही, पण ते 'कपिलषष्ठी' या तिथिनामांत अध्याहृत आहेत. कारण अमान्त भाद्रपदाच्या कृष्ण पक्षाच्या षष्ठीस मंगळवार येत असेल आणि त्या तिथीस नक्षत्र रोहिणी आणि योग व्यतीपात असेल तर तिला कपिलषष्ठी म्हणतात. त्या वेळीं सूर्य हस्तनक्षत्रांत असेल तर

४. ए. इं, पु. २७, पृ. २१०.

ती तिथि विशेष पुण्यकारक मानली जाते. ही दुसरी मितिहि पूर्णपणें जुळते. त्याच गत शकसंवत्सरामधील अमान्त भाद्रपद कृष्ण षष्ठी ही मंगळवारीं मध्यममानानें सूर्योदयापासून १२ तास १५ मिनिटें होती. तिची इंग्रजी तारीख १५ सप्टेंबर सन १३१० ही होय. त्या दिवशीं चंद्र रोहिणी नक्षत्रांत सूर्योदयापासून ३ तास २० मिनिटें आणि व्यतीपात योग १२ तास ४५ मिनिटें होता.[५] तेव्हा सूर्यहि हस्त नक्षत्रांत होता. कारण तो त्या नक्षत्रांत त्या दिवसापूर्वी फक्त एक आठवड्यापूर्वीच गेला होता. प्रस्तुत लेखांत म्हटलें आहे की रामचंद्र नृपतीने पुरुषोत्तमास स्वतःस अनुरूप असा अग्रहार करण्याविषयी अनेकदा सांगितलें होतें. शेवटीं उपरिनिर्दिष्ट दिनीं तिथि, वार, नक्षत्र व योग यांचा क्वचितच जमणारा मेळ होणार आहे हें पाहून त्या दिवशीं सकाळीं पुरुषोत्तम मंत्र्याने अग्रहार केला असें दिसतें.

प्रस्तुत ताम्रपटांत रामचंद्र नृपतीची वंशावळ सिंह (सिंहण) राजापासून दिली आहे. सिंह राजाने बल्लाळ, अंध्राधिप, कक्कल्ल आणि भम्भागिरीचा अधिपति यांचा पराजय केला, दुर्गांवर (किल्ल्यावर) भोजराजाला कैदेंत ठेवलें आणि अर्जुनाचा मोड केला असें यांत म्हटलें आहे. सिंहणाचे हे पराक्रम इतर ताम्रपटांत (उदाहरणार्थ पैठण तामपटांत) उल्लेखिले आहेत. बल्लाळ हा होयसळवंशी द्वितीय वीर बल्लाळ (इ. स. ११७३ ते १२४७) होय. याचा पराभव केल्यावर सिंहणाने कृष्णा आणि मलप्रभा नद्यांच्या दक्षिणेचा कांही प्रदेश आपल्या राज्यास जोडला असें दिसतें. अंध्राधिप हा काकतीय वंशी गणपति होय. याला सिंहणाचा पिता जैतुगि याने कैदेंतून मुक्त केलें होतें. कक्कल्ल हा कोणी कलचुरिवंशी त्रिपुरीचा राजा असावा असें डॉ. रामकृष्णपंत भांडारकरांनी म्हटलें होतें. पण या काळीं त्या वंशांतला तसा कोणी राजा राज्य करीत नव्हता. पण म्हैसूर प्रदेशाच्या सोराब तालुक्यांतील उद्दरी गावीं सापडलेल्या शिलालेखावरून वराट येथे राज्य करणारा काकल हा येथे विवक्षित असावा असें दिसतें. वराटनगराचा

---

५. योगगणनेकरिता स्वामिकन्नू पिल्ले यांच्या जंत्रींतील सूर्यसिद्धांताच्या कोष्टकांचा उपयोग केला आहे.

६. म्हैसूर आर्किऑलॉजिकल सर्व्हे रिपोर्ट, १९२९, पृ. १४२ इ.

अद्यापि पत्ता लागला नाही. तथापि तें म्हैसूर प्रदेशांत होतें यांत शंका नाही. भम्भागिरि[७] हें खानदेशाच्या पिंपळनेर तालुक्यांतील भामेर होय. येथे अद्यापि एक मोडकळीस आलेला किल्ला आहे. भम्भागिरीच्या अधिपतीचें नांव हेमाद्रीच्या व्रतखंडांत लक्ष्मीधर असें आलें आहे. खोलेश्वराच्या आंबे येथील शिलालेखांत (क्रमांक २) त्याला लक्ष्मीदेव म्हटलें आहे आणि तो आभीरवंशी होता अशी माहिती दिली आहे. त्या व इतर लेखांवरून सिंहणाने त्याचा समूळ उच्छेद केला असें दिसतें.

भोज हा कोल्हापूरच्या शिलाहारवंशांतील द्वितीय भोज होय. हा प्रणाल (पन्हाळा) किल्ल्यावर राहत असे असें इतर लेखांत म्हटलें आहे. याचा पराभव केल्यावर सिंहणाने त्याचें राज्य खालसा केलें. तेव्हापासून कोल्हापूर प्रदेशांत यादवांचे लेख सापडूं लागतात. त्यांतील पहिला सन १२१८ चा आहे. त्यापूर्वी भोजाचा पराभव झाला असावा.

अर्जुन हा चौलुक्यांच्या वाघेला शाखेंतील अर्जुनवर्मदेव असावा असें डॉ. फ्लीटचें मत होतें. पण डॉ. रामकृष्णपंत भांडारकरांच्या मतें तो माळव्याचा परमारवंशी अर्जुनवर्मदेव असावा. अलीकडे सांपडलेल्या उद्री (म्हैसूर प्रदेश) येथील लेखांत सिंहणाला 'अर्जुनमालवीक्षितिपतिमत्तमात्तंग-मददलनपञ्चानन '(मालव देशाचा राजा अर्जुन ह्या मत्त हत्तीचा मद नष्ट करणारा सिंह) असें म्हटलें आहे. त्यावरून डॉ. भांडारकरांचें मत खरें ठरत आहे.

सिंहणानंतर जैत्रपालाचें वर्णन आलें आहे. पण तें ठराविक ठशाचें आहे. कोरीव लेखांवरून सिंहणानंतर त्याचा नातु कृष्ण गादीवर आला असें कळतें.

कृष्णाचें वर्णन श्लोक ७ व ८ मध्ये केलें आहे. श्लोक ७ मध्ये म्हटलें आहे की कृष्णाने कामपालावर विजय प्राप्त करून गोकुलाला आनंदित केलें.

---

७. हेमाद्रीच्या व्रतखंडांत याचें नांव 'रम्भागिरि' असें दिलें आहे, पण तें चूक आहे. पैठण ताम्रपटांत आणि आंबे शिलालेखांत भम्भागिरि असेंच नांव येतें.

तासगांव ताम्रपटांतहि कृष्णाचे मांडलिक चंद्रदेव व केशव यांनी अनुक्रमें कोंकणनृपति आणि गोपकपालक यांच्यावर विजय मिळविल्याचें सूचित केलें आहे.[८] त्यावरूनहि कामपाल हा कोणी आभीरनृपति असावा असें वाटतें. पण त्याचें नांव अन्यत्र आढळत नाही. श्लोक ८ मध्ये कृष्णाचे गुर्जर, मालव, चोल व कोसल देशांच्या राजांवरचे विजय सूचित केले आहेत. हेमाद्रीच्या व्रतखंडांत कृष्णाने गुर्जरनृपति वीसलदेव याचा पराभव केला असें म्हटलें आहे. तत्कालीन मालवनृपति जैतुगिदेव (विक्रम संवत् १२९२ व १३००) हा होता. कृष्णाने चोलनृपतीवर विजय मिळविल्याचा इतरत्र निर्देश नाही. कोसलदेशचा (छत्तीसगडचा) राजा कोण होता हेंहि ठरवितां येत नाही.

कृष्णाचा भाऊ महादेव याच्या वर्णनांत त्याने सोमाचा (उत्तरकोंकणाधिपति शीलाहारवंशी सोमेश्वराचा) उच्छेद केल्याचा उल्लेख आहे. या वर्णनावरून सोमेश्वराचा पराजय नाविक युद्धांत झालेला दिसतो.

महादेवानंतर त्याचा पुत्र आमण गादीवर बसला. त्याच्या वर्णनास दोन श्लोक दिले आहेत. पण त्यांत ऐतिहासिक माहिती कांही नाही. त्यानंतरच्या श्लोक १४ मध्ये कृष्णाचा मुलगा रामचंद्र याने देवगिरि दुर्ग कसा काबीज केला याचें मनोरंजक वर्णन केलें आहे. रामचंद्राने नाचे लोकांचा वेष घेतलेल्या आपल्या कांही सैनिकांसह देवगिरि दुर्गांत प्रवेश केला. नंतर त्याने आपणांस अनुकूल असलेले लोक जमवून शत्रूचे सैनिक नाच पाहण्यांत दंग झाले असतांना त्यांच्यावर हल्ला केला. त्याचे सैनिकहि आपला घेतलेला वेष टाकून देऊन त्या गर्दींत मिसळले आणि त्यांनी शत्रूच्या लोकांस कंठस्नान घातलें. अशा रीतीने रामचंद्राने राज्य प्राप्त करून घेतलें. या ऐतिहासिक घटनेचे प्रतिसाद तत्कालीन महानुभावी वाङ्मयांत उमटलेले दिसतात. लीळाचरित्रावरून असें दिसतें की महानुभावपंथ संस्थापक चक्रधराचा मुक्काम या वेळीं सविता येथे होता. हें ठिकाण देवगिरीच्या दक्षिणेस ८ मैलांवर देवगिरि–पैठण मार्गावर सध्या वळूज गाव आहे तेथे होतें. सविता गावांतील लोक भयभीत झाले आहेत आणि कांही गाड्यांतून जखमी लोकांना नेलें जात आहे

---

८. तासगांव ताम्रपट (द. म. इ. सा., पु. ३, पृ. १४ पाहा.)

हें पाहून चक्रधराने आपला शिष्य इंद्रभट्ट यास माहिती काढण्यासाठी पाठविलें. त्याने जाऊन चौकशी केली तेव्हा त्यास कळलें की देवगिरीस राज्यक्रांति झाली आहे, रामचन्द्राने नरसिंहदेवास पळावयास लावून आमणदेवास पदच्युत केलें आणि त्याचे डोळे काढले.[९] केशवव्यासाच्या रत्नमालास्तोत्रावरून चक्रधरास ही माहिती सायंकाळीं कळली असें दिसतें.[१०]

श्लोक १६ ते १८ मध्ये रामचंद्राच्या विजयांचें वर्णन आहे. श्लोक १६ मध्ये म्हटलें आहे की रामचंद्राने विशाल डाहल देशाच्या राजाचा क्षणांत पराभव केला, तसेंच भांडागारनृपतीचा पाडाव केला, वज्राकराच्या राजाला पदच्युत केलें आणि गवळ्यांच्या अधिपतीला रणांगणांत जिंकलें. डाहल हा त्रिपुरीच्या कल्चुरींचा प्रदेश. पुळुंज येथील लेखांत सिंहणाचें 'डाहलहृत्कुतूहल' (डाहल देशच्या लोकांना ज्याच्याबद्दल कुतूहल वाटतें असा) असें वर्णन केलें आहे. त्यावरून त्याने डाहल देशावर स्वारी केली होती असें दिसतें.[११] रामचंद्राच्या काळीं त्रिपुरीस कोण राज्य करीत होता हें माहीत नाही. कारण सन १२१०–११ नंतर कल्चुरींचे लेख सापडले नाहीत. कदाचित् या काळीं डाहल देश चंदेल्लांच्या अमलाखाली असावा.

---

९. पाहा—डॉ. य. खु. देशपांडेकृत महानुभावीय मराठी वाङ्मय, (द्वितीयावृत्ति), पृ. ५–६.

१०. पुढील श्लोक पाहा. ततः सभिच्छं समुपेत्य सायं विप्रं प्रयुक्तं परिगृह्य तैलम् । समागतं ग्रामजनैरितां च तां प्रप्रच्छ राज्यान्तरजातवार्ताम् ॥ रत्नमालास्तोत्र (कै. हरि नारायण नेने यांच्या लीळाचरित्र, भाग ४ मधील परिशिष्ट पाहा.)

वरील उल्लेखिलेलें सभिच्छ ह्यास इतरत्र 'सविता' म्हटलें आहे. हें गाव बाभूळगांव आणि जोगेश्वरी यांमध्ये होतें. त्यांच्या ठिकाणीं आता वळूजगांव वसलें आहे. हें देवगिरीच्या दक्षिणेस ८ मैलांवर आहे

११. ग. ह. खरे : दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, भाग २, पृ. ६२.

भांडागार म्हणजे नागपूरच्या पूर्वेस ३८ मैलांवर असलेला भंडारा. विदर्भ देशाचा पश्चिम भाग यापूर्वीच सिंहणाच्या काळीं यादवांच्या अमलाखाली आला होता. खामगाव जिल्ह्यांतील अमडापुर गावीं सिंघणाच्या कारकीर्दीतील शके ११३३ चा लेख आहे. सिंघणाचा सेनापति खोलेश्वर याने विदर्भांत अनेक ठिकाणीं देवालयें बांधलीं व अग्रहार स्थापले असें वर्णन अंबे येथील शिलालेखांत आलें आहे. पण विदर्भाचा पूर्वभाग प्रथम रामचंद्राच्या काळीं यादवांच्या अमलाखाली आला असें दिसतें. रामचंद्राचा हस्तिसेनाध्यक्ष हेमाद्रि याने झाडिमंडळ जिंकल्याचा कोरीव लेखांत उल्लेख आहे.[१२] या पूर्वेकडील प्रदेशास झाडिमंडळ म्हणत. यानंतर नागपूरजवळ रामटेक येथे रामचंद्रनृपतीच्या काळचा शिलालेख लक्ष्मणाच्या देवळांत बसविला आहे. भंडारा जिल्ह्यांतील लांजी येथेहि एक तत्कालीन भग्न शिलालेख सापडला होता तो आता नागपूरच्या संग्रहालयांत ठेवला आहे.

ज्या वज्राकराच्या राजाचा समूळ उच्छेद रामचंद्राने केला असें म्हटलें आहे तो चांदा जिल्ह्यांतील गडचिरोली तहसिलींतील वैरागड होय.[१३] या ठिकाणीं मुसल्मानी कालापर्यंत हिऱ्याच्या खाणी होत्या म्हणून प्राचीन लेखांत याला वज्र किंवा वज्रगड असें म्हटलें आहे.[१४] पुढे ज्या गोपनृपतीचा पाडाव रामचन्द्राने केला असें म्हटलें आहे तो उपरिनिर्दिष्ट लक्ष्मीदेव आणि कामपाल याप्रमाणे खानदेशाचा कोणी अधिपति असावा.

श्लोक १७ मध्ये रामचंद्राने पल्लिराजाचा समरांगणांत बाणांनी पराजय केला, कान्यकुब्जाच्या राजाला आपणापुढे वाकावयास लावलें, कैलास पर्वताला तुच्छ लेखलें, अतिबलाढ्य अशा माहिमाधिपतीचा पाडाव केला, प्रबळ संगमेशाला पकडलें आणि खेटाधिपतीचा उच्छेद केला असें म्हटलें आहे. पल्लीपति हा कोणी विन्ध्य पर्वतांतील भिल्ल राजा असावा. कनोज व कैलास

---

१२. ठाणा ताम्रपट (ज. रॉ. ए. सो., पु. ५, पृ. १८३ इ.) पाहा.

१३. खारवेलाच्या हाथीगुंफा लेखामध्ये याला 'वजिरघर' म्हटलें आहे.

१४. ऐनी अकबरी (जारेटकृत भाषांतर), पृ. २२९–३० पाहा.

येथील विजयांचा उल्लेख अन्यत्र सापडत नाही. माहीम हें मुंबईजवळचें तन्नामक गाव असावें. कोंकणांतील दन्तकथेप्रमाणे माहीम हें रामचन्द्राच्या भीमराज नामक मुलाने जिंकलें आणि त्यांतील ४४४ गावांचे १५ महाल केले.[१५] संगमेश हा रत्नागिरीच्या ईशान्येस २० मैलांवरच्या संगमेस्वराचा अधिपति असावा. खेटाधिपति हा रत्नागिरी जिल्ह्यांतील खेड येथे राज्य करीत असावा. रामचंद्राचे हे कोंकणांतील विजय एकाच स्वारींत प्राप्त झालेले दिसतात.

श्लोक १८ मध्ये रामचन्द्राने वाराणसी म्लेच्छ राजांच्या अमलापासून मुक्त केली आणि तेथे शार्ङ्गपाणीचें सोन्याचें देवालय बांधलें असें म्हटलें आहे. याचा उल्लेख मुसल्मानी बखरींत येत नाही, पण त्याबद्दल आश्चर्य वाटावयास नको. सन १२८५ ते १२९० मध्ये बल्बनच्या मृत्यूनंतर आणि जलालुद्दीनची सत्ता उत्तरेंत प्रस्थापित होण्यापूर्वी रामचंद्राची ही स्वारी उत्तरेंत झालेली दिसते. त्यानंतर १२९४ मध्ये अल्लाउद्दिनाने देवगिरीवर स्वारी करून तिचा वचपा काढला असें दिसतें.[१६]

प्रस्तुत लेख हा रामचंद्राच्या कारकीर्दींतील शेवटचा ज्ञात लेख होय. यानंतर रामचंद्राने किती काळ राज्य केलें हें माहीत नाही. बरनी आणि फेरिश्ता यांच्या ग्रंथांत हिजरी सन ७१० (इ. स. १३१०–११) मध्ये मलिक काफूर आणि ख्वाजा हाजी हे होयसळांच्या द्वारसमुद्र राजधानीवर स्वारी करतांना देवगिरीमार्गाने गेले तेव्हा रामचंद्र मृत्यु पावला होता, असें म्हटलें आहे.[१७] त्यावरून रामचंद्र सन १३०९ मध्ये निधन पावला असें मानण्यांत येत असे, पण प्रस्तुत ताम्रपटावरून तो सन १३१० च्या अखेरीपर्यंत राज्य करीत होता असें दिसतें. त्यानंतर तो लौकरच कालवश झाला असावा. कारण हिजरी सन ७११ च्या अखेरीस (सन १३१२ मध्ये)

---

१५. बॉंबे गॅझेटियर (प्रथमावृत्ति), पु. १, भाग २, पृ. २७.

१६. यापूर्वी सिंहणाचा सेनापति खोलेश्वर याने वाराणसीच्या रामपालनृपतीचा पराजय केला होता असें आंबे शिलालेखावरून दिसतें.

१७. फेरिश्ता (ब्रिग्जचें भाषांतर), भाग १, पृ. ३७३ पाहा.

देवगिरीचा राजा खंडणी देत नाही अशी बातमी अल्लाउद्दीनला कळली असें मुसलमानी लेखकांनी म्हटलें आहे.[१८] हा राजा रामचंद्रदेवाचा पुत्र शंकरदेव असावा.

प्रस्तुत ताम्रपटाच्या १९ ते २८ या श्लोकांत पुरुषोत्तमपुरी अग्रहार करणाऱ्या **पुरुषोत्तम** मंत्र्याची वंशावळ दिली आहे. वसिष्ठ गोत्रांत भानुसूरि नामक एक अत्यंत धार्मिक वृत्तीचा गृहस्थ होऊन गेला. त्याने अनेक तलाव खणले आणि देवालयें बांधलीं. त्याचा पुत्र अल्हदेव हा चौदाहि विद्यांत प्रवीण होता. त्याचा पुत्र विनायक आणि नातू सांवलदेव होता. रामचंद्र नृपतीने त्याच्या अनेक गुणांनी आकृष्ट होऊन त्याला फुलबडुवा (किंवा पुष्परचनाध्यक्ष) केलें. सांवलदेवाने जामदग्न्यवत्स गोत्री माधवसूरीची नात आणि सारंगसूरीची कन्या अक्वांबिका हिच्याशीं विवाह केला. पुरुषोत्तम हा त्यांचा पुत्र. त्याची बुद्धिमत्ता, विद्वत्ता, शौर्य इत्यादि गुणांनी आकृष्ट होऊन रामचंद्राने त्याला आपला प्रधान नेमलें. त्यानेहि राज्यकारभार उत्कृष्ट रीतीने चालविला. राजद्रोही लोकांवर जरब बसवून लोकांना वर्णाश्रमानुसार वागावयास लावलें आणि सर्व कंटकांचा निःपात केला. त्याने आपल्या नीतीने रामचंद्राच्या कोशगृहांत जणूं काय मोठी सुवर्णवृष्टिच पाडली. सदाचारी, स्वामिभक्त, विनयशील आणि शूर अशा त्या पुरुषोत्तमाला पाहून सज्जनांना निरतिशय आनंद होत असे तर दुर्जनांना कंप सुटे. त्याच्या आज्ञाधारकत्वाने आकृष्ट होऊन रामचंद्रनृपतीने त्याला अग्रहार करण्याकरितां पूर्वोक्त ग्रामांचें दान केलें.

प्रस्तुत ताम्रपटांतील अनेक गावें अद्यापि ओळखतां येतात. अग्रहाराचें गाव **पुरुषोत्तमपुरी** हें अद्यापि मराठवाड्याच्या बीड जिल्ह्यांत गोदावरीच्या दक्षिण तीरावर आपल्या प्राचीन नांवाने विद्यमान आहे. ज्या **कान्हैरी** नामक खंपणकांत किंवा तालुक्यांत तें अंतर्भूत होतें त्याचें मुख्य गाव कन्हेर या नांवाने चाळीसगावाच्या नैर्ऋत्येस ८ मैलांवर आहे. त्या ठिकाणीं एक जुना

१८. इलियट, हिस्टरी ऑफ इंडिया, भाग ३, पृ. २०४; फेरिश्ता, भाग १, पृ. ३७८–७९.

किल्लाहि आहे. प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेलीं अनेक गावें पुरुषोत्तमपुरीच्या आसमंतात् त्या त्या दिशांस अद्यापि आढळतात. उदाहरणार्थ **सादुलें** हें आग्नेय दिशेस ३ मैलांवर असलेलें सादोला होय. **केशवपुरी**, **सावरिगवा** आणि **हरिकिनिबगौ** हीं ७–८ मैलांवर असलेलीं अनुक्रमें केसपुरी, सावरगाव आणि हरकी निमगांव होत. **हिवरें** आणि **राजगौ** हीं पश्चिमेस ५–६ मैलांवरचीं हिवरे बुझुर्ग आणि राजेगांव दिसतात. अग्रहाराची उत्तर मर्यादा असलेली **गंगा** ही गोदावरी नदी होय यांत संशय नाही. ज्या चार गावांचा अग्रहार केला होता त्यांतील **वाघौरे** हें पुरुषोत्तमपुरीच्या नैर्ऋत्येस चार मैलांवर असलेलें वाघुर आणि **अडगौ** हें पश्चिमेस तितक्याच अंतरावरचें टिकी अडगांव होय. त्या गावांच्या नऊ वाड्यांपैकी फक्त दोन आता विद्यमान आहेत. **पिंपळवाडी** हें टिकी अडगावच्या दक्षिणेस दोन मैलांवरचें फूलपिंपळगांव आणि **गोलेगाह्वाण** हें वाघूरच्या वायव्येस तीन मैलांवरचें गोहनथडी असावें. इतर गावें मात्र नकाशांत आढळलीं नाहीत.

वाचन[1]

पहिला पत्रा

१ ओम् [।]*श्रीआदिवराहाय नमः ॥ निरतिशयनिरंतानंदचि-
[त्स्व]स्वरूपः प्रबलविमलसत्व(त्त्व)स्वी–

२ कृतव्यक्तशक्तिः । परमरमणमंगं मंगलानां निधानं दधदधरित-
सेव्यः सेव्यतां शा–

३ र्ङ्गपाणिः ।[2] [।१॥*] लक्ष्मीनारायणक्रीडासरःक्षीरसमुद्रजं-
(जम्) । लीलांबुजं विजयते विधुस्त्रिभु–

४ वनश्रियाः[3] [।२॥*]निःसीमः सोमवंशः स जयति जगति प्रोल्ल-
सत्कीर्त्तिवल्लिर्मुक्तारत्नानि तत्रा–

---

१ मूळ ताम्रपट व त्याचे छाप यांवरून.

२ वृत्त–मालिनी.

३ वृत्त–अनुष्टुभ्.

५ प्युरुरुचिररुचो वृष्णयः स्वच्छवृत्ताः। तेष्वप्येकावली सद्गुण-घटिततनुः कंठकांतिः कवीनां

६ तस्यामप्येष चिंतामणिरुचितरुचिर्नायकः सिंहभूपः[1]। [।३॥*] बल्लालो विजितः पराभवभुवं सं-

७ भावितोंध्राधिपः कक्कल्लो दलितः क्षणेन गिलितो भंभागिरेरी-श्वरः। दुर्ग्गाग्रे विनिबध्य ॥[2]

८ भोजनृपतिर्न्यस्तोर्जुनो निर्जितः सिंहेनेति निशम्य के भुवि भयं भेजुर्न भूमीभुजः[3]। [।४॥*] तत्पुत्रो जै-

९ त्रपालः कुलकुमुदविधुर्वीरलक्ष्मीप्रसादप्रासादो रु(रू)पसंपत्सुष-मितसुषमाकंदकंदर्प्पदर्प्पः। यः क-

१० र्ण्णः किं दधीचिः किमु किमुत शिबिः किं नु जीमूतवाहः सत्वो(त्त्वो)द्रेकैकसीमा पुनरभवदिति व्यक्ततर्क्कैर्व्यत-

११ र्क्कि[4]। [।५॥*] श्रीकृष्णभूपः प्रभविष्णुरस्माद्बभूव भूयः परिभूतवीरः [।*] पलायमानानवलोक्य वीरान् यत्कीर्तिदंभेन दि-

१२ शो हसंतिः[5]। [६॥*] यः कामपालप्रसरच्चरित्रः स्वयंवरायात-विशाललक्ष्मीः। उल्लासयंन्गोकुलमादरेण[6] कृष्ण-

---

१ वृत्त–स्रग्धरा.

२ हे दंड अनावश्यक आहेत.

३ वृत्त–शार्दूलविक्रीडित.

४ वृत्त–स्रग्धरा.

५ हा विसर्ग अनावश्यक आहे. श्लोक ६ व ७ यांचें वृत्त–उपजाति.

६. 'उल्लासयन् गोकुल–' असें वाचावें.

१३ त्वमुच्चैः प्रकटीचकार। [।७॥*] रे रे गूर्जर जर्जर व्रज रजो-
राजी[1] भराजीवनं रे रे मालव मालवं त्यज भज त्वं चोल चो–

१४ लांचलं(लम्) । रे रे कोशल कोशलंघनपरो भूयास्त्वमित्थं
जगुर्भूपा यद्विजयप्रयाणसमये बंदीजनव्यंजनाः[2] [॥८॥*]

१५ कृष्णे राजनि लीलया स्वनगरीं वैकुठमालोकितुं यातेशासदिमां
महीमथ महादेवः स तस्यानुजः। यद्दोः–

१६ स्तंभविजृंभमाणवसुधाकस्तूरिकाचित्रकभ्रांति वि(बि)भ्रव(द)-
जायत क्षितिभुजां क्षोभाय कौक्षेयकः। [।९॥*] निमज्जयं-
(य)न्क–

१७ लाशेषमपि सोमं पयोनिधौ। स्थानाच्चित्रं महादेव एव यः
कथ्यते जनैः[3]। [।१०॥*] जज्ञे शक्तिधरस्तस्य सूनुरंमणभूप–

१८ तिः। भूदेवानुद्धरंनुच्चैः[4] करतारकपीडितान् ॥ [११ ॥*]
यत्र क्षत्रपितामहे वितरति प्रत्यर्थिपृथ्वीश्वराः सर्वे दानमवा–

१९ [प्तु]मुत्कमनसो नूनं बभूवुर्भुवि। चंडांशोः किरि(र)णावली-
मविरतं संसेव्य लीलावतीवाक्यव्याकुलमानसैः

२० कथमपि व्यालोकि यत्तैः पदं(दम्)[5]। [। १२॥*] आरुह्य वैरि-
क्षितिपालमौलिनिश्रेणिभिर्देवगिरिं गरिष्ठं(ष्ठम्)। प्रसह्य तस्मा–

२१ दपहृत्य भुंक्ते कृष्णात्मजः स्वामवनिं स रामः[6]। [।१३॥*]
आदौ देवगिरिप्रवेशनमथो नृत्तप्रकारेक्षणं पश्चात्स्वै(त्स्वै)–

---

१. '–राजि' असें वाचावें.

२. श्लोक ८ व ९ यांचें वृत्त–शार्दूलविक्रीडित.

३. श्लोक १० व ११ यांचें वृत्त–अनुष्टुभ्.

४. '–नुद्धन्नुच्चैः' असें वाचावें.

५. वृत्त–शार्दूलविक्रीडित.

६. वृत्त–उपजाति.

२२ रपदातिमेलनमथालंकारविक्षेपणं(णम्) [।*] अन्विष्टार्थविरोधि-
दूरकरणं तस्माद्रसासादनं श्रीरामेण कृतं

२३ ततस्तत इतः श्लोकोस्य लोकोत्तरः[1] । [।१४।।*] श्रीरामः
शर्ववर्म्मा पदघटनलघूपायदृग्दुर्ग्गवृत्तिव्याख्याताशेष-

२४ सूत्रो विकरणविलसद्धातुनिष्पादितार्थः । वर्ण्णानां व्युत्क्रमेण व्यव-
हरणमपाकृत्य संदर्शितार्था(र्थो) जेता

२५ दिव्याकृतीनां शिशुरपि तदिह स्पृस्य(श्य)ते नापशब्दैः[2] ।
[।१५।।*] येनोत्तालविशालडाहलमहीपालः क्षणांन्नि[3]-

२६ र्ज्जितो भांडागारधराधवः परिभवं येनोच्चकैर्लंभितः । येनोन्मू-
लितराज्य एव रचितो वज्राकरक्ष्मापतिर्ये-

२७ नाजौ विजितः स गोपनृपतिर्वर्ण्यः स रामः कथं(थम्)[4]
।। [।१६।।] भल्लीभिः पल्लिराजः समरभुवि जितः कुब्जितः
कन्यकुब्जः

२८ क्षिप्तः कैलासशैलः पृथुतरमहिमा माहिमेंद्रः परास्तः । उत्तुंगः
संगमेशः प्रसभमधिगतो मोटितः

२९ खेटनाथो येन स्वेनैव धाम्ना स कथमवितथं वर्ण्यते रामचंद्रः ।
[।१७।।*] यः शुक्ल(ल्क)संकेतलिपिं व्यलोपयत्स-

३० र्वाग्रहारेषु कराग्य(न्य)वारयत् वाराणसीं म्लेच्छगणाद्व्यमोचयत्
हिरण्मयं शाङ्‍र्गधरालयं व्यधा-

२१ त्[6] ।। [१८।।*] स खल्वेवंविधगुणगणालंकृतश्रीमत्प्रो(प्रौ)ढ-
प्रतापचक्रवर्त्ती यादवकुलकमल-

---

१ वृत्त–शार्दूलविक्रीडित.
२ वृत्त–स्रग्धरा.
३ 'क्षणान्नि–' असें वाचावें.
४ वृत्त–शार्दूलविक्रीडित.
५ वृत्त–स्रग्धरा.
६ वृत्त–उपजाति.

३२ कलिकाविकासभास्करो देवगिरिपुरपुरंदरो महाराजाधिराजः श्रीरामचंद्रदे–

३३ वः शकनृपकालातीतसंवत्सरेषु द्वात्रिंशदधिकद्वादशशतसंख्याकेषु ।[1] साधारण–

३४ संवत्सरांतर्गतभाद्रपदशुक्लैकादश्यां स(श)नौ कान्हैरिदेशसंबद्धान् कान्हैरिक्षपणकांत–

दुसरा पत्रा : पहिली बाजू

३५ र्गतान् पोष(ख)री । तत्प्रविष्टखेटकानि साएगाह्वाणं । पिंपल-गाह्वाणं । पारिपोखरी ॥ अडगौं ।

३६ एतत्प्रविष्टानि खेटकानि । पिंपलवाडी । काजलकोवि । सोंइजणें । वाघौरें । ए–

३७ तत्प्रविष्टानि खेटकानि । सींपिविहिरें ॥ गोलेगाह्वाण । धारवाघौरें ॥ कुरु–

३८ णपारगौं । एवमेतांश्चतुरो ग्रामान् स्वप्रविष्टनवखेटकसहितान् तत्रत्यनि-

३९ धिनिक्षेपवृक्षत्रि(तृ)णजलपाषाणदंडशुक्ल(ल्क)कारुकादिसमस्ता-दाययुक्तान् वासिष्ट(ष्ठ)गोत्राय

४० ऋग्वेदशाखाध्यायिने फुलबडुएसांवलनायकसुताय महामंडलीक[2]-पुरुषैनायका–

४१ य समस्तनिजाज्ञासंपादनजनितपरितोखे(षे)ण अग्रहारकरणाय हस्तोदकपूर्वकं प्रादात् ।

४२ अस्यैते प्रशस्तिश्लोकाः । विश्वस्यैकः पुरोधाः सुत इति विदित[ः] स्त्रष्टुरात्मा द्वितीयः सप्तर्षी–

---

१ हा दंड निरर्थक आहे.

२ 'महामांडलिक–' असें वाचावें.

४३ णां वरिष्ठः स जयति तपसां वासभूमिर्वसिष्ठः । पातिव्रत्योपदेश-
प्रथमगुरुगुणारुंधती यस्य पत्नी

४४ बद्धा यद्गोष्ठकोणे त्रिजगदघतमःकौमुदी कामधेनुः ।[१] [।१९।।*]
ततोन्यस्तादृक्षः समजनि ततोन्यो मु–

४५ निरिति क्रमात्प्रांशुर्वंशः त्रिभुवनवतंसः प्रववृते । तमोमोहग्राह-
ग्रहकलुषितानां तनुभृतां प्रबो–

४६ धं तन्वानस्तरणिकिरणानुक्रम इव[२] ।। [२०।।*] तत्रासीद्भानु-
सूरिर्निजसवहविषे निर्गतानां सुराणां धर्म–

४७ प्रासादभंग्या दिशि दिशि विहिता येन सोपानमार्ग्गाः । किंचो-
द्धर्त्तुं किलाधोगतिमपि गमिता–

४८ न्कर्मयोगेन जन्तून्खाताःपातालमूलावधि विशदयशोरत्नष(ख)-
न्यस्तडागाः[३] । [।२१।।*] तस्माद्बभूव तपसां

४९ निधिरल्हदेवस्संकेतधाम सकलार्थकृतां गुणानां(नाम्) । कुक्षौ
हरेरिव जगंति चतुर्दशापि विद्यास्थ–

५० लानि सुखमासत यस्य वक्त्रे[४] । [।२२।।*] विद्वन्मौलिमणिर्वि-
नायक इति ख्यातस्ततोभू[त्सु]तस्तीर्थान्य–

५१ प्यघम[५]र्षणं विदधते यत्कीर्त्तिगंगांभसि । दूराद्दानगुणं निशम्य
रभसादाग[च्छ]तार्मथिना–[६]

---

१ वृत्त–स्रग्धरा. २ वृत्त–शिखरिणि.

३ वृत्त–स्रग्धरा. ४ वृत्त–वसन्ततिलका.

५ येथे ' घम ' अशीं अनावश्यक अक्षरें वर दंड काढून खाडलीं आहेत.

६ हा अनुस्वार निरर्थक आहे.

५२ मग्रे यस्य गृहं व्यनक्ति निगमव्याख्यानघोषो महान्[१]। [।२३॥*] धर्मप्रेमसुहृद्यश:प्रसवभू:[२]श्चातुर्यसारो धृ–

५३ तिक्षांतिक्षेमपदं कृपाकुलपतिर्धैर्यप्रतिष्ठो[च्छ]व:[३]। विद्याकोश-गृहं विचारसचिवः संपत्सभामंडपः

५४ सूनुः सांवलदेव इत्युदभवत्सूरेस्ततः ख्यातिमान्। [।२४॥*] प्रकृतिमृदुलं मान्यं शुद्धं मनोहरणक्षमं कु–

५५ सुमसदृशं निश्चित्यैनं श्रियः परमास्पदं(दम्)। निपुणधिषणो रामक्षोणीपतिर्यदुपुंगवः कुसुमर[च]–

५६ नाध्यक्षं दक्षं प्रसादपरोकरोत्[४]। [।२५॥*] शुचौ हिते धीमति सत्यवाक्ये सेवापरे सांवलदेवसूरौ। दिने दि–

५६ नेवर्द्धत राजचित्ते प्रीतिः प्रगल्भा स्वगृहे [च] लक्ष्मीः[५]। [२६॥*] सारंगसूरितनयामथ जामदग्न(ग्न्य)वत्सान्वयप्रभ–

५८ वमाधवसूरिपौत्रीं(त्रीम्) [।*] अक्वांबिकेति विदितां गुणरत्न-भूषां योषामसावुदवहद्विधिना स्वयोग्यां(ग्याम्)[६]। [।२७॥*]

५९ पुत्रोभूदनयोर्नयादघटितयोर्मेधाविना वेधसा बिभ्राणः पुरुषोत्तमत्व-मुचितं नाम्नार्थसंस्पर्शिना [।*]

६० मत्स्याद्यंगपरिग्रहे विमृशतो दोषांशमं(म)न्विच्छता श्लाघ्यं जन्म हरेर्य एष वपुषः स्वीकार एकादशः[७]॥ [२८॥*]

६१ सद्गोष्ठ्या(ष्ठ्या) द्विगुणमतिं विवेकवत्या दीर्घाभ्यां द्विगुणदृशं श्रुतिस्मृतिभ्यां(भ्याम्)। धैर्येण द्विगुणबलं तमक्ष–

---

१ श्लोक २३ व २४ यांचें वृत्त शार्दूलविक्रीडित.
२ हा विसर्ग निरर्थक आहे.
३ 'प्रतिष्ठोत्सवः' वाचावें.
४ वृत्त–हरिणी.
५ वृत्त–उपजाति.
६ वृत्त–वसन्ततिलका.
७ वृत्त–शार्दूलविक्रीडित.

६२ येण स्वे राज्ये यदुनृपतिर्व्यधात्प्रधानं(नम्)[१] । [। २९ ॥ *]
स विद्युतेवोज्व(ज्ज्व)लया निजाज्ञया प्रदर्श्य वर्णाश्रमयोः
पृथक्क(क्क)–

६३ मान् । महीपतेः कोशगृहे महीयसीं सुवर्णवृष्टिं व्यतनोद्घ-
नोपमाः(मः)[२] [॥ ३० ॥ *] स्वामिद्रोहकृतामयोवलय–

६४ वद्वक्रं कठोरं मनस्तस्य प्रज्वलता प्रतापशिखि(खि)ना नीतं
जवादार्जवं(वम्) । क्रूरास्तेषु सकंटकद्रुमनिभा [:]

६५ प्लुष्टा निकृष्टास्ततो रामक्षोणिपतेः सुवर्णसदृशं तेजः कृतं
प्रोज्व(ज्ज्व)लं(लम्)[३] । [। ३१ ॥ *] सुकृतनिधिषु काशी–

६६ द्वारकाद्येषु तीर्थेष्ववहितहृदि तस्मि(स्मिन्) कल्पितानल्पसत्रे ।
मुनिवचनविचारान्मुक्तिमात्रप्र–

६७ देषु स्फुरति परमिदानीं भुक्तिभु(मु)क्तिप्रदत्वं(त्वम्)[४]।
[। ३२ ॥ *] स्वाचारे स्वामिभक्ते विनयवति परस्त्रीधनाशाविदू–

६८ रे तस्मिन् प्रौढप्रतापे वहति पुरुषतां पौरुषेण स्फुटार्थाम्[५] ।
तत्कीर्त्ति निर्जिहानां दिशि दिशि

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

६९ बहुशो [हृष्ट]ता सज्जनानामासीत्कंपो रा(ग)रीयांच्छिरसि[६]
मनसि चाहर्निशं दुर्जनानां(नाम्) । [। ३३ ॥ ॥ *] श्रीमां(मा)न्
रामनृपः प्रसन्नहृद–

७० यो लोकद्वयश्रेयसे कुर्वात्मोचितमग्रहारमिति तं वारान्बहूनादिशत् ।
तस्मै चाथ महाप्रसाद इति तां स्वी–

---

१. वृत्त–प्रहर्षिणी.
२. वृत्त–वंशस्थ.
३. वृत्त–शार्दूलविक्रीडित.
४. वृत्त–मालिनी.
५. येथील अनुस्वार अनावश्यक आहे.
६. ‘ गरीयांश्छिरसि ’ असें वाचावें.

७१ कुर्वते सत्क्रियां धारापूर्वमनल्पसारविषयान्ग्रामानदान्मानदः।
[।३४॥*] सोयमेवंविधगुणरत्नाकरश्रीमन्महा-

७२ राजाधिराजश्रीरामचंद्रदेवीयमहामंडलीक[1]पुरुषैनायकः शकनृप-
कालातीतसंवत्सरेषु द्वात्रिंशद-

७३ धिकद्वादशशतसंख्याकेषु साधारणसंवत्सरान्तर्गते भाद्रपदमासि
कपिलषष्टचां(ष्ठचां) कान्हैरिदेशसंबद्धान् कान्है-

७४ रिखंपणकांतर्गतान् ॥ पोष(ख)री ॥ तत्प्रविष्टानि षे(खे)टकानि।
साएगाह्वाण। पालिपोखरी ॥ अडगौ ॥

७५ तत्प्रविष्टानि खेटकानि। पिंपलवाडी। काजलकोवि। सोंइजणें॥
वाघौरें॥ एतत्प्रविष्टानि खेटकानि। सींपि-

७६ दिहिरें।[2] गोलेगाह्वाण। धारवाघौरें। [।*] कुरुणपारगौं॥
एवमेतांश्चतुरो ग्रामान् स्वप्रविष्टनवखेटकसहि-

७७ तान् तत्रत्यनिधिनिक्षेपतृणजलपाषाणदंडशुक्ल(ल्क)कारुकादि-
समस्तादाययुक्तान् षडशीतिसंख्याका वृत्ती[:]

७८ परिकल्य(ल्प्य) देवद्वयार्थं वृत्ति(त्ति)द्वयं अग्निष्टिकाप्रपार्थं(र्थं)
मेका वृत्ति(त्ति)ब्राह्मणार्थं अशीतिसंख्याका वृत्तयः इत्यनया

७९ भागकल्पनया नानागोत्रेभ्यो नानाशाखाध्यायिभ्यः त्र्यशीतिसंख्य-
विप्रेभ्यो देवद्वयाग्निष्टिकाप्रपास-

८० हितेभ्यः स्वाभिलखि(षि)तफलसिद्धचर्थं हिरण्याक्षतोदकपूर्वकं
प्रादात् ॥ अथ ब्राह्मणनामानि। तत्र बह्वृचाः [।*]

---

१. 'महामांडलिक' असें वाचावें.

२. या गावाचें नांव ओळ ३७ मध्ये 'सींपिविहिरें' असें आलें आहे.

८१ केशोभट्ट[1]सुतमहादेवभट्टः । कोमण्णसुतविष्णुभट्टः । विष्णुमंचिसुत। पेदिभट्टः । गोविंदभट्टसुतो

८२ लाषण(लक्ष्मण)भट्टः । एते काश्यपाः ॥ मल्लिदेवभट्टसुतलक्ष्मी- धरभट्टः । पद्मनाभभट्टसुतदामोदरभट्टः । आ–

८३ पदेवभट्टसुतमैरालभट्टः । योगिभट्टसुतवासुदेवभट्टः । राघो[2]भट्टसुत- कमलदेवभट्टः । देवणभट्ट–

८४ सुतो महादेवभट्टः । जोगदेवभट्टसुतः गदोभट्टः । ध्वा(?)मिदेवः भट्टसुतः लषुमिदेवभट्टः[3] । नागनाथभट्ट–

८५ सुतः कालिदासभट्टः । गंगाधरमिश्रसुतः पद्मनाभभट्टः । एते भारद्वाजाः । सूदनभट्टसुतदामोदरभ–

८६ ट्टः । गणपतिभट्टसुतः वीरभद्रभट्टः । योगदेवभट्टसुतो यज्ञेश्वरभट्टः : सारंगनायकसुतो गोविंदना–

८७ यकः । दामोदरभट्टसुतः महादेवभट्टः । महानायकभट्टसुतकृष्ण- भट्टः । वामनाचार्यसुतो धनेश्वरभट्टः ।

८८ एते जामदग्न(ग्न्य)वत्साः । पद्मनाभभट्टसुतो जानुभट्टः । विनायक- भट्टसुतो राघवनायकः । नागनायक–

८९ सुतपुरुषोत्तमदेवः । नरसीं(सि)हभट्टसुतचांगदेवभट्टः । महादेवभट्ट- सुतः कमलादेवभट्टः । परशराम–

९० भट्टसुतः केशवभट्टः । एते वाशिष्टाः(ष्ठाः) ॥ पुरुषोत्तमभट्टसुतः कृष्णभट्टः । पुरुषोत्तमभट्टसुतो गोविंदभट्टः [।*]

---

१ ‘ केशवभट्ट ’ असें वाचावें. याप्रमाणे यापुढील ओळींतहि, नांवांचीं अशुद्ध रूपें आलीं आहेत.

२. ‘ राघव ’ असें वाचावें.

३. ‘ लक्ष्मीदेवभट्टः ’ असें वाचावें.

९१ महादेवभट्टसुतो वासुदेवभट्टः । एते विष्णुवृद्धाः । नागदेवभट्ट-
सुतः खेंइदेवभट्टः । सुदर्शनभट्टसुतः

९२ पुरुषोत्तमभट्टः । विश्वनाथभट्टसुतः कृष्णभट्टः । गोविंदभट्टसुतो
महादेवभट्टः । एते कौशिकाः ॥ प–

९३ द्मनाभभट्टसुतो नागदेवभट्टः । देकंभट्टसुतः आदित्यभट्टः ।
एतावागस्त्यौ । शारंगपाणिदेवसुतः कृ–

९४ ष्णदेवः । रामदेवभट्टसुतो ब्रह्मदेवभट्टः । एतौ वि(वै)श्वा-
मित्रौ । सांवलदेवसुतो जोगदेवभट्टः । दादं–

९५ भट्टसुतो दामोदरभट्टः । एतौ कौंडिन्यौ । अनंतभट्टसुतो
वैजनाथभट्टः । पद्मनाभभट्टसुतो दा–

९६ मोदरभट्टः । एतौ ह(हा)रितौ । शारंगपाणिभट्टसुतः चक्र-
पाणिभट्टः । कमलदेवभट्टसुतो दादंभट्टः [।*]

९७ एतौ प्रथमात्रेयौ । भास्करभट्टसुतः कृष्णभट्टः । बापदेवभट्टसुतः
सिंहभट्टः । एतौ विष्णुवृद्धांगिर–

९८ सौ । माइंदेवभट्टसुतश्चंडिकाभट्टः । माइंदेवभट्टसुतो रामेश्वर-
भट्टः । एतौ वाध्र्यश्वौ । पद्मनाभ–

९९ भट्टसुतो नागदेवभट्टः । गौत्त(त)मः ॥ महादेवभट्टसुतश्चांगदेव-
भट्टः । नैध्रुवः ॥ दामोदरभट्टसुतपुरु–

१०० षोत्तमभट्टः । देवरातः । गोपालभट्टसुतो महादेवभट्टः । आत्रेयः ।
भास्करभट्टसुत आपदेवभट्टः ।

१०१ वत्सगोत्रः । गायत्रीभट्टसुतः कृष्णभट्टः । कपिमो(गो)त्रः ॥
नागदेवजोइसीसुतः परशरामजोइसी ।

१०२ गार्ग्यः । नागण्णसुतकेशवदासः । पूतिमाषः । विष्णुभट्टसुतो
नरसींहदासभट्टः[१] [।]

१. ' नरसिंहदास– ' असें वाचावें.

१०३ वासिष्ठः। अथ तैत्तिरीयाः। नारायणपेदिसुतो मैरालभट्टः। माधवभट्टसुतत्रिवी(वि)-

१०४ क्रमभट्टः। गंगाधरभट्टसुतः सोमनाथभट्टः। माधवभट्टसुतो माइंदेवभट्टः। एते

१०५ भारद्वाजाः। कृष्णभट्टसुतो विंझभट्टदेवः। ब्रह्मदेवभट्टसुतो गणपतिभट्टः। महादे-

१०६ वभट्टसुतो विश्व(श्वे)श्वरभट्टः। नागश्वा(स्वा)मिभट्टसुतो रामेश्वरभट्टः। विष्णुभट्टसुत आपदेवभट्टः [।*]

तिसरा पत्रा

१०७ एते कौंडिन्याः॥ विष्णुभट्टसुतसोमनाथभट्टः। सिंहपेदिसुत आदित्यभट्टः। विष्णुभट्टसुतो ना-

१०८ गदेवभट्टः। एते आत्रेयाः॥ श्रीधरभट्टसुतो धनेश्वरभट्टः। केशवाचार्यसुतपुरुषोत्तम-

१०९ भट्टः। एतौ जामदग्न(ग्न्य)वत्सौ। नागदेवभट्टसुतकोटेश्वरन-(नं)[दि]:। रु(रू)पदेवभट्टसुत आपदे-

११० वभट्टः। एतौ गौतमौ। विष्णुभट्टसुतो(तः) शार्ङ्गपाणिभट्टः [।*] श्रीवत्सगोत्रः। दामोदरभट्टसुतः सू-

१११ र्यभट्टः [। *] लोहितगोत्रः। लक्ष्मीधरभट्टसुतो रामेश्वरभट्टः। ह(हा)रितः। नरसीं(सिं)हत्रिवेदी(दि)सुतक-

११२ मलदेवभट्टः। प्रथमात्रेयः। एल्हणदुबेसुतनारायणपेदिः। काश्य-पगोत्रा(त्रः) [। *] सोमनाथम्हांतेसुतः पद्म-

११३ नाभह्मांता। काश्यपो माध्यंदिनः। अनंतभट्टसुतसारंगभट्टः। काश्यपकाण्वः। दादंभट्टसुतः काकंभट्टः॥ (।)

११४ काकंभट्टसुतसांवलभट्टः । एतौ ह(हा)रितौ । रामपंडितसुतवसंत-
पंडितः । भारद्वाजः ॥ एते सामगाः । अथै–

११५ तदग्रहारभूमेराघाटाः । पूर्वतः दांडिगौं । सादुलें । दक्षिणतः ।
केशवा(व)पुरी । सांवरिगवां । हरिकीनि–

११६ बगौं । पश्चिमतः राजगौं । हीवरें । चिंचवली । द्रुगलेगाह्वाण-
संबध(द्ध) महादेओपुरी । उत्तरतः गंगा [। *]

११७ एव(वं) चतुराघाटविशुद्धः पुरुषोत्तमपुरापरनामधेयोग्रहारः
कृतः [। *] अथ ब्राह्मणनियमाः । अ(आ)–

११८ चंद्रार्कमिदं भोज्य(ग्य)मेभिरेषां च वंशजैः । नाधेयं न च विक्रेयं
सदा सन्मार्ग्गवर्त्ति[भिः][1] । [। ३५ ॥ *] पण्यांगनानां सद–

११९ नं न देयं द्यु(द्यू)तप्रचारोपि निवारणीयः । शस्त्रादिकं वापि न
धारणीयं सत्कर्म्मनिष्टै(ष्ठै)भं(र्भ)वितव्यमेभिः[2] [॥ ३६ ॥ *]

१२० राजसेवकानां वसतिप्रयाणदंडौ न स्तः । अथ भूमिदानप्रशंसा ।
सिंहासनं तथा [च्छ]त्रं वराश्वा वरवा[र]–

१२१ णाः । भूमिदानस्य पुष्पाणि फलं स्वर्ग्गस्तथैव च ॥[3] [३७॥*]
नृत्यंति पितरस्तस्य वल्गंति च पितामहाः । भूमिदोस्म–

१२२ त्कुले जातः सोस्मांत्सं(स्मान्सं)तारयिष्यति । [।३८॥*]
आदित्या इव दीप्यंते तेजसा दिवि मानवाः [।*] ये
प्रयच्छ(च्छं)ति वसुधां ब्रा–

१२३ ह्मणायाहिताग्नये । [। ३९॥*] यथा जनित्री पुष्णाति क्षीरेण
स्वसुतं नृपा[: ।*] एवं सर्वगुणैर्भूमिर्दातारमनुपुष्यति
। [। ४०॥*] अग्नि–

---

१. वृत्त–अनुष्टुभ्. २. वृत्त–इंद्रवज्रा.
३. श्लोक ३७ ते ५७ यांचें वृत्त–अनुष्टुभ्.

१२४ ष्टोमादिभिर्यज्ञैरिष्ट्वा विपुलदक्षिणैः । न तत्प(फ)लमवाप्नोति
यद्दत्वा(त्त्वा) वसुधां नृप । [। ४१।।*] नृत्यौ(मृत्यो)हि
किंकरा दंडा

१२५ ह्यग्नितापाः सुदारुणाः । घोराश्च वारुणाः पाशाः नोपसर्प्पंति
भूमिदं(दम्) । [। ४२।।*] संतर्प्पयति दातारं भूमिः प्रभव-

१२६ तां वर । कृशाय कृशभृत्याय बृत्तिक्षीणाय सीदते । [। ४३।।*]
भूमिं वृत्तिकरीं दत्वा(त्त्वा) च्छत्री भवति मानवः । [। ४४।।*]
षष्टिं वर्षसहस्रा-

१२७ णि स्वर्ग्गे तिष्ठति भूमिदः । आच्छेत्वा(त्ता) चानुमंता च तान्येव
नरके वसेत् । [४५।।*] वारिदस्तृप्तिमाप्नोति सुखमक्ष-

१२८ यमन्नदः । तिलप्रदः प्रजामिष्टां दीपदश्च कुरुत्तमं(कुरूत्तम) ।
भूमिदः सर्वमाप्नोति दीर्घमायुस्तथैव च ॥ [४६।।*] अथ

१२९ ब्राह्मणभूमिहरणे दोषाः ।। गामेकां रत्तिकामेकां भूमेरप्येक-
मंगुलं(लम्) । हरं(रन्) नरकमाप्नोति यावदा-

१३० भूतसंप्लवं(वम्) । [।४७।।*] स्वदत्तां परदत्तां वा यो हरेत
वसुंधरां(राम्) । षष्टिं वर्षसहस्राणि विष्ठायां जायते कृमिः ।
[।४८।।*] स्वद-

१३१ त्तां परदत्तां वा हरेत सुरविप्रयोः । वृत्तिं स जायते विड्रुग्वर्षा-
णामयुतायुतं(तम्) । [।४९।।*] विंध्याटवीष्वतोयासु-

१३२ शुष्ककोटरशायिनः [।*] कृष्णसर्प्पाः प्रजायन्ते ब्रह्मभूम्य-
पहारकाः । [।५०।।*] हिनस्ति विषमत्तारं वह्निरद्भिः प्र-

१३३ शाम्यति । कुलं समूलं दहति ब्र(ब्र)ह्मस्वारणिपावकः ।
[।५१।।*] ब्रह्मस्वं दुरनुज्ञातं भुक्तं हंति त्रिपूरुषं(षम्) ।
प्रसह्य

१३४ तु बलाद्भुक्तं दश पूर्वान् दशापरान् । [।५२।।*] गृन्हं(ह्लं)-
ति यावतः पा(पां)सून् क्रंदताश्रुबिंदवः । विप्राणां हत-
वृत्तीनां व–

१३५ दान्यानां कुटुंबिनां(नाम्) । [।५३।।*] राजानो राजकु-
ल्याश्च तावतोब्दान्निरंकुशा [:।*] कुंभीपाकेषु पच्यंते ब्रह्म-
भूम्यप–

१३६ हारिणः ॥ [।५४।।*] अथ भूमिपालनफलं(लम्) ॥ दान-
पालनयोर्मध्ये दानाच्छ्रेयोनुपालनं(नम्) । दानात्स्वर्गमवाप्नो–

१३७ ति पालनादच्युतं पदं(दम्) । [। ५५ ।। *] गण्यंते पांशवो
भूमेर्गण्यंते वृष्टिबिंदवः । न गण्यते विधात्रापि भूमिसंर–

१३८ क्षणे फलं(लम्) । [। ५६ ।। *] बहुभिर्वसुधा दत्ता राजभि [: *]
सगरादिभिः । यस्य यस्य यदा भूमिस्तस्य तस्य तदा फ–

१३९ लं(लम्) । [। ५७ ।। *] सामान्योयं धर्मसेतुर्नृपाणां काले
काले पालनीयो भवद्भिः [। *] सर्वानेतान् भाविनः पार्थिवें(वें)-
द्रान् भू–

१४० यो भूयो याचते रामचंद्रः[१] । [। ५८ । *] मद्वंशजाः परमही-
पतिवंशजा वा पापादपेतमनसो भुवि भाविभूपाः । ते

१४१ पालयंतु मम धर्ममि[मं समग्रं] तेभ्यो मया विरचितोंजलिरेष
मूर्द्धनिः[२] ॥ [५९ ॥ *] मंगलं महाश्रीः ॥ छ ॥

---

१. वृत्त–शालिनी.

२. हा विसर्ग अनावश्यक आहे. वृत्त–वसन्ततिलका.

१६. पैठणचा नवीन शिलालेख*

'नवभारता'च्या सप्टेंबर १९५६ च्या अंकांत डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी पैठणचा एक महत्त्वाचा शिलालेख त्याच्या ठशासह प्रसिद्ध केला आहे. या लेखांत कालनिर्देश नाही, तथापि त्याच्या अक्षरवटिकेवरून व त्यांतील सोमेश्वराच्या उल्लेखावरून तो शके १०५० च्या सुमाराचा असावा, असें अनुमान त्यांनी केलें आहे. तें खरें ठरल्यास मराठींतील कोरीव लेखांमध्ये हा पुष्कळच अगोदरचा ठरेल आणि त्यामुळे मराठी भाषेच्या अभ्यासाकरिता त्याचा उपयोग होईल. म्हणून त्याची आणखी चर्चा होणें जरूर आहे. तसा थोडासा प्रयत्न प्रस्तुत लेखांत केला आहे.

डॉ. तुळपुळे यांनी आपल्या लेखाबरोबर मूळ शिलालेखाचा ठसा जोडल्यामुळे त्यांचें वाचन तपासणें व अक्षरवटिकेवरून त्यांनी केलेल्या अनुमानाची युक्तायुक्तता ठरविणें शक्य झालें आहे. वाचनांत एकदोन दुरुस्त्या सुचवतों. प्रथम 'दुर्गाभैरन(व)केशवेशबटुके संरक्षते सर्वदा' (ओळ १-२) याबद्दल 'दुर्गाभैरन(व)केशवेशबटुके(कैः) संरक्ष्यते सर्वदा' असें वाचलें पाहिजे. (वाटोळ्या कंसांतील अक्षरें दुरुस्त केलेलीं समजावीं.) अर्थाकडे लक्ष दिल्यास 'संरक्ष्यते' असेंच रूप योग्य दिसेल.

कालनिर्णयाचीं प्रमाणें

लेखांत कालनिर्देश नसल्यामुळे त्याचा काल अनुमानानें ठरविला पाहिजे. डॉ. तुळपुळे यांनी त्याकरिता दोन प्रमाणें दिलीं आहेत. पहिलें प्रमाण अक्षरवटिकेचें. 'प्रस्तुत लेखांत ए, ओ, च, ण, ब, भ, र आणि क्ष यांचें वळण जुन्या तऱ्हेचें आहे; विशेषतः 'ए' अक्षराचें त्रिकोणाकृतित्व प्रस्तुत लेखाचें प्राचीनत्व सिद्ध करतें,' असें ते म्हणतात. पण तें निर्विवाद

---

* नवभारत, डिसेंबर, १९५६.

नाही. ' ए ' या अक्षराची डावीकडील वक्ररेषा उजवीकडील दंडापासून वेगळी झालेली अकराव्या शतकांतील कल्चुरि कर्ण नृपतीच्या बनारस ताम्रपटांत प्रथम आढळते. तथापि त्या अक्षराचें त्रिकोणाकृतित्व पुढे दीर्घकाल टिकलें यांत संशय नाही. (उदाहरणार्थ, शके ११२८ च्या पाटण येथील शिलालेखाच्या चोवीसाव्या ओळींतील ' एथ ' या शब्दांतील ' ए 'ची आकृति पाहा. पुढे ' ए 'च्या डावीकडील वक्ररेषा किंचित् खाली ओढण्याची पद्धत पडली. अशा तऱ्हेचा ' ए ' मी संपादिलेल्या शके १२३२ च्या पुरुषोत्तमपुरी ताम्रपटांत आला आहे. तेव्हा प्रस्तुत शिलालेख शके १०५० च्या सुमाराचा असेलच असें म्हणतां येत नाही. याच्या उलट, या लेखांतील ' ज 'चें वळण प्राचीन दिसत नाही. बहुतेक ठिकाणीं ' ज 'च्या उजव्या बाजूला सरळ रेघ आहे. शके १२१२ च्या पूर्वोक्त पुरुषोत्तमपुरी ताम्रपटांतहि ' ज 'ची उजवी रेषा वक्र आहे. पाटणच्या शके ११२८ च्या लेखाच्या २१ ते २६ ओळींचा ठसा कै. भावे यांच्या ' महाराष्ट्र सारस्वतां 'त (पहिली आवृत्ति, पृ. १२) दिला आहे. त्यांतील ' ज 'चें वळण प्रस्तुत लेखांतील ' ज 'पेक्षा प्राचीन दिसतें. तेव्हा ' ज 'च्या आकृतीवरून प्रस्तुत लेख शके १०५० इतका जुना वाटत नाही.

सोमेश्वराचा निर्देश

आता सोमेश्वराच्या निर्देशाकडे वळूं. प्रस्तुत लेखाच्या आरंभींच्या श्लोकांत ' तस्मिन्नेव (प्रतिष्ठानके) सोमेश्वरो राजते ' असें म्हटलें आहे. पुढे तिसऱ्या ओळींत ' सोमेस्वरुस्वामीआ ' असाहि निर्देश आला आहे. या दोन्ही ठिकाणीं प्रतिष्ठानमध्ये राज्य करणाऱ्या सोमेश्वर नृपतीचा उल्लेख आहे आणि अक्षरवटिका व भाषा यांवरून प्रस्तुत लेख जुना दिसत असल्याने हा सोमेश्वर म्हणजे उत्तर चालुक्य वंशांतील तृतीय सोमेश्वर–भूलोकमल्ल (शके १०४८–१०६०) असावा असें अनुमान डॉ. तुळपुळे यांनी केलें आहे. प्रस्तुत लेखांत सोमेश्वराच्या जगतींतील म्हणजे आवारांतील कांही देवस्थानांचा निर्देश आहे. ' हीं देवस्थानें सोमेश्वर नृपतीच्या पैठण येथील प्रासादाच्या आवारांतील असावीं. सोमेश्वर हें देवाचें नांव असणें शक्य दिसत नाही, कारण या नांवाचें देवस्थान महानुभावांच्या स्थानपोथींत जे

पैठणच्या देवस्थानांचे उल्लेख आले आहेत त्यांमध्यें आढळत नाही, असें डॉ. तुळपुळे म्हणतात त्याचा आता विचार करूं.

प्रस्तुत लेखांत उल्लेखिलेले सोमेश्वर व सोमेश्वरस्वामी हे एकच होत यांत संशय नाही. परंतु हा सोमेश्वर चालुक्यवंशी नृपति मानल्यास त्याच्या बिरुदांचा कोठेच उल्लेख कसा नाही अशी शंका सकृद्दर्शनींच येते. ह्या तृतीय सोमेश्वर–भूलोकमल्लाची राजधानी कानडी मुलखांत कल्याणी येथे होती. त्यामुळे त्याचे सर्व लेख त्याच्या पूर्वजांच्या बहुसंख्य लेखांप्रमाणे कानडी मुलखांतच सापडले आहेत. या राजाचा प्रासाद पैठण येथे होता व त्याच्या आवारांत त्याने अनेक देवालयें बांधलीं होतीं असें मानण्यास कांहीहि प्रमाण नाही. या उत्तर चालुक्यांचीं 'समस्तभुवनाश्रय, श्रीपृथिवीवल्लभ, महाराजाधिराज, परमेश्वर, परमभट्टारक, सत्याश्रयकुलतिलक, चालुक्याभरण, श्रीमत्प्रतापचक्रवर्ती' इत्यादि बिरुदें त्यांच्या कानडी लेखांत उल्लेखिलेलीं आढळतात. मराठी लेखांत अशीं बिरुदें लिहिण्याचा प्रघात नव्हता, असेंहि नाही. कारण, या चालुक्यानंतर महाराष्ट्रांत ज्यांचें साम्राज्य झालें, त्या देवगिरीच्या यादवांच्या काळच्या मराठी लेखांत त्यांचीं बिरुदें लिहिलीं आहेत. तेव्हा स्वतः तृतीय सोमेश्वराने कोरविलेल्या व त्याच्या प्रासादाच्या आवारांतील देवस्थानांना दिलेल्या देणग्यांचें वर्णन असलेल्या लेखांत त्याचें राजत्वदर्शक एकहि बिरुद उल्लेखिलें जाऊं नये हें विलक्षण वाटतें. तेव्हा सोमेश्वर किंवा सोमेश्वरस्वामी हें राजाचें नांव दिसत नाही. अत्यंत प्राचीन काळीं 'राजा' या अर्थी 'स्वामी' या शब्दाचा उपयोग केला जात असे खरा, पण राजाच्या नांवापुढे स्वामी लावलेलें आढळत नाही. याच्या उलट 'स्वामी' हें पद ब्राह्मणांच्या व देवांच्या नांवापुढे लावण्याचा प्रघात होता. उदाहरणार्थ, वाकाटकांच्या ताम्रपटांतील चनालस्वामी, सूर्यस्वामी इत्यादि ब्राह्मणांचीं नांवें पाहा. अशा तऱ्हेचीं नांवें इतर राजवंशांच्याहि लेखांत येतात. किंबहुना 'स्वामिपदान्त विद्वान् ब्राह्मणांचीं नांवें प्राचीन ग्रंथांत व कोरीव लेखांतच येतात. इ. स. च्या तेराव्या शतकानंतरच्या ग्रंथांत व लेखांत तीं सहसा आढळत नाहीत,' असें डॉ. रामकृष्णपंत भांडारकरांनी म्हटलें आहे. तथापि प्रस्तुत लेखांतील वर्णनावरून सोमेश्वरस्वामी हें कोणा ब्राह्मणाचें नांव असेलसें

वाटत नाही. पण तें देवनाम असणें सुतराम् शक्य आहे. प्राचीन काळच्या अनेक लेखांत अशीं स्वामिपदान्त देवनामें आढळतात. सामान्यतः शिवाचीं नांवें 'ईश्वर' पदान्त असत. उदाहरणार्थ, सोमेश्वर, अलङ्घ्येश्वर, नोहलेश्वर, वप्पुलेश्वर, भीमेश्वर, हाटकेश्वर, पृथ्वीदेवेश्वर, रत्नेश्वर, वङ्केश्वर हीं कल्चुरींच्या कोरीव लेखांतील शंकराचीं नांवें पाहा. याच्या उलट विष्णूच्या नांवाच्या शेवटीं 'स्वामिन्' हें पद लावण्याचा प्रघात होता. उदाहरणार्थ, वाकाटकांच्या ऋद्धपुर ताम्रपटांतील रामगिरिस्वामी (रामटेकवरील श्रीरामचंद्र), गुप्तांच्या दामोदरपुर ताम्रपटांतील श्वेतवराहस्वामी, कल्चुरींच्या कारीतलाई शिलालेखांतील सोमस्वामी हीं विष्णूच्या अवतारांचीं नांवें पाहा. तेव्हा 'सोमेश्वरस्वामी' हें विष्णूचें नांव दिसतें. अर्थातच हें नांव सोमेश्वरनामक कोणा गृहस्थाने देऊळ बांधवून त्यांत प्रतिष्ठापना केलेल्या देवाला दिलेलें दिसतें. प्राचीन काळीं लोक आपल्या नांवाच्या शेवटीं ईश्वर किंवा स्वामी हें पद लावून झालेलें नांव आपण प्रतिष्ठापना केलेल्या देवाला ठेवीत असत. उदाहरणार्थ, प्रवरेश्वर, रत्नेश्वर, पृथ्वीदेवेश्वर, सोमस्वामी (कल्चुरि द्वितीय लक्ष्मणराजाच्या सोमेश्वर मंत्र्याने कारीतलाई येथे स्थापिलेला वराह) इत्यादि. याशिवाय हेंहि लक्षांत घेणें जरूर आहे की प्रस्तुत लेखांत उल्लेखिलेलीं सोमेश्वरस्वामीच्या आवारांतील इतर देवांचीं नांवें विष्णूचींच द्योतक आहेत. उदाहरणार्थ, सोढलनारायण, वेसुनारायण, म्हातूनारायण हीं नांवें पाहा. यांच्या शेवटीं 'नारायण' पद आहे तें विष्णूचें वाचक आहे. प्राचीन काळीं विष्णूचे उपासक स्वतःच्या नांवाच्या शेवटीं 'नारायण' पद जोडून बनविलेलें नांव स्वतः प्रतिष्ठापिलेल्या विष्णूच्या मूर्तीला ठेवीत असत. अशा तऱ्हेचीं इन्द्रनारायण, शंकरनारायण इत्यादि नांवें कोरीव लेखांत येतात. त्या तऱ्हेचींच हीं सोढल्नारायण, वेसुनारायण इत्यादि नांवें दिसतात. सोढल हें व्यक्तिनाम आहे. संस्कृत वाङ्मयांत उदयसुंदरीकथेचा कर्ता सोड्ढल हा सुविख्यात आहे. वेसु व म्हातु हीं अशींच व्यक्तिनामें दिसतात.

कांही शब्दांचे अर्थ

आता प्रस्तुत लेखांत आलेल्या कांही शब्दांच्या अर्थांचा विचार करूं. कामतसेतु १ (ओ. ५), जांबुआलीए १ स्थावर (ओ. ९) आणि दीवीए

संबंध वाडुए १ (ओ. ९) यांतील 'ए'च्या अर्थाविषयी डॉ. तुळपुळे यांनी संशय दाखविला आहे, पण तो 'कविठीए' (ओ. ४) यांतल्याप्रमाणे षष्ठीचा किंवा चतुर्थीचा प्रत्यय दिसतो. मी संपादिलेल्या कृष्णदेव यादवाच्या काळच्या नांदगावच्या शिलालेखांत 'लाषौलीए ग १' किंवा 'लाषौए ग १' हे शब्द 'फुलांच्या लाखोलीकरिता दिलेलें एक गद्याणक' या अर्थी योजिले आहेत.[1] पूर्वोक्त 'कामतसेतुए १' इत्यादिकांचा अर्थ 'कामतसेतूकरिता (शेतांत जाण्याच्या वाटेकरिता) एक निवर्तन' इत्यादि अर्थ विवक्षित दिसतो. 'टाकलीए वॉटॉ भूमीशतें ३००' ह्याचा अर्थ 'टाकलीच्या वाटेवर ३०० निवर्तनें भूमि' असा असावा. येथे 'भूमिशतें ३' किंवा 'भूमि ३००' असें असावयास पाहिजे होतें. 'शतें' पद अनावश्यक आहे. कालाचा उल्लेख करतांना अशा तऱ्हेचीं अनावश्यक पदें कांही ठिकाणीं योजिलेलीं प्राचीन कोरीव लेखांत आढळतात.

डॉ. तुळपुळे यांच्या या लेखाच्या वाचनांत व विशेषतः त्याचा कालनिर्णय करण्यांत व अर्थ लावण्यांत अग्राह्य असा कांही भाग आम्हांस वाटत असला तरी त्यांनी प्रथमच प्रकाशित केलेला हा लेख महत्त्वाचा आहे यांत संशय नाही. प्राचीन लेखांचें वाचन करून अर्थ लावणें फार जिकीरीचें काम असतें व त्यांत मतभेदास पुष्कळ अवकाश असतो. म्हणून वरील सूचना केल्या आहेत. त्यांचा त्यांनी विचार करावा असें सुचवून प्रस्तुत विषयाची रजा घेतों.

---

१. वर पृ. १४६ पाहा.

१७. गोंडनृपति दलपतशहाचा जबलपूर शिलालेख
(विक्रम) संवत् १६०६*

उपलब्धि—गोंडांचे कोरीव लेख क्वचितच आढळतात. कै. डॉ. हिरालाल यांच्या ' मध्यप्रदेश व वऱ्हाड यांतील कोरीव लेखांच्या सूचीं 'त गोंडांच्या फक्त सात लेखांचा निर्देश आहे. त्यांपैकी तीन सतीस्मारकांवरचे आहेत. एक ताम्रपटावरील लेख गोंड राजाचा नसून यादवांचा असावा असें त्याविषयीं त्या पुस्तकांत दिलेल्या माहितीवरून दिसतें. शिवाय रामनगरचा लेख सोडल्यास हे सर्व लेख अद्यापि अप्रकाशित आहेत. रामनगरचा शिलालेख बराच नंतरचा, विक्रम संवत् १७२४ (सन १६६७) चा, आहे. त्यांत गढा-मंडला येथील गोंड राजांच्या ५२ पिढ्यांचें वर्णन असलें तरी त्याचा आरंभींचा भाग ऐतिहासिक दृष्ट्या विश्वसनीय नाही हें आता सिद्ध झालें आहे. हा लेखहि डॉ. फिट्झ एडवर्ड हॉल या साहेबाने अमेरिकन ओरिएंटल सोसायटीच्या जर्नलमध्ये (व्हॉ. ७, पृ. १–२३) प्रसिद्ध केल्यावर आज जवळ जवळ शंभर वर्षे झालीं. त्या लेखाचेंहि चिकित्सक पद्धतीने पुनः संपादन होणें जरूर आहे. गोंड राजांनी गढा-मंडला, देवगड व चांदा येथे दीर्घ काल राज्य केलें. पण त्यांच्या इतिहासाचीं साधनें अत्यल्प आहेत. त्याविषयीं संशोधन करण्यास पुष्कळ वाव आहे. प्रस्तुत लेख गढा येथील गोंड राजवटीच्या आरंभींच्या काळांतील असल्यामुळे त्याचें महत्त्व विशेष आहे.

हा शिलालेख जबलपुर येथील फकीरचंद उस्तादाच्या आखाड्याजवळ सापडला. हा लेख मूळचा कोठला हें निश्चितपणें माहीत नाही. कित्येक वर्षांपूर्वी जबलपूरच्या आसपास सापडलेले शिलालेख या आखाड्याजवळ जमा केले होते असें दिसतें. असे आणखी तीन शिलालेख तेथे सापडले आहेत ते

---

* ऐतिहासिक संकीर्ण निबंध (भा. इ. सं. मं), खंड ६, पृ. ५१–५५.

कल्चुरि नृपतींच्या काळचे आहेत. दोन वर्षांपूर्वी जबलपूरचे इतिहासप्रेमी डॉ. एम्. सी. चौबे यांस हे शिलालेख आढळले. त्यांनी त्याचा छाप घेऊन मजकडे पाठविला. त्यांच्या संमतीने प्रस्तुत लेख येथे प्रसिद्ध करीत आहे.

वर्णन—प्रस्तुत शिलालेख भग्नावस्थेंत आहे. त्याचा वरचा आणि डाव्या बाजूचा कांही भाग फुटून नष्ट झाला आहे. अवशिष्ट भागहि वाकडा तिकडा फुटला आहे. त्याचीं जास्तींत जास्त लांबी २ फूट ९३/४ इंच व रुंदी १ फूट २ इंच आहे. अवशिष्ट भागांत दहा ओळी आहेत.

लिपी व भाषा—अक्षरवटिका नागरी आहे. कांही ठिकाणीं पृष्ठ-मात्रांचा उपयोग केला आहे. ‘साम्राज्यगुणैः’ (ओळ २) पहा. इतरत्र बहुतेकं ठिकाणीं मात्रा अक्षरांच्या डोक्यावर काढल्या आहेत. या लेखाचा अवशिष्ट बहुतेक भाग संस्कृत पद्यांत आहे. शेवटच्या दोन ओळी मात्र तत्कालीन हिंदीच्या ‘अवधी’ बोलींत गद्यांत लिहिल्या आहेत. त्या येणेप्रमाणे—सम्वत् १६०६ वर्षे पौष्री पौर्ण्णमासीकंह दलपतिसाहिराज्ये चन्द्रपतिठाकुर[पुत्रम*]हेशठाकुरकंह पद्मावती माय विष्णुपुरग्राम दीन्ह [।*] तहां महेश ठाकुर वासुदेवकी मूर्तिकै स्थापना कीन्ही” (संवत् १६०६ या वर्षी पौषी पौर्णमासीला दलपतिसाहि राज्य करीत असत चन्द्रपति ठाकुराचा पुत्र महेश ठाकुर यास पद्मावती मातेने विष्णुपुर गाव दान दिला. तेथे महेश ठाकुरने वासुदेवाच्या मूर्तीची स्थापना केली.)

चर्चा—हा लेख गोंड राजा दलपतिसाहि याच्या काळचा आहे. या राजाचें नांव दलपत असें दुसऱ्या ओळींत व दलपतिसाहि असें नवव्या ओळींत आलें आहे. प्रस्तुत लेखाचा उद्देश पद्मावती मातेने दलपतिसाहि राज्य करीत असतां महेश ठाकुर नामक विद्वान् ब्राह्मणास संवत् १६०६ मध्ये पौष महिन्याच्या पौर्णिमेस विष्णुपुर नांवाचें गाव दान दिलें व तेथें त्या ब्राह्मणाने वासुदेवाच्या म्हणजे कृष्णाच्या मूर्तीची स्थापना केली, हें नमूद करण्याचा होता.

प्रस्तुत लेखाच्या आरंभींच्या भागांत दलपतिसाहीच्या पूर्वजांचा नामोल्लेख व वर्णन आलें असावें, पण हा भाग आता भग्न झाल्यामुळे ही ऐतिहासिक

माहिती नष्ट झाली आहे. विष्णुपुर गाव दान देणाऱ्या पद्मावती स्त्रीचा उल्लेख दोन ठिकाणीं–तिसऱ्या व दहाव्या ओळींत–आला आहे. तिसऱ्या ओळींत ती पद्मेसारखी म्हणजे लक्ष्मीप्रमाणे आहे असें म्हटलें आहे. शेवटच्या ओळींत तिला माय (माता) असें उपपद लावलें आहे. त्यावरून ती दलपतिसाहीची माता व त्याचा पिता संग्रामसिंह याची राणी असावी. तिसऱ्या ओळींत तिचें वर्णन आलें आहे. त्यापूर्वीच्या म्हणजे दुसऱ्या ओळींत दलपतराजाचा उल्लेख आला आहे, त्यावरूनहि वरील अनुमानास पुष्टि मिळते. रामनगरच्या शिलालेखावरून व ऐनी अकबरींतील वर्णनावरून दलपतिसाहीचा पिता संग्रामसाहि याचें नांव आपणांस माहीत आहे. पण त्याच्या मातेचें नांव मात्र कोठेहि आलें नाही. त्याची माता पद्मावती नामक होती ही माहिती प्रस्तुत लेखावरून प्रथमच उपलब्ध होत आहे. दलपतिसाहि हा गढामंडल्याच्या शूर राणी दुर्गावतीचा पति होय.

महेश ब्राह्मण हा दलपतिसाहीचा आश्रित होता. नवव्या ओळीच्या शेवटीं चन्द्रपति ठाकुराचें नांव आलें आहे. त्याच्या पुढील दहाव्या ओळीच्या आरंभींचा भाग नष्ट झाला आहे. पण अवशिष्ट भागाच्या आरंभीं महेश ठाकुराचें नांव दिसतें. त्यावरून चन्द्रपति ठाकूर हा महेश ठाकुराचा पिता असावा. महेश हा कृष्णभक्त होता. आठव्या ओळींत ' महेशविदुषः श्रीवासुदेवो गतिः ' असें त्याचें वर्णन आलें आहे. आपल्यांला दान मिळालेल्या विष्णुपुरग्रामांत त्याने वासुदेवाचें मंदिर उभारलें व त्यांत भगवान् वासुदेवाची स्थापना केली. ' या मंदिरांत हरि आनन्दमग्न होऊन काळ घालवो ' अशी इच्छा चौथ्या ओळींत व्यक्त केली आहे.

कालनिर्देश—प्रस्तुत लेखांतील कालनिर्देशहि महत्त्वाचा आहे. त्यावरून संवत् १६०६ च्या पौष महिन्यांत दलपतिसाहि राज्य करीत होता असें दिसतें. दलपतिसाहीच्या कारकीर्दीचीं वर्षें अद्यापि अनिश्चित आहेत. सुमारें तीस वर्षांपूर्वी मध्यप्रदेशांतील इंग्रज अधिकारी श्री. सी. यू. विल्स् यांनी लिहिलेल्या ' सातपुडा पर्वतांतील राजगोंड महाराज ' या इंग्रजी पुस्तकांत (पृ. ४६) उपलब्ध पुराव्याची छाननी करून ' संग्रामसाहि हा इ.

स. १५०० ते १५१३ या दरम्यानच्या काळांत गादीवर आला. त्याने सन १५४१ पर्यंत राज्य केलें. त्यानंतर त्याचा मुलगा दलपतसाहि याने सात वर्षे राज्य केलें असें म्हटलें आहे. त्यानंतर उपलब्ध झालेल्या कांही नाण्यांवरून व प्रस्तुत शिलालेखावरून या कारकीर्दीच्या वर्षांत कांही फरक करावा लागेल असें दिसतें. संग्रामसाहीच्या काळचे दोन सतीस्मारकांवरचे लेख दमो जिल्ह्यांत दमोपासून पंधरा मैलांवरच्या ठर्का नांवाच्या गावांत सापडले आहेत. त्यांतील वर्षें संवत् १५७० व १५७१ अशीं कै. डॉ. हिरालाल यांनी वाचलीं आहेत. संग्रामशाहाचीं दोन सोन्याचीं नाणींहि सापडलीं आहेत. त्यांपैकी एक चौकोनी आहे. त्यावरील संवताच्या वाचनांत मतभेद आहेत. डॉ. हिरालाल यांचे मतें त्यावरील संवत् १५७० आहे.[1] कलकत्त्याचे विद्याविनोद तो संवत् १५६६ असा वाचतात.[2] हें नाणें पुराणवस्तुसंशोधनखात्याच्या सन १९१३–१४ च्या वार्षिक अहवालांत छापलें आहे. तेथील ब्लॉकवरून त्यावरील वर्ष १५८८ असावें असें दिसतें. दुसरें नाणें वर्तुलाकार आहे. तें श्री. ॲलन् यांनी न्यूमिस्मॅटिक् क्रॉनिकलमध्ये कांही वर्षांपूर्वी प्रसिद्ध केलें होतें. त्यावरील वर्ष ते संवत् १६०० असें वाचतात.[3] हीं सर्व वर्षें विक्रम संवताचीं आहेत यांत संशय नाही. तेव्हा संग्रामसाहीने निदान विक्रम संवत् १५७० ते १६०० किंवा इ. स. १५१३ ते १५४३ पर्यंत राज्य केलें यांत संशय नाही. प्रस्तुत लेखांतील संवत् १६०६ हें वर्षहि विक्रम संवताचेंच आहे यांत संशय नाही. तेव्हा श्री. विल्स् म्हणतात त्याप्रमाणे दलपतिसाहीची कारकीर्द इ. स. १५४८ मध्ये समाप्त झाली नसून तो निदान विक्रम संवत् १६०६ किंवा इ. स. १५४९ पर्यंत राज्य करीत होता यांत संशय नाही.

---

१. 'सातपुड्यांतील राजगोंड महाराज,' पृ. ४२

२. विद्याविनोद–इंडियन् म्युझियम् मधील नाण्यांच्या कॅटलॉगची पुरवणी, पृ. १००

३. या तऱ्हेचेंच दुसरें एक नाणें श्री. नेव्हिल् यांनी बंगाल एशियाटिक सोसायटीच्या (न्यू सीरिज्, व्हॉ. २१) मध्ये प्रसिद्ध केलें होतें. त्यावरीलहि संवत् १६०० च आहे.

स्थलनिश्चय— पद्मावती राणीनें महेश ठाकुरास दान दिलेलें विष्णुपुर-गांव जबलपूरजवळच असलें पाहिजे. जबलपूर तहसिलींतील गावांच्या यादींत बिसनपुर नामक गाव मला आढळलें व जबलपूर जिल्ह्याच्या विस्तृत नकाशांत तें जबलपूरच्या पूर्वेस २५ मैलांवर सापडलें. या नांवाचें गाव जबलपूर जिल्ह्याच्या दुसऱ्या कोणत्याहि तहसिलींत आढळत नाही. तेव्हा जबलपूरच्या पूर्वेस २५ मैलांवरचें बिसनपुर हेंच प्राचीन 'विष्णुपुर' होय याविषयी संशय राहत नाही.

वाचन

१ ... भूत[ले] क्व षु (?) प्रा[र्थ]नं भगीर[थ*]–

२ ... पकण्ठे मठे साम्राज्यगुणैः...[स्तु] दलपतस्तस्या–

३ ... [प]त्नेव पद्मावती ग्रामं विष्णुपुरं महेशविदुषे प्रादत्त स[त्क]–

४ ... ती सौभाग्यसीमा च तत्वि(द्वि)द्धि न्यस्तमना दिनानि गमयत्वानन्दमग्नो हरिः ॥

५ ... ह शङ्क क्षितिरमणगताब्दे(ब्दे) पूर्णिमायां सहस्ये व्यधित जनकदेशं ख्यातखण्डाम–

६ ... [रे]त्रं वासुदेवं महेशः ॥ भ्रान्तं भूवलयं न कोपि मिलितस्तादृग्जनः सात्वि(त्वि)को यो वि–

७ ... [र]न्त मधुना धन्यो धनं यच्छति । इत्यालोच्य कुटुम्बिनः कलयतो भूपालसेवामघव्या–

८ ... महेशविदुषः श्रीवासुदेवो गतिः ॥ इदं पुण्यं महेशेन यन्निदेशेन साधितं चराचरे–

९ [श्वरे तेन वा]सुदेवे समर्प्पितं (तम्॥ सम्ब(संव)त् १६०६ वर्षे पौषीपौर्ण्णमासीकंह दलपतिसाहिराज्ये चन्द्रपतिठाकुर–

१० [पुत्रम*]हेशठाकुरकंह पद्मावतीमाय विष्णुपुरग्राम दीन्ह [।*] [त]हां महेशठाकुर वासुदेवकी मूर्तिकै स्थापना कीन्ही ॥ शुभम् [।।*]

प्राचीन भारतीय नाणीं

१८. तऱ्हाळा येथील सातवाहन नाण्यांचा संचय

ता. ६ सप्टेंबर १९४१ रोजीं एका नऊ वर्षांच्या गुराखी मुलाला अकोला जिल्ह्याच्या मंगरूळ तालुक्यांतील मंगरूळच्या वायव्येस सुमारें सात मैलांवर असलेल्या तऱ्हाळा गावीं नाल्याच्या काठीं एक नाणें सापडलें. त्यानें तें आपल्या सवंगड्यांना दाखविलें. नंतर त्यांनी त्या जागीं खणलें तेव्हा त्यांना १६०० नाणीं असलेला पुरलेला मातीचा घडा आढळला. पुढे यथावकाश ट्रेझर ट्रोव्ह कायद्याखाली सरकारने तो जप्त करून नागपूर संग्रहालयाच्या स्वाधीन केला. हा संचय सापडला तेव्हा त्यांतील नाणीं माती व गंज यांनी भरलीं होतीं. पण तीं नागपूर संग्रहालयाचे त्या वेळचे नाणकविशारद श्री. एम्. ए. सुबूर यांनी मोठ्या परिश्रमाने साफ करून वाचनाकरिता माझ्या स्वाधीन केलीं. याबद्दल मी त्यांचा आणि संग्रहालयाचे क्यूरेटर डॉ. शं. श्री. पटवर्धन यांचा आभारी आहे. या नाण्यांवर मी आपला लेख जर्नल ऑफ दि न्यूमिस्मॅटिक सोसायटी ऑफ इंडिया या संशोधन पत्रिकेंत (पु. २, पृ. ८३ इ.) त्यावेळीं प्रसिद्ध केला होता. मराठी वाचकां-करिता तो येथे देत आहे.

सातवाहनांच्या नाण्यांचा विदर्भांत सांपडलेला हा दुसरा संचय होय. पहिला संचय सुमारें पाऊणशें वर्षांपूर्वी—सन १८९९ मध्ये—चांदा जिल्ह्याच्या ब्रह्मपुरी तहसिलींत एका अनुल्लिखित गावीं सापडला होता. त्यांत फक्त १८३ नाणीं होतीं. ती एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगाल या संस्थेकडे पाठविलीं होतीं. त्यांचा अभ्यास करून डॉ. होर्नल याने अहवाल तयार केला होता तो त्या सोसायटीच्या १८९३ च्या प्रोसीडिंग्ज् मध्ये (११६–११७ पृष्ठांवर) छापला आहे. होर्नल साहेबास त्या संचयांत श्रीसातकर्णीचीं

५१ नाणीं, श्रीपुळुमावीचीं २४ नाणीं आणि श्रीयज्ञ सातकर्णीचीं ४२ नाणीं आढळलीं. याशिवाय त्याला आणखी कांही 'य(गद) सात[१]', 'सिरिकुण सात' आणि 'राज्ञो व–' अशीं अपूर्ण लेख असलेलीं दिसलीं, पण त्याविषयी त्यानें कांही अनुमान केलें नाही. त्यानंतर त्यांतील कांही नाणीं लंडनच्या ब्रिटिश म्यूझियमला व कल्कत्त्याच्या इंडियन म्यूझियमला देण्यांत आलीं. पहिलीं प्रो. रॅप्सन यांनी आपल्या आन्ध्र राजांच्या नाण्यांचा कॅटलॉगमध्ये आणि दुसरीं व्हिन्सेंट स्मिथने इंडियन म्युझियमच्या नाण्यांच्या कॅटलॉग (भाग १) मध्ये वर्णिलीं आहेत.

वर सांगितल्याप्रमाणे या संचयांत सुमारें १६०० नाणीं होतीं. त्यांपैकी १५२५ हीं पूर्णावस्थेंत आढळलीं आणि ७५ नाण्यांचे तुकडे दिसले. हीं सर्व नाणीं सातवाहनांचीं आहेत. यांत एकहि अन्य देशी वा विदेशी राजाचें नाणें नाही. हीं सर्व नाणीं पोटीन नामक मिश्र धातूचीं आहेत.[२] त्यांचा आकार वाटोळा असून तीं ओतीव नसून ठशांनी बनविलेलीं दिसतात. त्यांच्या पुढील बाजूवर सोंड वर केलेला हत्ती आणि सभोवार लेख आढळतो आणि मागील बाजूवर उज्जयिनी चिह्न (काटकोन करून एकावर एक ठेवलेले दोन डंबेल्स) आढळतें. या चिह्नाच्या चार वर्तुलांत एक एक गुटिका आहे. नाण्यांवरील लेख घड्याळावरील सात आकड्याच्या स्थानाजवळ सुरू होऊन दोन आकड्यापर्यंत जातो, पण बहुतेक नाणीं ठशांपेक्षा लहान आकाराचीं असल्यामुळे त्यांच्यावरील लेखाचीं आरंभींचीं किंवा शेवटचीं कांही उठलीं नाहीत. तथापि कांही थोड्या नाण्यांवर तीं स्पष्ट दिसतात. त्यांच्या योगानें या नाण्यांविषयी कांही गैरसमज दूर करतां येतात.

या नाण्यांवरील हत्तीचें तोंड बहुतेक सर्वत्र उजवीकडे आहे. कर्ण सातकर्णीच्या नाण्यांवरील हत्ती मात्र डावीकडे तोंड करून उभा आहे. होर्नल,

---

१. याचें वाचन बहुधा 'य(ग)द सात' असें विवक्षित असावें.

२. या नाण्यांच्या धातूंचें पृथक्करण केलें तेव्हा त्यांत तांबें (शेकडा ७५ ते ८०), कथील (सुमारें शेकडा २०) आणि किंचित् लोखंड आढळलें.

रॅप्सन् व स्मिथ साहेबांनी हत्तीवर माहूत बसला असून तो वांकला आहे असें म्हटलें आहे. पण तें चूक आहे. हत्तीवर माहूत नसून त्याच्या गळ्यांत अलंकार घातले आहेत. त्यांना वरील विद्वानांनी माहूत म्हटलें आहे.

या संचयांतील १५२५ नाण्यांचें वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे—

क्रमांक	पार्जिटरच्या आवृत्तीप्रमाणे पुराणांतील क्रमांक	राजनाम	नाण्यांची संख्या
१	२३	श्रीसातकर्णि (तिसरा) (गौतमीपुत्र)	५७३
२	२४	श्री पुळुमावि (दुसरा)	१७४
३	२४ (अ)	श्रीसातकर्णि (चौथा)	३५
४	२५	शिवश्री पुळुमावि (तिसरा)	३२
५	२६	श्रीस्कन्द सातकर्णि	२३
६	२७	श्रीयज्ञ सातकर्णि	२४८
७	२८	श्रीविजय सातकर्णि	४
८		श्रीकुंभ सातकर्णि	५६
९		श्रीकर्ण सातकर्णि	७
१०		श्रीशक सातकर्णि	४
११	३०	(श्री)पुळुहामवि	४
	लेख नसलेलीं किंवा अस्पष्ट लेख असलेलीं		३६५
			१५२५

क्रमांक ८ व ९ च्या राजांचीं नांवें कोणत्याहि कोरीव लेखांत किंवा नाण्यांवर अद्यापि आढळलीं नाहीत.

या सर्व नाण्यांवरील लेख प्राकृत भाषेंत आहे आणि त्यांतील राजनाम षष्ठ्यंत आहे. प्रो. रॅप्सन् यांनी म्हटल्याप्रमाणे विदर्भांतील या नाण्यांवर त्या त्या राजांचें मातृनाम (उदाहरणार्थ, गौतमीपुत्र) आढळत नाही. पण रॅप्सनचें दुसरें विधान की विदर्भांतील सातवाहनांच्या नाण्यांवर 'राजन्' ही

पदवीहि आढळत नाही हें या नाण्यांवरून चूक ठरत आहे. कारण पुढे वर्णिलेल्या दोन सातकर्णींच्या आणि दोन पुळुमावींच्या नाण्यांवर रणा (रणो, संस्कृत, राज्ञः) हें विशेषण आढळतें. पुढे यज्ञ सातकर्णींच्या काळांत त्याचें रञ (रञो) असें रूप झालें. बाकीच्या राजांच्या नाण्यांवरील लेखांचा आरंभींचा भाग उठला नसल्यामुळे त्या नाण्यांवर ही किंवा दुसरी राजत्वनिदर्शक पदवी होती किंवा नव्हती हें सांगतां येत नाही.

१ श्री सातकर्णि (तिसरा) (गौतमीपुत्र) – एकूण संख्या ५७३

धातु–पोटिन. पुढील बाजूवर–उजवीकडे तोंडकरून सोंड वर केलेला हत्ती. मागील बाजूवर–उज्जयिनी चिह्न. पूर्ण लेख–' रणा (रण्णो) सिरि सातकणिस '.

		लेख	इंचांत व्यास	ग्रेनमध्ये वजन	संदर्भ–प्लेट २ सधील(क्रमांक)
(१)	पुढील बाजू	–णा सिरिसातक–	·७	३९·५	१
(२)	,,	–[णा] [सि]रिसात–	·७३	४४	२
(३)	,,	[रि]सातकणिस	·८	६०·५	३
(४)	,,	तक[णि]–	·७५	५०	४
(५)	,,	–[सा]तकणिस	·७	३९·५	५
(६)	,,	–[सा]तकणिस	·६५	३१·५	६
(७)	,,	–[सा]तकणिस	·७	४४	७

या संचयांतील सातकर्णींचीं नाणीं सर्वांत जास्त आहेत, पण तीं सर्व एकाच राजाचीं असतील असें वाटत नाही. त्यांतील कांहीवरचे लेख मोठ्या व जाड अक्षरांत आहेत तर इतरांवरचे लहान व बारीक अक्षरांत आहेत. या संचयांतील अनेक राजांच्या नांवाच्या शेवटीं ' सातकर्णि ' येतें आणि त्यांच्या नाण्यांवरचीं अक्षरेंहि बारीक आहेत. तेव्हा बारीक अक्षरांत अपूर्ण लेख असलेलीं कांही नाणीं या दुसऱ्या राजांचीं असण्याचा संभव आहे. अशीं नाणीं सुमारें ९० आहेत. बहुतेक नाण्यांवर सातकर्णि या राजनामांत मूर्धन्य ण आहे पण कांहींत तो दन्त्य न आहे. तीं नाणीं वायु पुराणाच्या एका प्रतींत उल्लेखिलेल्या चौथ्या सातकर्णींचीं असावीं.

व्हिन्सेंट स्मिथ् आणि रॅप्सन् यांनी हीं हस्त्यंकित नाणीं यज्ञ सातकर्णीचीं असावीं असें म्हटलें आहे आणि त्याला हें प्रमाण दिलें आहे की आंध्र प्रदेशांतील सातवाहनांच्या नाण्यांवर हत्ती हा फार उशीरा आढळतो. पण हें म्हणणें बरोबर दिसत नाही. प्रस्तुत संचयावरून विदर्भांत तरी हीं हस्त्यंकित नाणीं आरंभापासून चालत होतीं, कारण यज्ञ सातकर्णीच्या पूर्वी कांही पिढ्या होऊन गेलेल्या दोन पुळुमावींच्या नाण्यांवर सोंड वर केलेला हत्ती हेंच चिह्न आहे. शिवाय सातकर्णीच्या नाण्यांवर 'रणो' अशी राजपद्वी आहे. यज्ञ सातकर्णीच्या नाण्यांवर ती 'रञो' अशी झालीं तेव्हा हीं नाणीं गौतमीपुत्र सातकर्णीचींच असावीं. प्रस्तुत संचयांतील इतर नाण्यांप्रमाणे याहि नाण्यांवर त्याचें मातृनाम उल्लेखिलें नाही.

२ श्री पुळुमावि (दुसरा) (वासिष्ठीपुत्र)—एकूण नाणीं १७४

वर्णन—तिसऱ्या सातकर्णीच्या नाण्यांप्रमाणे.

पूर्ण लेख—'रणा सिरि पुळुमाविस'

पुढील बाजू	आकार	वर्णन	संदर्भ
(१) रणा सिरिपुळु[मा]-	·८	४३	क्र. ८
(२) पुळुमा[वि]स	·७	४४	क्र. ९
(३) -ळमा[वि]स	·७५	४१	क्र. १०

हा पुळुमावि गौतमीपुत्र सातकर्णीचा पुत्र व उत्तराधिकारी होय. 'पुळुमाविस' असें अपूर्ण नांव असलेलीं सर्व नाणीं याचींच असतील असें, नाही. कारण दुसरा एक तन्नामक राजा – शिवश्री पुळुमावि—या राजानंतर कांही काळाने होऊन गेला.

३ सातकर्णि चौथा— एकूण संख्या ३५

वर्णन—तिसऱ्या सातकर्णीच्या नाण्यांप्रमाणे. पूर्ण लेख–'रणा सिवसिरिसातकणिस' असा असावा. पण तो येथील एकाहि नाण्यावर आढळत नाही,

(१) [त]क[नि]स	·८	३८·५	क्र. ११
(२) [सा]तक[नि]	·७	२८·५	क्र. १२

हीं नाणीं चौथ्या सातकर्णीचीं असावीं कारण यांवर राजनामांत 'न' हें दन्त्य अक्षर असून त्याची खालची आडवी ओळ 'त' सारखी वांकडी झाली आहे. हा राजा वासिष्ठीपुत्र सातकर्णी असावा. वायुपुराणाच्या एका प्रतींत याचें नांव आलें आहे. याने २९ वर्षें राज्य केलें असें तेथें म्हटलें आहे.[१]

४ शिवश्री पुळुमावि— **एकूण नाणीं ३२**

वर्णन—तिसऱ्या सातकर्णीच्या नाण्यांप्रमाणे.

पूर्ण लेख—रणा सिवसिरिपुळुमाविस.

(१)	रणा सिवसि[रि]पुळु–	·६५	३७	क्र. १३
(२)	–वसिरिपुळुमावि[स]	·७५	५०	क्र. १४

प्रा. रॅप्सनच्या आंध्रांच्या नाण्यांच्या कॅटलॉगमध्ये याचीं नाणीं नाहीत. चांद्यास सापडलेल्या संचयांतहि याचें निश्चितपणें म्हणतां येईल असें नाणें होर्नलला आढळलें नाही, पण अलीकडे श्री. मार्टिन् यांनी प्रकाशित केलेल्या एका नाण्यावर 'सिवसिरि–पुळुमा-' स्पष्ट दिसतें. आमच्या एका नाण्यावर तर 'रणा' ही पदवीहि स्पष्ट आहे. याचीं अशीं ३२ नाणीं या संचयांत आढळलीं, पण 'पुळुमाविस' असा अपूर्ण लेख असलेल्या नाण्यांपैकी कांही या राजाचीं असणें संभवनीय आहे.

५ श्रीस्कन्दसातकर्णि— **एकूण नाणीं २३**

वर्णन—तिसऱ्या सातकर्णीच्या नाण्यांप्रमाणे.

पूर्ण लेख—[रणा] सिरिखदसातकणिस.

(१)	[सिरि]खदसातक–	·७५	५०	क्र. १५
(२)	[रि]खदसा–	·६५	४२	क्र. १६

या राजाचें नांव येथे प्रथमच बरोबर वाचलें आहे. चांदा संचयांत याचें नाणें होतें, पण त्यावरील नांव 'य(ग)द सात–' असें होर्नलने वाचलें होतें. व्हिंसेंट स्मिथच्या कॅटलॉगमध्ये या राजाचें नाणें होतें. पण त्यावरील

१. पार्जिटर, डायनॅस्टिज् ऑफ दि कलि एज्, पृ. ४२.

नांव त्याने चड सात[कणि] असें वाचलें होतें,[१] पण त्याच्या प्लेटवरून तें 'खद सात–' असेंच आहे. रॅप्सन्च्या कॅटलॉगमधील नं. १७९ चें नाणें याच राजाचें आहे, पण तें कृष्णा जिल्ह्यांत सापडलें असें म्हटलें आहे. रॅप्सनने त्यावरचें नांव '[रु*]ड सातक–' असें वाचलें होतें पण तें चूक आहे.

हा खद सातकर्णि म्हणजे पुराणांत शिवश्री पुळुमावीचा पुत्र म्हणून उल्लेखिलेला शिवस्कंद सातकर्णि होय. वायुपुराणांतील एका प्रतींत याने तीन वर्षे राज्य केलें असें म्हटलें आहे.

६ श्रीयज्ञ सातकर्णि— **एकूण नाणीं २४८**

वर्णन—तृतीय सातकर्णीच्या नाण्यांप्रमाणे.

पूर्ण लेख—रञ सिरियञसातकणिस.

(१)	रञ [सि]रियञ–	·७	४३	क्र. १७
(२)	यञसातकणि[स]	·७	४९	क्र. १८
(३)	यञसात–	·७	४०	क्र. १९
(४)	–[रि]यञसा–	·६६	३९	क्र. २०
(५)	रञ [सिरि][यञ]–	·६९	३९·५	क्र. २१

या राजाचीं या संचयांतील नाण्यांची संख्या फक्त तिसऱ्या सातकर्णीच्या नाण्यांच्या संख्येपेक्षा कमी आहे. याच्या पदवींत 'रणा' ऐवजीं रञ (रञो, संस्कृत राज्ञः) असा झालेला बदल उल्लेखनीय आहे. याचें नांव लांबलचक असल्याने कांही नाण्यावर तें 'यञ सात' किंवा 'यञ सा' अशा संक्षिप्त रूपाने आढळतें.

७ विजय सातकर्णि **एकूण नाणीं ४**

वर्णन—तृतीय सातकर्णीच्या नाण्यांप्रमाणे.

पूर्ण लेख—[सिरि]विजयसातकणिस.

(१)	–[ज]यसातक[णि]	·६८	३१	क्र. २२
(२)	–यसातक–	·६५	४५	क्र. २३

१. इंडियन म्यूझियम् कॅटलॉग्, भाग १, पृ. २१३, प्लेट २३, २४ (? २२) पाहा.

या राजाचें नांव कोणत्याहि नाण्यांवर पूर्णपणें आलें नाही. चांदा संचयांत या राजाचीं दोन नाणीं होतीं. त्यांवरील लेख होर्नलने 'रञो व' किंवा 'ञो व' असे वाचले होते. सातवाहन वंशांत ज्याच्या नांवाच्या शेवटीं 'य' आहे असा राजा फक्त विजय सातकर्णि होता. तेव्हा हीं सर्व नाणीं त्याचीं असावीं. याशिवाय त्याचीं नाणीं सापडलीं नाहीत. पुराणांतील वर्णनानुसार हा यज्ञसातकर्णीचा पुत्र व उत्तराधिकारी असून याने फक्त ६ वर्षे राज्य केलें.

८ श्रीकुंभ सातकर्णि— **एकूण नाणीं ५६**

वर्णन—तिसऱ्या सातकर्णीच्या नाण्याप्रमाणे.

पूर्ण लेख—'[रञो] सिरिकुंभसातकणिस'

(१) [सि]रिकुमसातक–	·६७	३०	क्र. २४
(२) [रि]कुमसातक–	·६	२९	क्र. २५

या राजाचीं नाणीं प्रथमच सापडलीं आहेत. याचें नांव पुराणांतहि येत नाही. कदाचित् याच्या काळीं सातवाहनांचें राज्य विदर्भापुरतें मर्यादित असेल.

९ कर्ण सातकर्णि-- **एकूण नाणीं ७**

वर्णन—तृतीय सातकर्णीच्या नाण्यांप्रमाणे.

पूर्ण लेख—'[रञो] सिरिकणसातकणिस.'

(१) –न– सात–	·६५	३०·५	क्र. २६
(२) –कन–[सा]त–	·६५	३३·५	क्र. २७
(३) (उलट्या अक्षरांत)रिकनसात	·६५	३७	क्र. २८

क्र. २६ मध्ये 'न' अक्षराची खालची आडवी ओळ वाकडी झाली आहे आणि क्र. २७ मध्ये तिला पोकळ गाठ दिसते. या राजाच्या नाण्यांवर हत्ती डावीकडे तोंड करून उभा आहे. क्र. २८ वर ठसा उलटा झालेला दिसतो. चांदा संचयांतहि अशीं दोन नाणीं होतीं. होर्नल्ने याचें नांव सिरि-कणु–सात– असें वाचलें होतें. त्यांपैकी एक नाणें रॅप्सनच्या कॅटलॉगमध्ये (प्लेट ८, क्र. १८०) दिलें आहे. रॅप्सने यावरचा लेख 'रिकण्हसात'

असा वाचला, पण प्रस्तुत संचयांतील नाण्यांवरून शुद्ध वाचन 'कणसात–' असें आहे. मत्स्य पुराणांत आन्ध्र राजांपैकी अनेकांचीं नांवें 'कर्णपदा'न्त आलीं आहेत. उदाहरणार्थ, क्र. १२–१४ स्वातिकर्ण, क्र. १६, अरिष्टकर्ण, क्र. २०, सुन्दर शांतिकर्ण, क्र. २१, चकोर स्वातिकर्ण, आणि क्र. २९ चण्डश्री शांतिकर्ण. पण शेवटचा राजा वगळतां हे सर्व गौतमीपुत्राच्याहि पूर्वी होऊन गेले होते. पण प्रस्तुत नाण्यांवरील 'न'च्या आकृतीवरून हा कर्ण सातकर्णि गौतमीपुत्रानंतर बऱ्याच काळाने—खिस्तोत्तर दुसऱ्या शतकानंतर–होऊन गेला असावा. चण्डश्रीचें दुसरें नांव शांतिकर्ण असल्यास हीं नाणीं त्याचीं असतील.

एकूण नाणीं ४

१० श्री शक सातकर्णि—

वर्णन—तृतीय सातकर्णीच्या नाण्यांप्रमाणे.

पूर्ण लेख—[रञो सिरि] सक (किंवा सकस) सातकणिस.

(१) –कस सातक–	·७	३४	क्र. २९
(२) –[त] सक–सा–	·७	३७	क्र. ३०

याचींहि नाणीं यापूर्वी सापडलेलीं माहित नाहीत. कदाचित् रॅप्सन्‌च्या कॅटलॉगमधलीं क्र. ३४, ३६, ३७ वगैरे नाणीं या शक सातकर्णीचीं असावीं. पण रॅप्सनने राजनाम वाचण्याचा प्रयत्न केला नाही. कान्हेरी येथे माढरीपुत्र स्वामी शकसेनाचा लेख आहे. पण भगवानलाल इंद्रजींनी तेथे 'सिरिसेन' असें राजनाम वाचलें आहे.

एकूण नाणीं ४

११ श्रीपुळहामवि—

वर्णन—तृतीय सातकर्णीच्या नाण्यांप्रमाणे.

पूर्ण लेख—'रञो सिरिपुळहामविस.'

(१) –[पु]ळहाम–	·६५	४०·५	क्र. ३१
(२) –पुळहाम–	·६६	५१	क्र. ३२


याचें नांव [वासिष्ठीपुत्र] पुळुमावि किंवा [शिवश्री] पुळुमावि-सारखें नसल्यामुळे हा आंध्र (सातवाहन) राजांपैकी शेवटचा (चौथा) पुळुमावि असावा.

पुराणांत या राजांना आंध्र म्हटलें आहे खरें, पण त्यांचे सर्वांत अगोदरचे लेख व नाणीं आंध्र देशाबाहेर सापडली आहेत. आंध्र प्रदेशांत ज्याचीं नाणीं सापडलीं त्यांमध्ये सर्वांत अगोदरचा राजा गौतमीपुत्र सातकर्णि होय. पण पुराणांतील वंशावळींत हा पुष्कळच खाली (क्रमांक २३) येतो. शिवाय ओरिसामधील हाथीगुंफा कोरीव लेखांत असें म्हटलें आहे की कलिंगाधिपति खारवेलाने सातकर्णीला न जुमानतां पश्चिमेकडे सैन्य पाठविलें आणि तें कण्हबेण्णा नदीपर्यंत आल्यावर असिक (ऋषीक) नगराच्या लोकांच्या पोटांत धडकी भरली.[१] या उल्लेखावरून सातकर्णीचें राज्य कलिंग देशाच्या पश्चिमेस होतें हें उघड आहे. अर्थात् तें त्या देशाच्या दक्षिणेस असलेल्या आंध्र प्रदेशावर नव्हतें. हा सातकर्णि नागनिकेचा पति प्रथम सातकर्णि असावा. ज्या कण्हबेण्णा नदीपर्यंत खारवेलाचें सैन्य पोचलें होतें ती कृष्णा होय असें सामान्यतः मानण्यांत येतें, पण कृष्णानदी कलिंगाच्या दक्षिणेस आहे, पश्चिमेस नाही. तेव्हा ही कण्हबेण्णा नागपूरपासून १० मैलांवर वाहणारी कन्हान होय.[२] महाभारतांतील पांडवांच्या तीर्थयात्रेच्या वर्णनावरून पार्जिटरने दाखविलें आहे कीं त्यांत उल्लेखिलेली कृष्णवेणा ही कन्हान असावी. तेव्हा त्या काळीं सातवाहनांचें राज्य विदर्भावर होतें यांत संशय नाही. मौर्यांच्या विनाशानंतर विदर्भांत यज्ञसेन नामक राजा राज्य करीत होता, असें कालिदासाच्या मालविकाग्निमित्रावरून दिसतें. त्यानंतर सातवाहनांनी हा प्रदेश जिंकला असावा किंवा तेथील राजास आपलें स्वामित्व कबूल करण्यास लावलें असावें. खारवेलच्या व सातवाहनांच्या सैन्याची चकमक उडालेली दिसत नाही. विदर्भांत खारवेलाची सेना घुसल्यावर ऋषीकाच्या (खानदेशच्या) लोकांस तिच्या आक्रमणाची भीति वाटली असली तरी

---

१. एपिग्राफिया इंडिका, पु. २०, पृ. ८३. जायसवाल आणि बॅनर्जी यांनी 'असिक'च्या ऐवजी 'मुसिक' वाचलें आहे, पण तें बरोबर नाही. बरुआंनी 'असिक' असेंच वाचलें आहे.

२. राष्ट्रकूट नृपति तृतीय कृष्णाच्या देवळी ताम्रपटांत या नदीचें नांव 'कन्हना' असें आहे. ए. इं., पु. ५, पृ. १९६.



प्लेट २ – तऱ्हाळें येथील



सातवाहनांचीं नाणीं.

प्लेट ३



१ २

(अ) क्षत्रपांचीं नाणीं



(ब) जयाश्रयाचें नागें

लौकरच सातवाहनांची सेना आल्यावर ती दूर झाली आणि खारवेलाच्या सेनेची पिछेहाट झाली असें दिसतें.

गौतमीपुत्र सातकर्णीच्या काळापासून सातवाहनांचीं नाणीं विदर्भांत सापडूं लागतात. गौतमीपुत्राच्या पूर्वजांना शकांच्या आक्रमणामुळे पश्चिम महाराष्ट्र सोडावा लागला तेव्हा त्यांना विदर्भांत आश्रय मिळालेला दिसतो. म्हणून शक क्षत्रप नहपानाचा पराभव केल्यावर कोरलेल्या नाशिक लेण्यांतील आपल्या लेखांत गौतमीपुत्र सातकर्णि स्वतःस 'बेणाकटकस्वामी' असें उल्लेखितो.[1] बेणाकटक म्हणजे वेणा किंवा वैनगंगा हिच्या काठचा जिल्हा. वाकाटक नृपति द्वितीय प्रवरसेनाच्या तिरोडी ताम्रपटांत बेण्णाकटाच्या अपरपट्टांतील (पश्चिम भागांतील) कोशम्बखंड गाव दान दिल्याचा उल्लेख आहे.[2] हें गाव वैनगंगेच्या पश्चिमेस थोड्या मैलांवर असलेलें कोसंबा होय. या प्रदेशावर राज्य करीत असल्यामुळे गौतमीपुत्राने स्वतःचा 'बेणाकटकस्वामी' असा निर्देश केला आहे. प्राचीन काळीं जिल्ह्याच्या नांवाच्या शेवटीं कट किंवा कटक लावत असत. उदाहरणार्थ करहाकट, धेनुकाकट इत्यादि पाहा. पुढे गौतमीपुत्राचें राज्य सर्व दक्षिणभर पसरल्यावर त्याने आपली राजधानी प्रतिष्ठान (सध्याचें पैठण) येथे नेली असावी. टॉल्मीने (वासिष्ठीपुत्र) पुळुमावीचा उल्लेख पैठणचा राजा म्हणून केलेला इतिहासज्ञांस माहीत आहे.[3]

---

१. ए. इं., पु. ८, पृ. ६५–६६.

२. पूर्वोक्त, पु. २२, पृ. १६७ इ.

३. सातवाहनांची आरंभींची राजधानी प्रतिष्ठान (पैठण) असण्याचा संभव आहे. या घराण्याचा मूळ पुरुष सातवाहन या राजाचीं नाणीं नेवासें, औरंगाबाद, कोंडापूर इत्यादि ठिकाणीं दक्षिणच्या मध्यभागीं सापडलीं आहेत.

१९. क्षत्रप द्वितीय रुद्रसेन याचीं दोन नाणीं

पश्चिम भारतांतील क्षत्रपांचीं चांदीचीं नाणीं पूर्वीच्या विदर्भ-मध्यप्रदेशांत अनेकदा सापडलीं आहेत. सन १९२५ मध्ये ६७० नाण्यांचा मोठा संचय मध्यप्रदेशाच्या छिंदवाडा जिल्ह्यांत सोनपूर येथे सापडला होता. त्याचें वर्णन श्रीयुत जी. व्ही. आचार्य यांनी न्यूमिस्मॅटिक सप्लीमेंट नं. ४७ (ज. रा. ए. सो. बें., पु. ३) पृ. ९५ इ. वर केलें आहे. एकाददुसरें क्षत्रपांचें नाणें विदर्भ-मध्यप्रदेशांत अनेक ठिकाणीं—उदाहरणार्थ, आर्वी (वर्धा जिल्हा), केवलारी आणि शिवनी (शिवनी जिल्हा) यांत—सापडलें आहे. अलीकडे विदर्भांत वाशीम (अकोला जिल्हा) आणि कुंडिनपूर (वर्धा जिल्हा) या ठिकाणीं क्षत्रपांच्या नाण्यांचे दोन संचय सापडले होते, त्यांपैकी कांही नाणीं मजकडे आलीं आहेत. पण बाकीचीं वितळविलीं किंवा लोकांना देऊन टाकलीं असें समजतें. यामुळे भारताच्या प्राचीन इतिहासाची मोठी हानि झाली आहे. थोड्या दिवसांपूर्वी नागपूर महाविद्यालयाचे विद्यार्थी श्री. विष्णुकुमार डोणगांवकर यांनी अकोला जिल्ह्यांतील कारंजा गावीं सापडलेलें क्षत्रप नाणें मला दाखविलें होतें. तें पश्चिम भारतांतील क्षत्रप द्वितीय रुद्रसेन याचें आहे हें पुढे दाखविलें आहे. त्याच क्षत्रपाचें सोनपुर येथे सापडलेलें दुसरें एक नाणें नागपूरच्या संग्रहालयांत आहे त्याच्याविषयी कांही गैरसमज आहेत. या दोन नाण्यांची चर्चा प्रस्तुत लेखांत करावयाची आहे.

(१) द्वितीय रुद्रसेनाचें कारंजा नाणें : शक-संवत् १८६

वजन—३३ ग्रेन **आकार**—·५५ इं. व्यास

पुढील बाज—उजवीकडे तोंड केलेला राजाचा मुखवटा; वर सराफांनी केलेल्या खुणा; डोक्यावर कांही अक्षरांचे अवशेष; कानामागे संख्यादर्शक चिन्हांत शकसंवत् १८६.

मागील बाजू—तीन कमानींनी दर्शविलेली टेकडी किंवा चैत्य; वर अर्धचंद्र आणि उजवीकडे तारा; खाली प्रवाहदर्शक वाकडी रेषा; वाटोळ्या

कडेच्या आंतल्या बाजूस मण्यांचें वर्तुळ आणि त्याला लागून पुढील लेख— राज्ञः क्षत्रपस वीरदामपुत्रस राज्ञः [महाक्षत्रप]रुद्रसेनस. (प्लेट ३, आकृति (अ) १ पाहा.) (ही आकृति मूळ नाण्याच्या पांचपट मोठी आहे.)

संवत्सरदर्शक चिन्हांमध्ये ६ या संख्येचें चिन्ह संशयित आहे. त्याचा वरील भाग रुंद आहे पण तो चिमट्यासारखा नाही. म्हणून तें ६ चें द्योतक समजलें पाहिजे (४ चें नव्हे). म्हणून या नाण्याचें शकसंवत्सर १८६ आहे (१८४ नव्हे). 'महाक्षत्रप' या अक्षरांचा फक्त खालचा भाग नाण्यावर दिसतो, तथापि या वाचनाविषयी संशय नाही. तेव्हा या लेखाचा अर्थ ('हें नाणें) राजा क्षत्रप वीरदामन् याचा पुत्र राजा महाक्षत्रप रुद्रसेन याचें (आहे).'

(२) द्वितीय रुद्रसेनाचें सोनपूर नाणें—१८९.

वजन—३४ ग्रेन **आकार**—'५५ इं.

पुढील बाजू—वरील प्रमाणें राजाचा मुखवटा–वर सराफांनी केलेल्या खुणा; कानामागे संख्यादर्शक चिन्हांत शकसंवत्सर १८९.

मागील बाजू—वरील प्रमाणे टेकडी वगैरे. सभोवार लेख–राज्ञः क्षत्रपस वीरदा[मपुत्रस राज्ञो महा]क्षत्रपस रुद्रसेनस. कोष्टकांतलीं अक्षरें कडेवर तुटलीं आहेत (प्लेट ३, आकृति (अ) २ पाहा.) (आकृति मूळ नाण्याच्या पांचपट मोठी.)

पश्चिम भारतांतील क्षत्रपांच्या राज्यकारभाराची अशी पद्धत होती की राज्य करीत असलेल्या व्यक्तीने महाक्षत्रप पदवी धारण करावी, पण त्याचा भाऊ किंवा पुत्र हा राज्यकारभारांत मदत करीत असला तर त्याने स्वतःच्या नांवें नाणीं पडण्यास हरकत नाही, पण त्याची पदवी क्षत्रप असावी. तेव्हा एकाच वर्षी राजाने महाक्षत्रप म्हणून आणि युवराजाने क्षत्रप म्हणून पाडलेलीं नाणीं सापडतात. प्रत्येक नाण्याच्या पुढील बाजूस तें पाडणाऱ्या व्यक्तीचें व तिच्या पित्याचें नांव, त्यांच्या पदव्या आणि मुखवट्याच्या कानामागे शक संवताचें वर्ष असतें. या क्षत्रपांचे शिलालेख फारच थोडे आहेत, ताम्रपट तर मुळीच मिळाले नाहीत. तरीहि त्यांच्या नाण्यांवरून त्यांचा बराचसा इतिहास ज्ञात झाला आहे. यामुळे त्यांच्या नाण्यांचें महत्त्व विशेष वाटतें.

वरील दोन्ही नाण्यांवर तीं पाडणाऱ्या द्वितीय रुद्रसेनाला महाक्षत्रप पदवी लावली आहे, पण त्याचा पिता वीरदामन् याला क्षत्रप म्हटलें आहे. त्यावरून तो कधीहि गादीवर आला नव्हता, त्याने फक्त युवराज म्हणून राज्यकारभार पाहिला असें दिसतें. या राजांची वंशावळ खाली दिली आहे.

दामसेन

वीरदामन् | यशोदामन् | विजयसेन | (तृतीय) दामजदश्री

(द्वितीय) रुद्रसेन

दामसेन महाक्षत्रप होता. त्याचा ज्येष्ठ पुत्र हा त्याच्या अगोदर मृत्यु पावला असावा, म्हणून त्याच्यानंतर यशोदामन् गादीवर आला. त्याचीं व त्याचे बंधु विजयसेन आणि (तृतीय) दामजदश्री यांचीं महाक्षत्रप बिरुद असलेलीं नाणीं सापडलीं आहेत. विजयसेन आणि (तृतीय) दामजदश्री यांचीं अनुक्रमें कुंडिनपुर आणि वाशीम येथे सापडलेलीं नाणीं मी इतरत्र प्रकाशित केलीं आहेत. दामजदश्रीनंतर वीरदामन्चा पुत्र द्वितीय रुद्रसेन महाक्षत्रप म्हणून राज्य करूं लागला. त्याच्या पित्याने स्वतःच्या नांवाने राज्य केलें नव्हतें म्हणून त्याला या दोन्ही नाण्यांवर क्षत्रप असेंच बिरुद लावलें आहे. हा द्वितीय रुद्रसेन सुमारें शकसंवत् १७२ (इ. स. २५०) मध्ये गादीवर आला आणि त्याने शकसंवत् १९६ (इ. स. २७४) पर्यंत राज्य केलें असें त्याच्या नाण्यांवरून दिसतें.

श्री. जी. व्ही. आचार्य यांनी सोनपूर (छिंदवाडा जिल्हा) येथे सापडलेला क्षत्रप नाण्यांचा संचय तपासून त्यावरील आपला अहवाल न्यूमिस्मॅटिक सप्लीमेंट नं. ४७ मध्ये प्रकाशित केला आहे. त्यांत त्यांना द्वितीय रुद्रसेनाचें शकसंवत् १९९ चें नाणें आढळलें असें त्यांनी म्हटलें आहे. या संचयांतील कांही महत्त्वाची नाणीं नागपूर संग्रहालयांत ठेवून कांही इतर संग्रहालयांना त्या वेळीं वाटण्यांत आलीं होतीं. द्वितीय रुद्रसेनाचें शक संवत् १९९ चें दुसरें नाणें सापडलें नसल्याने या सोनपूर नाण्याविषयी मी नागपूर

संग्रहालयांत चौकशी केली; पण मला तेथे तें नाणें आढळलें नाही. त्या संचयांतील कांही नाणीं कलकत्त्याच्या इंडियन् म्यूझियमला पाठविलीं होतीं. त्यांच्या संचयांत असें एखादें नाणें आहे काय म्हणून त्या संग्रहालयाच्या क्यूरेटरकडे चौकशी केली, पण त्यांचें नकारात्मक उत्तर आलें. सर्वाणिया (राजपुताना, बांसवाडा) येथे क्षत्रप नाण्यांचा मोठा संचय सापडला होता. त्याचा अभ्यास कै. डॉ. देवदत्त भांडारकरांनी केला होता, त्यांत त्यांना ज्याच्यावर शक संवत् १९८ किंवा १९९ हें वर्ष असावें असें द्वितीय रुद्रसेनाचें एक नाणें आढळलें होतें. त्यावरील वर्ष अस्पष्ट असल्यामुळे सोनपूरच्या नाण्याचा पत्ता लागला असता तर द्वितीय रुद्रसेनाने निदान शक संवत् १९९ पर्यंत राज्य केलें असें निश्चितपणें म्हणतां आलें असतें. मला वाटतें श्री. आचार्यांची वर्ष वाचतांना चूक झाली असावी. त्यांनी शकवर्ष १९९ चें म्हणून मानलेलें नाणें हें आम्ही वर वर्णन केलेलें दुसरें नाणेंच असावें. या नाण्यावरील संख्यादर्शक चिन्हांपैकी दुसरें चिह्न ९० या संख्येचें वाचक नसून ८० या संख्येचें आहे, हें यासोबत त्या नाण्याचा जो मोठ्या आकारामध्ये फोटो छापला आहे, त्यावरून स्पष्ट होईल. द्वितीय रुद्रसेनाच्या कारकीर्दीचा शेवट केव्हा झाला हें निश्चितपणें सांगता येत नाही. त्याचा पुत्र व उत्तराधिकारी विश्वसिंह याच्या नाण्यांवर निश्चित असें शक वर्ष नाही. विश्वसिंहानंतर गादीवर आलेल्या भर्तृदामन् या दुसऱ्या पुत्राचीं शकवर्ष २०० चीं नाणीं सापडलीं आहेत. त्यावरून प्रस्तुत दुसऱ्या नाण्यावरील शकवर्ष १८९ च असावें (१९९ नव्हे) असें वाटतें.

क्षत्रपांचीं नाणीं विदर्भात वरचेवर मिळत असल्यामुळे तेथे क्षत्रपांचें राज्य होतें काय असा प्रश्न उपस्थित होतो. श्री. आचार्यांनी तसें मत व्यक्त केलें आहे. पण या नाण्यांशिवाय क्षत्रपांच्या विदर्भावरच्या स्वामित्वाचें दुसरें कांही चिन्ह आढळत नाही. शिवाय यांपैकी कांही नाणीं शकसंवत् १६० ते २३० किंवा खिस्तोत्तर २३८ ते ३०८ या काळांतील आहेत. या काळांत प्रथम विन्ध्यशक्ति आणि प्रथम प्रवरसेन या बलाढ्य वाकाटक नृपतींचें राज्य होतें. प्रथम प्रवरसेनाने तर अश्वमेध व वाजपेययाग करून सम्राट् पदवी धारण केली होती. तेव्हा या काळांत विदर्भ क्षत्रपांच्या अमला-

खाली गेला असणें शक्य दिसत नाही. म्हणून डॉ. अळतेकरांनी विदर्भात सापडलेल्या क्षत्रपांच्या नाण्यांची उपपत्ति निराळ्याच रीतीने लावण्याचा प्रयत्न केला आहे. 'द्वितीय रुद्रसिंह आणि त्याचा पुत्र यशोदामन् (खिस्तोत्तर ३०४ ते ३३२) यांनी आपल्या नाण्यांवर फक्त क्षत्रप ही खालची पदवी उल्लेखिली आहे. खिस्तोत्तर ३३२ पासून ३४८ पर्यंत १६ वर्षे तर क्षत्रपांचीं नाणीं कोठेहि मिळत नाहीत. तेव्हा या काळांत क्षत्रपांना अवनत दशा प्राप्त झाली होती, हें उघड आहे. तिचें कारण वाकाटक सम्राट् प्रवरसेन याचा उदय हेंच असलें पाहिजे. त्याने क्षत्रप द्वितीय रुद्रसेन आणि यशोदामन् यांना आपलें मांडलिक केलें असावें. या कालांत क्षत्रपांकडून विदर्भ सम्राटांना जी खंडणी आली ती नाण्यांच्या रूपाने आली असावी. प्रथम प्रवरसेन व त्याचा मांडलिक क्षत्रप यशोदामन् यांच्या निधनानंतर वाकाटकांचें साम्राज्य संपुष्टांत येऊन क्षत्रपांचीं नाणीं विदर्भांत येणें बंद झालें असावें,' अशी डॉ. अळतेकरांची उपपत्ति आहे. पण ती उपपत्ति मान्य करतां येत नाही; कारण श्री. आचार्यांचें सोनपूर संचयांतील शेवटचें नाणें स्वामी तृतीय रुद्रसेन याचें असून त्यावरील शकसंवताचें वर्ष ३१२ (खिस्तोत्तर ३८०) हें आहे. याने महाक्षत्रप ही पदवी धारण केली होती. तेव्हा तो वाकाटकांचेंच काय, पण इतर कोणाचेंहि आधिपत्य मान्य करीत नव्हता हें स्पष्ट आहे. तेव्हा त्याचीं नाणीं खंडणीरूपाने विदर्भांत आलीं असणें शक्य नाही.

क्षत्रपांच्या नाण्यांचे केवळ संचयच विदर्भांत सापडले नाहीत तर फुटकळ नाणींहि सापडलीं आहेत. त्यावरून ह्या नाण्यांचा चलन म्हणून व्यवहारांत उपयोग केला जात असे हें उघड आहे. वाकाटकांनी स्वतःचीं नाणीं पाडलीं नसल्यामुळे त्यांनी जशीं गुप्तांचीं सोन्यांचीं नाणीं आपल्या राज्यांत चलन म्हणून स्वीकारलीं तशीं क्षत्रपांचीं चांदीचीं नाणीं स्वीकारलेलीं दिसतात. तेव्हा या नाण्यांवरून क्षत्रपांचें विदर्भावर राज्य होतें असें अनुमान करणें योग्य होणार नाही.

२०. जयाश्रयाचें तांब्याचें नाणें*

हें नाणें मध्यप्रदेशांतील पुरातत्त्व विभागाचे संचालक डॉ. एच्. व्ही. त्रिवेदी यांनी न्यूमिस्मॅटिक सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेच्या जर्नलमध्ये (पु. २०, भाग २, पृ. २१९, प्लेट १३, क्रमांक १०) प्रकाशित केलें आहे. डॉ. त्रिवेदी यांच्या वर्णनावरून असें दिसतें की या नाण्याच्या पुढील बाजूवर उजवीकडे तोंड केलेला व सोंड वळवलेला हत्ती आहे. या बाजूचा ठसा छापलेला नाही. या नाण्याच्या मागील बाजूवर वरच्या भागांत अर्धचंद्राकृति असून तिच्याखाली ' श्रीजयाश्रय ' असें राजनाम आहे. त्याच्याहि खाली इंग्रजी ' एक्स ' या अक्षराच्या सारखी आकृति आडवी ठेवलेली दिसते. (प्लेट ३ मधील ' ब ' आकृति पाहा. यांतील दुसरी आकृति मोठी केली आहे.) या नाण्याचा आकार वाटोळा असून त्याचें वजन ३६·२ ग्रेन आहे.

डॉ. त्रिवेदी यांनी या नाण्याच्या अक्षरवटिकेवरून त्याचा काल ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. ते म्हणतात, ' श्रीजयाश्रय ' या राजनामांतील पहिलें ' श्री ' आणि तिसरें ' या ' हीं अक्षरें सातवाहन नृपति पुळुमावीच्या नाशिक येथील लेण्यांतील कोरीव लेखांतल्या सारखीं आहेत. ' ज ' हें अक्षर मात्र अशोकाच्या गिरनार येथील लेखांतल्या प्रमाणे असल्यामुळे इतर अक्षरांपेक्षा प्राचीन दिसतें. अक्षरवटिकेवरून प्रस्तुत नाण्याचा काल अजमासें खिस्ती शकाचें दुसरें शतक असावें, असें डॉ. त्रिवेदी म्हणतात. हें नाणें उज्जयिनीस मिळालें होतें. पण उज्जयिनीच्या प्राचीन इतिहासांत जयाश्रय नांवाचा राजा आढळत नाही. तथापि त्या नगरीचा प्राचीन इतिहास बराचसा अज्ञात असल्यामुळे तसा राजा तेथे झाला असणें शक्य आहे, असें त्यांचें मत आहे. प्रस्तुत लेखांत डॉ. त्रिवेदी यांच्या प्रमाणांचा विचार करून शक्य तर हें नाणें प्रचलित करणाऱ्या राजाचा शोध करावयाचा आहे.

ज्यावर राजनाम आहे ती बाजू नाण्याची मागील बाजू होय असें डॉ. त्रिवेदी कां समजतात तें कळत नाही. वास्तविक ती जास्त महत्त्वाची आणि

---

* विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक, १९५९.

म्हणून पुढील बाजू मानली पाहिजे.[1] प्रस्तुत नाण्यावरील कांही अक्षरें पूर्णपणें स्पष्ट नाहीत, तरीहि 'श्रीजयाश्रय' हें डॉ. त्रिवेदींचें वाचन बरोबर मानण्यास हरकत नाही. त्यांतील 'श्री' हें अक्षर पुळुमावीच्या नाशिकच्या लेण्यांतील लेखांतल्या सारखें आहे, असें डॉ. त्रिवेदी म्हणतात; पण तसें अक्षर त्या लेखांत आढळत नाही व तें तेथे असणेंहि शक्य नाही. कारण पुळुमावीचे नाशिक येथील दोन्ही लेख प्राकृत भाषेंत आहेत.[2] त्या भाषेंत 'श्री' याचें 'सिरि' असें रूप होतें व तें त्या लेखांत आलेंहि आहे. 'ज' व 'या' हीं अक्षरेंहि पुळुमावीच्या काळाइतकीं प्राचीन दिसत नाहीत. तेव्हा प्रस्तुत नाणें खिस्तोत्तर दुसऱ्या शतकाइतकें प्राचीन असणें शक्य नाही. शिवाय विशेष लक्षांत घेण्यासारखी गोष्ट ही की प्रस्तुत नाण्यावरचें राजनाम 'श्रीजयाश्रय' हें संस्कृतांत आहे. खिस्तोत्तर दुसऱ्या शतकांत सर्वत्र प्राकृत भाषेचा प्रसार होता. त्या काळांतील बहुतेक लेखांत व नाण्यांवरहि प्राकृत भाषेचाच उपयोग केला आहे म्हणून प्रस्तुत नाणें त्या काळांतलें दिसत नाही. शिवाय त्या काळांत जयाश्रय नांवाचा कोणी राजा होऊन गेल्याचें माहीत नाही. म्हणून डॉ. त्रिवेदी यांचें मत बरोबर वाटत नाही.

पण मग हा जयाश्रय कोण? हा प्रश्न उपस्थित होतो. त्याचें उत्तर देणें कठीण नाही. खिस्तोत्तर सातव्या शतकाच्या आरंभीं महाराष्ट्र, गुजराथ, विदर्भ, माळवा या भागावर माहिष्मतीच्या कल्चुरींचें राज्य होतें. त्या काळांत बदामीचे चालुक्य हळूहळू प्रबळ होऊं लागले होते. चालुक्य नृपति मंगलेश याने सन ६०१ मध्ये कल्चुरि नृपति बुद्धराज याचा पराजय करून त्याचा खजिना काबीज केला होता.[3] त्यानंतर बलाढ्य चालुक्य नृपति द्वितीय पुल्केशी याने सन ६२० च्या सुमारास बुद्धराजाचा पूर्ण पाडाव करून तीन्ही

---

१. सातवाहन, गुप्त वगैरे राजांच्या नाण्यांच्या राजनाम असलेल्या बाजूलाच पुढील बाजू मानतात.

२. ए. इं., पु. ८, पृ. ६० आणि पृ. ६५ पाहा.

३. वा. वि. मिराशी—इन्स्क्रिप्शन्स् ऑफ दि कलचुरि—चेदि ईरा, प्रस्तावना, पृ. ४८.

महाराष्ट्र (अर्थात् विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि कुन्तल हे) आपल्या राज्यास जोडले असें ऐहोळे येथील लेखांतील खालील श्लोकांत म्हटलें आहे[१]—

विधिवदुपचिताभिः शक्तिभिः शक्रकल्प–
स्तिसृभिरपि गुणौघैः स्वैश्च माहाकुलाद्यैः ।
अगमदधिपतित्वं यो महाराष्ट्रकाणां
नवनवतिसहस्रग्रामभाजां त्रणायाम् ॥

या विजयानंतर पुल्केशीने आपली राजधानी बदामीहून महाराष्ट्रांत (बहुधा नाशिक येथे) आणलेली दिसते, कारण चिनी यात्रेकरू ह्युएनत्संग हा पुल्केशीला महाराष्ट्राचा राजा म्हणतो. या पुल्केशीनंतर त्याचा पुत्र प्रथम विक्रमादित्य हा बदामीच्या गादीवर बसला. त्याने आपला धाकटा भाऊ जयसिंह–धराश्रय यास नाशिक, उत्तर कोकण व गुजराथ या प्रांताचा अधिपति नेमलें.[२] जयसिंह स्वतः नाशिक प्रदेशावर राज्य करीत होता. त्याचा कल्चुरि संवत् ४३६ (सन ६८५) चा ताम्रपट नाशिक येथे सापडला आहे. त्यांत नाशिकजवळच्या ढोंढक (सध्याच्या धोंडेगांव) च्या दानाचा उल्लेख आहे.[३] जयसिंहाने आपला वडील मुलगा युवराज शीलादित्य उर्फ श्र्याश्रय यास गुजराथचा अधिपति नेमलें होतें. शीलादित्याचे दोन ताम्रपट गुजराथेंत नवसारी व सुरत येथे सापडले आहेत. त्यांमध्ये त्या काळीं गुजराथेंत प्रचलित असलेल्या कल्चुरि संवताचा उपयोग कालनिर्देशाकरिता केला आहे.[४] जयसिंहाने आपला दुसरा मुलगा विनयादित्य–मंगलरस यास

---

१. ए. इं., पु. ६, पृ. १ इत्यादि.

२. शीलादित्य–श्र्याश्रय याच्या नवसारी ताम्रपटांतील जयसिंहाचें पुढील वर्णन पाहा—ज्यायसा भ्रात्रा समवर्द्धितविभूतिर्द्धराश्रयश्रीजयसिंहवर्मा । इ. क. चे. ई., पृ. १२५.

३. इ. क. चे. ई., पृ. १३०.

४. नवसारी ताम्रपट कलचुरि संवताच्या ४२१ (इ. स. ६७१) या वर्षी आणि सुरत ताम्रपट त्याच संवताच्या ४४३ (इ. स. ६९३) या वर्षी दिला होता.

उत्तर कोंकणाचें राज्य दिलें होतें. याचेहि दोन ताम्रपट मानोर (ठाणें जिल्हा) व बलसाड येथे सापडले आहेत.[१] त्या काळीं उत्तर कोंकणांत शक संवताचा प्रचार होता म्हणून या ताम्रपटांत अनुक्रमें शक संवत् ६१३ (सन ६९१) आणि शक संवत् ६५३ (सन ७३१) यांचा निर्देश केला आहे. विनयादित्य-मंगलरस याने आपला पिता जयसिंह-धराश्रय आणि वडील भाऊ शीलादित्य-श्र्याश्रय याप्रमाणे 'श्रीजयाश्रय' असें 'आश्रयान्त' बिरुद धारण केलें होतें. याचें 'युद्धमल्ल' असें आणखीहि एक बिरुद होतें. विनयादित्य-मंगलरसाच्या या दोन्ही बिरुदांचा उल्लेख त्याच्या मानोर आणि बलसाड ताम्रपटांत आला आहे. तेव्हा 'श्रीजयाश्रय' असें राजनाम असलेलें प्रस्तुत तांब्याचें नाणें उत्तर कोंकणावर राज्य करणाऱ्या विनयादित्य-मंगलरस-युद्धमल्ल-जयाश्रय या चालुक्य नृपतीने पाडलें होतें व तें खिस्तोत्तर आठव्या शतकांतलें आहे हें वरील विवेचनावरून दिसून येईल. आपल्या नांवें विनयादित्य-मंगलरसाने मंगलपुरी नामक नगरी बसवून तेथे आपली राजधानी केली होती. या नगरीचा शोध अद्यापि लागला नाही, तथापि ती उत्तर कोंकणांतच कोठे तरी असली पाहिजे.

डॉ. त्रिवेदी हें नाणें खिस्तोत्तर दुसऱ्या शतकांतलें मानतात, पण तें वास्तविक खिस्तोत्तर आठव्या शतकांतलें आहे हें वर दाखविलें आहे. या प्रमाणे या दोन कालांत सहा शतकांचें अंतर असलें तरी अक्षरवटिकेचा पुरावा आमच्या मताविरुद्ध जात नाही. विनयादित्य मंगलरसाचा मानोर ताम्रपट श्री. कृष्ण देव यांनी एपिग्राफिया इंडिका, पु. २८, पृ. १७ इ. वर ठशांसह छापला आहे. त्या ताम्रपटांतील 'श्री' 'ज' आणि 'य' या अक्षरांच्या आकृति प्रस्तुत नाण्यांवरील त्या अक्षरांच्या सारख्याच आहेत. मानोर ताम्रपट आणि प्रस्तुत नाणें हीं एकाच जयाश्रयाचीं होत हें सिद्ध करणारा दुसराहि पुरावा आहे. प्रस्तुत नाण्याच्या पुढील बाजूवर वरच्या भागांत अर्धचंद्राकृति आणि तिच्या खाली 'श्रीजयाश्रय' हें राजनाम आहे हें मागे

---

१. ए. इं., पु. २८, पृ. १७ इ. आणि जर्नल ऑफ् दि बॉंबे ब्रँच ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी, पु. १६, पृ. ५ इ.

सांगितलें आहे. विनयादित्य-मंगलरसाच्या मानोर ताम्रपटाच्या मुद्रेवर अशीच अर्धचंद्राकृति आणि तिच्या खाली 'श्रीजयाश्रय' असेंच राजनाम आहे. श्री. कृष्ण देव यांनी एपिग्राफिया इंडिकामधील आपल्या लेखाबरोबर मानोर ताम्रपटाचे ठसे छापले आहेत, पण मुद्रेचा फोटो मात्र छापला नाही. तथापि त्या मुद्रेचें जें वर्णन त्यांनी दिलें आहे त्यावरून वरील माहिती मिळते. ते म्हणतात, 'The seal is slightly damaged in the upper right corner and shows faint traces of the design of a crescent in the upper field and of a lotus in the lower, with the legend Śri-Jay[ā]śraya in the middle in the script of the main inscription.' (Ep. Ind., Vol. XVIII, p. 17) यावरून मानोर ताम्रपटाची मुद्रा व प्रस्तुत नाणें यांमधील साम्य ध्यानांत येईल. राजनामाखालील आकृतींत मात्र फरक दिसतो. ताम्रपटाच्या मुद्रेवर ती आकृति कमळाची आहे असें श्री. कृष्ण देव म्हणतात. याच्या उलट प्रस्तुत नाण्यावर ती आडव्या ठेवलेल्या इंग्रजी 'एक्स' या अक्षरासारखी दिसते. मानोर ताम्रपटाच्या मुद्रेचा फोटो छापला नाही, बलसाड ताम्रपटाच्या मुद्रेचें वर्णनहि उपलब्ध नाही. त्यामुळे या आकृति समान किंवा भिन्न होत्या हें निश्चितपणें सांगतां येत नाही. तथापि एवढा लहानसा फरक आहे असें मानलें तरी त्यामुळे ताम्रपट देणारा जयाश्रय नाणें पाडणाऱ्या जयाश्रयाहून भिन्न होता असें म्हणतां यावयाचें नाही. ते दोन्ही एकच मानले पाहिजेत.

विनयादित्य मंगलरस हा बदामीच्या चालुक्यांचा मांडलिक होता. त्याला स्वतःच्या नांवें नाणीं पाडण्याचा अधिकार कसा प्राप्त झाला, असा प्रश्न येथे उपस्थित होतो; पण त्याचें उत्तर देणें कठीण नाही. नाशिक, गुजराथ व उत्तर कोंकण येथील चालुक्यांना बदामीच्या मुख्य शाखेच्या चालुक्य सम्राटांनी प्रांताधिपति नेमलें होतें. अर्थातच त्यांचा दर्जा मांडलिकांचा होता. तथापि त्यांना बरेंचसें स्वातंत्र्य होतें. त्यांना आपलीं भूदानें सम्राटांच्या अनुज्ञेशिवाय करतां येत असत. जयसिंह आणि त्याचे पुत्र शीलादित्य आणि विनयादित्य यांनी दिलेल्या ताम्रपटांत तत्कालीन बदामीच्या चालुक्य सम्राटाच्या

अनुज्ञेचा उल्लेख नाही. हीं दानें त्यांनी स्वतःच्या अधिकारांत दिलेलीं दिसतात. तेव्हा विनयादित्य–मंगलरसाने स्वतःच्या नांवें नाणीं पाडलीं असल्यास नवल नाही.

प्रस्तुत नाण्याचें महत्त्व विशेष आहे. बदामीच्या पूर्व चालुक्यांचीं (Early Chālukyas) फारच थोडीं नाणीं सापडलीं आहेत.[१] ज्यावर राजनाम आहे अशीं तर अत्यंत विरळ आहेत. त्यांच्या मांडलिकांचीं नाणीं तर आतापर्यंत मुळीच मिळालीं नव्हतीं. उत्तर कोकणांत ख्रिस्तोत्तर आठव्या शतकाच्या आरंभीं राज्य करणाऱ्या मांडलिक चालुक्य राजाचें हें नाणें प्रथमच मिळत आहे, यांतच त्याचें वैशिष्ट्य आहे.

विनयादित्य–मंगलरस हा उत्तर कोकणांत राज्य करीत होता. त्याच्या राज्यांत कधी काळीं माळवा अन्तर्भूत झाला होता, याबद्दल पुरावा नाही. मग त्याचें हें नाणें उज्जयिनीस कसें सापडलें, असा प्रश्न उपस्थित होतो. पण तोहि सोडविणें कठीण नाही. ताम्रपट व नाणीं या वस्तु सहज आपणांबरोबर नेतां येण्यासारख्या असल्यामुळे त्या त्यांच्या मूळ ठिकाणाहून शेकडों मैल दूर सापडतात. मूळचा विदर्भांच्या हिंगणघाट तहसिलींतील वाकाटक राज्ञी प्रभावतीगुप्तेचा ताम्रपट पुणें शहरीं सापडला होता हें इतिहासज्ञांस माहीत आहे. तसाच हाहि प्रकार आहे. तशांत उज्जयिनी हें सर्व भारतांत पूज्य मानलें गेलेलें पुण्य क्षेत्र. तेथे भारताच्या सर्व भागांतून यात्रेकरू येत असत. तेव्हा ख्रिस्तोत्तर आठव्या शतकांत उत्तर कोंकणच्या एखाद्या यात्रेकरूबरोबर प्रस्तुत नाणें उज्जयिनीस आलें असल्यास नवल नाही.[२]

---

१. बिब्लीऑग्रॉफी ऑफ इंडियन कॉइन्स, भाग १, पृ. ७०.

२. अलीकडे मिळालेल्या माहितीवरून हें नाणें मध्यप्रदेशांतील कलेक्टर सरदार पाटील यांच्या संग्रहीं होतें असें कळतें.

परिशिष्ट पहिलें

काली ' मेघदूत ' लिही*

(**श्री. ना. रा. शेंडे**, अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ, नागपूर)

कविकुलगुरु कालिदास यांचें रामटेक या तीर्थक्षेत्रीं बरेच दिवस वास्तव्य होतें. त्या वास्तव्यांत त्यांनी ' मेघदूत ' नांवाचें काव्य निर्माण केलें. हद्दपार झालेला यक्ष रामगिरीवर म्हणजे रामटेकच्या एका उंच डोंगरावर वास करतो. त्याला आपल्या प्रेयसीची तीव्र आठवण होते. विरहाने व्याकुळ झालेला तो यक्ष आपल्या प्रियतमेसाठी मेघामार्फत निरोप पाठवतो, संदेश देतो. प्रस्तुत गीतांत काली म्हणजे कालिदास कवि यक्षाच्या भूमिकेंत दर्शविण्यांत आला आहे. हें गीत मला एका कैकाडणी तरुणीच्या तोंडून ऐकायला मिळालें. एक दोन गीतें म्हणून झाल्यावर नेहमीच्या पद्धतीप्रमाणे ती तोंड वेंगाडून माझ्या पत्नीला म्हणाली, ' दे वो माय गिरजा बये. भुऱ्या तोंडाचे मैना बये वोऽऽ मोठ्या गुणाचे माय बये. तुहा भाऊ नेवाले येइनव्. तुह्या जन्माचं कल्याण व्हईल. माही माय देते. टुकू टुकू पाह्यते. दे वो माय गौरा बये...' मी त्या तरुणीला वटवट बंद करायला सांगितलें आणि म्हटलें, " हें बघ. तूं एक चांगलें गाणें म्हणून दाखव. पसंत पडलें तर चार आणे देईन. " तिने एकटक माझ्याकडे पाहिलें नि स्वतःच हसून टाळी वाजवीत ती प्रस्तुत भावपूर्ण गीत गाऊं लागली.

रामाचं रामटेक, गडावर गड भारी
तेथी बैसला राज काली
रामाचं रामटेक, दिसा मागोन गेले दिस
काली करे अस्तुरीचा ध्यास

---

* दीपलक्ष्मी, फेब्रुवारी १९६१.

रामाचं रामटेक, सुर्व्या डुबाया लागला
काळा मेघ वर आला
रामाचं रामटेक, काली मेघाले बोलला
माही खबर दे अस्तुरीला
रामाचं रामटेक, काली गह्यवरून गेला
डोंगराचा माथा रडाया लागला
रामाचं रामटेक, कळसावर उभी वीज
काली–हुर्दयांत अंकुरे प्रीतबीज
रामाचं रामटेक, मोर शिखरावर उडे
काली धाय मोकलून रडे
रामाचं रामटेक, दाही दिशा झाल्या एक
ऐकोन कालीची आर्त हाक
रामाचं रामटेक, हात जोडे मेघराज
आज्ञा करावी महाराज
रामाचं रामटेक, काली सांगे खाणाखुणा
जाता राखी सावधाना
रामाचं रामटेक, सरके मेघ उत्तरेला
वारा सोबतीले आला
रामाचं रामटेक, डोळ्याची केली दौत
लिही आसवांच्या अक्षरांत
रामाचं रामटेक, काली ‘ मेघदूत ’ लिही
राहे रामटेक ग्वाही

पण, आश्चर्याची गोष्ट ही की ती तरुणी गीत संपताच स्फुंदून स्फुंदून रडूं लागली. तिला काय झालें तें कांही कळेना. मी तिला परोपरीने विचारलें पण तिची वाचा फुटेना. थोडया वेळाने कांहीशी शांत होऊन ती उद्गारली ‘ माझाहि काली होता, महाराज. पण आतां ··· ’ ती पुढे बोलूं शकली नाही.

मी दिलेला पावला तिने तसाच पुढे सारला. आपला फाटका पदर सावरीत ती उभी राहिली, आणि आपल्या धन्यासंबंधीचें स्वरचित गीत गात ती पुढे चालूं लागली. त्या गीताच्या एवढ्याच ओळी कानीं पडल्या.

तो दिलाचा दिलवर
माहा काली भरतार
गेला राणा सर्गावर
खूण आहे हुर्यावर

आणि मग तिने जोराने आर्त हांक मारली

वोऽ कालीऽऽ वो कालीऽऽ

परिशिष्ट दुसरें

डॉ. वा. वि. मिराशी यांचे संशोधनपर ग्रंथ व लेख*

इंग्रजी ग्रंथ

1. Studies in Indology, Vol. I (published by the Vidarbha Samśodhan Maṇḍal, Nagpur.)
2. Studies in Indology, Vol. II (published under the auspices of the Vidarbha Samśodhan Maṇḍal)
3. Studies in Indology, Vol. III (Ancient Indian Coins) (in the press) (to be published by the University of Nagpur.)

मराठी लेख

§१ मेघदूतांतील देवगिरि (तरुणभारत, नागपूर, दिवाळी अंक १९५८)

§२ मेघदूतांतील रामगिरीचा शोध (वसंत, फेब्रुवारी, १९५९)

§३ रामगडच्या मूर्ति (नवभारत, मार्च १९५९)

---

* या पूर्वीच्या ९२ लेखांची यादी संशोधन–मुक्तावलि, सर पहिला (पृ. २०७–११) (७० लेख), सर दुसरा (पृ. २२८–२२९) (१० लेख) आणि सर तिसरा (पृ. २१६) (१२ लेख) यांत दिली आहे.

§ ही खूण केलेले लेख प्रस्तुत ' सरां 'त घेतले आहेत.

§४ रामगड हा रामगिरि नव्हे (संजय, जुलै १९५९)

§५ रामशेज हा रामगिरि नव्हे (नवभारत, जुलै १९५९)

§६ पुनश्च रामशेज ! (नवभारत, आक्टोबर १९५९)

§७ भीष्म विवाहित होते काय ? (युगवाणी, डिसेंबर १९५९)

§८ जयाश्रयाचें तांब्याचें नाणें (विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक १९५९)

§९ त्रिविक्रमभट्ट : विदर्भांतील एक संस्कृत कवि (इंडियन नॅशनल कांग्रेस, ६४ वें अधिवेशन, स्मारक ग्रंथ १९६०)

§१० जैन वाङ्मयांतील रामगिरि (नवभारत, ऑक्टोबर १९६०)

§११ प्रथम अमोघवर्ष याचा जवखेडा ताम्रपट (विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक १९६०)

§१२ कालिदासाचें जन्मस्थान : छत्तीसगडांतील मालडा ! (नवभारत, जानेवारी १९६१)

§१३ यादव नृपति रामचंद्र याचा पुरुषोत्तमपुरी ताम्रपट

§१४ क्षत्रपांचीं विदर्भांतील नाणीं.

§१५ तऱ्हाळा येथील सातवाहनांच्या नाण्यांचा संचय.

१६ महाशिवगुप्त बालार्जुनाचा बोंडा ताम्रपट (विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक १९६१)

सूची

डॉ. वा. वि. मिराशी यांच्या कांहीं ग्रंथांवरील अभिप्राय

संशोधनमुक्तावलि : सर तिसरा

डॉ. ब. ग. राहूरकर—

या संग्रहांतील १७ लेखांची विविधता व त्यांतील नानासाहेबांची अचूक दृष्टि, पक्षपातरहित व अभिनिवेशरहित निर्णय हीं पदोपदीं दृष्टोत्पत्तीस येतात....भारतीय इतिहासांतील अनेक त्रुटी भरून काढण्याचें काम नानासाहेबांनी अविरतपणें चालविलें आहे....संस्कृत पंडित, प्राच्यविद्याविशारद, इतिहासज्ञ, नाणकशास्त्रज्ञ, शिलालेखतज्ज्ञ नानासाहेबांचे सतत ऋणी राहतील एवढें मूल्यवान साहित्य त्यांनी संशोधन मुक्तावलीच्या तीन सरांत मिळून संगृहीत केलें आहे. ऐतिहासिक संशोधन हें राष्ट्रसेवेचें महत्त्वाचें अंग आहे हें ध्यानांत घेऊन संशोधकांची भावी पिढी स्वतःसमोर श्री. मिराशी यांच्यासारख्यांच्या कार्याचा आदर्श ठेवील तर इतिहाससंशोधनांत आमचें राष्ट्र अग्रेसर होईल यांत शंका नाही.

(केसरी, ता. १८ सप्टेंबर १९६०)

साहित्याचार्य, बाळशास्त्री हरदास—

संशोधनमुक्तावलीच्या तिसऱ्या सरांतील हे सतराहि मोती पाणीदार असून आपल्या तेजाने प्राचीन इतिहासाच्या अज्ञात भागांवर प्रकाशकिरण टाकणारे आहेत..

नानासाहेबांच्या लेखणीची शालीनता परपक्षखंडनाच्या प्रसंगींहि कधी भंग पावत नाही व प्रतिपक्षी मर्यादा सोडून हवें तें लिहूं लागला तरी नानासाहेबांचा संयम कधी सुटत नाही हें त्यांचें लोभनीय वैशिष्टच आहे....ज्या विषयाचा त्यांनी तपेचीं तपें घालवून अभ्यास केला आहे त्याच विषयांवर साधक बाधक चिंतनाने स्थिर झालेलीं आपलीं मतें ते व्यक्त करतात व तीं इतक्या भक्कम पुराव्यानिशीं की तो पुरावा हेंच प्रतिपक्षाला चपखल उत्तर असतें.

(महाराष्ट्र ता. ३–११–१९५९)

मेघदूतांतील रामगिरि अर्थात् रामटेक

साहित्याचार्य, बाळशास्त्री हरदास—

सध्या भारतांत रामगिरीचा मान मिळविण्यासाठी अनेक पर्वत व त्यांचे पक्षपाती उभे आहेत पण कालिदासाचा रामगिरि ठरावयास एकच वादातीत कसोटी आहे व ती कसोटी म्हणजे कालिदासाने मेघदूतांत वर्णिलेला मेघाचा भौगोलिक मार्ग होय. शब्दार्थांची ओढाताण न करतां रामगिरि पर्वताशीं जुळला पाहिजे असा मार्ग केवळ रामटेकशींच जुळतो. त्यामुळे रामटेक हाच कालिदासाचा रामगिरि ठरतो. बाकीच्या सर्व पर्वतांना रामगिरि ठरवितांना कालिदासाच्या श्लोकांचे रूढ अर्थ फिरवावे लागतात. श्री. परांजपे यांचे रामटेकवरहि पुष्कळ आक्षेप आहेत पण ते सारे आक्षेप नानासाहेब मिराशी यांनी खोडून दाखविले आहेत......

मेघमार्गाचें मेघदूतांतील सूक्ष्म वर्णन खरें ठरण्यास दोन गोष्टी सिद्ध होणें आवश्यक आहे. पहिली गोष्ट म्हणजे कालिदासाचा विदर्भांत निवास होता हें सिद्ध करणें व दुसरी गोष्ट म्हणजे रामटेकचें प्राचीनत्व सिद्ध करणें. म. म. मिराशी यांनी कालिदास स्वत: विदर्भांत रामटेक-जवळच्या नंदिवर्धन या राजधानींत कित्येक दिवस राहिला होता व

रामटेक हें अत्यंत प्राचीन स्थान असून त्याचें प्राचीन नांवहि रामगिरि होतें हें शिलालेखादि निर्विवाद प्रमाणांच्या द्वारें सिद्ध करून दाखविलें आहे व तेंच मिराशी यांचें सर्वांत महत्त्वाचें कार्य होय.

(महाराष्ट्र ,नागपूर, दिनांक २० सौर वैशाख १८८१)

डॉ. वासुदेवशरण अग्रवाल (बनारस हिंदू विश्वविद्यालयांतील प्राचीन भारतीय संस्कृतीचे प्राध्यापक)—

अमरकंटक के साथ आम्रकूट की पहचान का सुझाव एकदम बेमेल और असंगत है और भौगोलिक उलझनों से भरा हुआ है। इस प्रकार स्थानीय अनुश्रुति, महानुभाव साहित्यिक परम्परा, प्रभावती गुप्ता का ताम्रपट की और उस क्षेत्र में प्राप्त शिलालेख की साक्षी एवं कालिदास के भौगोलिक उल्लेखों की समीक्षा—इन चारों मार्गों से एकहि परिणाम निकलता है। अर्थात् वर्तमान रामटेक ही प्राचीन रामगिरि था। इस क्लिष्ट विवादास्पद प्रश्न पर निर्णायक प्रकाश डालने के लिये लेखक बधाई के पात्र हैं।

डॉ. राजबली पाण्डेय (जबलपूर विश्वविद्यालयांतील प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृतीचे प्राध्यापक)—

मेघदूत का मेघमार्गवर्णन रामटेक पर पूरी तरह लागू होता है। रामगिरि से उत्तर चलने पर मेघ को मालक्षेत्र, आम्रकूट तथा नर्मदा नदी पडने वाले थे। रामटेक से नर्मदा उत्तर में है ही। बीच के माल की पहचान शिवनीछपारा के पठार से की गयी है। आम्रकूट की पहचान शिवनी छपारा के पश्चिमोत्तर सातपुड़ा से की गई है, जिस का प्राचीन नाम समीप के अमरवाडा गांव में अवशिष्ट है। परवर्ती मार्ग सन्देह का विषय नहीं। अतः मेघदूत के रामगिरि की रामटेक से अभिन्नता सिद्ध है।...

श्री. परांजपेने यह प्रतिपादित किया है कि मध्यप्रदेश में सरगुजा राज्य का रामगढ ही रामगिरि है।...किन्तु इस मत के विपक्ष में सब से बडी आपत्ति यह है कि मेघदूत का वर्णन रामगढ पर लागू नहीं होता और जैसा प्रो. मिराशीने दिखाया है अनेक स्थानोंपर यह दिखाने के लिए श्रीपरांजपे को श्लोकों के अर्थों में खींचतान करनी पडी है।

(भारती--Bulletin of the College of Indology, No. III)

Studies in Indology Vol. I

ग. त्र्यं. देशपांडे (संस्कृतचे प्राध्यापक, नागपूर विश्वविद्यालय)—

या ग्रंथांतील लेखांचा एकत्रितपणें विचार करतां डॉ. मिराशी यांच्या संशोधनकार्याचीं कांही वैशिष्टचें नजरेंत भरतात...पहिलें वैशिष्टच असें की भरभक्कम पुरावा असल्याशिवाय मिराशी निश्चयात्मक निर्णय काढीत नाहीत. त्यांचा निर्णय अनुमानधपक्याचा नसतो. उपलब्ध पुराव्याचें बलाबल कसें ठरवावें ही गोष्ट त्यांच्या लेखांवरून अभ्यासितां येते...एखादा निर्णय करून किंवा तर्क सांगूनच ते थांबत नाहीत, तर त्यामुळे इतर ऐतिहासिक प्रश्न कसे सुटूं शकतात हेंहि वेळोवेळीं दाखवून देतात. विशेष म्हणजे संस्कृत–प्राकृत वाङ्मय व इतिहास याचा परस्पर संबंध ते नेमका उजेडांत आणतात. म्हणून त्यांचे लेख इतिहासज्ञ व वाङ्मयाभ्यासक या दोहोंनाहि सारख्याच मोलाचे वाटतात.

(केसरी, २० ऑगस्ट १९६१)

विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर

स्वीय आणि पुरस्कृत ग्रंथ

संशोधन मुक्तावलि : सर १ ते ४—म. म. वा. वि. मिराशी
यांच्या संशोधनपर लेखांचे संग्रह **प्रत्येकीं किंमत चार रुपये**

मध्यप्रदेशांतील संशोधनकार्य (सन १९३४ ते १९५४)
जुन्या मध्यप्रदेशांतील संशोधकांनी वीस वर्षांत विविध विषयांत केलेल्या संशोधनाचा आढावा. **किंमत सव्वा रुपया**

औपनिषदिक जीवनसौख्य—कै. डॉ. के. ल. दप्तरी
यांनी वस्तुनिष्ठ आणि बुद्धिप्रत्ययक पद्धतीने लिहिलेला उपनिषदांचा उपसंहार. **किंमत चार रुपये**

संशोधनलेखसंग्रह : भाग पहिला—कै. हरि नारायण नेने
यांनी लिहिलेल्या संशोधनपर लेखांचा संग्रह **किंमत चार रुपये**

मेघदूतांतील रामगिरि अर्थात् रामटेक (हिंदी व मराठी)
म. म. वा. वि. मिराशी यांचा रामटेकविषयक संशोधनपर ग्रंथ
प्रत्येकी किंमत तीन रुपये

वार्षिक १९५८, १९५९ व १९६० **किंमत अनुक्रमें ४, ३, ४ रु.**

Studies in Indology, Vol. I—Dr. V. V. Mirashi
Rs. 15-00

विदर्भांतील ऐतिहासिक लेखसंग्रह
संपादक : डॉ. य. खु. देशपांडे व श्री. दे. गो. लांडगे **किंमत चार रुपये**

संशोधनांजलि
श्री. दे. गो. लांडगे यांच्या संशोधनपर लेखांचा संग्रह **किंमत पांच रुपये**

पुरञ्जनचरित-नाटकम् (कृष्णदत्तमैथिलकृत)
संपादक : प्रा. स. ल. कात्रे **किंमत तीन रुपये**

रा. सा. केशव शिवराम भवाळकर
यांचें आत्मचरित्र—संपादक : भ. श्री. पंडित **किंमत दोन रुपये**

Studies in Indology Vol. II—Dr. V. V. Mirashi
Rs. 20-00

प्राप्तिस्थान—चिटणीस, **विदर्भ संशोधन मंडळ,**
विदर्भ साहित्य मंदिर, सीताबर्डी, नागपूर १.